१४०२९ / विविध
१४१९०
४

# अनुक्रमणिका.

सालअखेर (द्वितीय वर्षाच्या समाप्तीचा निबंध.)
सालअखेर (तृतीय वर्षाच्या समाप्तीचा निबंध.)
हल्लींच्या विद्याभ्यासापासून दृष्टीवर परिणाम.
राजाराम कॉलेजांतील शास्त्रीय प्रदर्शन.
सुविचाराची ओहोटी.
[illegible]ाच्या शतकांती वेड्या समजुती-बेंजामिन फ्रांक्लिनची जबानी.
व्यवहार चातुर्य.
[illegible] चर्चेतले विषय.
१० पैशाविषयी
११ षष्ठिवार्षिक महोत्सव अथवा ज्यप[illegible] [illegible]विधी.

# सालअखेर.

आमच्या मासिक पुस्तकास आज दोन वर्षे पुरीं झालीं. राजारामीय मंडळीनें सुमूहूर्तावर हातीं धरलेल्या कार्यास, थोडीबहुत यशःप्राप्ति झाल्यानें, एक प्रकारचें समाधान मानण्यास कांहीं हरकत नाहीं. मासिकपुस्तकें व वर्तमानपत्रकर्ते यांचा दरदर बारा महिन्यांचा एक प्रवासाचा टप्पा मानण्याची चाल पडून गेली आहे. हिशेबाच्या सोयीनें, उद्योगाच्या सोयीनें, हा काल सर्वांनींच सोईवार ठरविला आहे. सरकार दरबार झालें तरी काय, ह्याच चालत आलेल्या वहिवाटीस अनुसरून आपली बहुतेक व्यवस्था वर्षापुरतीच करतें. कोणत्या खात्यांत काम कसें व किती झालें हें कळण्यासाठीं, वार्षिक हकीकत मागण्यांत येते. बाकी, खरोखर बाराच महिने गेल्यावर अशा प्रकारचें सिंहावलोकन कां करावें, ह्यास कांहीं विशेष कारण नाहीं. एक वर्ष झाल्याबरोबर, कांहीं अजब फेरफार होऊन लोकांच्या आयुष्क्रमांत कांहीं अंतर पडतें असें नाहीं; परंतु सर्व कामांत मानवबुद्धीनें सोयीच्या योजना केल्या आहेत, त्यांपैकींच ही एक आहे. कार्यप्रवाह तसाच चालला आहे व वृत्तपरंपरा अबाधित चालली आहे असें असतांना, जसा एकादा राजा मरण पावलेल्या तारखेपाशींच इतिहासाचा भाग संपावा, त्यांतलाच हा प्रकार आहे. खरोखर राजा ह्मणजे एक व्यक्ति. तिच्या मरणावर किंवा सिंहासनारोहणावर सर्व देशाच्या इतिहासाचे भाग करणें ह्मणजे समाजापेक्षां एका व्यक्तीचा उगीच बडेजाव करणें होय. कांहीं इतिहासकार असें करीत नाहींत व प्रमुख चळवळीवर नजर देऊन इतिहास लिहितात; पण त्यांनामुद्धां या अंधपरंपरेचा पाश सर्वथा तोडून टाकतां येत नाहीं. त्यांनासुद्धां आपल्या कालभागास राजाभिधानाचा महनीय आश्रय केल्याशिवाय ग्रंथ लिहावासें वाटत नाहीं. विक्टोरियन् युग, इलिझाबेथन् वाङ्मय, इत्यादि शब्दसमुदाय सहजासुल्या त्यांच्या लेखणींतून

उतरतात, बाकी इंग्लिश राज्याच्या वृद्धीस व इंग्लिश व्यापार व कलाकौशल्याचे बढतीस, व्हिक्टोरिआ राणीसाहेबांची मदत, त्या बसतात त्या सिंहासनापेक्षां, कांहीं विशेष झाल्याचें कोणाही कुशाग्रबुद्धि मनुष्याच्या समजुतींत येणें शक्य नाहीं. सारांश, जग हें रूढिवश आहे. मात्र त्यांत कमी अधिक प्रमाण. तद्वत् पृथ्वीची सूर्याभोंवती एक प्रदक्षिणा झाली किंवा चंद्राच्या पृथ्वीभोंवती बारा प्रदक्षिणा झाल्या, ह्मणून त्यांत तुह्मीं लागलींच मागें वळून कां पहातां? चाललेला क्रम पुढें सुरू ठेवण्याचें सोडून विचार कसला करता, असा साहजिक प्रश्न उत्पन्न होतो. सरकार तरी वार्षिक हकीकत कां मागतें, नवीन अंदाजपत्रकें कां करितें? वर्तमानपत्रकर्ते सिंहावलोकन कां करितात? इत्यादि इत्यादि. तर याचें उत्तर एक प्रकारचें पूर्वीं दिलेंच आहे. तें हेंच कीं, असें करण्यांत सोय आहे. मानवी कार्यें सृष्टिदर्शनाप्रमाणें नव्हेत. प्रथमपासून तीं एकसारखींच चालावयाचीं नाहींत. ईश्वरानें निर्माण केलेले सूर्य, चंद्र हे कालदर्शक कांटे केव्हांच थांबत नाहींत. मोडतोड झीज ह्या गोष्टींची त्यांना भीति नाहीं. त्यांच्या चालक यंत्राची किल्ली संपत नाहीं; परंतु मानवी घड्याळजी एकदां घड्याळ करून स्वस्थ बसूं शकेल का? मधून मधून त्याला किल्ली दिल्याशिवाय चालेल काय? घांसून पुसून साफ ठेवण्याची जरूरी आहे कीं नाहीं? पांच चार वर्षांनीं तरी तार निराळी घालावी लागते कीं नाहीं? केव्हां तरी चक्रें स्वच्छ केलीं नाहींत, तर तें बिघडणार नाहीं काय? तात्पर्य, मानवी कृत्यास ही कालिक तपासणी अत्यंत आवश्यक आहे, परंतु ती तशी तपासणी करण्याचें काम, आपला मार्ग खुंटावा, आपलें काम अडावें, व फटफजिती उडावी, अशामुळें मध्येंच केव्हांतरी करण्याचा प्रसंग पडूं नये, ह्मणून आपल्या उद्योगाचा मगदूर पाहून या तपासणीचा काल ठरविला पाहिजे. आणि तो एकंदर विचार करितां, बारा महिन्यांनीं एकदां ठरविण्यांत सोय दिसून आल्यानें तसा ठरविला आहे.

गेलें साल मराठी भाषेस फार वाईट गेलें, असें ह्मणण्याचें कारण नाहीं; तथापि सेक्रेटरी साहेबांनीं मेहेर नजर करून या विषयाकडे लक्ष

पुरविण्याची शिफारस केली होती, त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. **श्रीमंत सयाजीव महाराज सेनाखासखेल समशेर बहादूर** यांणीं, परम औदार्यानें सुरू केलेल्या ग्रंथमालिकेंत विशेष भर पडली नाहीं. बडोदे सरकारच्या हस्तावलंबाची अद्याप मराठी भाषेस गरज आहे. इंग्लिश वाङ्मयाप्रमाणें, केवळ लोकाश्रयावर महाराष्ट्र ग्रंथसंग्रह निर्माण होऊन त्याचा प्रसार होईल, असा काल अद्यापि आला नाहीं; तर इकडे सर्व देशाभिमानी राजेरजवाड्यांनीं लक्ष पुरविणें अत्यंत अगत्याचें आहे. पाश्चात्य देशांतील लोकांची विचारसरणि, त्यांची राजकीय औद्योगिक व सामाजिक उन्नतीची कल्पना, आमच्या लोकांस जितक्या अल्प आयासानें कळतील तितकें आपलें कल्याण आहे. हें काम कालावधीवर पडेल, तर आपला उत्कर्षकालही कालावधीवर पडला, असें आपण खास समजलें पाहिजे. एकंदर समाज घोर अंधकारात चाचपडत राहून, केवळ त्याचा अत्यल्प अंश ज्ञानवान् झाला, तर कांहीं उपयोगी नाहीं. ही सामान्यस्थिति; पण जगांतील सांप्रतकालच्या भयंकर जीवनकलहांत, आमच्या लोकांचें अज्ञानापासून आमचा सर्वस्वी घात होत आहे. आमच्यांतील धंदेवाईक लोकांस युरोपीयन धंदेवाईक लोकांशी चढाओढ करण्याचें सामर्थ्य नाहीं. ब्राह्मणवर्ग, ज्यानें आजवर उद्दीमधंदा केला नाहीं, त्यास तो करणें कमीपणाचें वाटत आहे. तेली, माळी, साळी, कोष्टी, सुतार, लव्हार, चांभार इत्यादिकांस युरोपांतील कलाकौशल्याची कल्पना जर आली, तर त्याच्या हाडामासांत खिळलेल्या कलाकौशल्याचा प्रादुर्भाव झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांना उदार शिक्षण फारसें नको; पण धंदेशिक्षणच फार पाहिजे; पण तेंच येण्यास त्यांचा पश्चिम जगांतील कल्पनांशीं थोडा तरी परिचय झाला पाहिजे. आमच्या राज्यकर्त्यांविषयीं त्यांची कल्पना, केवळ ते ईश्वरतुल्य आहेत, अशी आहे. आमचे लोकांतील ह्मण कोणास माहीत नाहीं वरें? ‘ ईश्वराची करणी, नारळांत पाणी आणि इंग्रजांची करणी, बंबांत पाणी. ’ तर अशाप्रकारें ज्या समाजांतील महाजनसमूहाचा समज आहे, त्या समाजास स्वावलंबनशक्ति कशी येईल ? आपण दुबळे, नामर्द आणि सर्वथा पंगु, आपल्यावर राज्य

करणारे सर्वशक्तिमान्, असा जेथें ग्रह, तेथें थोडेसें वाचून वाचून आंधळे झालेले शिक्षित लोक काय करणार? शिक्षणाचे योगानें अशक्त न होतां, शिक्षण प्राप्त करून घेण्याचें असल्यास तें देशीभाषेशिवाय होणें अशक्य आहे. एक शिक्षण किंवा शिक्षणपद्धति एवढ्यानेंच आह्मीं अशक्त झालों असें नाहीं. त्याला दुसरीं अनेक व सबळ कारणें आहेत. त्या सर्वांचें आदिकारण मात्र एकच आहे; पण हा विषयच वेगळा आहे. प्रस्तुत आमचा रोख इतका आहे कीं, आपल्या लोकांत ज्ञानाचा अत्यंत सुलभ रीतीनें प्रसार करण्यासाठीं सर्वांनीं झटलें पाहिजे, आणि हें काम देशीभाषेंत नानाविध ग्रंथसंग्रह निर्माण झाल्याशिवाय होण्याची बिलकूल आशा नाहीं.

विश्वविद्यापीठांत देशीभाषांचा थोडा तरी प्रवेश व्हावा ह्मणून कांहीं खटपट झाली; पण तिला अद्यापि यश आलें नाहीं; पण या कामीं आमची व्हावी तशी खटपट होत नाहीं. हा प्रश्न सर्व हिंदुस्थान देशास सारखाच महत्वाचा आहे. विश्वविद्यापीठांचा सरकाराशीं अत्यंत निकट संबंध आहे, आणि जरी साक्षात् रीतीनें सरकारास यांत कांहीं करतां आलें नाहीं, तरी सर्व हिंदुस्थानचें मत या बाबतींत प्रदर्शित होणें अत्यंत अगत्याचें आहे. हा प्रश्न सामाजिक किंवा धार्मिक नव्हे. याचा राजकीय प्रश्नाबरोबर विचार करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. प्रथमतः पाहिजे असल्यास याविषयीं कांहीं सूचना निरनिराळ्या विश्वविद्यापीठास कराव्या. या योगानें देशभर ह्या बाबतींत चळवळ सुरू होईल. सारांश, राष्ट्रीयपरिषदेच्या अनेक प्रश्नांत हा प्रश्न सामील कां होऊं नये हें आह्मांस कळत नाहीं.

गतवर्षाच्या सालअखेरचे लेखांत डेक्कन व्हरनॅक्युलर सोसायटी ही नवीन संस्था अस्तित्वांत आली किंवा जुनीच जागृत झाली, अशाविषयीं उल्लेख केला होता. त्या संस्थेनें गेल्या सालांत कांहीं ग्रंथास बक्षिसें लावून व कांहीं आलेले तपासून त्यास बक्षिसें देऊन, मराठी भाषेची योडीबहुत सेवा केली आहे. याहीपेक्षां या संस्थेकडून अधिक कामें होण्याची आह्मांस मोठी आशा आहे. ह्या संस्थेत कांहीं वृद्ध व

कांहीं तरुण अशी मंडळी असल्यानें, उत्साह व अनुभव या दोन्हींच्या योग्य मिश्रणापासून अनुरूप फलप्राप्ति झाल्यावांचून राहणार नाहीं.

दुसरे महाराष्ट्र भाषेमध्यें ग्रंथसंग्रह वाढविण्याचे दोन व्यवस्थित प्रयत्न अव्याहत चालू आहेत. भाषांतर मासिकपुस्तक पूर्वीप्रमाणेंच थाटानें चालत आहे, व रा० रा० दाभोळकर यांच्या प्रयत्नास तर अधिकाधिक उत्तेजन मिळत चाललें आहे, हें पाहून आह्मांस अत्यंत समाधान होतें.

याशिवाय मराठींत नवीन जे ग्रंथ होत आहेत, त्यांच्याबद्दलही या ठिकाणीं दोन शब्द लिहिले नाहींत, तर गेल्या सालचा मराठी भाषेचा इतिहास अगदीं अपुरा होईल यांत शंका नाहीं. या बाबतींत आह्मांस फार संतोष वाटतो कीं, ग्रंथकर्ते, पुस्तक खपेल कोणतें यावर नजर न देतां, चांगल्या विषयावर पुस्तकें लिहिलीं पाहिजेत व तीं चांगल्या तऱ्हेनें लिहिलीं पाहिजेत, या गोष्टीवर आपली भिस्त ठेवीत आहेत. प्रसंगविशेषीं, रंगप्रयोगासाठीं जनरुचीस अनुरूप नाटकें व प्रहसनें झालीं आहेत; पण त्यांची संख्या अगदीं थोडी. गेल्या सालांत चांगलीं मनन करून वाचण्याजोगीं पुस्तकें बाहेर पडलीं आहेत, तीं खरोखरच आमच्या ग्रंथालयास शोभादायक आहेत; आणि एका शहरावरून इतर ठिकाणचें अनुमान काढणें बरोबर होईल, तर लोकही तीं पुस्तकें केवळ कपाटास शोभाच ह्मणून ठेवूं देत नाहींत. कितीएक तर मोठ्या आवडीनें वाचलीं जात असून चर्चाविषयही होत आहेत. अशा प्रकारचें सर्वांत मागाहून प्रसिद्ध झालेलें प्रिन्सिपाल गोळेकृत 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' हें होय. या पुस्तकांतील मुख्य मुद्दा, शिक्षण पद्धतींतील दोषांपासून होणारे अनिष्ट परिणाम हा आहे. हें पुस्तक वाचून आह्मांस, गोपाळ नरसिंह देशपांडे नांवाचे इंदापूर रयतेचे कुलमुखत्यार ह्मणून व्याख्यान देत एक गृहस्थ फिरत असत, त्यांचें स्मरण झालें. त्यांचें शरीर धिप्पाड, आवाज पहाडी आणि भाषणांत शौर्य आणि आवेश अगदीं भरलेला. आणि रा० गोळे यांस आह्मीं पाहिलें नसतें, तर त्यांच्या पुस्तकावरून त्यांचेंही असेंच चित्र आमच्या कल्पनानेत्रापुढें उभें

राहिलें असतें. कै० रा० रा० देशपांडे यांचा प्रत्ययशब्द (वॉचवर्ड) 'तन्दुरुस्ती;' हेंच नांव या पुस्तकासही शोभलें असतें. एकंदरींत, या पुस्तकांत मनन करून लवकर उपयोगांत आणल्या पाहिजेत अशा सूचना पुष्कळ आहेत.

याहून महत्वाचें पण आंकड्यांनीं भरलेलें असल्यामुळें सामान्य वाचकांस फार न आवडणारें पुस्तक ह्मणजे "हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थिति" हें होय. याच्या कर्त्यास एक महिन्याचेचपूर्वी निर्घृण काळानें आह्मांमधून ओढून नेल्यामुळें, मोठा शोधक व दीर्घवाचक असा महाराष्ट्रमित्र नाहींसा झाला! रा० रा० सोमण यांचें पुस्तक प्रत्येक स्वदेशहितचिंतकानें आपलेजवळ ठेऊन त्याचें पारायण करावें व त्यांतील माहिती व तिजपासून निरनिराळीं स्पष्ट व गूढ अनुमानें काढून, त्यांचा व्यवहारदृष्ट्या उपयोग करावा. तसा प्रत्येकानें केल्यास आमच्या देशाची निकृष्ट दशा फार दिवस राहणार नाहीं.

सिसरोचें चरित्र व त्याचा देवावरील निबंध, नीतिमुक्ताहार, शिवदिग्विजय, प्रपंचरहस्य इत्यादि वाचण्याजोगीं चांगलीं पुस्तकें होत आहेत. याशिवाय नेहमींप्रमाणें मासिकपुस्तकें व वर्तमानपत्रें आपआपल्यापरी देशभाषेची सेवा करीत आहेत, त्यांत नांव घेण्याजोगीं वर्तमानपत्रें केसरी व सुधारक. यांणीं बरीच कामगिरी बजाविली आणि आमच्या इलाख्यांत गतसालीं राष्ट्रीयसभा नसती, तर याहींपेक्षां त्यांनीं बहारीचीं कामें केलीं असतीं.

गेल्या सालीं महाराष्ट्र भाषेचा एक कट्टा भोक्ता व वाचकांचीं मनें आपल्या लेखणीच्या तालावर नाचविणारा लेखक नाहींसा झाला! प्रिन्सिपाल आगरकर व यमाजी भास्कर यांचा सारखा झगडा आज कितीएक वर्षे चालला होता; पण आगरकरासारखा महावीरच ह्मणून डाव्या हातानें यमाचा हात धरून उजव्या हातानें सुधारकद्वारा महाराष्ट्रभाषामातेची सेवा करीत होता. त्यांना होत असलेल्या वेदना पाहून, आमच्यासाठीं त्यांणीं जगांत रहावें असें इच्छिणारे आपण अत्यंत दुष्ट आहों असें आह्मांस वाटे; परंतु प्रेम मूढच नव्हे, तर अंध

आहे. शास्त्रीबोवांचे मागें आगरकर यांणीं तरवार गाजविली यांत कांहीं शंका नाहीं.

असो; याप्रमाणें साधारण मानानें आज महाराष्ट्र ग्रंथांचा व महाराष्ट्र भाषेचा वृत्तांत आहे; याहून कितीपट तरी प्रयत्न होणें जरूर आहे याचा विचार झाल्याशिवाय हा वर्षपरिसमाप्तीचा लेख संपविणें अगदीं वाजवी नाहीं.

सदरील हकीकतीवरून वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच कीं, आतां अभ्यास करणाऱ्या लोकांस मराठींत अगदीं ग्रंथसंचय नाहींच असें ह्मणतां येणार नाहीं. गायकवाड सरकारचे ग्रंथ, दाभोळकरांचे ग्रंथ, हेमंतव्याख्यानें, प्रवासवर्णनें, भारतीयसाम्राज्य, मिलचें स्वातंत्र्य, नाना फडणीस, महादजी शिंदे, झांशीची राणी, शास्त्रीबोवा हीं चरित्रें, काव्येतिहासांतील बखरीं, कांहीं थोडे इतिहासग्रंथ व वर निर्दिष्ट केलेलीं पुस्तकें इत्यादि ग्रंथ वाचल्यानें, अनांग्लज्ञ पुरुषास अथवा स्त्रीस थोडी बहुश्रुतता येईल, असें आह्मांस वाटत नाहीं. याशिवाय शास्त्रीयपुस्तकें प्रोफेसर मोडक यांची व सरकारी विद्याखात्याकडून तयार झालेलीं वेगळींच. अशा एकंदर वाङ्मयांत दिवसेंदिवस भर पडत आहेच. आमचे वडिलार्जित काव्यवाङ्मय तर एका जन्मांत वाचून संपणारें नाहींच. त्याचाही उद्धार प्रसिद्ध विद्वन्मणि रा० रा० वामनराव ओक हे काव्यसंग्रहाचेद्वारा करीत आहेत, व आपल्या टीपावरून मार्मिकपणें काव्याचें अध्ययन कसें करावें त्याची दिशा दाखवीत आहेत. तुकाराम, रामदास यांचा जितका परिचय आपल्या लोकांस अधिक होईल, तितका देशाभिमान व कर्तव्यविचार अधिक जागृत होईल. इतक्या साधनांचा उपयोग केला असता, अभ्यासी मनुष्याच्या डोक्यावर वेळेचें ओझें फार जड होईल, असें कोण ह्मणेल तें ह्मणो; आह्मांस तर तसें ह्मणवत नाहीं.

हा प्रकार केवळ अनांग्लज्ञांसच लागू आहे असें समजण्याचें कारण नाहीं. आंग्लभाषा जाणणारे कितीएक लोक मोठ्या डौलानें असें प्रतिपादितात कीं, आलीकडे मराठींत लिहिलेले ग्रंथ वाचण्यापेक्षां, ते

ज्या इंग्लिश ग्रंथांचे भाषांतर अगर रूपांतर असतील, ते मूळ ग्रंथच वाचलेले बरें; पण असें ह्मणणाऱ्यांपैकीं कोणीही अनुभव घेऊन पाहिला आहे असें आह्मांस वाटत नाहीं. कांहीं शब्द मराठींत पूर्णपणें सामील झाले नसले तरी, एकंदरीनें मराठींतील लेख सुलभरीतीनें कोणत्याही विषयाचा परिचय करून देण्यास अधिक समर्थ असतात, असें आह्मीं खात्रीनें सांगूं शकतो. स्पेन्सरसारखे ग्रंथ जितक्या मेहनतीनें वाचकांस समजतील, त्याच्या निमे परिश्रम केलें तर, मराठींत आणलेले स्पेन्सरविचार त्यांच्या हस्तगत होतील यांत आह्मांस काडीइतकी शंका नाहीं. पण इंग्लिशमध्यें कितीका खटपट पडेना, मराठींतून वाचतांना ते विचार झपाझप डोक्यांत शिरत गेले पाहिजेत. मराठी वाचकांस दुर्गम ग्रंथ वाचण्याची संवय नाहीं व स्पेन्सरसारखे ग्रंथांचीं भाषांतरें वाचण्यास हातीं धरण्यापूर्वीचें त्यांचें शिक्षण त्या योग्यतेचें झालेलें नसतें, ह्मणून चांगलाच दृढनिश्चय व खरोखर बलवत्तर ज्ञानलालसा असल्याशिवाय दुभाषी ग्रंथकारांच्या आयासाचें चीज होत नाहीं. इंग्लिश जाणणारे लोकांस अत्यल्प श्रमानें अति गहन विचाराचा फायदा घ्यावा ह्मटलें तर, त्यांच्या तबियतीचें मान कसें असतें त्याचें दिग्दर्शन केलेंच आहे. यांनीं बहुधा विशेष न वाचतां, भराभर अभिप्राय ठोकून देण्याचा सपाटा सुरू केला असतो. अभिप्राय देण्यास चार दोन पानें बसल्या बसल्या किंवा उठल्या उठल्याच डोळ्याखालून घालावयाचीं. तेवढ्यांत इंग्रजी शह्लास लिहिणाऱ्यांनीं मोठ्या खटपटीनें तयार केलेले चार दोन शह्ल किंवा एक दोन कां होईना, त्यांच्या नजरेस पडतात तेवढ्याच भांडवलावर आपल्या सारख्याच मंडळींत यांचा टीकाव्यापार सुरू होतो. कायहो ‘ सहक्रिया ’ हा शब्द यांनीं Cooperation याला केला आहे. Agency याचें ‘ कर्तृवर्ग ’ असें भाषांतर केलें आहे असें दिसतें. कायहो, हे मराठी वाचकास समजणार तरी कसें? आह्मांला कित्येकांनीं तर असें साफ सांगितलें आहे कीं, तुमच्या ग्रंथमालेबरोबर एक एक शास्त्री पाठवीत चला. आह्मीं निमूटपणें ऐकून घेतलें. आह्मांला या पूर्वापरविवेकशून्य टीकाकारांच्या तोंडीं लागून काय करावयाचें? त्यांना आमचें सविनय सांगणें एवढेंच कीं, सात आठ

पानें काळजीनें वाचा आणि मग जे शब्द संदर्भांतून पृथक् करून नुसते उच्चारिले असतां उपहासास्पद भासतात, ते वाक्यांत व ग्रंथखंण्डांत पाहिले असतां, तसें खचित वाटणार नाहींत. सर्वांगसुंदरीचे अवयव वेगळे करून जर आपणांपुढें आणले, तर आपणास त्या स्त्रीच्या लावण्याची कल्पना यत्किंचित् तरी येईल काय? नवीन केलेले असे शब्द थोडे असतात व ते जुन्याच्या सांनिध्यानें व्यक्तार्थ होतात. त्यांचा पुनः पुनः उपयोग आला ह्मणजे तेच परिचित भासतात. असा क्रम आजवर बहुतेक सर्व शब्दांचा झाला आहे. आहेत तेवढ्या शब्दांवर गुजारा करावा; वाक्यरचना लांबट झाली तरी हरकत नाहीं, असा कित्येकांचा आग्रह आहे; पण सर्व विषयांवरील ग्रंथासंबंधानें हा निर्बंध पाळणें अशक्य आहे. सामान्य विषयामध्यें हा पाळतां येईल; पण भाषा दरिद्री राहील. मनांतला अर्थ कमी अधिक जोरानें दाखवितां येईल; पण अधिकाधिक कल्पनातरंग उचंबळू लागले, तर त्यांचें यथायोग्य प्रदर्शन होणें कठीण नव्हे, तर अशक्यच होईल. इंग्लिश लोकांनीं व आमचे पूर्वज संस्कृत ग्रंथकारांनीं अशा नवीन नवीन शब्दघटनेच्या क्रमाचा अवलंब केला नसता, तर त्या भाषांचे प्रौढत्वादि गुण अस्तित्वांत आले नसते. फार कशाला, मराठीसच अशाप्रकारें बंधनागारांत कोंडून ठेविली असती, व दरवाजावर नूतनशब्दप्रवेशास प्रतिबंध करणारे गडकरी ठेविले असते, तर हल्लीं जेवढी ग्रंथरचना मराठींत आहे, तेवढीसुद्धां शक्य झाली नसती; परंतु पुराणप्रिय मंडळीचा एक विशेष गुण असा आहे कीं, एकदां एखादा शब्द घुसडून आंत गेला, ह्मणजे मग हे लोक त्यास बाहेर काढूं इच्छित नाहींत व शकत नाहींत. तेव्हां ह्यास खुष करून प्रवेश करणें शब्दास अशक्य आहे.

उगीच वाटेल तसे भलभलते शब्द करून घालावे असें कोणासही वाटणार नाहीं. जेथें निरुपाय होतो, त्या ठिकाणींच नवीन शब्दयोजना करण्यांत येते. चालढकल केली तरी होईल; पण कितीएक वेळा आह्मांस इंग्लिश भाषेचा मत्सर वाटतो. त्यांच्या भाषेंत एकाद्या

कल्पनेस अनेक प्रकारें गौरवितां यावें व आह्मांस तसें करितां येऊं नये हा कमीपणा वाटतो. या साठीं आमची प्रियकर मातृभाषाही तशीच मातबर व्हावी ह्मणून संस्कृत भाषेच्या साहाय्यानें ग्रंथकार कार्यसिद्धि करून घेतात. इंग्लिश भाषेंतही साधे व प्रौढ असे दोन प्रकारचे वाक्यप्रयोग आहेत. उदाहरणार्थ, एकाद्या साध्या पुस्तकांत इंग्रजींत On the whole it comes to this असा सरळ व सुगम प्रयोग असतो पण शास्त्रीय ग्रंथांत याच अर्थाचा व्यंजक वाक्यप्रयोग कसा असतो पहा. The collected result of it is this. "एकंदरींत यावरून असें होतें कीं," हें भाषांतर पहिल्या स्थळीं योग्य आहे व दुसऱ्या ठिकाणीं चालण्याजोगें आहे; पण ज्याला संस्कृत भाषेच्या आयुधागारांत यथासुख संचार करून, वाटेल त्या शस्त्राची निवड करण्याची संधि व मोकळीक आहे, तो सामान्य शस्त्रावरच खूष कां राहील? 'याचा संकलित परिणाम असा होतो कीं' अगर अशासारखेंच समयोचित भाषांतर त्याचे हातून होणें सहज आहे आणि तसें होण्यांतच मराठीभाषेचें हित आहे. तात्पर्य काय कीं, शब्द व कल्पना यांची सांगड आहे. शब्द हीं लहानशीं काव्येंच आहेत. सामान्यतः ज्यांस आपण काव्यें ह्मणतों, त्यास जशी प्रतिभेची अत्यंत आवश्यकता असते, तद्वत्च शब्द निर्माण करण्यासही उपजत व अथवा कष्टलब्ध प्रतिभा अत्यंत जरुरीची आहे. कालिदास, भवभूति, शेक्सपीअर, व गटे असे महाकवि व नाटककार होऊन गेले; पण त्यांची सामग्री तयार करणारे असंख्यात व अज्ञात अशा कवींचा कोणीच स्तव करीत नाहीं. एक साधा शब्द, **चरण, कर,** किंवा **वदन** या शब्दांत काय कमी काव्य आहे? त्या त्या कृति लक्ष्यांत आणून हीं अवयवनांमे बनविलीं आहेत. तसेंच करापासून **कररुह** ह्मणून नखाला शब्द बनविणारा तर चांगलाच कवि असला पाहिजे यांत शंका नाहीं. अशा तऱ्हेनें पदार्थांचे गुणधर्म व त्यांची व्यापकता पाहून शब्द बनवावे लागतात; पण आमच्या दुदैवानें बहुधा आयतेच तयार झालेले उपयोगांत आणण्याचेंच काय तें काम आमच्याकडे राहिलें आहे. क्वचित् स्थळीं दोन तीन मिळून

एक करावयाचें काम असतें. क्वचित् एखादा दुसरा प्रत्यय लावून मूळाचें रूपांतर करावयाचें असतें. एकंदरीनें गतवर्षी लिहिल्याप्रमाणें सांप्रत मराठी भाषेचा क्रांतिकाल आहे. युरोपीय भाषांना हा काळ येऊन गेल्यास दोन तीन शतकें गेलीं आहेत. काव्य वाङ्मयासंबंधानें आमच्या भाषेस हा काल त्याच सुमारास येऊन गेला. अंतर इतकेंच कीं, त्यांची अभिवृद्धि एकसारखीच चालली आहे. आमच्या भाषेची आमच्या देशाप्रमाणें दैन्यावस्था झाली. असो; हा भाषाभिवृद्धीचा ह्मटला तर एक निराळा विषय आहे. याचा पृथग्रूपानें पुढें एखादे वेळीं विचार करूं. लवकरच रीतिमीमांसा ( Philosophy of style) ह्या स्पेनसरच्या निबंधाचें रूपांतर देणार आहों. त्यांतच याविषयीं अधिक चर्चा करण्याचा आमचा मानस आहे. तूर्त नुसता, वाद-स्थलाचा निर्देश करून, आमच्या बाजूनें बोलण्यास कांहीं जागा आहे इतकेंच टीकाकारास जाणविणेचा हेतु होता. एवढ्यावरून, आलीकडील लिहिणारावर सरसकट संस्कृतमिश्रित लिहितात ह्मणून फर्डेशाही शेरा मारण्याचें धाडस कोणी करूं नये, इतकें वाचकांच्या ध्यानांत येईल. अशा प्रकारचा शेरा, **डायरेक्टर ऑफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन** ह्मणजे सार्वजनिक शिक्षणाचे नायक, ज्यांनीं, विद्याखात्यांतील सर्व लोकांस योग्य मार्ग दर्शवावा, तेच खुद्द सरकारच्या आश्रयानें लिहिणाऱ्या आज-वरच्या ग्रंथकारांची भाषारीति नीट होती, हल्लीं लिहिणारांची संस्कृतमय झाली आहे, असें लिहून जातात, तेव्हां सांप्रत जगांत काय चाललें आहे याचें सूक्ष्म निरीक्षण त्यांनीं केलें नाहीं याशिवाय अधिक लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

असो; याप्रमाणें वाचकवर्गांत हल्लीं लिहिणाराची कशी संभावना होते त्याविषयीं थोडें लिहिलें. चालू विषयावर खरमरीत टीका किंवा सद्यः-स्थितीवर एखादा झणझणीत लेख लिहिला, ह्मणजे जरा मंडळींना आवडतो; पण तशी जनाराधना करण्यासाठीं आमचा अवतार नसल्यानें, त्याविषयीं लिहिण्याचा आमचा अधिकार पोहोंचत नाहीं. आमचे कांहीं बंधु हें काम चांगल्या रीतीनें बजावीत आहेत, तरी पण तशा प्रचलित विषयावर

भारदस्त लेख ज्यांत येतील, अशा प्रकारचें एकादें मासिक किंवा निदान त्रैमासिक मराठींत पाहिजे आहे. राजकीय विषयापुरतें हें काम सातारकर **राष्ट्रभक्त** करील असें वाटत होतें; पण कधीं मंडूकप्लुति, तर कधीं मंदगति, अशानें सर्वथा 'अदर्शनं लोपः' हीच पाळी येते कीं काय, अशी भीति वाटत आहे. ह्या एकट्याच मासिकाचा हा दोष आहे असें नाहीं, तर चार दोन सन्मान्य अपवाद खेरीजकरून, हा कालातिपात-दोष सर्वच मासिकांस ग्रासित आहे. वर्तमानपत्रें नियमित निघूं लागलीं आहेत; पण मासिकांचें बीं अद्याप ह्या आमच्या प्रांतांत रुजत नाहीं, इकडे आमचे बंधु लक्ष देतील अशा आशेनें हा स्नेहोपदेश केला आहे. असो; मुख्य मुद्दा राहिला तो हा कीं, प्रचलित सामाजिक, औद्योगिक, राजकीय, शास्त्रीय अशा विविध विषयावर, नाइन्टीन्थ सेंचरी, फॉर्टनाइटली वगैरे सारखें एकादें तरी मासिक इकडे नाहीं ही मोठी उणीव आहे. महाराष्ट्रांतील सर्व सुशिक्षित ह्मणविणाऱ्यांनीं मनावर घेतलें, तर हें कांहीं दुर्घट काम नाहीं. तूर्त वादविवादांत न पडतां, आमच्या समाजासंबंधीं अगदीं जिव्हाळ्याचे विषय आहेत, त्यावर मथून मथून शास्त्रीयरीत्या व्यापक विचाराचे निबंध सवडीप्रमाणें आह्मीं घालीत असतों; परंतु हें काम वेगळ्या मासिकानेंच केलें पाहिजे.

दुसरा एक विषय हल्लीं लोकांस प्रिय होत चालला आहे, तो हिंदुस्थानचा व त्यांत मराठे लोकांचा इतिहास. यासंबंधानें जुने लेख, कागदपत्र, बखरी वगैरे लोकांस वाचावयास पाहिजे आहेत. या कामीं काव्येतिहाससंग्रहाच्या तेवढ्या भागाचें पुनरुज्जीवन व्हावें, अशी शिक्षित लोकांत इच्छा दिसत आहे. काव्याचें काम निर्णयसागरानें सुरेख चालविलें आहे. इतिहासास मात्र कोणी वाली भेटला नाहीं. जुन्या खऱ्या इतिहासाचा लोप होऊन इंग्रज लेखक सर्व क्षेत्र व्यापीत आहेत. इकडे आमच्यांतील जुन्या पुराण्या घराण्यांतील लोकांनीं व राजेरजवाड्यांनीं लक्ष्य पुरवावें.

इतकें सर्व झालें तरी लोकांत वाचनाची अभिरुचि उत्पन्न होऊन, त्यामध्यें सामान्यतः उदात्त विचारांचा फैलावा झाल्याशिवाय कांहीं

उपयोग नाहीं. शिक्षित व अशिक्षित लोकांचा हल्लींहून अधिक निकट संबंध झाला पाहिजे. शिकलेल्या लोकांचा अडाणी लोकांस बाऊ वाटतो, तसें त्यांस वाटूं नये. शिकलेल्या लोकांसही, सामान्य व्यापारी, उद्दीम धंदेवाले लोकांचासुद्धां स्नेह संपादणें कमीपणा वाटतोसें दिसतें; तेंही कामाचें नाहीं. साधारण अडाणी लोकांतसुद्धां कीं ज्यास लिहिणें, वाचणें मुळींच माहीत नाहीं, अशा लोकांत सुज्ञान व सुविचाराचा प्रसार संभाषणाच्या द्वारानें झाला पाहिजे. तसें होण्यास सुशिक्षित लोकांनीं आपल्या वर्तनानें व उपदेशानें लोकांस सुजाण करण्याची खटपट केली पाहिजे. सरकारी नोकरीवर असलेले व खासगी उद्योग करणारे अशा सर्व शिक्षित लोकांनीं, आपआपल्या शक्ति व संधीप्रमाणें, आपल्या साक्षात् सहवासाचा फायदा सर्व लोकांस देण्याचा यत्न केला पाहिजे. शिक्षणाविषयीं लोकांचे मनांत आदर उत्पन्न होण्याजोगें शिक्षितांचें वर्तन असलें पाहिजे. शिक्षित लोक विशेषत: पदवीधर व पाठशालांत कांहीं दिवस असलेले ह्मणजे पदवीच्छुदशेंत ज्यांनीं पाठशालेचा कोणत्या नाहीं कोणत्या तरी कारणानें संबंध सोडला, अशांनीं स्वत: वाचन कायम ठेवून, जवळच्या लोकांस कांहींतरी ज्ञानार्जनाच्या मार्गास लावण्याचें काम केलें पाहिजे. जागजागीं वाचनाचे आखाडे घालून लोकसमुदायापुढें चांगलीं पुस्तकें, निबंध व प्रासादिक कविता वाचून दाखविल्या पाहिजेत. लहान मुलांच्या जशा शाळा, तसे प्रबुद्ध लोकांसाठीं हे वाचनाचे आखाडे. शाळांतील शिक्षकांचा ह्या कामीं पुष्कळ उपयोग होईल. सरकार पहा कसें हुशार आहे तें? टपालच्याकामीं शिक्षक लोकांचा आपल्या खात्यांतील कर्तृवर्गांत त्यांनीं समावेश केला आहे. असाच उपयोग ठिकठिकाणच्या शिक्षित लोकांनीं वाचनमंदिरें स्थापून, कमी पगारांच्या शिक्षकांस कांहीं थोडेसें पोहोंचवून, तीं वाचनमंदिरें थाटून दिलीं, तर त्यांनीं समाजावर व देशावर अतोनात उपकार केल्यासारखें होईल.

लोकांत वाचनाची अभिरुचि उत्पन्न व्हावी ह्मणून, कांहीं बक्षिसेंहि ठेवावी. तशा प्रकारचा कांहीं अल्प आरंभ करण्याचें ठरवून, आज आह्मीं

एक जाहिरातही दिली आहे तिकडे वाचकांनीं लक्ष्य पुरवावें व आप-आपल्या परिचित मंडळीपैकीं अनांग्लज्ञ लोकांकडून तीं पुस्तकें वाचवावीं. हल्लींच्या आमच्या स्थितींत ह्याहून अधिक किंवा अधिक मोहक बक्षिसें ठेवतां येत नाहींत. परंतु केवळ बक्षिसाच्याच आशेनें वाचणें नीट नाहीं, हें सुज्ञ जनांस सांगण्याचें कारण नाहीं. बक्षिसें ठेवण्यांतला हेतु इतकाच कीं, चांगले लोक पुढें यावेत व वाचन मार्मिकपणानें व्हावें.

आतां सरतेशेवटीं, पूर्वीं वचन दिल्याप्रमाणें आमच्या हिशेबाची स्थिति आपल्या प्रिय वाचकापुढें मांडावयाची एवढेंच काय तें राहिलें आहे. गेल्या दोन वर्षांपुरतेंच पाहूं गेलें असतां, आमच्या हिशेबाचें काम फार साधें आहे. जमेच्या व खर्चाच्या बाबतींत फार भानगड नाहीं. कारण आमच्या वाढत्या संसाराबरोबर आमच्या गरजाही वाढत आहेत. ह्मणून ज्या बाबीबद्दल आज खर्चांत पूज्य आहे, त्याबद्दल कांहीं रकमा पुढें येणें साहजिक आहे. हल्लीं पूज्य असलें तरी, त्याबद्दल खर्च झाला नाहीं असें नव्हे; तर तो या कामाशीं ज्या ज्या व्यक्तींचा संबंध आहे, त्यांच्या खासगी व सार्वजनिक खर्चांत व व्यवस्थेंत मुरून जाण्याजोगा असल्यानें, त्याचा पृथक् निर्देश करणें सुलभ नाहीं. परंतु लवकरच ग्रंथमालेची ह्मणून सर्व वेगळी मांडणी होणार आहे, त्यांत त्या सर्व बाबी येतील; ह्मणून आज त्यांचा नुसता निर्देश करण्यांत येत आहे.

| जमा. | | खर्च. | |
|---|---|---|---|
| ५५० | प्रो० रघुनाथराव आपटे यांनीं प्रथम खर्चास ह्मणून दिली ती रकम. | ६६५ | पहिले वर्षीं छापणावळीबद्दल. |
| ३०० | पहिल्या वर्षास करवीर सरकारचे आले ते. | २५० | प्रो० आपटे यांस परत केले |
| २६५ | वर्गणीदाराकडून जमा तारीख ३१ मार्च १८९५ पर्यंत ह्मणजे पहिले वर्षअखेर. | ६०० | दुसरे वर्षाचे छापणवळीपैकीं दिले ते. |
| | | ५५ | पहिले वर्षीं जाहिरातीबद्दल खर्च. |
| | | २० | दुसरे वर्षीं जाहिरातीबद्दल खर्च. |

६७५ ग्रंथमालेचे दुसरे वर्षारंभापासून वर्गणीदारांकडून आजपर्यंत आले ते.

---

१७९०

७५ पहिले वर्षी टपालखर्च.
८० दुसरे वर्षी टपालखर्च.
५ शिळाछापावरील आकृतीबद्दल खर्च.

---

१७५०

स्टेशनरी, कारकून, शिपाई, घरभाडें, अशा प्रकारचे इतर बाबतींत येणारा खर्च ग्रंथमालेस न झाल्याचें वर लिहिलें आहेच.

**जमा पुढें होणेची तिचा अदमास.**

३०० दुसऱ्या वर्षाबद्दल सरकारांतून यावयाचे.
४५० वर्गणीदारांकडून येणेची.

**खर्च पुढें होण्याचा त्याचा अदमास.**

१७५ छापणावळीपैकीं देणें आहे
१५ खोतीहक्कावरचाला याच्या अधिक प्रति काढल्याबद्दलचा आकार.
३०० प्रो० आपटे यांचे देणेचे.

सदरील आंकड्यावरून वाचकांचे लक्ष्यांत येऊन चुकलें असेल कीं, या लेखांत दर्शविलेल्या तऱ्हेनें शिक्षणाचे कामीं चांगलेंच उत्तेजन देण्याची खटपट करण्यास, ग्रंथमालेसारख्या मासिक पुस्तकांचा आणखी जागोजागीं उदय झाला पाहिजे. ग्रंथरचना करणारे निरपेक्ष लोक मिळणें, अद्यापि आपल्या भरतभूमींत अशक्य नाहीं. विद्यादान हा ब्राह्मणांचा धर्म. आणि तें मोबदल्याची आशा न करतां करावें हें उत्तम; परंतु तशाप्रकारें बहाणा बाळगून राहणाऱ्या ब्राह्मणांस पूर्वींचा राजाश्रय व लोकमान्यता मिळत नाहीं; तथापि ती बुद्धि सर्वथा आपल्या लोकांतून लुप्त झाली नाहीं. ग्रंथकार पुढें येण्यास डेक्कन वर्नाक्युलर ट्रान्स्लेशन

सोसायटी सारख्यांनीं बक्षिसें लावण्याचें कारण नाहीं. किंबहुना तशीं लावणें ह्मणजेच निरपेक्ष श्रम करण्याची जागृत असलेली बुद्धि ठार करणें असेंच आह्मांस वाटतें. ग्रंथरचना फुकट करून द्यावी, व पुस्तकापासून पुढें फायदा झाला तर, त्यापैकीं कांहीं अंश ग्रंथकारास दिला जाईल, अशा तत्वावर व्यवस्था केली, तर रुचिवैचित्र्यास अवकाश राहून लोकोपयोगी ग्रंथ निर्माण होतील. वाटल्यास एवढ्या मोठ्या संस्थेनें महाराष्ट्रभाषेंत ज्या विषयावर ग्रंथ झाले पाहिजेत, अशाविषयांची अथवा युरोपीय भाषांपैकीं ज्या ग्रंथांचीं भाषांतरें अथवा रूपांतरें होणें जरूर आहे, अशा परकीय पुस्तकांची यादी नुसती प्रसिद्ध केली ह्मणजे बस आहे. अशा तत्वावर ग्रंथसंग्रह करण्याचा उद्योग, पुण्यांतील भाषांतर व आमची ग्रंथमाला यांचा सुरू आहे. वाटेल त्यानें वाटेल तो ग्रंथ लिहावा, आह्मांस पसंत पडेल तर, ग्रंथकारास कवडीचा त्रास पडूं न देतां तो छापून काढूं. त्या ग्रंथाच्या अधिक प्रति काढून तो लोकप्रिय झाला, तर ग्रंथकारांस आपोआप फायदा होईल. अशा व्यवस्थेवर ग्रंथसंग्रह निर्माण होणें शक्य आहे, हें दोन वर्षांतच वरील मासिक पुस्तकांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. हीच गोष्ट लवकरच क्रमाक्रमानें प्रसिद्ध होणाऱ्या, दास्यांतून आपली मोठ्या कष्टानें सुटका करून घेतलेल्या राष्ट्रांच्या इतिहास-मालिकेवरूनही व्यक्त होईल.

अशी एकंदर हकीकत आज वाचकांस सादर केली आहे. त्यांचें क्षेम असून आह्मांवरील प्रेम अबाधित राहो, व अशाच रीतीनें परमेश्वर आमच्या हातून चिरकाल देशसेवा घेवो, एवढीच प्रार्थना करून हा लेख संपवितों.

स्वधर्मस्वदेशस्वभाषादिकांचा ।  
जगीं मान व्हावा असा हेतु साचा ॥  
मनीं योजिला, अल्प हा यत्न केला ।  
जनाला सदा तोषवो **ग्रंथमाला** ॥

# सालअखेर.

प्रस्तुत अंक हा, **ग्रंथमालेच्या** तिसऱ्या वर्षाच्या शेवटचा आहे. श्रीमन्महाराज **शाहूछत्रपति** यांच्या अधिकारस्वीकाराच्या सुमुहूर्तावर सुरू केलेल्या या उद्योगास, आजला तीन वर्षे पुरीं झालीं. एवढ्या काळांत आमचे हातून कांहीं ग्रंथ व कांहीं निबंध पूर्ण झाले आहेत व कांहीं चालू आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे.

आमच्या भाषेंत ग्रंथसंग्रह फार कमी, त्यांत देशास उन्नतावस्था प्राप्त होण्यास विशेषतः सहायभूत होणारें सृष्टिशास्त्रीय व ऐतिहासिक वाङ्मय आमच्या भाषेंत फारच कमी आहे. ही उणीव दूर करावी व केवळ मराठी भाषा जाणणारांस सृष्टिशास्त्र व इतिहास ह्या विषयांचें ज्ञान होण्याचें साधन मराठी भाषेंत व्हावें, या हेतूनें आह्मीं ग्रंथमाला काढण्याचें योजिलें. त्यांत प्रसंगविशेषीं इतर विषयांचाही समावेश करीत आलों व पुढेंही करूं; परंतु मुख्यत्वेंकरून पाश्चात्य राष्ट्रांपासून जें व्यवहारोपयोगीं शिक्षण मिळण्याजोगें आहे, तें मराठी भाषेंतूनही मिळावें, हा प्रधान उद्देश आह्मीं मनांत योजिला आहे. यासाठीं मोठमोठ्या स्त्रीपुरुषांचीं चरित्रें, निरनिराळ्या राष्ट्रांचें इतिहास व सृष्टिशास्त्राच्या निरनिराळ्या शाखा, उपशाखा आणि त्यांचेही भाग घेऊन, त्यावर ग्रंथ व निबंध प्रसिद्ध करण्याचा आह्मीं उपक्रम केला आहे. आह्मीं हल्लीं प्रसिद्ध करीत आहों, यापेक्षांही अधिक ग्रंथ व निबंध छापून प्रसिद्ध करण्याची आमची इच्छा आहे व तसें करण्यास आमच्या जवळ ग्रंथकारबल आहे व तें वृद्धिंगत होण्याचाही संभव आहे; परंतु या कामास जितका लोकाश्रय पाहिजे तितका नाहीं. आह्मीं आपलें पुस्तक नेमलेल्या दिवशीं प्रसिद्ध करितों. लोकांस समजेल अशा भाषेंत लिहिण्याचा यत्न करितों; परंतु एकंदरीनें पहातां अजून आह्मांस

जितका वाचकवर्ग मिळावा तितका मिळत नाहीं. अद्यापि आह्मां-मधील केवळ मराठी भाषा जाणणारे लोक तात्त्विक विषयावरील ग्रंथ व निबंध वाचण्यास तयार नाहींत, हें सहज कबूल करण्यासारखें आहे; पण ऐतिहासिक ग्रंथांची तरी तशी गोष्ट नसावी. ते ग्रंथ वाचण्यास मोठे परिश्रम करावे लागत नाहींत. चरित्रें वाचण्यास तर फारच आनंद वाटावा; परंतु ह्या गोष्टीकडे हळूंहळूं अधिकाधिक प्रवृत्ति होत आहे, असें मानण्यास कारण आहे. आमच्या समाजांत प्रत्येक स्त्रीपुरुषास लिहितां वाचतां आलें, ह्मणजे आमच्या प्रय-त्नाची अधिक चीज होईल यांत शंका नाहीं.

गेले सालीं मराठी भाषेसंबंधानें फारसे चांगले नवीन ग्रंथ निपजले असें ह्मणतां येत नाहीं. सर्वांत शोचनीय अशी गोष्ट ह्मटली ह्मणजे, श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं, आपला या कामीं चालविलेला उद्योग बंद केला, ही होय! अशा प्रकारचा एकादा उद्योग हातीं धरून तो तडीस नेण्यास राजेरजवाडे लोकांत मात्र आतां सामर्थ्य आहे. गाय-कवाड सरकारांनीं या कामीं अप्रतिम औदार्य प्रकट केलें; परंतु आमच्या अल्प मतीस असें वाटतें कीं, त्यांनीं देशांतील ग्रंथसंपत्ति वाढविण्याच्या कामीं सर्व बोजा आपले अंगावर घेणें वाजवी नव्हतें. ग्रंथांस चांगलीं बक्षिसें लावून ते तयार करविणें, इतकेंच काम सांप्रत स्थितीमध्यें कोणत्याही सरकारानें करण्याजोगें आहे. एकदां ग्रंथ पसंत ठरला, ह्मणजे त्यावर ग्रंथकाराचा हक्क राहून, त्यानेंच त्याची पुढील व्यवस्था करावी हेंच सोइकर आहे. सरकारानेंच पुस्तकप्रका-शन व पुस्तकविक्रय हींहि कामें आपणांकडे ठेविलीं, तर त्यांची व्यवस्था नीट राहणें शक्य नाहीं; आणि हल्लीं झालेला परिणाम केव्हांनाकेव्हां तरी झाल्याविना राहिला नसता. असो; खरोखर पाहिलें असतां, श्री० गायकवाड सरकार यांनीं पुढें काम बंद ठेवल्या-बद्दल त्यांना दोष देण्यापेक्षां, त्यांनीं आजवर केलेल्या महत्कृत्याबद्दल कृतज्ञतापूर्वक त्यांचा स्तव करणें हेंच वाजवी आहे. शिवाय, जोंपर्यंत विद्याभिवृद्धि व्हावी अशी श्रीमंतांची बुद्धि जागृत आहे, तोंपर्यंत एका

नाहीं दुसऱ्या रूपानें त्यांच्या औदार्याचा या कामीं उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं.

महाराष्ट्र भाषेंत ग्रंथसंग्रह वाढविण्यासाठीं, व्यवस्थित रीतीनें चाललेले दुसरे दोन प्रयत्न ह्मणजे रा० रा० **दाभोळकर** यांची पुस्तकावली व **भाषांतर** मासिकपुस्तक हे चालू आहेतच. या दोनीही प्रयत्नांचा उल्लेख गेल्या दोन सालच्या सालअखेरच्या लेखांत केला आहे, त्याहून अधिक येथें लिहिण्याचें कारण नाहीं.

गेल्या सालचे लेखांत, पुण्याच्या **डेक्कन व्हरन्यॉक्युलर ट्रॅन्सलेशन सोसायटी** नामक संस्थेपासून आपल्या महाराष्ट्रभाषेचें बरेंच हित होण्याचा संभव आहे असें ह्मटलें होतें; व त्यामध्यें बडी बडी मंडळी आहेत तेव्हां या संस्थेच्या हातून, इतर जागत्या भाषांप्रमाणें व हिंदुस्थानांतील इतर विश्वविद्यापीठाप्रमाणें, आमच्या भाषेचा प्रवेश मुंबईच्या विश्वविद्यापीठांत होऊन, तिचा राजदरबारींही दर्जा वाढेल अशी अशा प्रकट केली होती. या संस्थेच्या हातून, आलेलीं पुस्तकें तपासून त्यांस लहान मोठीं बक्षिसें देण्यापलीकडे कांहीं झालें नव्हतें; परंतु गेल्या कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून या संस्थेच्या विद्यमानें, **भारतवर्ष** नांवें करून एक रमणीय मासिक पुस्तक निघूं लागलें आहे. याच्या योगानें, पूर्वीं कांहीं कालपर्यंत थाटांत चालत असून बंद पडलेल्या **काव्येतिहाससंग्रहा**पैकीं इतिहाससंग्रहाचें पुनरुज्जीवन झालें आहे; तें पाहून प्रत्येक स्वदेशाभिमान्यास आनंद झाला आहे. प्राचीन बखरी व इतर लेख याशिवाय स्वतंत्र नवीन लेखही येण्याची योजना केली आहे. या मासिकपुस्तकाचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत जावा अशी आमची मनापासून इच्छा आहे.

अशाप्रकारें कांहींअंशीं बऱ्याच मोठ्या प्रमाणावर, देशीभाषेंत ग्रंथ निर्माण व्हावेत ह्मणून चालू असलेल्या प्रयत्नांची हकीकत आहे. बाकी मासिक पुस्तकें आपआपल्या मगदुराप्रमाणें देशसेवा बजावीत

1M170



आहेत. त्यांत पुस्तकपरीक्षणाचें काम मोठ्या हौसेनें व मार्मिकरीतीनें बजावून शिवाय स्वतंत्र लेखही बरेच पुढें आणणारें मासिकपुस्तकशिरोमणि **विविधज्ञानविस्तार** याचें नांव प्रथम घेतलें पाहिजे. इतकीही खटपट होऊन कितीएकवेळां आपले वर्तमानकार व टीका करणारे लोक नेहमीं ह्मणत असतात कीं, आपल्या भाषेंत एकादें **नाइन्टीन्थ सेंचरी, फार्टनाइटली रिव्ह्यु, कॉंटेंपररी रिव्ह्यु, एडिन्बरा रिव्ह्यु, क्वार्टर्ली रिव्ह्यु**सारखें एकादें मासिकपुस्तक कां निघत नाहीं? अशाप्रकारचा प्रश्न करितांना, आमच्या लोकांची व देशाची स्थिति लोक लक्षांत घेत नाहींत. सदर मासिकपुस्तकांत ज्या मगदुराचे लेख येतात, तसे लिहिण्याइतकी विद्वत्ता व शोधकबुद्धि आह्मांपैकीं फारच थोड्यांमध्यें आहे, ही गोष्ट प्रांजळपणें कबूल केली पाहिजे. तशाप्रकारची योग्यता येण्यास जी परिस्थिति अत्यावश्यक आहे, ती आह्मांमध्यें नाहीं. पहिल्यापासून ज्या शिक्षणपद्धतीमध्यें आमची वाढ झाली असते, तिचा परिणामच असा आहे कीं, बहुतेकांची दृष्टि तात्कालिक गोष्टीच्या पलीकडे जाऊं नये. एका परक्या भाषेचा अभ्यास करण्यांत व तिच्याद्वारें सर्व विषय तयार ठेवण्यांत, शक्तीचा व बुद्धीचा इतका व्यय व ऱ्हास होऊन जातो कीं, एकदां अभ्यासाचें जूं परमेश्वरकृपेनें मानेवरून खालीं झालें कीं, पुनः तें घ्यावें अशी इच्छाच प्रायः होत नाहीं. परीक्षापिशाचिकेनें पछाडलेल्या विद्यार्थ्यास घोकंपट्टीचा मंत्र साधला ह्मणजे, त्याची एकदाची सुटका होते; पण पुनः पुस्तक पाहिलें कीं, कंटाळा आल्यासारखें होऊन जातें. आलीकडे आलीकडे तर, परीक्षायंत्रांतून पार पडल्याबरोबर मध्यान्हकालची चिंता पुढें दत्त करून उभी राहते. अशा स्थितींत निरपेक्ष ज्ञानार्जनास अवश्य लागणाऱ्या साधनांच्या अभावामुळें, आमच्या लोकांतील बुद्धीचा उपयोग व्हावा तसा होत नाहीं. निःशस्त्रता आल्यानें सर्वपरी शारीरिक निःशक्तता प्राप्त झाली आहेच; तशीच गोष्ट मानसिक निःशक्ततेची. शिवाय आपल्या लोकांची घोर अज्ञान स्थिति पाहून, पुस्तकें वाचून, निरनिराळ्या स्वतंत्र राष्ट्रांची भरभराट साक्षात् पुढें उभी राहिल्यानें, आपल्या

देशाचा व लोकांचा कांहीं केल्या पाय वर निघण्याची आशा नाहीं; जिकडे पहावें तिकडे आपला नाशच होत चालला आहे असें नजरेस पडून, शिक्षित लोकांचा मेंदू जळून जाऊन मोठी तळमळ उडून जाते. प्रचंड प्रमाणावर अव्याहत प्रयत्न चालू ठेविलें तर कांहीं होईल; पण त्याला आड येणारें विघ्नशैल डोळ्यापुढें येऊन, छाती दडपून जाते. अशांतून कांहीं तरी धडपड करावीच करावी, असें कांहीं लोकांस वाटतें; पण त्याचें प्रमाण फार कमी असल्यानें, वर नांवें लिहिलेल्या मासिकपुस्तकांसारखें पुस्तक बाहेर येणें मुष्कील पडतें. चाललेल्या सांप्रत निरनिराळ्या प्रयत्नांवरून, मग ते प्रयत्न राजकीय, औद्योगिक किंवा सामाजिक सुधारणेच्या दिशेनें का असेनात; पण जिकडे तिकडे योग्य कार्यकर्त्या माणसांची वाण दृष्टोत्पत्तीस येते. यासाठीं स्वतंत्र राष्ट्रामध्यें ज्या गोष्टी शक्य आहेत त्या गोष्टी आपणांत नाहींत; म्हणून उगीच खेद करीत बसणें सुविचाराचें नाहीं. ज्या कारणानें **ग्लॅडस्टन**, **बीकन्सफील्ड** सारखे मुत्सद्दी; **गॉर्डन**, **राबर्टस** सारखे महावीर; **फ्रीमन्**, **लेके** सारखे इतिहासकार; **टेनिसन**, **ब्राउनिंग** सारखे कवि होत नाहींत. त्याच कारणासाठीं वरच्याप्रमाणें अलौकिक मासिक पुस्तकेंही आमच्यांत निर्माण होत नाहींत. त्यातल्यात्यांत इतकाच आनंद मानावयाचा कीं, हल्लीं या विषयाकडे, चांगले शिकलेल्या इंग्रजी लोकांची प्रवृत्ति झपाट्यानें होत आहे. दहा वर्षांच्या पूर्वी पदवीधरकृत पुस्तकांची संख्या किती, व गेल्या दहा वर्षांतील किती, याचें प्रमाण पाहिलें तर, आपणास बरेंच समाधान मानण्यास सबळ कारण आहे. अजूनही कित्येक पदवीधरमंडळी अशा प्रयत्नांचा उपहास करणारी, किंवा आपण तरी त्या प्रयत्नास हातभार लावण्याचें कारण नाहीं, असें साफ बोलून दाखविणारी आहेत. विश्वविद्यापीठास रामराम ठोकल्यादिवसापासून, ज्यांचा अनध्यायमहोत्सव सुरू झाला व ज्यांना गप्पाष्टक व पत्ते यांशिवाय किंवा फार झालें तर टेनिसशिवाय किंवा पुस्तकदर्शन झालेंच तरी कादंबरीशिवाय करमणूक होतच नाहीं, असे पदवीधर आहेत हें मोठ्या खेदानें कबूल करणें प्राप्त आहे; परंतु त्या लोकांस

आमची सविनय प्रार्थना इतकीच आहे, "बापहो! विचार करा. दास्य व पारतंत्र्यांत तुमचा देश बुडून गेला आहे. परराज्य, परधर्म, परभाषा यांनीं तुमचें स्वत्व नष्ट करण्याचा उपक्रम केल्यास, आज बहुत काल लोटून गेला आहे. श्रीमंत लोक असे दिसणारे पुष्कळ असले, तरी त्यांच्या जवळ संपत्ति अशी बिलकुल नाहीं. राजेरजवाड्याजवळ सदांसर्वदां चांगलेच उपदेशक असतात असा नियम नाहीं. तुह्मी नवीन शिकून तयार झालेले लोक ह्मणजे हल्लींच्या समाजांतील मध्यम वर्ग; त्यांजवर फार मोठी जबाबदारी आहे. राहिल्यासाहिल्या संपत्तीचा उपयोग वरिष्ठ लोकांकडून व्हावा, अशाबद्दल तुमचीच सर्वतोपरी खटपट असली पाहिजे. आपणांपेक्षां संपत्तीनें श्रेष्ठ लोकांच्या संबंधानें हें तुमचें कर्तव्य आहे. तुह्मांस जी विद्या प्राप्त झाली आहे, तिला साजेल, तिचा बोज ज्यांत राहील, जो विद्यासंपन्न तोच सदाचारसंपन्न, असा जेणेंकरून जगांत ग्रह उत्पन्न होईल, अशा तऱ्हेचें तुमचें वर्तन असेल, तरच सरदार, मानकरी, राजेरजवाडे व इतर श्रीमान् लोकांवर तुमचें पडावें तसें वजन पडेल; नाहींतर आपल्या विद्येस कलंक लावाल. विद्या, अधिकार व राज्यकर्त्याशीं साक्षात् दळणवळण यायोगानें तुमच्या मंडळीस एक प्रकारचें विशेष महत्त्व हल्लींचे काळीं आलें आहे; यामुळें परका राजा व आपले देशबांधव यांमधील वकीलपणा व दुभाषीपणा तुमच्याकडे आला आहे. तर त्या महत्वाचा विचार करून क्षुल्लक व्यवसायांत कालहानि होऊं देऊं नका. केवळ गरीब लोक अन्नान्न करून पटापट मृत्युमुखीं पडत आहेत. अज्ञान घनघोर पसरल्यामुळें, आपमतलबी लोकांच्या जाळ्यांत सांपडत आहेत. तर त्यांस सुजाण करण्याची जबाबदारी तुह्मांवर आहे. तुमचीं बायकामुलें व तुह्मीं ज्या पैशावर आज चैन करीत आहां, ते पैसे मिळण्याची योग्यता तुह्मांमध्यें येण्यास, सरकारांनीं या गरीब प्रजेपासून घेतलेलें द्रव्य खर्ची घातलें आहे. त्याचा मोबदला तुह्मीं त्या प्रजेस कोणत्या रूपानें देणार? परदेशी आसवांचा फडशा उडवून कीं काय? त्यांच्या डोळ्यांतील आसवांस खळ पडूं देण्याचा कांहीं मार्ग काढणें तुह्मांस अवश्य नाहीं काय? त्यांचें अनुरक्षण, स्वतःच्या

सुरक्षणाखालीं तुह्मांस सुचूं नये, यासारखी अधमाधमतेची किंवा निदान कृतघ्नतेची तरी दुसरी गोष्ट असेल, असें आह्मांस वाटत नाहीं. पशूंस व तुह्मांस आहारनिद्रादिकर्में लागलीं आहेत; पण त्यापेक्षां कांहीं जास्ती गुण तुह्मांमध्यें ठेवले आहेत. तुमच्या पूर्वजांनीं त्या गुणांचा चांगला उपयोग कसा करावा, हें दाखविलें आहे. कालानुसार पौरुष दाखविणें हेंच तुह्मांस उचित आहे. ‘ आह्मांस कांहीं येत नाहीं, आमचे हातून कांहीं होणें शक्य नाहीं, आह्मीं नामर्द आहों, आह्मी नाउमेद झालों आहों,’ असे उद्गार काढून कित्येक लोक आमच्या तोंडावरून हात फिरविण्याची खटपट करितात. पण त्यांस एकच उत्तर आहे ‘ तुह्मांस इच्छा नाहीं; इच्छा असेल तेथें मार्ग आहे.’ तुह्मीं ग्लॅडस्टन, मॉरले, हक्सले, टिंडाल, स्पेन्सर इत्यादि मंडळींपैकीं नाहीं. तसें आहा ह्मणून तुमचा मिथ्या स्तुतिपाठ आह्मीं करूं इच्छित नाहीं. तुमच्या बांधवांची स्थिति अत्यंत शोचनीय आहे. त्यांना तुमच्या शिवाय दुसरा तरणोपाय नाहीं. या गोष्टींचा विचार करा. या पलीकडे तुमच्या सारख्या शहाण्यासुरत्या लोकांस अधिक सांगण्याची आमची शक्ती नाहीं आणि सांगण्याची पण गरजही नाहीं. ” या विनंतीस मान देऊन आमचे पदवीधर मित्र व इतर शिक्षित मित्र, आपापल्या ठिकाणीं आपापल्या संधिसवडीप्रमाणें अज्ञान लोकांस सुजाण करण्याची खटपट करतील अशी आशा आहे.

असो; येथवर गेल्या सालांत महाराष्ट्रग्रंथसंग्रहाचे कामीं कोणकोणते उद्योग झाले व आणखी कोणते होण्याचा संभव आहे, ते कोणाच्याहातून होतील, इत्यादि गोष्टी थोडक्यांत लिहिल्या- आतां आमच्या पुस्तकासंबंधानें चार शब्द लिहून हा लेख आटपावयाचा. पूर्वीच सांगितलें आहे कीं, शिक्षितमंडळींचें लक्ष या गोष्टीकडे अम्मळ अधिक लागूं लागल्यामुळें, छापण्यास मजकुराची वाण पडत नाहीं. लोकाश्रय भरपूर मिळाल्यास २०० पानांचेंदेखील मासिकपुस्तक काढतां येईल, अशी आजला आमची खात्री झाली आहे; पण यास समाजांतील प्रत्येक व्यक्तीस लिहितां वाचतां आलें पाहिजे. महाकवि कालिदास

याच्या ह्मणण्याप्रमाणें लिपिज्ञान हें, सर्व प्रकारचें वाङ्मय आपलें करून घेण्यास प्रथम द्वार आहे. * तें सर्व लोकांच्या हस्तगत झाल्याशिवाय आमचे मनोरथ पूर्ण सिद्धीस जाणार नाहींत. यासाठीं तूर्त आहे हाच प्रकार चालू ठेवून, प्रसंगविशेषीं जरूर वाटेल तेवढे फेरफार करूं. प्रत्येक अंकांत थोडी बहुत तरी प्रस्तुत विषयावर चर्चा असावी असें पुष्कळ लोक सुचवितात. तसेंच एकाच अंकांत संपणारीं प्रकरणें घालावीत, अशीही कित्येकांची सूचना आहे. इतिहासग्रंथांत जागोजाग नकाशे घालावे अशीही उत्तम सूचना कित्येकांकडून करण्यांत आली आहे. कित्येकांचें ह्मणणें, कांहीं भाग विशेषतः स्त्रियांस उपयुक्त होईल असा असावा. अशा नाना प्रकारच्या सूचनांचा सवडीप्रमाणें व साधनानुकूल्याप्रमाणें विचार करीत आहों. प्रस्तुत चर्चेतील विषयासंबंधानें इतकेंच सांगावयाचें कीं, त्या भागाकडे कधीं कधीं सुमारें आठ पृष्ठें देऊं व तो भाग वाचनीय व उपयुक्त होण्याचा प्रयत्न करूं. व त्या भागास विविधपणा, मोहकपणा व चटकदारपणा जितका आणवेल तितका आणण्याचा मानस आहे, ह्मणजे त्याच्यामध्यें सार्वकालिक महत्व नसल्याबद्दल वाचकवर्ग आह्मांवर रुष्ट होणार नाहींत. प्रचलित विषयापासून बोध घेण्यासारखा कांहीं तात्विक भाग असेल तर, त्यावर निबंध लिहिणें हें आमच्या कार्यक्रमाबाहेर नाहीं. फक्त वर्तमानपत्राप्रमाणें, सरकारच्या विवक्षित कायद्यावर किंवा कृत्यावर टीका करणें, हें मात्र आमचें मुख्य काम आह्मीं समजत नाहीं. यापेक्षां या बाबतींत आज कांहीं अधिक लिहितां येत नाहीं.

आजवर ग्रंथमालेंत लहान मोठे ग्रंथ व निबंध मिळून सुमारें पंधरा प्रकरणें पूर्ण झालीं, व सुमारें तितकींच चालू आहेत. या सर्वांचें वाचन करून कोणी कांहीं सूचना करतील, तर त्याबद्दल आह्मी त्यांचे फार आभारी होऊं. सर्वांमध्यें या कामीं आमची फारशी भिस्त मराठी मास्तरमंडळी व इतर केवळ मराठी जाणणारे लोक यांजवर आहे. अशा

---

* लिपेर्यथावद्ग्रहणेन वाङ्मयं । नदीमुखेनेव समुद्रमाविशत् ॥ रघुवंश. सर्ग ३

लोकांस आम्ही इंग्रजी व संस्कृत या भाषांतील ग्रंथामध्यें जें कांहीं वाचतों, त्यापैकीं कांहीं भाग समजावा, हा हें पुस्तक काढण्यांत आमचा हेतु आहे; ह्मणून त्या लोकांस आमच्या प्रयत्नापासून फायदा होतो असें कळल्यास, आह्मांस फार आनंद होईल. तशा लोकांनीं आपण वाचलेले भाग, आपण ज्या ठिकाणीं राहतों तेथील लोकांस वाचून दाखविले अगर समजून सांगितले, तर आमच्यावर त्यांचे फार उपकार होतील.

हें **ग्रंथमालेचें** काम हातीं घेण्याचें ठरलें, त्यावेळीं आमच्या मित्रमंडळीस हें एक वर्ष तरी तडीस जातें कीं नाहीं, अशी भीति वाटत होती; परंतु परमेश्वर कृपेनें आज या पुस्तकांत लिहिण्यास दिवसेंदिवस अधिक अधिक लोक पुढें येत आहेत. प्रथमतः हें पुस्तक काढण्याचें काम राजारामीय मंडळींनेंच हातीं घेतलें. आतां राजारामीय मंडळीच्या बाहेरचे पदवीधर व इतर शिक्षित लोकही आपल्या टाकानें आह्मांस साहाय्य करण्यास सिद्ध आहेत. पैकीं रा० रा० लक्ष्मणराव चिपळूणकर व प्रो० राजाराम रामकृष्ण भागवत यांचे आह्मांस विशेषेंकरून आभार मानिले पाहिजेत. रा० रा० चिपळूणकर यांचा महाराष्ट्राचा इतिहास वाचकांस फार प्रिय झाला आहे. त्याचा पहिला भाग औरंगजेबाच्या मरणापर्यंतचा वेगळा पुस्तकरूपानें लवकरच विक्रीस तयार होईल. प्रो० भागवत यांचे मार्मिक व शोधक रीतीनें लिहिलेले लेख सर्वांस प्रिय होणार नाहींत; पण बुद्धिमान् व चौकस वाचकांस त्यापासून ज्ञानलाभ झाल्याशिवाय राहणार नाहीं.

आमचा सालअखेरचा लेख, आमचे मित्र रा० रा० शंकरशास्त्रीबोवा गोखले यांच्याकडून आह्मांस मिळालेल्या साहाय्याचा उल्लेख न करतां संपविला, तर आह्मीं मोठ्या दोषास पात्र होऊं. आह्मीं नियमितपणें मासिकपुस्तक प्रसिद्ध करतों, ही जी अभिमानोक्ति आह्मीं करितों, याचें बहुतेक श्रेय शास्त्रीबोवांसच आहे. त्यांच्याकडून मुद्रितें ( प्रुफ ) तपासण्याचे कामीं आह्मांस फारच मदत होते. त्यांच्या शुद्धाशुद्धविवेचनशक्तीचा आह्मांस अतिशय उपयोग होतो. एकंदरींत आमच्या कामास **विद्याविलास** छापखान्याची अमोलिक जोड

मिळाली आहे, याबद्दल आमची तीन वर्षांच्या अनुभवावरून खात्री झाली आहे.

सरतेशेवटीं, आमच्या ग्रंथमालेस ज्यांनीं आश्रय दिला त्यांचे आभार मानितों. त्यांत विशेषतः **श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन,** मिरज संस्थानचे अधिपति यांणीं, आपल्या संस्थानच्या मुख्य शाळांस वांटण्याकरितां ग्रंथमालेच्या प्रति घेऊन आह्मांस मोठें उत्तेजन दिलें आहे, त्याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक आह्मीं स्तव करितों. इतर संस्थानिकही अशीच मेहरबानी करून आमचे प्रयत्नास उत्तेजन देतील अशी आशा आहे. **श्रीमंत शाहूमहाराज छत्रपति सरकार करवीर** यांच्या उदार आश्रयाबद्दल मनोभावानें त्यांचे उपकार स्मरून, त्यांस परमेश्वर दीर्घायु करो व सर्वदा सुखी राखो, अशी प्रार्थना करून हा लेख संपवितों.

**आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।**
**तोषोनि मज द्यावें । *पसायदान हें ॥ जे ख-**
**ळाची ¶व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती**
**वाढो । भूता परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥**

ज्ञानेश्वर.

**पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण ।**
**तो दुरात्मा दुरभिमान । मत्सर करी ॥**

रामदास.

स्वधर्मस्वदेशस्वभाषादिकांचा
जगीं मान व्हावा असा हेतु साचा ।
मनीं योजिला, अल्प हा यत्न केला
जनाला सदा तोषवो **ग्रंथमाला** ॥

———————

* प्रसाद. ¶ वक्रदृष्टि.

# *हल्लींच्या विद्याभ्यासापासून दृष्टीवर परिणाम.

आलीकडे कोणत्याही विषयावर लिहिण्यास प्रारंभ करतेवेळीं, किंवा एकाद्या पुस्तकास प्रस्तावना लिहितेवेळीं, इंग्रजीराज्य झाल्यापासून आगगाडी, सडका, पोष्ट ऑफिस, विद्याखातें वगैरे अशा अमूल्य देणग्या मिळाल्या असून, पाश्चात्य सुधारणेपासून आह्मांस अतिशय फायदा होत आहे, असें दर्शविण्याची चाल आहे; परंतु बारीक दृष्टीनें पाहणारांस, पाश्चात्य सुधारणेपासून अगदीं निव्वळ फायदाच होतो अशी जी लोकांची समजूत आहे, ती साधार वाटत नाहीं. कोणत्याही संस्थेपासून जो फायदा होतोसा वाटतो, त्यांत सुखाची व दुःखाची बहुधा समभाग भेसळ असते; ह्मणजे जितके फायदे असतात, किंबहुना तितकेच तोटेही असतात. इंग्रजी तऱ्हेची शिक्षणपद्धति आमच्यांत सुरू झाल्यापासून पुष्कळ फायदे झाले आहेत, असा जो लोकांचा ग्रह झालेला आहे तो खोटा असून, त्या पद्धतीपासून बरेच तोटे झालेले आढळून येतात! त्यांपैकीं विद्यार्थी लोकांच्या प्रकृतीचा अशक्तपणा हें एक तोट्याचें मोठें उदाहरण होय. त्यासंबंधानें प्रस्तुतच्या लेखांत विचार करावयाचा नसल्यामुळें, त्यांपैकींच ह्मणजे अर्वाचीन विद्याभ्यासाच्या पद्धतीपासून विद्यार्थ्यांच्या नेत्रांवर होणारे वाईट परिणाम, एवढ्याच विषयावर आज विवेचन करावयाचें आहे.

लोकांच्या मनावर रूढीचा इतका बलवत्तर दाब असतो कीं, प्रत्यक्ष त्यांस त्या रूढीपासून हानि होत आहे असें समजलें, तरी ती रूढि ते एकाएकीं सोडीत नाहींत. इंग्लंड देशांत छापण्याची कला निघाल्यापासून, पुष्कळ वर्षेपर्यंत येथें चालू असल्याप्रमाणें शिक्षणक्रम चालू असून, त्यापासून हजारों तरुण लोक दरवर्षी आंधळे होत चालले

---

* राजारामीय संमेलनासंबंधीं झालेल्या व्याख्यान मालेंतील तिसरें व्याख्यान ता० २१।३।९६ शनिवार रोजीं झालें. व्याख्यानकार डा० विष्णु गोपाळ आपटे यांणीं मेहेरबानीनें ग्रंथमालेसाठीं आपल्या व्याख्यानाचा सारांश दिला आहे तो येथें छापला आहे.

आहेत; पण त्या क्रमांत फेरफार करण्याचा विचार तेथील लोकांच्या मनांत देखील अद्यापि यावा तसा येऊं लागला नाहीं. फ्रेंच, जर्मन व अमेरिकन या लोकांमध्यें यासंबंधानें विशेष चळवळ चालू असल्याचें आढळून येतें. एका जर्मन डाक्तरास कांहीं दुसऱ्याच विषयाचा शोध करतेवेळीं असें आढळून आलें कीं, जो समाज विद्येनें पुढारी आहे, त्यांत अंधळेपणाची किंवा उलट्या बाहुल्या असलेल्या माणसांची संख्या विशेष आहे. साधारण खेड्यांतील शाळेंत अदूरदृष्टीच्या मुलांची संख्या पाहिली असतां, ती दर शेंकडा १ किंवा २ या प्रमाणानें त्यास आढळून आली; पण पुढें शहरांतील उच्च प्रतीच्या शाळांत शोध करितांना, अदूरदृष्टीच्या मुलांचें प्रमाण शेंकडा तीनपासून पांचपर्यंत वाढूं लागलें, व खालच्या वर्गांपासून वरच्या वर्गांत जसजसें चढत जावें, तसतसें प्रमाण शेंकडा आठपासून दहापर्यंत अधिक वाढूं लागलें. आमचे इकडील हायस्कूलच्या बरोबरीच्या शाळांतून, शेंकडा पंधराप्रमाणें अदूरदृष्टीच्या मुलांची संख्या असलेली दृष्टीस पडली, आणि कालेजांत गेलेले लोक तर शेंकडा २०।२२ या प्रमाणानें अदूरदृष्टि असलेले आढळले. त्या डाक्तरचें मत शेवटीं असें ठरलें कीं, जन्मतः मुलें बहुधा अदूरदृष्टीचीं असत नाहींत. त्यांस जवळचे जिन्नस वरचेवर पुष्कळ पाहण्याचे प्रसंग येऊं लागल्यामुळें, व त्यांस जवळ पहावें लागल्यामुळें अशी अवस्था प्राप्त होते.

वर सांगितलेल्या अंधळेपणाचें प्रमाण, जर्मनीपेक्षां आमच्या देशांतील मुलांत कमी असेल असें मला वाटत नाहीं. कारण, जिकडे तिकडे ज्याच्या त्याच्या डोळ्यांवर चष्मा वापरलेली मंडळी दृष्टीस पडते. युनिव्हर्सिटीपदवीधारणेच्छु ज्याप्रमाणें झगा किंवा बूट किंवा एखादें पदक संपादन करून बाहेर पडतो, त्याबरोबरच त्याचे कपाळाशीं चाळशी येऊन चिकटते, आणि अशा लोकांची संख्या दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालल्यामुळें, मनास भीति वाटण्याजोगें झालें आहे. कर्मधर्मसंयोगानें, युनिव्हर्सिटीविद्याविभूषित लोकांस लष्करीखात्यांत घ्यावें, असा सरकारानें इतःपर कधींही ठराव केल्यास, या लोकांपैकीं निम्मे लोकांस तरी डोळ्याच्या उणेपणामुळें नोकरीला नालायक ठरावें लागेल.

निशाण मारितां येणें हें लष्करीखात्यांत जाणाऱ्या मनुष्याचें मुख्य कर्तव्य असल्यामुळें, अंधळ्यांकडून तें काम मुळींच होणार नाहीं. सबब असे लोक लष्करीखात्यांत मुळींच प्रवेश करूं शकणार नाहींत. विद्याव्यासंगी लोकांस स्वतंत्र धंदा करूं लागल्यानंतरदेखील त्याच व्यासंगांत काळ घालवावा लागतो. यामुळें आरंभींच दृष्टीचा ऱ्हास झाल्यामुळें मोठी पंचाईत पडते.

यास्तव, अशा प्रकारचा उणेपणा कोणकोणत्या कारणांनीं येतो हें सांगण्यापूर्वी, 'डोळ्याची रचना व त्याचे धर्म' यासंबंधानें थोडीशी माहिती सांगणें जरूर आहे.

पदार्थमात्राचें ज्ञान पांच प्रकारांनीं होतें. कांहीं जिन्नस स्पर्शानें समजतात, कांहीं जिन्नस रुचीनें समजतात, कांहीं ध्वनीनें समजतात, कांहीं गंधामुळें समजतात व कांहीं रूपामुळें समजतात. पदार्थमात्राच्या रूपाचें ज्ञान डोळ्यांच्यायोगानें होतें. डोळा हें इंद्रिय इतर चारी इंद्रियांपेक्षां श्रेष्ठ आहे. कारण, इतर इंद्रियांस ज्ञान होण्याकरितां, पदार्थ इंद्रियाच्या संनिध आणावे लागतात. त्या मानानें डोळ्यास पदार्थ बराच लांब असला तरी चालतो. डोळ्याच्या रचनेवरून पाहतां, मनुष्यानें नेहमीं लांबच्याच वस्तू पहाव्या असा सृष्टिकर्त्याचा हेतु असावा असें दिसून येतें. कारण, उपजतेवेळीं मुलांच्या डोळ्यांची रचना पाहिली असतां, ती लांबचे पदार्थ पाहण्यास मात्र योग्य असते, आणि हीच स्थिति रानटी लोकांच्या डोळ्यांत कायम रहाते. यास्तव रानटी लोकांस किंवा खेड्यापाड्यांतील लोकांस, जितक्या लांबून एखादा जिन्नस स्पष्ट ओळखतां येतो, तोच जिन्नस शहरवासी लोकांस $\frac{1}{4}$ अंतरावरून दिसत नाहीं.

डोळा हा त्वचेनें मढविलेला एक वाटोळा गोळा आहे. याचा आकार अगदीं वाटोळा असून, त्याचा व्यास सुमारें १ इंच आहे. ह्मणजे सरासरी एका लहानशा श्रीवर्धनी रोठ्याएवढा आहे. हा गोळा कपाळाच्या खालच्या बाजूस असलेल्या दोन कोनाड्यामध्यें बसविलेला असतो. यामुळें, सर्व गोळा बाहेरून पहाणारास दिसून येत नाहीं.

या गोळ्याचा पुढील भाग, सर्व गोळ्यापेक्षां फाजील गोलाकार आहे; ह्मणजे एखाद्या दुसऱ्या लहान गोळ्याचा तुकडा कातरून पुढें बसविल्यासारखें दिसतें. या भागास बुबुळ असें नांव आहे. बुबुळ हा कांचेसारखा पारदर्शक पदार्थ आहे. बुबुळापासून सर्व मागील भाग अतिशय चिवट अशा त्वचेनें जाहला आहे. त्या त्वचेच्या आंतील अंगास दुसरें एक पटल आहे. या पटलाच्या आंतील बाजूस मेंदूपासून येणाऱ्या एका मुख्य शाखेचे अनेक विभाग होऊन, त्याचें जाळें होऊन पसरलेलें आहे. हेंच जाळें, या इंद्रियांतील मुख्य स्थान होय. बुबुळाच्या आंतील बाजूस थोडक्याच अंतरावर एक आडवा पडदा आहे, आणि त्या पडद्याच्या मध्यास वाटोळें छिद्र आहे. यास कनीनिका अशी संज्ञा आहे. या पडद्याच्या रंगावरून डोळा काळा, घारा वगैरे ठरवितात. कनीनिका, फाजील प्रकाश असतो तेव्हां तेव्हां बारीक असते, व अंधाराकडे पाहूं लागतांच रुंद व मोठी होते. कनीनिकेच्या मागील बाजूस थोड्याच अंतरावर दोन्ही अंगास, गोलबाह्य असें पारदर्शक घनद्रव्याचें बनविलेलें एक भिंग आहे. त्यास इंग्रजींत लेन्स ( Lence ) असें ह्मणतात. बुबुळापासून लेन्सपर्यंत जी पोकळी आहे, त्यांत पाण्यासारखा निर्मळ पातळ पदार्थ भरलेला आहे. लेन्सच्या पाठीमागें असलेली सर्व पोकळी फारच निर्मळ अशा पारदर्शक पातळ रसानें भरलेली आहे. हा रस पांढऱ्या कांचेच्या रसासारखा दिसतो, ह्मणून त्यास कांचमयरस असें ह्मणतात. डोळ्याच्या गोलास इकडून तिकडे व वरून खालीं हालवितां येण्याकरितां चारी बाजूस स्नायूंची योजना केलेली आहे. हे स्नायू मांसाच्या तंतूचे केलेले असलेकारणानें, मनुष्याच्या इच्छेनुरूप पाळीपाळीनें आंखडून डोळा चारी दिशेस फिरवूं शकतात. डोळ्याच्या गोलाच्या मागील बाजूस मात्र अशाप्रकारचें स्नायूंचें लेपन नाहीं. याखेरीज डोळ्याच्या पोषणाकरितां नाड्याच्याद्वारें विपुल रक्ताचा पुरवठा ठिकठिकाणीं केला आहे व स्वच्छता राखण्याकरितां एक दोन ठिकाणीं जलोत्पादक पिंड केलेले आहेत. त्यांपासून उत्पन्न होणारे जलास अश्रु अशी संज्ञा आहे. या अश्रूंच्या योगानें, डोळा सदोदित ओला

व चकचकीत रहातो, इतकेंच नव्हे, तर एखादा केराचा कण डोळ्यांत पडला असतां, तो अश्रूच्या लोटाबरोबर बाहेर वाहून जाऊन डोळ्याच्या बाहेर पडतो. या सावधगिरीखेरीज बाहेरील केरकचऱ्यापासून डोळ्यास इजा न व्हावी ह्मणून खालीं व वर केसानें युक्त अशा पापण्या लावलेल्या आहेत. या पापण्यांपासून फाजील तेज, धूर, धूळ वगैरे सर्व प्रकारच्या पदार्थांपासून डोळ्याचें संरक्षण होतें.

दर्शनानुशास्त्रांत असा एक नियम आहे कीं, कोणत्याही दोन भिन्न घनत्वाच्या पदार्थांमधून किरण जात असल्यास, विरल पदार्थांतून किरण शिरतें, तेव्हां तें कांहींसें वक्री होतें ह्मणजे तें त्या किरणावर होणाऱ्या लंबाकडे वळतें. पुन्हां हा घनपदार्थ सोडून पहिल्या विरळ पदार्थांत जावें लागल्यास, तितक्याच प्रमाणानें लंबापासून दूर जातें. यास्तव एखादा कांचेचा तिकोनी पदार्थ किंवा लोलक घेतला असतां, त्याजवर पडून पार जाणारें किरण लोलकाच्या पायाकडे वळून बाहेर पडतेवेळीं आलेल्या दिशेच्या उलट जातें. याचप्रमाणें गोल भिंगावर पडणारीं किरणें, गोलाच्या मध्याकडे वक्री होऊन भिंगाच्या पलीकडच्या बाजूस जवळच एकमेकांस मिळतात. गोलांतर भिंगावर एक समांतर किरणाचा छटा पडला असतां, तो छटा भिंगांतून पार पडल्यानंतर किरणांचें वक्रीभवन झाल्यामुळें, क्षीयमाण होऊन, लवकर केंद्रीभूत होतो. वर्धमान छटाही याचप्रमाणें क्षीयमाण होऊन कांहीं अधिक अंतरावर एका केंद्रांत मिळतो. पारदर्शक पदार्थांचा, किरणें वक्री करण्याचा हा धर्म डोळ्यांत फारच व्यक्त रीतीनें दृष्टोत्पत्तीस येतो. किंबहुना सृष्टिकर्त्यानें ह्या धर्माची योजना डोळ्यांत फारच उत्तम रीतीनें केलेली आहे.

कोणत्याही चकचकीत पदार्थांपासून निघणारीं किरणें चोहोंकडे फांकतात; त्या किरणसमूहास वर्धमान छटा असें ह्मणतात. शास्त्ररीत्या प्रत्येक तेजःपुंज पदार्थापासून निघणारीं किरणें वर्धमान असलीं पाहिजेत; परंतु डोळ्याच्या कामांत हा नियम लागूं पडत नाहीं. डोळ्यापासून अदमासें सोळा फुटांच्या पलीकडे कितीही अंतरावरून किरणें आलीं, तर तीं समांतर किरणें मानण्याची वहिवाट पडलेली आहे.

ह्मणजे सुमारें २० फुटांवरच्या अंतरावर असलेल्या दिव्याचें किरण आपल्या डोळ्यावर पडत असल्यास, तें समांतर किरण आहे असेंच मानावयाचें आहे. १६ फुटांच्या आंतील सर्व तेजोमय पदार्थांपासून निघणारीं किरणें फांकणारीं असल्यामुळें, त्यांच्या किरणास वर्धमान छटा असेंच मानलें जातें.

कोणत्याही पदार्थापासून आलेलीं समांतर किरणें, बुबुळाच्या योगानें कांहींशीं वक्री होतात; परंतु त्या वक्रीभूत किरणांचें केंद्रीभवन, मज्जातंतूच्या जाळ्यावर होत नाहीं. यास्तव त्या पदार्थाचें ज्ञान डोळ्यास बरोबर होत नाहीं. कोणत्याही पदार्थापासून निघालेलीं किरणें गोल भिंगांतून वक्री झाल्यानंतर केंद्रास मिळतात, तेव्हां केंद्राच्या ठिकाणीं हुबेहुब त्या पदार्थाची लहान प्रतिमा उत्पन्न होते. ती प्रतिमा डोळ्याच्या ज्ञानतंतुमय पटलावर उमटली असतां मात्र, त्या पदार्थाचें खरें स्वरूप इंद्रियास कळतें. बुबुळापासून वक्री झालेलीं किरणें, या ज्ञानतंतूच्या पटलाच्या पलीकडे केंद्रीभूत होतात. तशीं न व्हावीं ह्मणून मध्यें गोलभिंगाची योजना केलेली आहे. बुबुळांतून पार पडलेलीं किरणें पुन्हां गोल भिंगांतून पार जाण्याच्या योगानें अधिक वक्रीभूत होऊन, तीं ज्ञानतंतुमय पडद्यावर एकत्र केंद्रीभूत होतात. जेव्हां बुबुळावर वर्धमान छटा पडतो, ह्मणजे जवळचा पदार्थ पहावा लागतो, त्यावेळेस त्याचीं किरणें ज्ञानतंतूच्या जाळ्यापासून पुष्कळ पलीकडे केंद्रीभूत न व्हावीं, ह्मणून गोलभिंगाच्या अंगीं फुगीर होण्याची शक्ति दिलेली आहे. गोलभिंगाच्या सभोंवार कांहीं स्नायूंची योजना केलेली आहे. हे स्नायु सैल पडतात त्यावेळीं, गोलभिंग आपल्या स्वाभाविक धर्माच्या योगानें अधिक फुगून, आपला पृष्ठभाग अधिक गोलबाह्य करितें, आणि यायोगें वर्धमान किरणांचेंही केंद्रीभवन ज्ञानतंतूच्याच पटलावर होतें. जेव्हां किरणें जास्ती वक्री करण्याचें काम नसतें, तेव्हां त्या भिंगाभोंवतीं असलेले स्नायु आंखडून त्यास चापटें करितात. या युक्तीच्या योगानें, लांबच्या पदार्थांपासून येणाऱ्या समांतर किरणांचें, तसेंच जवळच्या पदार्थांपासून निघणाऱ्या वर्धमान

किरणांचें केंद्रीभवन ज्ञानतंतूच्या पटलावरच होऊन, तदुद्भूत प्रतिमेच्या योगानें जवळच्या आणि लांबच्या जिनसाचें ज्ञान एकाच साधनानें व्हावें अशी युक्ति केलेली आहे.

ज्या मनुष्यास नेहमीं जवळचे पदार्थ पहावे लागतात, त्याच्या गोल भिंगाचा फुगीरपणा नेहमीं राखावा लागल्यामुळें, स्नायूंस फारच श्रम होतात व पुष्कळ रक्ताचा व्यय होतो. तो व्यय भरून काढण्याकरितां, रक्ताचा अधिक पुरवठा केला जातो. स्नायूंस अधिक श्रम झाल्यामुळें ते दुखूं लागतात; पण त्या दुःखाचा भास पाहणाऱ्याच्या कपाळाशीं झाल्यामुळें, त्यास कपाळ दुखतें असें वाटूं लागतें. पुष्कळ बारीक अक्षरें पुष्कळ वेळ वाचलीं असतां, बहुतेकांचें कपाळ दुखतें त्याचें कारण हेंच होय. ह्या अशा कारणानें होणाऱ्या रक्ताधिक्यामुळें, डोळ्यांतील रसाचें परिमाण वाढतें, त्यामुळें डोळ्याच्या पटलास अधिक ताण पडतो. डोळ्याच्या मागील अंगास पटलास आधार कमी असल्यामुळें, या ताणाच्यायोगानें पटल अधिक अधिक पसरत जाऊन मागें मागें सरत जातें. यामुळें कांहीं कालांतरानें डोळ्याचा गोलाकार नाहींसा होऊन, त्याचा लांबोडा गोल बनतो. असें झाल्यामुळें आंतील गोल भिंगास, किरणें केंद्रांत आणण्यास, फारच फाजील श्रम पडतात, व शेवटीं शेवटीं गोल भिंगाचे स्नायूंस थकवा आल्यामुळें, किरणांचें केंद्रीभवन ज्ञानतंतूच्या पडद्यावर होईनासें होतें; त्यामुळें पदार्थ ओळखण्याचें बंद पडतें. या विकारास अदूरदर्शित्व ह्मणतात. अशा मनुष्यास लांबचे पदार्थ मुळींच दिसत नाहींत. हा विकार आलीकडे बहुतेक विद्यार्थ्यांत असलेला आढळतो.

कित्येकांच्या डोळ्यांचे सारखे दीर्घ गोल न बनतां, प्रत्येक याम्योत्तराचा गोल निरनिराळा होतो, ह्मणजे एके बाजूस पाहिलें असतां डोळा चिंचोळा होतो, एके बाजूस फुगीर असतो. तिसऱ्या याम्योत्तर वृत्तावर चापटका दिसतो. असें झाल्यामुळें, डोळ्यावर पडणाऱ्या निरनिराळ्या किरणांचें केंद्रीभवन, निरनिराळ्या ठिकाणीं होतें. ह्मणून पदार्थाची चांगली प्रतिमा जाळ्यावर पडत नसल्यामुळें, तो जिन्नस

डोळ्यांस दिसत नाहीं. या विकारास इंग्रजींत अस्टिग्मॅटिझम् (Astigmatism) असें ह्मणतात. हा विकार आलीकडे इंग्रजी शिकलेल्या विद्यार्थ्यांत बराच आढळतो. या विकारांत डोळ्यांचा गोल कोणत्या आकाराचा होतो, याची कल्पना मनांत आणावयाची असल्यास, चमचाचें टिवळें मनांत आणावें, ह्मणजे त्यावरून गोलार्धाचें स्वरूप निदान लक्षांत येईल.

ह्मातार्‍या मनुष्यांचीं सर्व गात्रें शिथिल व निःशक्त झाल्यामुळें, डोळ्यांतील गोल भिंगाच्या अंगीं वर्धमान किरणांस वक्री करण्याची शक्ति रहात नाहीं, यामुळें जवळ असलेल्या पदार्थांची प्रतिमा ज्ञानतंतुमय जाळ्यावर उठत नाहीं, ह्मणून जवळचे पदार्थ त्यांस दिसत नाहींत, लांबचे मात्र दिसतात. या विकारास दूरदर्शित्व ह्मणतात. दूरदर्शित्व नाहींसें होण्याकरितां, डोळ्यापुढें दोन्ही बाजूस गोल अशा भिंगाची योजना करितात. त्याच्यासंबंधानें जवळच्या पदार्थांची प्रतिमा ज्ञानतंतुमय पटलावर उमटते. अदूरदर्शित्वांत गोलभिंगाचे श्रम कमी करण्याकरितां दोन्ही बाजूस गोलांतर असलेल्या भिंगांची योजना करितात. या भिंगाच्या अंगीं समांतर किरणें अधिक फांकविण्याची शक्ति असल्यामुळें, लांबोड्या झालेल्या डोळ्याच्या बुडाशीं केंद्रीभवन होण्यास सोपें पडतें. अस्टिग्मॅटिझम् या विकारावर भिंगें करावयाचीं झाल्यास, ज्या ज्या याम्योत्तरास जितका जितका गोल पाहिजे, त्या त्या मानानें निरनिराळ्या याम्योत्तरांस निरनिराळें गोलांतरच देऊन भिंगें तयार करावीं लागतात.

विद्यार्थी लोकांच्या डोळ्यांस अदूरदर्शित्व नांवाचा उणेपणा येण्यास आह्मास दोन मुख्य कारणें दृष्टीस पडतात. एक प्रकाशाचा उणेपणा व दुसरें, सदोदित बारीक पदार्थ डोळ्याजवळ धरून पाहण्याचा प्रसंग येणें. या दोन कारणांचा एकसमयावच्छेदेंकरून डोळ्यांवर सदोदित परिणाम घडला असतां, डोळे कायमचे अदूरदर्शित्व झाल्यावांचून रहाणार नाहींत. पहिल्यानें उजेडाचा विषय घेऊं. आमच्या देशांत वर्षांतून निंमे दिवस आकाश निरभ्र असल्यामुळें, घराबाहेर प्रका-

शाची बिलकुल उणीव नाहीं; तथापि पुष्कळ वर्षेंपर्यंत हा देश परशत्रू व बंडखोर लोकांच्या तावडींत सांपडल्यामुळें, त्यांपासून घरांतील मालमत्तेस इजा न पोंचावी या हेतूनें घरें रुंद भिंतीचीं व मजबूत बांधावीं लागत होतीं. याचमुळें खिडक्याही लहान अरुंद कराव्या लागत असत. साधारण मध्यम स्थितीच्या घरांत बहुतेक अंधार असावयाचा. एक अतिशय श्रीमंत किंवा अति गरीब यांस मात्र उजेडाची अगदीं उणीव नसावयाची. ही पूर्वींची गोष्ट झाली. अर्वाचीनकाळीं पाश्चिमात्य पद्धतीप्रमाणें मोठमोठ्या खिडक्यांचीं घरें होऊं लागलीं; तथापि उजेडाच्यासंबंधानें पूर्वींची उणीव कमी झाल्याचें दिसून येत नाहीं. शिक्षणाकरितां ज्या इमारती बांधावयाच्या, त्या बांधण्याचें स्थळ कोठें असावें याचा कोणीही विचार करीत नाहीं. ऐन भरवस्तींत आजूबाजूस एक दोन मजली घरें असतांना, कितीही मोठ्या खिडक्यांची शाळा बांधिली, तरी खिडकीच्या आड घराच्या भिंती येत असलेमुळें, मुलांस लिहिण्यास व वाचण्यास जितका प्रकाश पाहिजे तितका मिळत नाहीं. इंग्लंड वगैरे देशांत लिहिणें, वाचणें, खाणें, पिणें, पदार्थ संग्रहीं ठेवणें वगैरे सर्व कृत्यें टेबलावर होतात. म्हणजे जमिनीपासून दोन तीन फूट अंतरावर होतात. यास्तव त्यांच्या घरांच्या खिडक्या जमिनीपासून २ किंवा ३ फूट उंचीवर असतात. अशा खिडक्यांतून येणारा प्रकाश टेबलावर जसा पडतो, तसा भुईवर पडत नाहीं. जमिनीवर बसून वाचणारांस प्रकाश कमी पडतो. तरी या गोष्टीचा विचार न करितां, हजारों खेड्यांतील मुलें भुईवर बसून लिहीत, वाचीत असतां, त्यांच्या शाळागृहांची रचना, टेबलावर लिहिणारा वाचणारांस उपयोगी पडण्यासारखी करणें हें अगदीं मूर्ख-पणाचें कृत्य आहे. अशा शाळांच्या खिडक्या जमिनीबरोबर असाव्यात. पुणें वगैरे शहरांत जुन्या पद्धतीनें बांधलेल्या घरांच्या खिडक्या जमिनीच्या सपाटीबरोबर असतात, व मुलांनीं खालीं पडूं नये म्हणून त्यांस कठडे लाविलेले असतात. ही पद्धत इंग्रजी इमारतींत दिसून येत नाहीं. अशा प्रकारचा विचार मनांत न आणितां इमारत बांधल्यापासून दृष्टीचें व पैशाचें किती नुकसान होतें याचें एक उत्तम

उदाहरण, मी हल्लीं व्याख्यान देत आहें तो " राजाराम कॉलेजहॉल " या नांवाचा दिवाणखाना होय. पहा, या दिवाणखान्यांतून कोणत्याही दिशेकडे पाहिलें असतां आकाश मुळींच दिसत नाहीं, व ज्या दिशेकडून पर्जन्य मुळींच नाहीं, त्या बाजूसदेखील वृष्टीपासून संरक्षण होण्यास्तव घुमटाच्या आकाराचे पत्रे लाविले आहेत. यामुळें खिडकींतून पाहाणारास वरील $\frac{१}{३}$ भाग पत्र्यानें व्यापिलेला दिसतो व खालील भागांतून शेजारच्या इमारतीची भिंत दिसते. यामुळें आकाशापासून येणारा उजेड या इमारतीस मुळींच मिळत नाहीं. या दिवाणखान्यांत पूर्वेस व पश्चिमेस मुळींच खिडकी नाहीं, व दक्षिणेकडील व उत्तरेकडील खिडक्यांतून प्रकाश येत नाहीं. शिवाय खिडक्यांचीं भिंगें बसविण्याकरितां ज्या चौकटी केलेल्या आहेत, त्यांत लांकडाच्या पुष्कळ जाळी कोरल्यामुळें भिंगापेक्षां लांकडानें खिडकीची जागा अधिक व्यापिली आहे. व प्रत्येक लहान भिंगास बसविणेकरितां तेलकट पदार्थाची योजना केलेली असते. त्या तेलकट भागावर धूळ बसून प्रत्येक भिंगाभोंवती एक मळकट परिवेश उत्पन्न झालेला असतो. तो फडक्यानें पुसला असतांही जात नाहीं, यामुळें प्रकाश येण्यास अधिक अडचण झालेली आहे. चौकटी करण्यास लागलेल्या मजुरीचा खर्च मोठीं भिंगें घेण्यास लावला असता, तर एकेका खिडकीस एक भिंग पुरेल एवढालीं मोठीं भिंगें विकत घेतां आलीं असतीं. करवीर येथील कित्येक मराठी शाळा प्राचीन नमुन्याच्या बांधल्या असल्यामुळें, मुलानें मास्तरास आकाश शब्दाची व्याख्या विचारिली असतां " शाळेबाहेर जाऊन वर पाहिलें असतां जें दिसतें तें. " अशी व्याख्या करण्याचा प्रसंग येतो. शाळागृहास लागणाऱ्या खिडक्यांचे आमच्या मतें तीन वर्ग आहेत. ज्या खिडकीच्या सर्व भागांतून आकाश दिसतें, ती खिडकी उत्तम वर्गांतील होय. जींतून अंशतः आकाश दिसतें, ती मध्यम वर्गांतील होय. आणि जींतून आकाश मुळींच दिसत नाहीं, ती कनिष्ट वर्गांतील होय. या तिसऱ्या वर्गांतील खिडकी शाळागृहांस मुळींच असतां उपयोगीं नाहीं व दुसऱ्या वर्गांतील खिडकीचा उपयोग करणें झाल्यास त्या

खिडकींतून निदान ४ इंच रुंदीचा आकाशाचा पट्टा दिसला पाहिजे. खिडकीची उंची खोलीच्या रुंदीच्या $\frac{2}{3}$ असावी. अशा खिडकीनें मात्र शाळांतील सर्व भागावर सारखा उजेड पडूं शकेल. नाहींतर खिडकी शेजारील मुलांस उजेड मिळून दूरच्या मुलांस अंधारांत परिश्रम करावे लागतात.

पाश्चिमात्य सुधारणा जसजशी या देशांत अधिक प्रचारांत येऊं लागली, तसतसे बारीक बारीक जिन्नस डोळ्याच्या जवळ धरून पाहण्याचे प्रसंग वारंवार व अधिक येऊं लागले. बारीक कांट्यांचीं घड्याळें, बारीक सुया, दोरे, बारीक अक्षरांनीं छापलेलीं पुस्तकें व पत्रें हीं नेहमीचीं उदाहरणें होत. पूर्वीं लिहिण्याची कला या देशांत मुळींच नव्हती, यामुळें गुरूपासून शिष्यांस कर्णाच्या साहाय्यानें ज्ञान होत असे. पुढें लिहिण्याची कला निघाल्यानंतर झाडांच्या पानावर किंवा सालीवर लिहूं लागले असावे. हे जिन्नस मृदु व नाजूक असल्यामुळें, त्यांजवर साहजिक बोथट लेखणीनें मोठीं अक्षरें काढावीं लागत असत. याच झाडांच्या पानांपासून लिहिलेल्या कागदास पत्र ह्मणजे पान असें नांव आलेलें असावें. भूर्जपत्र हें झाडाच्या सालीचें उदाहरण आहे. पूर्वीं पत्रें एकत्र शिवून बुक बांधण्याची चाल नव्हती. यामुळें पत्रें एकावर एक रचून बांधून ठेवीत असत. आपल्यास जें पत्र वाचावयाचें असेल तें पत्र काढून घेऊन, पाहिजे तितकें लांब धरून वाचावयास सुलभ पडत असे व प्रत्येक पत्राचें वजन फारच हलकें असल्यामुळें, पत्र वर धरून वाचतांना हातास बिलकुल श्रम पडत नसत. ग्रंथांस बुकाचें रूप आल्यामुळें व त्यांत जडत्व उत्पन्न झाल्यामुळें, कोणत्याही वाचणारास एखादें साधारण वजनाचें पुस्तक पुष्कळ वेळपर्यंत अंतराळीं धरून वाचतां येत नाहीं. कारण पुस्तकाच्या जडत्वामुळें हात भागल्या सारखा होऊन कळा येऊं लागतात. बूक दूर धरून वाचण्याची गोष्ट तर बोलावयासच नको; कारण दूर धरण्यास हातास विशेष श्रम लागतात. हे श्रम न व्हावे ह्मणून वाचणारा पुस्तक डोळ्याशेजारीं धरितो किंवा जमिनीवर अथवा टेबलावर ठेवून

आपण वांकून, आपले डोळे त्याशेजारीं नेऊन पाहतो. यामुळें त्या इंद्रियास विनाकारण फाजील श्रम पडतात. त्यांत बारीक अक्षरें असलीं तर श्रमाची कमालच होते. छापण्याची कला निघाल्यापासून पुष्कळ मजकूर थोड्या जाग्यांत आणावा लागल्यामुळें, अक्षरें फार बारीक करावीं लागलीं व ओळी एकाजवळ एक ठांसून बसवाव्या लागल्या. यामुळें वाचणारांस विशेष कष्ट होऊं लागले. एक ओळ संपून दुसऱ्या ओळीच्या आरंभास जावें लागल्यास अशा ओळीच्या टोंकापासून बुडापर्यंत येऊन खालच्या ओळीस उतरावें लागतें. असें केलें नाहीं तर नजर पुनः पहिल्याच ओळीच्या आरंभास येते व वाचावयास चूक पडते. ठळक अक्षरांनीं छापलेलीं व ओळी विरळ असलेलीं पुस्तकें अलीकडे फारच कमी होत चाललीं आहेत, ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. मोठा मनुष्य वाचूं लागला ह्मणजे, पुष्कळ वाचतेवेळीं पुष्कळ अक्षरांनीं झालेला शब्द तो अदमासानें ओळखतो. त्यास प्रत्येक शब्दांतील प्रत्येक वर्ण निवडून काढावा लागत नाहीं. यामुळें प्रौढ वाचणाऱ्याला श्रम कमी पडतात. नवीन वाचणारांचें तसें नाहीं. त्यांस वाचतेवेळीं शब्दांतील प्रत्येक वर्ण तपासून त्या वर्णसमूहापासून कोणता उच्चार निघतो, हें ठरवावें लागतें, आणि हा नियम इंग्रजी शब्दांस तर फारच विशेष लागूं आहे. या कारणामुळें इंग्रजी १ ते ४ इयत्तांतील मुलांस वाचतेवेळीं फारच श्रम पडतात. इतके श्रम कॉलेजांतील लोकांस पडत नाहींत. कारण ते लोक वाचतेवेळीं पुढें येणारा शब्द बहुतकरून संदर्भानें ओळखतात. तसें लहान मुलांस करतां येत नाहीं.

आतां लिहिण्यासंबंधानें थोडेंसें विवेचन करितों. थोरांचें लिहिणें व लहान मुलांचें लिहिणें यामध्यें थोडा फरक असतो. स्वभावतः लहान मुलांस मोठें अक्षर काढण्याची आवड असते. कारण, त्यांच्या हातांच्या ठायीं बारीक अक्षर काढण्याचें कौशल्य आलेलें नसतें. त्याप्रमाणेंच लहानपणीं बारीक वाचण्याचाही स्वाभाविक कंटाळा असतो. पुरातनकाळीं मुलांस लिहिण्याकरितां धुळीचे पाट्यांचा उपयोग करीत

होते. तेव्हां त्या पाट्या विस्तीर्ण असल्यामुळें लागेल तेवढें मोठें अक्षर काढण्यास सोपें पडत असे, व मोठें अक्षर असल्यामुळें किती पुसकट अक्षर असलें तरी तें वाचतेवेळीं नेत्रांस आयास होत नसत. पाश्चिमात्य सुधारणा जसजशी अधिक प्रचारांत येऊं लागली, तसतशी जुन्या चालीच्या धुळीच्या पाट्या कमी होत जाऊन, बालकांच्या हातांत स्लेटपाट्या येऊं लागल्या. ह्या नवीन तऱ्हेच्या स्लेटी लांबी रुंदीनें धुळीच्या पाट्यांपेक्षां फारच लहान असल्यानें त्यांवर काढावयाचीं अक्षरें देखील अर्थात् बारीक काढावीं लागलीं. ह्मणजे हात दीड हात औरसचौरस क्षेत्रावर जितकीं अक्षरें काढावयाचीं, तितकींच अक्षरें मुलें एक फूट लांब व एक वीत रुंद स्लेटीवर काढूं लागले, आणि हा बारीक अक्षरें लिहिण्याचा क्रम वर्षोंगणती चालल्यामुळें डोळ्यांस फाजील श्रम पडूं लागले. स्लेटी हातानें पुसल्यामुळें हाताचा तेलकट मळ त्यांवर सारविला जातो. यामुळें पेन्सलीच्या घर्षणानें उठणारें अक्षर फारच अस्पष्ट होतें. अगोदर अक्षर बारीक, त्यांत अस्पष्टपणा, शाळागृहांत अंधेर, साभ्र आकाश व त्यांत लहान वयाची कोती नजर, या सर्व कारणांचा एकत्र विचार केला असतां, आलीकडील प्राथमिक शिक्षणाच्या वेळांत, मुलांच्या कोमल दृष्टीस किती कष्ट पडत असतील याची कल्पना वाचकांनींच करावी. लिहिण्याच्या संबंधानें असा एक नियम आहे कीं, ज्या कागदावर किंवा पाटीवर आपण लिहितों, त्यावर पुष्कळ प्रकाश लिहिणाराच्या डावेकडील बाजूनें पडत असावा. उजवेकडून प्रकाश येत असेल, तर अक्षर काढतेवेळीं लिहिणाराच्या हाताचाच अंधेर, अक्षर काढण्याच्या ठिकाणीं पडतो. उजेड समोरून घेतल्यास तोच उजेड लिहिणाराच्या डोळ्यांवर पडल्यामुळें डोळे दिपकतात, त्यामुळें कागदावरील अक्षरें चांगलीं दिसत नाहींत. वांकून लिहिलें असतां डोळे दिपत नाहींत खरे; परंतु कोंवळ्या वयाच्या मुलांस वांकून लिहिण्यास लावणें अगदीं गैरशिस्त आहे. कारण, वांकावें लागल्यामुळें पाठीच्या कण्यास ताण बसून वक्रता उत्पन्न होते, व डोकें लोंबत ठेवल्यामुळें डोळ्यांत रक्त उतरून पाणी मारूं लागतें, व त्यामुळें अंधेरी येते. उजेड पाठीमागून घेतला असतां, स्वतांच्या

शरीराचाच अंधेर लिहिण्याच्या ठिकाणीं पडतो. ह्मणून डावे बाजूकडून उजेड घ्यावा हेंच सोईकर असतें. शाळागृहांच्या छपरांत कांहीं कांचा बसविल्या असतां वरून प्रकाश पडून मुलांस लिहिण्यावाचण्यास अधिक सुलभ होण्याजोगें आहे; पण अशा भिंगांतून सूर्याचीं प्रखर किरणें आंत येऊन, शाळेची उष्णता वाढवितात. हीच भिंगें अपारदर्शक करून लाविलीं असतां मात्र उजेड पुष्कळ पडून सूर्यकिरणांपासून त्रास व्हावयाचा नाहीं; पण इतकें खर्चाचें काम एवढ्याशा शाळेकरितां करितो कोण? थोर लोकांच्या लिहिण्याच्या संबंधानें, पूर्वींच्या बोरूच्या लेखण्या व ढबदार अक्षर जाऊन, टांकाच्या लेखणीनें बारीक अक्षर लिहिण्याची जी चाल पडत चालली आहे ती फारच दुष्ट आहे. मोठ्या कागदाच्या ऐवजीं लहान लहान नोटपेपर व त्यांहून लहान पोष्टकार्ड निघाल्यामुळें, फारच बारीक अक्षर काढण्याची चाल पडत चालली आहे. एका तावांत लिहितां येण्याजोगा मजकूर बारीक अक्षरें काढून ४ $\frac{3}{4}$ इंच लांब व ३ इंच रुंद एवढ्याशा कागदाच्या चिटोऱ्याच्या ( कार्ड ) एका अंगाला लिहून, एक पैसा वांचविला ह्मणून आनंद मानीत असतो; पण बिचाऱ्याच्या दृष्टीस त्या तशा लिहिण्यापासून किती हानि झाली याचा कोणीही विचार करीत नाहींत. मनुष्यप्राणी रूढीचा दास बनलेला आहे, असें वर आह्मीं सांगितलेंच आहे. आह्मीं वर सांगितलेल्या दृष्टीस हानिकारक अशा सर्व चाली एकदम आतांच मोडतां येतील, असें आह्मांस मुळींच वाटत नाहीं; पण अमुक गोष्टीपासून अमुक प्रकारचा तोटा आहे असें सर्वांस कळलेलें असल्यास, ज्यांस ज्यांस ह्मणून सवड होईल, तो तो मनुष्य तसा तोटा न करून घेण्यास यत्न करील. श्रीमंत लोक लिहिण्यास व वाचण्यास मोठ्या मोठ्या अक्षरांचीं बुकें घेऊं लागतील, व मुलांकडून मोठीं अक्षरें काढवूं लागतील व शाळाखात्याच्या योग्य अधिकाऱ्यांची या विषयाकडे नजर गेल्यास, शाळागृहाच्या रचनेंत व शिक्षणपद्धतींत थोडी तरी सुधारणा होईल, अशी पूर्ण आशा करून हें व्याख्यान आतां पुरें करितों.

---

# राजाराम कॉलेजांतील शास्त्रीय प्रदर्शन

अथवा

## शास्त्रीय ज्ञानाचें माहात्म्य.

पारतंत्र्यांत असणाऱ्या देशांस वाटेल त्यानें वाटेल तीं नांवें ठेवावीं अशी जगांतील रहाटी आहे; परंतु ज्याचें सर्व जीवित दुसऱ्यावर अवलंबून व ज्याच्या श्रमाचा उपभोग बहुतांशीं दुसऱ्यासच होणार, त्यास या जगांत आपलेपणा असा कशाबद्दलच वाटत नाहीं. आणि त्याची सर्व गोष्टींत निष्काळजीपणाची वृत्ति होते. सुखोपभोगाचीं अमुप साधनें अनुकूल असून त्याविषयीं उदासीन वृत्ति असणें, हें वैराग्याचें खरें स्वरूप आहे. त्याच्या उलट, सुखप्राप्तीची सर्वथा निराशा झाल्यानें उत्पन्न होणारी उदासीनता व तिजमुळें भासणारें आपल्या जन्माचें वैय्यर्थ्य यापासूनही एक प्रकारचें वैराग्य उत्पन्न होतें, तें खरें वैराग्य नव्हे. पहिल्या प्रकारच्या वैराग्यास पोहोंचणाऱ्या लोकांचें प्रमाण फारच अल्प असतें, व तशा उदाहरणावरून मनुष्य जातींतील कांहीं उच्च मनोधर्मांची सामान्य जनास कल्पना होऊन त्याविषयीं आदर उत्पन्न होतो व एकंदरींत त्या वैराग्यापासून व वैराग्य-शाली सत्पुरुषापासून राष्ट्राचें कल्याणच आहे. परंतु दुसऱ्या प्रकारचें वैराग्य राष्ट्रहितविघातक आहे, इतकेंच नव्हे तर परिणामीं राष्ट्रत्वविघातक आहे. कारण, हें वैराग्य बहुजनसमाजास ग्रासून टाकितें आणि बहुतेक सर्व लोकांचीं प्रवृत्ति आजचा दिवस कसा जाईल एवढाच विचार करण्याकडे असते. 'उद्याचें उद्यां,' अशा लोकांतील शौर्य, बुद्धि, साहस आदिकरून सर्व गुणांचा लोप होऊन कालेंकरून त्यांचाही ह्या पृथ्वीतलावरून लोप होतो. अशा प्रकारचीं उदाहरणें आलीकडील इतिहासांत अनेक आहेत, त्यांतच हिंदुस्थान व हिंदुस्थानच्या लोकांची गणना होईल कीं काय अशी भीति बाळगणारीं

चार माणसें देशांत झालीं आहेत, व होऊं लागलीं आहेत. त्यांच्या-मध्यें, तो दुर्धर प्रसंग टाळण्यास काय केलें पाहिजे हा विचार चालत असून, त्यांचीं डोकीं भणभणून जात आहेत.

अशा निराशेंत व निरुत्साहांत व निरुद्योगांत हिंदुस्थानांतील लोकांचीं आयुष्यें खर्ची पडत आहेत, व पूर्वी एकेकाळीं ज्या राष्ट्राची बुद्धिमत्ता सर्व विषयांत सारखीच चालत होती, त्या बुद्धिमत्तेस क्षय लागला आहे, व तिचा सर्वथैव विनाशकाल समीप आला आहे, ही गोष्ट सर्व पृथ्वीच्या दृष्टीनें ह्मणजे धर्म, राष्ट्र व जाति हे बारीक व संकुचित भेद बाजूस ठेवून विचार केला तर, सकल मानव जातीच्या ज्ञानवृद्धीस व सुखवृद्धीस अत्यंत अपायकारक आहे. अशा व्यापक दृष्टीनें पाहतां, आमच्या राष्ट्राचें जीवनमरण हा केवळ एकराष्ट्रीय प्रश्न नव्हे, तर हा एक विश्वराष्ट्रीय महत्वाचा विषय आहे, ह्मणूनच पृथ्वी-तलावरील आमचे राज्यकर्त्या इंग्रजाप्रमाणें सर्व राष्ट्रें आह्मांस साहाय्य करण्यास सिद्ध आहेत. पण आमचें नशीब आह्मांस त्या साहाय्याचा फायदा घेऊं देईल तर कीं नाहीं? आमच्या घशांत कोणी औषध ओतूं लागला तरी तें घेण्यास आपली तयारी नाहीं. आपल्या सभों-वार काय चाललें आहे, हें डोळे उघडून आह्मांस पुरतें पहाणें होत नाहीं. अशानें आमची सर्व कर्तृत्वशक्ति झपाट्यानें लोप पावूं लागली आहे. दुसऱ्या राष्ट्रांपासून आह्मांस शिकण्याजोग्या गोष्टी अनंत आहेत; पण इतर कोणत्याही गोष्टीपेक्षां एका कोणत्या गोष्टीची आमच्यामध्यें उणीव आहे असें जर आपण पाहूं लागलों, तर ती गोष्ट **सृष्टिशास्त्रीय ज्ञान** होय, हें आजकाल अगदीं थोडा विचार करणारा मनुष्य असला, तरी त्याच्या ध्यानांत सहज आल्यावांचून राहणार नाहीं. हल्लींच्या जगांतील राष्ट्रमंडळांत अजूनें चार दिवस काढण्याचें ज्या राष्ट्राच्या मनांत आहे, त्यास या महत्वाच्या ज्ञानविषयाकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं. लहानशा समाजांतसुद्धां व्यावहारिक किंवा लौकिक मान संपत्तीवर अवलंबून असतो. त्याचप्रमाणें सर्व पृथ्वी हा एक राष्ट्रसमाजच होय, यांतही ज्या राष्ट्राजवळ द्रव्यबल मोठें

त्याचा दरजा मोठा असतो. ह्या द्रव्यबलास मुख्य आधार शास्त्रीय ज्ञान व त्याचा व्यावहारिक उपयोग. देशाचा व्यापार यावर अवलंबून असतो. ' ज्ञान ही शक्ति आहे, ' अशी जी इंग्रजींत सर्वतोमुखीं झालेली ह्मण आहे, तिच्या सत्यतेचें ढळढळींत उदाहरण पाहिजे असल्यास, शास्त्रीयज्ञान व व्यापारवृद्धि यांच्या परस्परसंबंधाचा विचार करावा ह्मणजे झालें. मानवप्राणी ह्मणजे त्याची स्वतःची शक्ति केवढी; पण केवळ आपल्या बुद्धिसामर्थ्यानें व ज्ञानबलानें तो हजारो ' अश्वशक्ती 'चीं यंत्रें चालवितो. पाण्यापासून व पाण्याच्या वाफेपासून हरएकप्रकारची कामगिरी तो करून घेतो. विजेच्या योगानें निबिड अंधकाराचें घोर स्वरूप त्यानें अगदीं नाहींसें करून टाकिलें आहे. याच विजेस साऱ्या जगांत संचार करावयास लावून एका खुर्चीवर बसून, जगांतील कोणत्याही भागावरील आपल्या बांधवाबरोबर बोलूं शकतो. पंचमहाभूतावरील मनुष्यप्राण्याचा अधिकार वर्णन करण्यांत मानवी ज्ञान व उद्योग याचीच वाहवा केल्यासारखी आहे. इतकेंही करून सृष्टीचें रहस्य अगम्य आहे, व परमेश्वराची करणी अगाध आहे, या सर्वोपयोगीं अचल तत्वाचा हृदयावर ठसा उमटण्यासही हेंच सृष्टिज्ञान कारण होत आहे. परंतु हा विषय किंचित् वेगळा आहे. आपण नुसत्या मानवी शक्तीपुरताच विचार करीत आहों. तेवढ्यांत बाह्यसाधनाच्या योगानें शीत व उष्ण या दोहोंस सारखेंच लेखणारा व मूकास वाचाल करणारा व पंगूस गिरी उल्लंघविणारा व समुद्राच्या पार नेणारा असा ज्या शास्त्रीयज्ञानाचा प्रभाव व पराक्रम आहे, त्याची आह्मां हिंदुस्थानांतील लोकांस किती ओळख आहे, व जी थोडी आहे, तिजपासून अशा व्यावहारिक कार्यांत कितीसा उपयोग करून घेतला आहे, याचा विचार करणें आमच्या सांप्रत स्थितींत अत्यंत महत्वाचें आहे.

सोळाव्या शतकांत प्रारंभ होऊन, ज्या व्यावहारिक चळवळीचा युरोप खंडांत जारीनें प्रसार सुरू झाला व ज्यांचींच फळें बेकन, डेकार्टीस, हार्वे, ग्यालिलीओ, न्यूटन, फ्रँक्लिन, वॅट, इत्यादि झालीं, तशा

प्रकारच्या चळवळी आमच्या इकडे सुरू झाल्या नाहींत. यांत्रिक कलांचा विशेष फैलावा न झाल्या कारणानें, 'उत्तम शेती, मध्यम व्यापार, व कनिष्ठ नोकरी,' हा सार्वत्रिक ग्रह होऊन बसला. संपत्तीचें मुख्य साधन व्यापार. ह्यासच गौणत्व आल्यानें, त्याचें सहकारी शास्त्रज्ञान ह्याजकडेही लोकांचें सर्वथा दुर्लक्ष्य झालें. गरीबांनीं जाडा भरडा कपडा वापरावा व श्रीमंतांनीं अति उत्तम सूक्ष्म वस्त्रें परिधान करावींत असा प्रघात पडल्यानें, हात व डोकें यापेक्षां अधिक निराळी शक्ति पाहिजे आहे असें वाटलें नाहीं. पुढें कालांतरानें परकीय अम्मल झाल्यानें पैसा बाहेर जाऊं लागला आणि देशास दारिद्याची कळा येऊं लागली. त्यावेळीं तर जो कांहीं थोडासा व्यापार लोकांत होता, तोही बसूं लागला. अमानुष बुद्धीचे नव्हेत, पण अमानुषशक्तीचे प्रतिस्पर्धी आल्यानें, आणि तेही एकदम दुरून आल्यानें त्यांच्या शक्तीचें बीज प्रथमतः ध्यानांत आलें नाहीं. पुढें पुढें तर आमच्या लोकांस पूर्ण पराधीनपणा आल्यानें, त्यांना पाश्चात्य शास्त्रीयज्ञानाचा व कलाकौशल्याचा परिचय करून देऊन, त्यांस जगांतील राष्ट्रांत नांवारूपास आणावें अशी इच्छा व हुरूप बाळगणारा त्यांचा कोणी वाली न राहिल्यानें, ते सर्वथा अज्ञानीच राहिले. आतां इतर शिक्षणाबरोबर आमचें सरकार शास्त्रीय शिक्षणही देत आहे; परंतु त्याचा मगदूर कसा आहे, हें चाणाक्ष मनुष्यास सांगण्याचें कारण नाहीं. त्यांत व्यावहारिक उपयोगाचा भाग फार थोडा असतो. अति उच्च परीक्षांस मात्र आपणांस मिळालेल्या शिक्षणांत व्यावहारिक उपयुक्ततेचा भाग अत्यल्प आहे, इतकें ज्ञान होण्यापुरता शास्त्रज्ञानाचा अधिकार प्राप्त होतो. खरोखर ह्मटलें असतां, प्रत्येक मनुष्यास शास्त्रीय ज्ञान अवश्य आहे. अवलोकनशक्ति व विचारशक्ति वाढण्यास यासारखें उपयुक्त दुसरें साधन नाहीं. युरोपांतील इतर देशाच्या लोकांची आह्मांस विशेष माहिती नाहीं; पण इंग्लिश व आयरिश लोकांची व तेही कांहींतरी निमित्तानें इकडे आलेल्यांची माहिती आह्मांस आहे. पलटणींत असलेल्या साधारण शिपायांस जें ज्ञान यांत्रिककला व सृष्टिशास्त्र या बाबतींत असतें, तें

आमच्या इकडे एम्. ए. पर्यंत शिकलेल्या लोकांस असेल असें वाटत नाहीं. याचा अर्थ त्या शिपायांचा या विषयांवर व्यासंग असतो असें नाहीं; पण त्यांच्या चौकस बुद्धींत व आमच्या चौकस बुद्धींत इतकें अंतर पडून गेलें आहे. लहानपणापासून साध्या शास्त्रीय गोष्टी त्यांस सांगण्याचा व शिकविण्याचा प्रघात आहे. आमच्या इकडे अगोदर मुळीं लिहितां वाचतां येण्याइतकें शिक्षणच फार थोड्या लोकांना मिळतें. पण तें ज्यांना मिळतें, त्यांच्यामध्यें एकमार्गीपणा अत्यंत आढळून येतो. आपण जात असतां, मार्गांत सहजावृत्या दिसणाऱ्या गोष्टी कोणत्या आहेत, त्यापासून कोणतें उपयुक्त ज्ञान मिळवितां येण्याजोगें आहे, याचा विचार करण्याची संवयच नाहीं.

सांप्रतकालीं जगाच्या राष्ट्रांत जी चढाओढ चालली आहे, त्यामध्यें जर आपणास पडावयाचें असेल, तर शास्त्रीय ज्ञानाशिवाय आमचें काडीइतकें चालणार नाहीं. हें कालाचें लक्षण जर ओळखण्यास आह्मीं चुकलों, तर दारिद्र्य व पारतंत्र्य यांत आमचा पाय अधिकाधिकच रुतून पडणार आहे. देशांतील निरनिराळ्या प्रांतांची पाहणी होत आहे व तिच्यायोगानें आमच्यांत असलेलीं सांपत्तिक साधनें दिसेंदिवस व्यक्त होत आहेत; पण यावेळीं आह्मांस जर त्यांचा यथायोग्य उपयोग करून घेतां आला नाहीं, तर त्यापासून परके लोक आपलें भांडवल आणून फायदा करून घेण्यास कधींही चुकणार नाहींत. यास उदाहरण एकच दिलें ह्मणजे पुरें आहे. गोकाकचा धबधबा आह्मांस किती दिवस माहित आहे; पण त्याचा उपयोग आह्मांस कांहीं झाला काय? नाहीं ह्मणायला मजूरी मात्र आह्मांस मिळते. ह्मणजे आमच्या डोक्यांत कल्पकपणा बिलकुल नाहीं, आणि आमची योग्यता लांकूड कापणारे व पाणी ओढणारे यापेक्षां कांहीं अधिक नाहीं, इतकेंच ठरलेंना? आमच्या मुलुखांत दुसऱ्यानें येऊन झाडें लावावींत, विहिरी खणाव्यात, कालवे काढावेत, पाणचक्या व पवनचक्या कराव्यात, आगगाड्या चालवाव्यात आणि आह्मांस मोलमजूरी करून पोटांत कांटे भरण्यासाठीं रात्रंदिवस काम करण्याचा व दास्यांत राहून

दुसऱ्याच्या लाथा खाण्याचा प्रसंग यावा, हें परमेश्वराच्या प्रकोपाचें कीं आमच्या दुर्दैवाचें चिन्ह आहे तें आह्मांस कळत नाहीं. राजा परका असला तर राज्याधिकार खुशाल आपल्या हातीं ठेवील, आपल्या लाडक्या लोकांस बड्या बड्या नोकऱ्या देईल; पण शास्त्रीयज्ञान मिळवून त्याच्यायोगानें आपण स्वतंत्रपणें खटपट केली, आणि आमचीं शेतें दुप्पट पिकविलीं, आमच्या देशांतील सांपत्तिक द्रव्याचा व उत्साही व दीर्घोद्योगी पुरुषसिंहास साहाय्यभूत अशा नैसर्गिक शक्तींचा उपयोग करून घेतला तर, त्या परक्या सरकाराची आह्मांस आडकाठी होईल काय? आणि होईल अशी उगींच भीति बाळगून आळसांत आह्मीं काल घालवावा काय? आमच्या राजकीय चळवळींनीं व आमच्या सामाजिक चळवळींनीं आमच्या शत्रूंस आह्मीं जर्जर करूं यांत शंका नाहीं; पण आमच्या शत्रूंचा समूळ नाश आमच्या खुद्द लोकांत शिक्षणाचा प्रसार झाल्याविना होणार नाहीं. त्यांत शास्त्रीय शिक्षण व औद्योगिक उन्नति यावर आमची सर्व भावी उर्जितदशा अवलंबून आहे असें आह्मांस खास वाटत आहे. पैसा हा सर्व उन्नतीचा पाया आहे, आणि तो जोंपर्यंत आमच्यामधून पाय काढीत आहे, तोंपर्यंत आह्मांस सुखाची व स्वातंत्र्याची आशा नाहीं. कोणत्या रूपानें पैसा हिंदुस्थानांतून बाहेर जात आहे व कोणत्यानें नाहीं, याचा विचार करितां, पहिल्याचीं उदाहरणें सहस्रावधि सुचतात, आणि दुसऱ्याची मुळींच पुढें उभा रहात नाहींत. अशी मनाची स्थिति झाल्यानें पोटांतून भडभडून येऊन वाटतें कीं, या सुवर्णभूमीला करटी हातांत घेण्याचे दिवस यावेत-ना? हरहर! देवा! तुलाच कींव येऊन आमच्यांत ज्ञान व तद्रूपच असणारें सामर्थ्य आमच्यांत लवकर उत्पन्न करशील तर, आह्मीं जगतों नाहीं तर मरतों. वाचकहो, विचार करा, केवढा हिंदुस्थानदेश आणि सहा महिने मेघराजानें अतिवृष्टि अनावृष्टीच्यायोगानें जरा भयंकर रूप दाखविल्या बरोबर, आह्मास, रशियानें आमच्यासाठीं फंड काढला, यांत समाधान मानण्याचा प्रसंग यावा आणि इंग्लंडच्या लोकांनीं आह्मांस **भीक** घालावी

अशी इच्छा उत्पन्न व्हावी, ही शोचनीय स्थिति नव्हे काय. **हिंदुस्थान** देश **रशिया**खेरीजकरून सर्व **युरोप**खंडाएवढा आहेना? **हिंदुस्थानांत** पंचवीस वर्षांत दोन भयंकर दुष्काळ यावेत, आणि सर्व युरोपखंडांत असला संकटप्रसंग पन्नास वर्षांत आल्याचें एकदांसुद्धां कानीं पडूं नये, हें कशाचें चिन्ह आहे? त्यांच्यांत काय पाऊस हुकमी पडतो काय? रावणाप्रमाणें त्या युरोपीय राष्ट्रांच्या कैदेंत कां देव वागत आहेत? छेः तसें कांहीं नाहीं. अंतर एवढेंच कीं, आम्हीं **कृषिजीवी** व ते **व्यापारजीवी**. व्यापारजीवित्व बहुतेक मानवाधीन आहे, व कृषिजीवित्व आह्मांस आकाशावर नजर देऊन बसावयास लावतें. चातकाप्रमाणें आमचें जीवन वृष्टीवर अवलंबून. दुसरा तरणोपाय नाहीं.

## ‘त्वय्यायत्तं कृषिफलम्’

असें मेघास ह्मणत आह्मीं बसणार; आणि तेवढें फसलें कीं, सरकारानें दुष्काळ कामगिऱ्या काढाव्या, **रशिया**नें उदार व्हावें, **इंग्लंडा**नें भीक घालावी, आणखी कोणी दाता भेटला तरी आमची झोळी पुढें आहेच. आमचा मात्र लोकांस कांहीं उपयोग नाहीं. **जपान**चीं पंधरा मिनिटांत २९००० माणसें मेलीं; पण आह्मीं त्यांना कांहीं तरी मदत केली कां? आह्मीं कोण? बुडतें राष्ट्र. ही अतिशयोक्ति नव्हे. ज्या राष्ट्राचे दर पंचवीस वर्षांस असे कंठगत प्राण होतात, त्या राष्ट्रांस बुडतें नाहीं ह्मणावें, तर ह्मणावें तरी काय? अशा राष्ट्रावर अंमल करून त्यास पिळणाऱ्या राजास, अंतिम लाभ काय असेल तो देव जाणे. पण हिंदी प्रजेचे मात्र तूर्त हाल आहेत. देशाचे प्राण, देशाचें दैवत ह्मणजे मध्यम स्थितींतले कष्टाळू लोक. ज्यांचा एवढा पोवाडा **गोल्ड**स्मिथनें गायिला आहे, ते आमचे निष्कपटी लोक या प्रचंड जीवनयुद्धांत लक्षावधि पडत आहेत, अशा देशास उन्नतीचा काल येण्यास इतर राष्ट्राचें त्यानें अनुकरण करणें जरूर नाहीं, असें कोण ह्मणेल?

आज ह्या गोष्टीचें महत्व आपल्या लोकांस जितकें कळणें जरूर आहे तितकें कळत नाहीं; पण जे कांहीं लोक शास्त्रीय ज्ञानाची महती व त्याचे परिणाम व त्याचा प्रभाव जाणत आहेत, त्यांचें कर्तव्य आज काल आह्मांस दुसरें दिसत नाहीं. इतर चळवळी निरर्थक आहेत, त्यांत मन घालणारे लोक मूढ, असें आह्मीं मानीत नाहीं व ह्मणतही नाहीं. वर लिहिल्याप्रमाणें आमच्या दारिद्याचें व पारतंत्र्याचें मरण मात्र या शास्त्रज्ञानप्राप्तींत आहे, एवढें खास सांगतों. भारतीय युद्धामध्यें रणधीर कौरवराज सुयोधन याच्या पराक्रमाचें वर्णन आपण वाचतों व ऐकतों. त्याच्या शरीरावर शस्त्रास्त्राचा कितीही प्रयोग केला, तरी त्यास मरण ह्मणून नाहीं. तो जर्जर होई, त्यास जखमा होत, तो बेशुद्ध पडे, पण मरणाची किल्ली तेवढी श्रीकृष्ण परमात्म्यानें भीमसेनास कळविली. मांडीवर गदेचा आघात झाला पाहिजे, त्याशिवाय जशी विजयश्री पांडवांस नाहीं, तशी आह्मांसही या शास्त्रीयज्ञानमूलक औद्योगिक व्यवसायाशिवाय लभ्य नाहीं. पांडवांनीं जशा कामगिऱ्या वांटून घेतल्या, कीं अर्जुनानें एक कर्ण, भीष्म व द्रोण ही सहकारी मंडळी खालीं पाडावी, व भीमसेनानें शंभर कौरवांचा निःपात करावा, तशाप्रकारें आपणांतीलही मंडळींनीं पृथक् पृथक् कामें वांटून घेऊन देशहिताचें समग्र कार्य पार पाडावें. इतर उद्योगाविषयीं लिहिण्याचा प्रस्तुत उद्देश नाहीं. शास्त्रीय ज्ञानाचें महत्व एवढावेळपर्यंत लिहिण्यांत आलें आहे. उदाहरणें देऊन हा विषय जितका व्यक्त करावयास पाहिजे आहे, तितका आह्मीं केला नाहीं, हें आह्मांस माहीत आहे; पण हा लहानसा निबंध विषयविवेचन ह्मणून लिहिला नाहीं. हें ग्रंथाचें शेवटीं असणारें माहात्म्यवर्णन आहे. यासाठीं शास्त्रीय ज्ञानाची महती व त्यापासून होणारे सुपरिणाम यांविषयीं इतकेंच लिहून, याचा आपल्या लोकांत प्रसार करण्यासाठीं काय करावें, याविषयीं दोन शब्द लिहावयाचे आहेत.

14170



एकवेळ शास्त्रीयज्ञानाच्या उपयुक्ततेची खातरी झाल्यावर मग लोक त्याची उपेक्षा करणार नाहींत; परंतु प्रथम त्यास शास्त्रीय विषयांची थोडीबहुत गोडी लावून, त्यांचें त्यावर मन बसेपर्यंत सुशिक्षित लोकांनीं हरएक प्रकारें ते विषय लोकांपुढें आणले पाहिजेत. नानाप्रकारचे उपाय योजून, लोकांचें इकडे चित्त वेधलें पाहिजे. त्या उपायांपैकींच सप्रयोग सार्वजनिक व्याख्यानें व छोटीं छोटीं प्रदर्शनें होत. या दोन्ही मार्गांचा अवलंब, आमचे येथील शास्त्रगुरु प्रो० **बाळाजी प्रभाकर मोडक** करीत असतात. गेल्या सालीं त्यांणीं एक सार्वजनिक व्याख्यानमाला केली होती, त्यावेळीं प्रयोग करून दाखविले; परंतु तेवढ्यानें सर्व शास्त्राचे ठळक ठळक प्रयोग सर्वांस पहावयास मिळत नाहींत, ह्मणून प्रदर्शनाचा मोठ्या खटपटीचा, खर्चाचा, पण त्यामानानें अधिक उपयोगाचा प्रघात त्यांणीं घातला आहे. हें काम फार त्रासाचें असल्यानें दरवर्षी हा योग येत नाहीं; परंतु पूर्वी २ वर्षांनीं एक वेळ प्रदर्शन करण्याचें ठरविलें, व त्याप्रमाणें २ प्रदर्शनें केलीं. शेवटचें प्रदर्शन होऊन आज ६ वर्षें झालीं. तेवढ्या काळांत शास्त्रीय सामानाचा बराच अधिक संग्रह झाला आहे. शिवाय श्री० रा० **बाळासाहेब पटवर्धन**, **मिरज** संस्थानचे अधिपति, यांच्या रसायनशाळेंतील अत्यंत महत्वाच्या विपुल सामानाचाही संग्रह यंदाचे प्रदर्शनांत झाला आहे. मागील प्रदर्शनाप्रमाणें प्रत्येक शास्त्रास निरनिराळी खोली व त्यामध्यें प्रत्येक पृथक् पदार्थ अगर प्रयोगावर मुद्दाम तयार केलेल्या प्रदर्शकाची योजना केलेली आहे. जो कोणी चौकस प्रेक्षक येईल, त्यास तेवढ्यापुरती माहिती देण्यांत येईल. यंदाचें प्रदर्शन बहुतेक सर्व शास्त्रीयच असल्यानें, शांतपणानें अवलोकन करणाऱ्या जिज्ञासूस, थोडक्या कालांत बऱ्याच शास्त्रांतील ठळक ठळक गोष्टींची माहिती झाल्याशिवाय राहणार नाहीं. साधारण लोकांस, मुंबईहून येथें तारेंतून बातमी कशी येते, याचें मोठें गूढ असतें, व त्यांस या इंग्रज लोकांस **सी**ताबाईचा वर असल्यानें, असलीं अद्भुत कृत्यें करतां येतात असें वाटत असतें; परंतु त्यांत तसा कांहीं प्रकार नाहीं. हे सगळे विजेचे खेळ आहेत, व ते कसे होतात, हें प्रत्यक्ष लहानशा

प्रमाणावर डोळ्यांनीं स्पष्ट रीतीनें पाहतां येण्याजोगें आहे. तें करण्यास कांहीं लोकोत्तर शक्ति लागत नाहीं, किंवा देवतेच्या प्रसादाची अपेक्षा नाहीं, अशी बालंबाल खात्री होईल. ही जशी तारायंत्राची गोष्ट, तशीच आगगाडीची. उष्णतेच्या खोलींत जाऊन वाफेच्या शक्तीचीं कार्यें कशीं होतात हें प्रेक्षकाच्या लक्षांत येइल. तसेंच आकाशांतील निरनिराळे ग्रह व त्यांचे उपग्रह यांचा मनोहर देखावा, प्रकाशशास्त्रांतील वेगवेगळीं चमत्कारिक दृष्टिभ्रामक दर्शनें, जलशास्त्र व वायुशास्त्रांतील प्रयोग, कीं ज्यांच्या तत्वावर गिरण्यांत व कारखान्यांत मोठमोठीं कामें चालतात. ध्वनिशास्त्रसंबंधीं प्रयोग, कीं ज्यांच्यायोगानें नुसता आवाज काढला असतां ज्या क्रिया घडतील अशी आपणास कल्पना देखील नसते, अशा क्रिया दिसतात. निरनिराळ्या तंतुवाद्यांची व चर्मवाद्यांची रचना वगैरे सुमारें दोन तीन तासांचे अवकाशांत पाहण्यास मिळालें ह्मणजे, त्या कालाच्या शतपट काल नुसतें घरींच वाचन करून मिळवीन ह्मटलें तर मिळणार नाहीं, इतकें ज्ञान, प्रत्यक्ष नेत्रापुढें ते पदार्थ व प्रयोग मांडल्यानें, प्राप्त होणार आहे. अशा प्रकारचा उपयोग चौकस प्रेक्षकांस होण्याचा संभव आहे. फावल्या वेळांत करमणुकीसाठीं शास्त्रीय विषयाचें वाचन करणाऱ्या गृहस्थास व एकंदरीनें बहुश्रुतपणाची ज्यास ह्मणून आवड असेल त्यास, अशा प्रदर्शनापासून उपयोग आहे. ज्याप्रमाणें तारायंत्र व आगगाड्या यांचीं तत्वें प्रत्यक्ष प्रयोगानें दाखविण्यांत येतात, त्याप्रमाणें कांचेचा कारखाना, काड्याच्या पेट्या तयार करण्याचीं मिश्रणें, साबू तयार करण्याच्या कृति, चुका, टांचण्या, टांक, स्क्रू वगैरे तयार करण्याची सामग्री दाखविली असतां, प्रदर्शनांत मनोरंजकता आणि साक्षात् व तात्कालिक उपयोगिता यांचा सुखकर मिलाफ झाला असता; परंतु सर्वच गोष्टी एकदम साध्य होतील कशा? प्रथमतः त्यांचीं शास्त्रीय तत्वें समजून देण्याची खटपट होत आहे, तेवढ्याचा उपयोग झाल्यावर पुढें कार्यमर्यादा वाढविण्यास उत्तेजन व अवकाश मिळेल. अगदीं कांहीं नाहीं ह्मटलें तरी आमच्या येथील शास्त्रीय व औद्योगिक प्रदर्शनापासून निरनिराळ्या लोकांमध्यें उत्तेजन दिल्यास

चांगलाच उपयोग खचित होईल, अशी कुशलता आहे असें दिसून आलें आहे. इंग्रजी सामानापैकीं जरा मोडतोड झाली कीं, सर्व फुकट टाकून देण्याचा प्रसंग पूर्वी येत असे. आतां येथल्या येथें दुरुस्ती करतां येते. इंग्रजी नमुन्याप्रमाणें बरोबर बहुतेक ओतीव काम देखील सुरेख तयार होतें. आमच्या इकडील हायस्कुलांत शास्त्रीय विषय शिकण्यास लागणारें सामान बरेंच येथें तयार करण्याजोगें आहे. तें आपल्या लोकांनीं व विशेषतः शिक्षकांनीं तयार करवून घेतल्यास, मिळण्यास हरकत नाहीं. अशानें आपल्या कारागिरांस पुढें आणितां येईल. तारायंत्राच्या तक्तक्ड्यावर पितळेचें सर्व काम जेथलें तेथें बसवून अगदीं उपयोगांत आणलेलें आहे, तें सर्व येथेंच केलेलें आहे. अशा अनेक गोष्टी, त्यांचा येथें कोठवर समावेश करावा? अशा प्रकारचा कांहीं व्यावहारिक उपयोगही आमच्या प्रदर्शनापासून झाल्याचें, प्रेक्षकांच्या नजरेस येईलच येईल. या प्रदर्शनाच्या जाहिराती बहुतेक विख्यात वर्तमानपत्रांतून सायंत छापून प्रसिद्ध झाल्या आहेत, तेव्हां त्यावरून सर्व हकीकत कळून येणार आहेच.

अशा प्रकारचीं प्रदर्शनें लहान लहान प्रमाणांवर कां होईनात; पण प्रत्येक ठिकाणीं झालीं पाहिजेत. निदान जेथें शास्त्राधीत लोक व रसायनशाला असतील, तेथें तेथें सामान्य लोकांत शास्त्रीय ज्ञानाची अभिरुचि वाढविण्यासाठीं व औद्योगिक कलांकडे लोकांची प्रवृत्ति करण्यासाठीं, अशा कांहीं खटपटी होणें अगत्याचें आहे. लहान लहान प्रदर्शनें पाहून व व्याख्यानें ऐकून लोकांचीं मनें तयार झाल्यावर, मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या या प्रदर्शनापासून विशेष उपयोग होणार आहे. सांप्रतच्या स्थितींत प्रौढ विद्यार्थी, सुखवस्तु चौकस लोक व विशेषतः शिक्षकवर्ग यांस या प्रदर्शनापासून उपयोग होणार आहे.

आमच्या लोकांत सायन्टिफिक अमेरिकनची सप्लिमेंट, नेचर, नॉलेज, ॲमेट्युर वर्क वगैरे मासिक पुस्तकांकडे लोकांचें लक्ष जात नाहीं.

त्यांत मनोरंजक व व्यवहारदृष्ट्या उपयुक्त अशी अतिशय माहिती असते. शास्त्रीय विषयांचा चांगला अभ्यास करून पदव्या मिळविलेले लोकदेखील, त्या पुस्तकावरून माहिती मिळवून लोकांस समजेल अशा प्रकारें लिहून अगर सांगून, देशाच्या कलाकौशल्यास मदत करीत नाहींत ही शोचनीय गोष्ट आहे. पुण्याचें **शिल्पकलाविज्ञान**, **नागपूरचें उद्योग** व **बडोद्याचें धंदेशिक्षक** हीं पुस्तकें मराठींत निघून बंद पडलीं, याचेंही कारण लोकाश्रयाचा अभाव; व तसें होण्याचें कारण आमचे धंदेवाले लोकांत शिक्षणप्रसार निदान लिहिण्या-वाचण्यापुरता सुद्धां, नाहीं याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. लोहार, सुतार, कोष्टी, सोनार, चांभार या सर्वांस त्यांच्या त्यांच्या कलेसंबंधानें नवीन नवीन माहिती दिली असतां, त्यांना प्रयोग करून तिची सत्यता व उपयुक्तता पहातां येण्यायोगी असते; पण जोंपर्यंत अशा प्रकारें विद्याप्रसार झाला नाहीं, तोंपर्यंत खेडेगावांत सुशिक्षित लोकांनीं या धंदेवाल्यांचे मेळे जमवून, त्यामध्यें या विषयांची माहिती वाचून दाखवावी. तशापासून जात्या बुद्धिमान् कारागिरास उपयोग झाल्याविना राहणार नाहीं. या स्तुत्य उद्योगास जागोजाग असलेले आमचे पाश्चात्यशिक्षणमंडित मामलेदार व मुनसफ यांणीं हातभार लाविला, निदान अशा प्रकारें कार्य करण्यास लोकांस उत्तेजन दिलें, तर त्याजकडे देशहिताची बरीच कामगिरी बजाविल्याचें श्रेय येईल. अशा प्रकारें कोणत्याही धंद्यासंबंधानें माहिती मिळविणें किंवा स्वतः मौजेनें फावल्या वेळीं त्या धंद्याच्या लोकांप्रमाणें काम करणें यांत बिलकुल कमीपणा नाहीं. **रशियाचें** राज्य ज्यानें नांवारूपास आणिलें, त्या **पीटर** धि ग्रेटनें साधारण कामाठ्याचें सोंग घेऊन सुतारकाम करण्याचें पत्करलें व तारवें बांधण्याची कला साध्य केली. फार कशाला, आमच्या सार्वभौमिणी **व्हिक्टोरिआ राणीसाहेब** यांनीं आपल्या सर्व चिरंजीवांस कोणती तरी उपयुक्त कला प्रत्येकानें शिकलीच पाहिजे असा निर्बंध केला. त्याअन्वयें सृष्टिक्रमास अनुसरून चतुर्थांश पृथ्वीच्या राज्याची गादी ज्यांस मिळणार, ते **प्रिन्स**

ऑफ् वेल्स चांभाराच्या कामांत फार *तरबेज आहेत व त्याबद्दल त्यांस मोठा अभिमानही वाटत आहे. असो; आमच्या देशास तर हल्लींच्या कठिण प्रसंगीं सर्व प्रकारचें कलाकौशल्य पाहिजे आहे. मग रशिआच्या झाराप्रमाणें अथवा इंग्लंडच्या युवराजाप्रमाणें वागण्यास आह्मांस लाज वाटावी काय? लाजलज्जा ही सर्व शिष्टसंप्रदायावर आहे. दूरवर दृष्टि देऊन सुशिक्षित लोकांनीं आपलें आचरण ठेऊन इतरांस वळण लाविलें पाहिजे.

शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करणें व त्याची लोकांत अभिरुचि उत्पन्न करणें, हा कित्येक लोकांनीं आपला धंदाच केला पाहिजे. साधारण अशिक्षित लोकांस अशा प्रदर्शनाच्या ठिकांणीं येऊन पहाण्यास होत नाहीं. त्यांस 'महमद जर पर्वताकडे येत नाहीं, तर पर्वतानें महमदाकडे गेलें पाहिजे,' या न्यायानें त्या लोकांचा जमाव असेल, त्या ठिकाणीं कांहीं मनोरंजक पदार्थ व शास्त्रीय प्रयोग समजून सांगण्यासाठीं गेलें पाहिजे. विशेष त्रासाशिवाय नेतां येईल अशी शास्त्रीय सामग्री टेंबलाई, विशाळी, चतुःशृंगी अशा जत्रांचे ठिकाणीं नेली असतां, इतर खेळांप्रमाणें लोकांस याचीही गोडी लागेल. राजापुरची गंगा ह्मणून, समजून त्यांस सांगितलें, तर सायफनचें तत्व सहज समजून देतां येईल. वासुदेवाच्या पेल्याचा प्रयोग त्यांस खचित मनोरंजक वाटेल. त्याचप्रमाणें अशी सुवाह्य सामग्री नरसोबाची वाडी, जोती-

* The Prince of Wales is a very expert shoe-maker, so says a contributor to the November number of 'Woman at Home'. It is said that the Prince chose to learn the cobbler's work when a boy, the Queen and the Prince Consort having made a rule that each of the Princes should receive thoroughly practical training in some trade. They were allowed to select the one which they like best. It is said that the Prince has worn shoes of his own make, which were the envy of the gentlemen who saw them and that he did not forget to name the maker.

*Native opinion* 6-12-96.

बाचा डोंगर, आळंदी, पंढरपूर व जेजुरी येथें यात्रेकरितां व वारीस जमणाऱ्या सहस्रावधि लोकांपुढें मांडून, कांहींतरी व्यावहारिकरूपानें शास्त्रीय शिक्षण देणें अशक्य नाहीं. फार कशाला, चैत्र महिन्यांत घरोघरीं हळदीकुंकवाचे समारंभ होतात, त्या ठिकाणीं निरनिराळ्या शास्त्रांतील कांहीं प्रयोग चालू ठेवले, तर त्या समारंभास विशेष मोहक स्वरूप येऊन शिक्षणही मिळेल. अनेक लहान मोठ्या मुलींना वीज आंत सोडलेल्या पाण्यांतील रुपया काढावयास सांगावा. यंत्रशास्त्रांतील गुरुत्वमध्या संबंधाचे खेळ मांडून ठेवावेत. नानाप्रकारचे आरसे मांडावेत, वाफेच्या यंत्राचे, ग्रहमालेचे नमुने व्यवस्थेनें चालू ठेवावेत. अशा अनेक उपायांनीं शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करणें व तिकडे लोकांच्या मनोवृत्ति वळविणें हल्लींच्या मनूंत फारच हितावह आहे. अशा योगानें आमच्या लोकांचें औदासिन्य जाऊन, पैसा मिळविण्याचें ज्ञान त्यांच्यांत येऊन, सर्वतोपरी आह्मांस ग्रासून टाकणारें परावलंबन पार नाहींसें होवो अशी इच्छा प्रदर्शित करून, हें 'व्रतानामुत्तमं व्रतम्' रूपी माहात्म्यवर्णन संपवितों.

य इदं परमं गुह्यं बांधवेष्वभिधास्यति ।
नैव तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तम : ॥
वाचनं योऽस्य लेखस्य प्रसारं च करिष्यति ।
देशकार्य कृतं तेन तेनेष्टो जगदीश्वर : ॥

# सुविचाराची ओहटी,

अथवा

## पुण्यांतून बाहेर पसरलेल्या महाराष्ट्रांतील नवीन चळवळी.

मानवी स्वभाव सर्व ठिकाणीं एकसारखाच असल्यामुळें, इतिहासाची पुनरावृत्ति होते, हा सिद्धांत स्थूल मानानें व बऱ्याच अंशीं खरा असला तरी, दोन देशाची किंवा काळाची अगदीं तंतोतंत समता दिसून आल्याचें कोणास माहीत नाहीं. यावरून अमक्या अमक्या काळीं अमक्या अमक्या देशाची स्थिति अशी होती, त्याप्रमाणें हल्लीं आमची स्थिति आहे, असें सांगतां येणें शक्य नाहीं. एकासारखी एका रोग्याची स्थिति, एकासारखा एक मुकदमा, अगदीं बरोबर ठरून गेला ह्मणजे, रोगाचें निदान व मुकदम्याचा निकाल करण्यास बिलकुल अडचण पडत नाहीं. पण प्रत्येक रोग्याची स्थिति निरनिराळी, प्रत्येक मुकदम्यांतील बाबी वेगवेगळ्या असल्या तर, त्यांचा पृथक्पणें विचार करावा लागतो. यामुळें, वैद्य व वकील यांच्या धंद्यामध्यें, पुढें आलेल्या गोष्टींचा विचार करणें कधीं कधीं सुलभ नसतें. साधारण पडशा खोकल्याचा आजार किंवा साधारण चालू वहिवाटीचा खटला, यासंबंधानें कांहीं अवघड जात नाहीं. पण गहन रोगांचा किंवा खटल्याचा विचार करावयाचा ह्मटला ह्मणजे, पिढ्यानपिढ्याच्या अनुभवाचा उपयोग, वैद्यास व वकीलासही होतो. मुकदम्यासंबंधानें इत्थंभूत हकीकत सरकाररीत्या नमुद करून प्रसिद्ध करण्याची चाल आहे, त्यापासून अगदीं तंतोतंत सारखे मुकदमे सांपडून वकील व न्यायाधीश यांचें काम बहुतेक यंत्रवत् झालें आहे. तथापि नानातऱ्हेच्या कोटिक्रमास जागा अजून आहेच व ती नेहमीं असणारच. वादामध्यें जय हा कांहींवेळ तरी वाद-

पटुत्व व द्रव्यसामर्थ्यावर अवलंबून राहतो असें आपणास आढळून येतें. तसा वादविवाद करण्याचा विषय, देशस्थिति व लोकस्थिति हा नव्हे. हा शांत अवलोकनाचा व सूक्ष्म विचाराचा विषय असल्यानें व यांत चालू व पुढील पिढ्यांच्या कल्याण अकल्याणाच्या गोष्टी गुंतून राहिल्या असल्यानें, याची मीमांसा पक्षांध न होतां केवळ प्राञ्जळ बुद्धीनेंच केली पाहिजे. वकीलाप्रमाणें किंवा वैद्याप्रमाणें त्याला सदृश उदाहरणांचा फायदा विशेष मिळत नाहीं. वकीलाचें व वैद्याचें काम सोपें नाहीं, पुष्कळ अवघड आहे. पण देशस्थिति व लोकस्थिति याविषयीं विचार करणाराचें काम फारच कठीण आहे. आतां अशामुळें तें करावयाचेंच नाहीं व आपला समाज व आपले लोक काय चिंतितात, बोलतात किंवा करितात याकडे मुळींच लक्ष पुरवावयाचें नाहीं असें ह्मटलें तर, मोठी हानि होईल. लोकांस विचार व आचार या बाबतींत चांगलें वळण कधींही लागावयाचें नाहीं व उत्तरोत्तर अधिकाअधिक सुखाची आशा करण्यास अवकाश राहणार नाहीं. ज्यांना ह्मणून थोडा बहुत विचार करण्याची शक्ति आहे, त्यांचें या विषयांकडे लक्ष गेल्याशिवाय राहत नाहींच. पैशाचा उपयोग कसा करावा, जगांत कसें वागावें, सुख ह्मणजे काय, दुःख ह्मणजे काय, आपला व आपल्याजवळील इतर लोकांचा संबंध काय, या व अशाच साध्या व्यावहारिक विषयावर कांहीं तरी मतें झालीं नाहींत, असा मनुष्य विरळा. युक्तिसिद्ध सिद्धांत रूपानें त्यास तीं मांडतां न येतील, ही गोष्ट वेगळी; पण त्या मतांच्या अनुरोधानें त्याचें आचरण बहुधा चाललें असतें. हीं मतें सूक्ष्म विचार अगर दीर्घ अवलोकन करून ठरविलेलीं नसतात व तशीं ठरविण्याचें सामर्थ्य बहुजनसमाजाच्या अंगी नसतें. यासाठीं हा विचार करण्याची कामगिरी व बहुजनसमाजास योग्य वळण घालून देण्याची जबाबदारी, कांहीं नियमित व्यक्तींच्या वर्गावर असते. असा वर्ग संख्येच्या मानानें पाहिलें असतां, अगदींच थोड्यांचा असल्यानें व हा विषय गहन व गंभीर असल्यानें, त्यांच्यावर फार मोठें जोखीम आहे.

एकंदरीनें पहातां आजवरच्या पृथ्वीच्या इतिहासांत हल्लींच्या हिंदुस्थानाप्रमाणें हुबेहुब ज्या देशाची स्थिति होती, असें आपणापुढें एकही उदाहरण नाहीं. पारतंत्र्यपंकांत रुतलेल्या देशाच्या अनेक गोष्टी आह्मांस माहिती आहेत. सुधारलेल्या राष्ट्राच्या दास्यांत कुचमत राहिलेल्या देशांचीं उदाहरणें आमच्या अवलोकनांत आहेत. स्वतःची पूर्वीं उत्तम प्रकारची सुधारणा झालेलीं, व स्वराज्यसुखाचा पूर्ण उपभोग घेतलेलीं, परंतु कालचक्राच्या फेऱ्यांत येऊन, गुलामगिरींत युगच्यायुगें कंठण्याचा अनावर प्रसंग आलेलीं, राष्ट्रें आह्मांस माहीत नाहींत असें नाहीं. इतकें असूनही सर्व बाबतींत हिंदुस्थानाशीं सारखवटपणा असलेला असा देश आढळून येत नाहीं. अशासाठीं इतिहासशास्त्रज्ञ व समाजशास्त्रवेत्ते आपणास नेहमीं सांगत असतात कीं, एका देशास जी गोष्ट फायदेशीर झाली, ती तशीच दुसऱ्या देशास फायदेशीर होईल असें नाहीं. यामुळें प्रत्येक देशाच्या लोकांनीं इतर देशांच्या व कालांच्या अनुभवाचा फायदा घेऊन आपणास आपल्या सांप्रत स्थितीचा पृथक्पणें विचार केला पाहिजे. या हेतूनें आमच्या सद्यःस्थितीस उद्देशून आह्मांस आज दोन शब्द लिहावयाचे आहेत.

सुमारें दीड वर्षाच्या पूर्वीं ह्मणजे आमच्या मासिक पुस्तकाच्या अकराव्या व बाराव्या अंकांत मिळून, एक लहानसा निबंध येऊन गेला आहे. त्याचा विषय ‘ आमच्यांत काय कमी आहे ’ असा होता; व त्यांत आमच्यांत **खरी आस्था, खरा उल्हास, खरें औत्सुक्य** नाहीं असें दाखविण्याचा यत्न केला होता. तें मत बदलण्यास अद्यापि कांहीं कारण झालें नाहीं; परंतु त्यावेळीं चालू असलेल्या कांहीं चळवळींना व नवीन अस्तित्वांत आलेल्या कांहीं चळवळींना जें स्वरूप प्राप्त होत आहे, त्यावरून सुखकाल समीप न येतां, अधिकाधिक दुरावत चालला आहे असें दृष्टोत्पत्तीस आल्यानें, त्या नाहींतर तशाच दुसऱ्या विषयावर लिहून, आणखी एकवार आपल्या प्रिय समाजास इशारा द्यावा असें मनांत आणून आज लेखणीं हातीं धरली आहे. आजच्या लेखांतील विधानास दृष्टांत ह्मणून पुण्याच्या चळवळींचा व तेथील कांहीं व्यक्तींचा प्रच्छन्न किंवा

प्रकट रीतीनें उल्लेख येईल. याचें कारण उघड आहे. आजकाल आह्मीं महाराष्ट्रांतील लोक पुण्याच्या धोरणानें वागत आहों. सर्व चळवळींचें आदिस्थान आह्मांस तें आहे. आह्मीं अनुकरण करीत आहों तें त्याचें. कोणतीही बरी वाईट गोष्ट जी महाराष्ट्रांत होते, तिचा प्रारंभ पुण्यामध्यें. सुखाच्या गोष्टी, करमणुकीच्या गोष्टी, ज्ञानवृद्धीच्या गोष्टी, सर्व कांहीं पुण्यास अगोदर सुरू व्हाव्या, आणि मग त्याचा कित्ता कमी अधिक मानानें इतर शहरांनीं व ठिकाणांनीं गिरवावा, असा क्रम आजच चालला आहे असें नाहीं, तर हें पुण्याचें अग्रेसरत्व पेशवाईच्या उत्कर्ष कालापासूनचें आहे. सारांश काय कीं, पुणें ही महाराष्ट्राची सदसद्विवेकबुद्धि आहे. अमकी अमकी गोष्ट बरी कीं वाईट, करावी किंवा नाहीं, याचा इतर ठिकाणीं प्रश्न निघाल्याबरोबर, पुण्याचे लोक काय करितात, ते काय ह्मणतात, त्यांचें मत काय आहे, ह्याची अगोदर विचारपूस होते. त्या गोष्टीमुळें महाराष्ट्रांतील इतर कोणत्याही शहरास जें महत्व नाहीं, तें पुण्यास प्राप्त झालें आहे. यासाठीं तेथील प्रमुख लोकांचे विचार, उच्चार व आचार या त्रयींविषयीं आह्मांस आजच्या निबंधांत लिहावें लागेल, आणि तें लिहिणें तेथील दोन अथवा अनेक पक्षांस कदाचित् सारखेंच अप्रिय वाटेल यास उपाय नाहीं; पण आमचे एका अर्थी नायक ह्मणून आह्मीं त्यांस उद्देशून कांहीं गोष्टी सांगणार. आमच्या मनांत गोड बोलण्याचें फार आहे; पण सत्यही सोडूं नये असें खास वाटतें; आणि तें सत्यकथन हितावह असल्यास, मग केवळ गोड बोलण्याचा अनावर मोह आवरणेंच भाग पडतें. तशांतील प्रस्तुत प्रसंग असल्यानें आज मन घट्ट केलें आहे.

देशास स्वातंत्र्य नसलें, ह्मणजे मोठमोठ्या राज्यकारस्थानाविषयीं विचार लोकांच मनांत बिलकुल येत नाहींत. जगांतील उलाढालींत आपला साक्षात् संबंध नसला ह्मणजे, लोक तिकडे विशेष लक्ष देत नाहींत. समंजस व सुशिक्षित लोकांसमुद्धां जगाचा आधुनिक इतिहास कसकसा बनत चालला आहे, या गोष्टीकडे मननपूर्वक पहावें असें वाटत नाहीं. इंग्रजी वर्तमानपत्रें दूरदूरच्या देशासंबंधानें तारा प्रसिद्ध

करीत असतात; परंतु त्या देशांतील वर्तमानांचा आमच्यावर घडणारा इष्टानिष्ट परिणाम आमच्या मनांत भरतच नाहीं. अमेरिकेचा अध्यक्ष द्विधातुपक्षाचा आहे किंवा एकधातुपक्षाचा आहे, याचा विचार करून आह्मांस काय करावयाचें? आमचें मत त्या चलनीनाण्याच्या विश्व-देशीय सभामंदिरांत थोडेंच विचारांत घेणार आहेत. आर्मीनियन लोकांवर तुर्कांचा नाहक जुलूम चालला आहे, व सर्व युरोपखंड टर्कीवर क्षुब्ध झालें आहे; पण आमच्या लोभाची आणि क्षोभाची टर्किश सुलतानास थोडीच किंमत आहे. आफ्रिकेंत लढाईचा प्रसंग आला, तर आमचें सैन्य दावें लावून ओढून न्यावें, तसें नेतील. त्यांतील लोक मरतील तर मरतील, जगतील तर जगतील; त्याच्या उठाठेवीवीण आमचें काय अडणार आहे? खुद्द आमचे लोक मोलमजूरी व लहानसान व्यापार करण्याच्या हेतूनें दक्षिणआफ्रिकेंत जात आहेत, तेथें त्यांस मानवी प्राण्याचे सामान्य हक्कही मिळत नाहींत, ह्या गोष्टी कोणी पाहून आला आणि येथें आमच्या कानीं कपाळीं ओरडून गेलाच, तर एक दोन दिवस हळहळ केली; झालें, सोडून दिलें. कुठें आपण; कुठें ते आणि कुठें आफ्रिका देश? कोण ऐकणार आमचें? मग उगीच डोक्याला शीण तरी कां? असे हे जगांतील प्रश्न आमच्या सामान्य लोकांस व मोठमोठ्या सुशिक्षित लोकांसही साधारण मानानें सारख्याच महत्वाचे वाटतात. देशांतल्यादेशांत उदीमधंदा, व्यापार, जमिनीचा सारा, गुरेंचराई, लोकशिक्षण, न्यायपद्धति वगैरे प्रश्नांचें तरी ज्ञान अशिक्षित, व अर्धशिक्षित यांस तर नाहींच; पण सुशिक्षित ह्मणविणाऱ्या लोकांससुद्धां या विषयाची माहिती तितक्यापुरतीच असते आपआपल्या पोटाचा धंदा करण्यापलीकडे व मजेंत दिवस काढण्यापलीकडे त्यास कांहीं सुचत नाहीं असा आमचा पूर्वीचा आरोप आमच्या लोकांवर होता, तोच आतांही आहे; पण हल्लीं एकप्रकारची हालचाल सर्व महाराष्ट्रदेशभर दिसून येत, त्यांत या मौजेंत काल घालविण्याच्या प्रकारास एक विशिष्ट स्वरूप आलें आहे. त्या मौजेस कांहींसें संकुचितच कां होईना, पण सार्वजनिक स्वरूप आलें आहे. वर सांगितलेल्या मोठमोठ्या व व्यापक अशा प्रश्नाकडे लक्ष जाण्याचें राहिलेंच.

परंतु मनास कांहींतरी व्यवसाय लागतो. मन मोकळें राहूं शकत नाहीं. तेव्हां उच्चगोष्टींत तें व्यग्र झालें नाहीं तर नीच गोष्टींत दंग होऊन जातें. असा प्रकार हल्लीं हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं, कमी अधिक प्रमाणानें, चालला आहे. अमक्या शहरांत नाहीं असें खास सांगतां येत नाहीं. शहरांत कांहींतरी साधारण गोष्ट झाली, तरी तिजविषयीं सर्व लोक चर्चा करण्यास प्रारंभ करितात. जेथल्या तेथें तिचा विसर पडून गेला पाहिजे इतकीच तिची योग्यता असते; पण नाहीं. तिचें नसतें स्तोम माजवून तिला राष्ट्रीय महत्वाचें स्वरूप आणावयाचें आणि मग तिच्यापायीं अगोदर असलेलीं वैमनस्यें वृद्धिंगत करावयाचीं व नसतील तर तीं उत्पन्न करावयाचीं. खासगी भाषणांतदेखील शब्द जोकून कुठले पडणार? पण तेथेंसुद्धां एखादा वेडावांकडा शब्द किंवा शब्दसमुच्चय मुखांतून बाहेर पडला कीं, विरुद्ध पक्षाच्या मंडळीच्या हृत्पटावर झाला वज्रलेप. आणि मग त्याचा, ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सर्व देशभर, फैलावा झाला नाहीं तर सर्व जन्म व्यर्थ; असा त्या मंडळींचा ग्रह. खासगी प्रसंगांत ही गोष्ट, मग सार्वजनिक प्रसंगांत जर असें वाक्स्खलन झालें, तर मग काय? त्यासारखी प्रिय शिकार दुसरी नाहीं. तेवढ्यावर त्या मंडळीचा पंधरा दिवस काय आणि महिनाभर काय, उदरनिर्वाह होण्यास हरकत नाहीं. एकानें अशी भाषा झाली ह्मणावें, दुसऱ्यानें नाहीं ह्मणावें; साक्षी, पुरावे आणावे. मोठमोठ्या मंडळ्यांनीं सह्या घालून पत्रें लिहावींत. मग त्यांत, मूळ प्रश्न बाजूसच रहावा व उपप्रश्नावर वादविवाद कडकडीत होऊं लागावा. अशा तऱ्हेनें मोठमोठ्या भारदस्त प्रश्नावर जो काल व जी मानसिक शक्ति खर्च झाली पाहिजे, त्या कालाचा व त्या मानसिक-शक्तीचा व्यय क्षुल्लक कामावर होऊन जावा, ह्यासारखी दुश्चिन्हाची व सुखाशाभञ्जक दुसरी कोणती गोष्ट आहे बरें?

अशा प्रकारचें दोषग्राहित्व हा मनाच्या कोतेपणाचा व कुत्सित-पणाचा परिणाम आहे. मनाला अशी क्षुद्रता कां येते, याचा आमच्या मताप्रमाणें आह्मीं एक निश्चय करून ठेवला आहेच; आणि तो पूर्वीच आमच्या वाचकांस कळवून चुकलों आहोंच.

अद्यापि आपणांत देशकालवर्तमानाप्रमाणें आपल्या देशाचें कल्याण करण्यास झटण्याची खरी आस्थाच उत्पन्न झाली नाहीं. देखावा मात्र कांहीं लोकांना आवडतो. तेवढीसुद्धां इच्छा सुशिक्षित लोकांपैकीं पुष्कळांना नाहीं. देशहितासाठीं सात्विकपणें झटणारे भेटले नाहींत, तरी राजस कर्ते जरी पुढें येतील, तरी त्यापासूनही बरेंच हित होणार आहे. अनुत्साहानें व तटस्थपणानें आह्मीं मरून जात आहों. प्रत्येक सुजाण मनुष्य आपआपल्या नियमित क्षेत्रापुरता आपलें कर्तव्य बजावण्यास तयार असल्यावर, बहुजनसमाजांत सुविचारांचा फैलावा होण्यास फार विलंब लागणार नाहीं. रोजच्या भाकरीपुढें जर कांहींच पहावयाचें नाहीं, असा सामान्यतः सुशिक्षित लोकांनीं निश्चयच केला, तर कुमार्गदर्शक अग्रसरांच्या मागून जनसमूह मेंढराप्रमाणें जाऊं लागला, तर त्यांत आश्चर्य काय? अजाण लोकांना कोणी तरी त्यांच्या कलाप्रमाणें बोलणारा भेटला, व त्यांच्या आवडीनिवडी ओळखून त्यांना गोड वाटेल तेंच करण्यास सांगणारा झाला, तर ते त्याचे देव्हारे माजवितील यांत नवल तें कोणतें? सामान्य जनांस आपल्या नित्याच्या व्यवहारापलीकडे अधिक गहन विचार करण्याची संवयच नसते. कित्येक बिचाऱ्यास तर सवडही नसते. अशास जो त्यांच्याजवळ जाईल तो त्यांस वंद्य. त्यांत त्यांच्या खंडोबा, बिरोबा, ह्मसोबास कोंबडी देण्यास जो सांगेल, तो त्यांस साधुसंत वाटेल यांत शंका नाहीं. त्यांच्या कोऱ्या मनावर वाटेल तो ठसा उमटविणें फारसें कठीण नाहीं. त्यांत आहे तो ग्रह दृढ करण्याइतकें तर कांहींच सोपें नाहीं. अशाप्रकारच्या लोकांस बोलावून, पण मुख्यत्वें करून ते जमण्याजोगें असतील तेथें जाऊन, खऱ्या खोट्या, बऱ्यावाईट गोष्टी सांगण्याचा क्रम सुरू ठेवणें, आणि अशा प्रकारास लोकशिक्षण हें नांव देणें मोठें चुकीचें आहे. लेखनपटु अथवा भाषणपटु बुद्धिमान् गृहस्थ पाहिजे त्या वस्तूस पाहिजे तें स्वरूप देऊन, अडाणी लोकांस अथवा वरवर पहाणाऱ्या शिक्षितांसही चकवूं शकेल. पण काल हाच एक अशा भोंदूचें सत्यस्वरूप लोकांचे पुढें व्यक्त करून दाखविण्यास समर्थ आहे. प्रसंगीं अप्रसंगीं, आत्म-

स्तुति परनिंदा करणाऱ्यांचा पक्ष फार वेळ चढता रहात नाहीं. कांहींवेळपर्यंत यांच्या हातून बहुजनसमाज फसविला जातो हें निर्विवाद आहे. ज्या समाजांत असा प्रकार चालतो, त्या समाजांत लवकर सुधारणा झाली नाहीं तर, गोष्ट वाईट थराला जाण्याची भीति असते. समंजस व विचारशील लोकांनीं या अनिष्टग्रहप्रसारक मंडळीस वेळींच शुद्धीवर आणिलें पाहिजे. शुद्धीवर आले नाहींत, तर त्यास योग्य शासन करून दाबांत ठेवलें पाहिजे. नाहींतर ते बहकून जाऊन, आपल्या बरोबर दुसऱ्याचा नाश करण्यास कारणीभूत होतील यांत शंका नाहीं.

बहुजनसमाजाची किंवा त्यांतील कांहीं प्रमुख मंडळीची आपल्यावर भिस्त जडली आहे असें कळल्यावर, जात्या समंजस विचार डोक्यांत असले तरी, लोकप्रियतेस धोका येईल, या साहजिक बुद्धीनें ते लोकांपुढें मांडण्याची छाती होत नाहीं, व मांडले तरी ते ठसा उमटण्याजोग्या रीतीनें मांडवत नाहीं. कित्येकवेळां समाजाच्या अतिलालनाचा अथवा पूर्ण छंदानुरोधाचा परिणाम असा होतो कीं, आपल्या ह्मणण्याप्रमाणेंच सर्व झालें पाहिजे असा लोकांचा ग्रह ठाम होऊन जातो. मग ज्याचे आपण मोठे देव्हारे माजविले, ज्याचा अनन्यभावानें स्तुतिपाठ गायिला, प्रसंगविशेषीं ज्याचा जयघोष केला, व ज्याच्यावरून आरत्याही ओंवाळल्या, त्याचा सुविचारोपदेश क्षणमात्रही ऐकूं नये असें वाटतें. जरा आपल्या मर्जीविरुद्ध भाषण झालें कीं, त्या सर्व गौरवाचें मातेरें व्हावें, असा कांहीं विलक्षण जोर अशिक्षित लोकांच्या समाजांत असतो. तात्पर्य, हळू हळू शिक्षणप्रसार केल्याशिवाय अगदीं कडेलोटाच्या कल्पना सामान्य जनाच्या डोक्यांत शिरकविण्यास प्रयत्न केला ह्मणजे, त्या कल्पनांच्या मोहक व मादक गुणानें त्या एकदां स्थिर बसल्या ह्मणजे, मर्यादेच्या व सारासार विचाराच्या गोष्टी त्यास पळभरही मानवत नाहींत. यामुळें अशा केवळ लोकछंदानुरोधानें बनलेल्या अमुकुटधारी राजाचे हातून व्यावहारिकदृष्ट्या कल्याण बिलकुल होत नाहीं. चाललेल्या मंदच कां होईना, गतीस मात्र विरोध होतो.

वरील चार दोन खंडांत वर्णिलेली स्थिति आमच्या महाराष्ट्रांतील समाजास व मुख्यत्वेंकरून पुण्याच्या समाजास कशी लागू पडते, हें आलीकडील वर्षदोनवर्षांत चालू असलेल्या चळवळीवरून कोणाच्याहि लक्षांत येण्याजोगें आहे. वरील वर्णनांतील प्रत्येक विधानास समर्थक अशा घडलेल्या गोष्टी देत बसण्याचें येथें प्रयोजन नाहीं; परंतु अत्यंत महत्वाच्या व राष्ट्रीय हिताहिताच्या ज्या चळवळी आहेत, त्याविषयीं दोन शब्द येथें लिहिणें भाग आहे. केवळ स्थानिक महत्वाच्या ज्या गोष्टी आहेत, त्यांजवर कांहींच लिहिण्याचें कारण नाहीं. तशा गोष्टींची चर्चा वर्तमानपत्रांत जाहली नसती, तर त्या, या कानाच्या त्या कानाला देखील कळल्या नसत्या. दोनही पक्ष ह्या कामांत अत्यंत दूषणीय आहेत. हरहमेषा घरांत, रस्त्यांत, बाजारांत होणाऱ्या गोष्टीस नसतें महत्व आल्यानें, कालहानि व दीर्घद्वेष वाढतो; परंतु त्या राष्ट्रीयदृष्टीच्या विचारांत घेण्याचें कारण नाहीं. पण वर सांगितल्याप्रमाणें समाजाच्या प्रगतीस विरोध करणाऱ्या अशा मोठ्या प्रमाणावर चालू केलेल्या चळवळीचा या ठिकाणीं थोडा खुलासेवार ऊहापोह करणें अगत्याचें आहे. तशा चळवळी ह्मणजे **सा**र्वजनिक सभेंतील उलथापालथ, **सा**माजिक परिषदेचें राष्ट्रसभेच्या मंडपांतून उच्चाटन, **श्री**शिवाजीमहाराजमहोत्सव, **स**नातनधर्मपरिषद्, **गण**पत्युत्सव, **दे**शी माल वापरण्याविषयींची चळवळ व **डे**कन लिबरल असोसिएशनची स्थापना. ह्या सात चळवळींविषयीं विचार करितां, आतांपर्यंत वर्णन केलेली समाजाची मानसिक स्थिति व्यक्त करून दाखविणारीं, हीं प्रत्यक्ष घडलेलीं उदाहरणें आहेत किंवा उलट अधिक बरोबर रीतीनें लिहावयाचें ह्मटलें ह्मणजे या सात चळवळींचें सर्व निरनिराळ्या अंगांनीं मनन केलें असतां, त्यापासून वर वर्णिलेली समाजाच्या विचाराची प्रवृत्ति स्पष्ट दिसून येते.

या सात चळवळींविषयीं साद्यंत हकीकत देऊन, त्यावर चर्चा करून, त्यापासून मिळणारा बोध घेऊन, त्यांच्या इष्ट परिणामाचा सदुपयोग कसा करून घ्यावा व अनिष्ट परिणामाचा प्रतीकार कसा करावा इत्यादि प्रकरणें लिहित बसणें ह्मणजे एक भारतच होणार

आहे. पण तसें करण्याचा आमचा हेतुही नाहीं आणि तितकी जरूरीही नाहीं; परंतु त्यांचें सामान्य स्वरूप सांगून त्या प्रत्येकापासून आपलें नुकसान किती झालें आहे व तें भरून निघण्यास काय केलें पाहिजे, ह्या गोष्टींचा विचार केल्याशिवाय आज हातीं घेतलेल्या विषयाची पूर्तता होणें अशक्य आहे. त्यापासून थोडा बहुत फायदा झाला असेल, तर त्याचा आह्मीं अनंगीकार करणार नाहीं, त्याचाही उल्लेख योग्य स्थलीं करण्यांत येईल.

सार्वजनिकसभा ही संस्था ज्याला माहीत नाहीं असा लिहितां वाचतां येणाऱ्यांपैकीं कोणी गृहस्थ असेल असें आह्मांस वाटत नाहीं. सुमारें पंचवीस वर्षांपूर्वीं पुण्यास या संस्थेचें अधिष्ठान झाल्यापासून सरकार व प्रजा यामध्यें ज्या प्रकारचें ह्मणजे अदबीचें परंतु धीराचें दळणवळण पाहिजे आहे, तशा प्रकारचें दळणवळण सुरू होतें. तेवढ्या कालांत सार्वजनिक महत्वाचे प्रश्न जेवढे ह्मणून पुढें आले, तेवढ्यांवर प्रजाजनांपैकीं सुशिक्षित वर्गाचें मत काय आहे तें सरकारास मोठ्या नेटानें परंतु मर्यादशीलपणानें कळविलें आहे. खरोखर प्रजेच्या कल्याणासाठीं केलेल्या गोष्टींबद्दल सरकारचें अभिनंदन केलें आहे. तसेंच लोकमताची विचारपूस न करतां व कधीं कधीं लोकमत विरुद्ध आहे असें पूर्णपणें ठाऊक असूनही, सरकारचे हातून गैरवाजवी कामें झालीं, तेव्हां मुद्देसूदरीतीनें व शांतपणानें आपलें ह्मणणें सरकारापुढें मांडून त्यांच्या चुकांचें माप त्यांचे पदरांत घातलें आहे. ‘सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं’ या न्यायानें अनेकवेळां सभेचें ह्मणणें युक्तियुक्त व अखंड्य असूनही, सरकारांतून त्याचा योग्य विचार झाला नाहीं; पण अशावेळींदेखील दुसरी बाजू दाखविल्याबद्दल व तसें करण्यांत जितकें शहाणपण तितकेंच राजनिष्ठत्व प्रकट केल्याबद्दल, सरकाराकडून अभिनंदन झालें आहे. कितीएकवेळां हा गोड शब्दही न लिहितां, अगदीं तुटकपणानें व कांहीं अंशीं असभ्यपणानेंही सार्वजनिक सभेच्या अर्जांची सरकारांनीं वाट लावली आहे; परंतु जो जो ह्मणून अर्ज किंवा लेख सार्वजनिक सभेंतून बाहेर पडला, त्याची सर्व समंजस लोकांनीं व वर्तमानपत्रकर्त्यांनीं तारीफच केली आहे.

मुंबईचीं साहेबलोकांचीं प्रत्याहिक पत्रें, ज्यांवर हीं हिंदीलोकांचीं कैवारी, पुरस्कर्तें किंवा स्तुतिपाठक, असा दोषारोप कोणी करूं शकणार नाहीं, त्यांनींही सार्वजनिक सभेच्या लेखांच्या भारदस्तपणाबद्दल, मुद्देसूद-पणाबद्दल, न्यायी व निःपक्षपातीपणाबद्दल प्रसंगविशेषीं गुणानुवाद करावे, ही सामान्य समाधानाची गोष्ट आहे काय? नुसते सरकारास अर्ज करूनच आपला कार्यभाग आटपला असें सार्वजनिक सभेनें कधींच मानिलें नाहीं. सरकारास मदत करण्यासाठीं सार्वज-निक सभेनें पुष्कळ परिश्रम केले व पैसाही खर्च केला. मागें दुष्काळ पडला होता त्या वेळीं, सरकाराप्रमाणें आपणही ठिकठिकाणची खा-त्रीलायख माहिती गोळा करून, सरकारास साह्य केलें, याबद्दल सरका-राकडून सभेची वाहवा झाली आहे. तसेंच स्थानिकस्वराज्याचा हक्क हिंदुस्थानांतील लोकांस मिळाला, त्यावेळीं ठिकठिकाणीं मुखत्यार पाठवून त्या विषयाची माहिती लोकांस दिली. अशा पुष्कळ काम-गिऱ्या सार्वजनिकसभेनें बजावल्या व त्यामुळें लोकांत व सरकारांत या संस्थेची इभ्रत वाढली, ह्या गोष्टीचें या ठिकाणीं कोठवर वर्णन करावें? ही सर्व हकीकत ज्यास पहाणें असेल, त्याणें सार्वजनिकसभेच्या त्रैमा-सिकाचे आजवर निघालेल्या सर्व अंकांतील पहिलीं प्रकरणें *

---

* अगदीं अलीकडल्या गोष्टी ह्मणजे प्रॉव्हिन्शियल सर्व्हिसचे नियम, कायदे-कौन्सिलच्या जागांची वांटणी, सिव्हिलसर्व्हिस परीक्षा, हिंदुमुलमानांचे तंटे, यांवरील सार्वजनिकसभेचे लेख व अर्ज अद्यापि लोकांच्या स्मरणांतून गेले नसतील. मागें केलेल्या कामगिरीसंबंधानें, नुसते पुढील विषय लक्षांत आणले कीं त्यांवर सार्वजनिक सभेचे लेख, अर्ज, व जाहीरसभा, इत्यादि कामें लोकांपुढें उभीं राहतील अशी आह्मांस आशा आहे. १ देशी वर्तमानपत्रांचा कायदा; २ दक्षिणेंतील दरवड्याच्या हकीकती; ३ स्टँपाचा कायदा; ४ कालव्याच्या पाण्याचा कायदा; ५ शेतकऱ्यांचा कायदा; ६ स्थानिक स्वराज्याचा कायदा; ७ फायनॅन्स कमिटीचें सरक्युलर; ८ मिठाचा कर; ९ डेक्कनकॉलेजवर व पुणें हायस्कूलवर आलेल्या गदा; १० मोहोच्या फुलाचें बिल. वगैरे, वगैरे. या सर्व विषयांवरील लेख व अर्ज व याखेरीज गव्हरनर व गव्हरनरजनरल यांस अव्वल व अखेरीचे सलाम करतांना दिलेल्या व राजेरजवाड्यांस दिलेल्या व पाठविलेल्या मानपत्रांतून किती तरी सूचना लोकांच्या वतीनें केल्या आहेत. त्यांचा विचार करितां सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचीं पुस्तकें, राजकीय शिक्ष-णाचें अत्यंत महत्वाचें भांडार आहे, असें कोणीही ह्मणूं शकेल.

पहावींत. त्यांत, सभेनें केलेल्या कामकाजाची हकीकत व तिनें केलेला महत्वाचा सर्व पत्रव्यवहार येऊन गेला आहे. त्रैमासिकांतील दुसरें प्रकरण ह्मणजे स्वतंत्र लेखांचें. या लेखांची योग्यता फार मोठी आहे. त्यांच्या वाचनानें कित्येक विद्वान् व सन्मान्य गृहस्थांचा अनुभव, माहिती व दीर्घ शोध यांचा लाभ वाचकांस मिळण्याजोगा आहे. विलायतेंतील मासिकत्रैमासिकांत हे लेख शोभण्याजोगे आहेत, असा तीं पुस्तकें वाचणारांनीं अभिप्राय नमूद केलेला आहे. असा उदात्त इतिहास ज्या संस्थेचा आहे, तिचे हाल गेल्या दीड वर्षांत कसे झाले आहेत हें पाहिलें ह्मणजे, महाराष्ट्रांतील कोणत्याही विचारी मनुष्याचें हृदय फाटून जातें यांत आश्चर्य नाहीं. ज्यांणीं ह्या वृक्षाचें बीजारोपण* करून, त्यास पाणी घालून व त्याची हरएक प्रकारें निगा करून त्यास फलद्रूप केलें, त्यांना हल्लींची त्याची निष्फल, निष्पुष्प व निष्पर्ण स्थिति पाहून काय वाटत असेल याची कल्पना करणें अशक्य आहे. यास साम्य द्यावयाचेंच, तर आपला सर्वगुणसंपन्न पुत्र वनवासास जावयास निघाला त्यावेळीं राजा दशरथाची जी मानसिक व्यथा झाली असेल, तिचेंच योग्य. आपले भरज्वानीचे दिवस, ज्यांनीं या सभेच्या कार्यांत खर्च केले, व त्या सभेचा स्तुतिपाठ ऐकून ज्यांना भावी स्वातंत्र्याच्या आशेंत प्रस्तुत पारतंत्र्याचा क्षणभर तरी विसर पडत असे, त्यांच्या नशिबीं, हल्लीं सभेविषयीं चोहोंकडून तुच्छ वाद ऐकण्याचें यावें, यासारखी इंगळावरून काळीज ओढणारी दुसरी कोणती गोष्ट असणार बरें? आपण एकसारखे परिश्रम करून नांवारूपास आणलेल्या संस्थेचें काम

---

* सार्वजनिकसभा स्थापन झाली त्यावेळीं, राज्यकर्त्या गोऱ्या मंडळींत तिजविषयीं किती प्रतिकूल मत होतें, व केवळ तिच्या कर्तबगारीनेंच सभेविषयीं अनुकूळ ग्रह कसा झाला, हें पुढील वाक्यावरून कळेल: —

It is the fashion to assume that the 'Sarvajanika Sabha' is a seditious, if not a secret society, but an impartial survey of the papers in the four numbers which lie on our desk, leaves us unable to discover any ground for the impression, which appears to prevail in some quarters.——*Times of India.*

बहुतेक बंद पडावें व जेथें चांगली, व्यापक देशकार्यें करण्याची चर्चा सुरू असावी, त्या ठिकाणीं गांवांतल्या बाणेरड्या आपमतलबी मसलती होत असाव्या ; चांगल्या उपयुक्त कार्यास ज्या संस्थेनें मदत करण्यास एका पायावर तयार असावें, त्याच संस्थेच्या इमारतींतून कांग्रेसच्या कचेरीची हाकालपट्टी व्हावी ; अशा एक कां दोन गोष्टी ह्मणून लिहाव्या! एकंदरीनें गेल्या दीड वर्षांत मोठमोठ्या सार्वजनिक प्रश्नासंबंधांत सभेनें स्तब्धप्रायच रहावें व ज्यांत लोकांच्या खऱ्या कल्याणाची वृद्धि होण्याचा यत्किंचित् संभव नाहीं, अशा क्षुल्लक बाबींत सभेच्या व्यवस्थापकांनीं चूर असावें, हें ज्यांनीं सभेसाठीं देह झिजविला असेल त्यांना कसें पाहवेल ? आजपर्यंत केलेलें सर्व काम अन्यथा होण्याचा प्रसंग गुदरलेला आहे, व आपण चालविलेल्या धोरणानें काम चाललें तरच देशाचें व लोकांचें हित आहे, अशी खात्री बाळगणारे सभेचे पहिल्यापासूनचे अभिमानी व कार्यकर्ते यांस याउपर आपल्या कर्तव्यापासून दूर राहणें भयावह आहे असें वाटणें साहजिक आहे. त्यांणीं आज दीड वर्ष सुमारें वाट पाहिली; परंतु प्रस्तुत व्यवस्थापकांच्या विचाराचा ओघ भलतीकडे वाहत आहे हें पाहून, सुधारणेच्या आशेचा सर्वथा भंग झाला. अशा स्थितींत पूर्ववत् कामाचें जूं आपल्या मानेवर पुनः घेतलें पाहिजे, तसें केलें नाहीं तर, पूर्वीं झालेल्या अनर्थांची पुनरावृत्ति होईल, व आपल्या कुडींत प्राण आहे तोंपर्यंत त्यांचा प्रतीकार करणें आपलें आद्यकर्तव्य आहे, असें वाटून त्याच लोकांनीं दुसरी सार्वजनिक सभा काढण्याचें ठरविलें आहे, असें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. त्यांतील लोकांची व त्यांच्या स्वभावाची जी सर्वांस माहिती आहे, तिजवरून आह्मी खास ह्मणूं शकतों कीं, प्रसंग अनावर असल्याशिवाय ते असें पाऊल टाकणारे नाहींत. प्रतिस्पर्धी सार्वजनिक सभा काढण्यांत त्यांस पराकाष्ठेचा खेद झाला असेल, यांत आह्मांस बिलकुल शंका नाहीं. आपल्या खासगी मतावर व केवळ मनाच्या कलावर ही गोष्ट अवलंबून असती, तर अशी दुहीची गोष्ट ते कधींही करतेना; परंतु देशकार्याच्या विचारापुढें आपले अंतस्थ मनोविकार लुले पडले पाहिजेत. त्यांचा

विजय होणें शक्य व इष्ट नाहीं. पुढील कार्य पूर्वींच्याच धोरणानें चालेल याविषयीं संशय घेण्याचें कारण नाहीं. **डेक्कनसभे**सही आपलें पुस्तक वेगळें काढावें लागेल, तेंही पूर्वीप्रमाणें उत्तम निघेल यांत संशय नाहीं.

ही **डेक्कन सभा** निघण्याचें कारण ह्मणून इतकेंच कीं, आपल्यांमधील वृद्ध, अनुभविक, विचारी व बहुतेक विद्वान् लोक यांचे विचार, हल्लीं ज्या विचारांचा पुण्यांत फैलावा आहे व जे बहुजनसंख्येस मान्य आहेत त्यांच्याविरुद्ध आहेत * ह्मणजे दीड दोन वर्षांपूर्वी ज्या विचारानें सार्वजनिक सभा चालत होती, ते विचार व त्यास अनुसरून असलेला वर्तनक्रम आतां पसंत नाहीं, असाच भाग झाला. 'ते पूर्वींचे विचार नामर्दपणाचे व आतांचे विचार वीरश्रीचे.' खरोखर पाहतां, राजकीय बाबतींत आमच्या समाजांत दोन मतें असण्याचें कारणच नाहीं. काम करणाऱ्याच्या हातांत काम सोंपवावें व संस्था सुरळीतपणानें चालाव्या; पण केवळ पक्षभेद होऊन व्यक्तिव्यक्तींच्या वैमनस्याचे परिणाम सार्वजनिक सभेसारख्या राष्ट्रीय महत्वाच्या

---

* ज्या 'पॉप्युलर बेसिस्' वर सार्वजनिक सभेची इमारत दृढ राहील असें वाटलें होतें, तोच पाया इमारत ढासळण्यास कारणीभूत झाला आहे. सभेची खरी योग्यता जी सरकारांत व लोकांत आहे, ती खटपटी लोकांच्या हातचलाखीनें फिरणाऱ्या लोकमताच्या डौली पायावर अवलंबून नाहीं. ती योग्यता सभेनें आजवर एकनिष्ठपणानें बजाविलेल्या कामगिरीच्या भक्कम पायावर आहे. या संबंधानें लोकनियुक्त प्रतिनिधिसत्ताक पद्धतीवरच मुळीं आपला विश्वास नाहीं, असा डा॰ निकोल्सन यांनीं १७ वर्षांपूर्वी इशारा दिला होता, तो वाचण्याजोगा आहे.

I have the greatest respect for the free expression of public opinion: its worth is the true test of its legitimacy. On the other hand, I have no faith in any form of parliamentary Government, in any system where temporal power is wielded by so called representatives of the people; the very bad results invariably attending this system are the proof of its illegitimacy. I hope, the Sabha, which acknowledges 'a popular elective system' in its constitution, will never make the mistake of having its tittle to consideration on its election or on anything except the results of its work.

संस्थेसही भोंवले. दोन पक्षांत मतांतर बिलकुल नसतां, अधिकारी-वर्ग बदलून टाकून कामाचा भंडवडा मात्र झाला! दुसरें कांहीं नाहीं. जशा प्रकारचे नम्र परंतु मुद्देसुद व जोरदार अर्ज पूर्वी जात असत, तसे गेले नाहींत. सभेच्या त्रैमासिकाचीहि व्यवस्था असमाधानकारकच झाली व सभेंत झालेलीं कांहीं कामेंही सभेच्या मूळ हेतूस सुटून झालीं. जातीचा, धर्माचा व वर्णाचा संबंध मनांत न आणतां, सर्व लोकांस राजकीय दृष्टीनें सारखेंच लेखणें, हें सभेचें पहिलें कर्तव्य आहे; परंतु सभेच्या प्रस्तुत व्यवस्थापकांचा कल, हे भेद जितके व्यक्त व दृढ होतील तितके करण्याचा आहे, असें त्यांच्या लिहिण्याबोलण्यावरून स्पष्ट होत असतें. सामाजिक सुधारणेच्या कामांत त्यांचे विचार अगदीं प्राचीन मताप्रमाणें असल्याचें, त्यांच्या बोलण्यांत दृष्टोत्पत्तीस येतें. त्यांत कित्येकांच्या उक्तिकृतींमध्यें ३६ छत्तीसाचा आंकडा असतो ही गोष्ट वेगळी. सामाजिक संबंधांत त्यांस आपल्या राष्ट्रासारखें सर्वगुणपरिपूर्ण राष्ट्र पृथ्वीतलावर दुसरें दिसत नाहीं. परकीय राष्ट्रांपासून आह्मांस धर्म, रीतिभाती, नीति या बाबतींत कांहींच शिकण्याजोगें नाहीं असा त्यांचा ठाम ग्रह झालेला लोकांत बोलून दाखविण्यांत येतो; त्यायोगें मागें सांगितल्याप्रमाणें स्तुत्यंध झालेला श्रोतृसमाज त्यांच्यापुढें भारून टाकल्याप्रमाणें, ते धरतील त्या तालावर नाचण्यास तयार असतो. या भरांत सामाजिक सुधारक ह्मणून एक निंद्य लोकांचा असा ठरविलेला वर्ग आहे, त्यास सामान्यतः किंवा कधीं कधीं नामनिर्देश करून, ही समाजस्तुतिलुब्ध वक्ती मंडळी हवें तसें तोंडसुख घेते. हाच वक्तृपीठावरील प्रकार वर्तमानपत्रांतील रकान्यांत प्रतिबिंबित होतो. अशायोगानें आपल्यामधील थोर थोर नाणावलेल्या लोकांविषयीं पूज्यबुद्धि नाहींशी करून टाकण्याचा सपाटा सुरू आहे. आपल्याहून निराळ्या मताचा मनुष्य झाला कीं, त्याच्या वाटेल त्या खासगी गोष्टीदेखील बाहेर काढून सन्मान्य गृहस्थांची विटंबना करण्याची व ऐकण्याची लोकांना खोड लागून गेल्यासारखें झालें आहे. सरकारच्या कृत्यावरही टीका करतांना असाच उद्दाम व उच्छृंखल

प्रकार दिसून येतो. सौम्य रीतीनें पण सत्यास धरून लिहिलेले लेख मिळमिळीत अथवा पिचपिचीत ह्मणून ठरतात! लोकांस असेच लेख वाचण्याची संवय झाली असल्यामुळें, साध्याशा गोष्टीवरही तसेच कडक व झणझणीत ह्मणजे जवळ जवळ शिव्यांनीं भरलेले लेख हवेसे होतात. तुमतीं मतेंच जर ह्मणाल, तर सर्वांचीं अगदीं सारखीं, पण लिहिण्यांत बेपर्वाईचे व आदरशून्य लेख लोकप्रियता संपादन करूं पहाणाऱ्या निस्पृहंमन्य लेखकांच्याच टाकांतून उतरतात. त्यांच्या मतें जोर कायतो सर्व भाषेंत आला ह्मणजे झालें. खरा जोर विचारांत व लेखांत भरून गेलेल्या माहितींत असला पाहिजे, हें तत्व ह्या मंडळींच्या लक्षांत येत नाहीं. साधारण आपल्या घरच्या नोकरास ज्याप्रमाणें एखादा तामसी धनी शिव्या देतो, त्यापेक्षां, खुद्द गव्हर्नराविषयीं लिहितांना कित्येक लेखक अधिक कडकपणा दाखवितात. मग सामान्यतः इंग्लिशलोकांविषयीं लिहितांना व सुधारकाविषयीं लिहितांना काय लिहावें आणि काय न लिहावें याचा धरबंदच रहावयाचा नाहीं. याचें कारण एकदां तसें लिहून, लोकांस तसें वाचण्याची चटक लागली ह्मणजे, सौम्य पण सत्यतेंत कमी नव्हेत असे लेख दोघांसही—लेखकांस व वाचकांस—रुचतच नाहींत. अशा प्रकारें भाषणांच्या व लेखनांच्या बाबतींत जेथें समाजाच्या अभिरुचीस भलतेंच वळण लागत चाललें आहे, तेथें त्यांचा त्यास वीट येईपर्यंत वाट पहात स्वस्थ बसावें, नाहीतर चांगलें वळण देण्यास चांगलेच परिश्रम करावे. ह्या दोन मार्गांहून तिसरा मार्ग समंजस व विचारी मनुष्यास राहिलाच नाहीं. या दोन मार्गांपैकीं दुसरा आणि अधिक शौर्याचा मार्ग, पुण्यांतील पराजित सुधारक वर्गानें पतकरिला आहे, हेंच त्यास विशेष भूषणावह आहे. सरळ व बांधीव रस्त्यानें आंधळादेखील जाऊं शकेल; पण काट्याकुट्यांतून झाडाझुडपांतून डोंगराळ अशा आडमार्गानें जाणाऱ्या मनुष्यासच शूर ह्मणावयाचें. लोकांच्या छंदानेंच वर्तून, त्यांजकडून पाठ थोपटून घेण्याचें काम कोणीही करील; पण त्यांस शहाणे करून त्यांजकडून चांगलीं कामें करून घेण्याचें कृत्य मात्र धीमान् नरवीरावांचून दुसऱ्याचे हातून होणें शक्य नाहीं.

# * सत्राव्या शतकांतील वेड्या समजुती.

## चेटूक.

सत्राव्या शतकामध्यें चेटूक करणें ह्मणजे गुन्हा समजत. या गुन्ह्याविषयीं एक विशेष गोष्ट लक्ष्यांत घेण्यासारखी आहे, ती ही कीं, हे गुन्हे प्रत्यक्ष दिसणारे नव्हत; तथापि त्यांवर पुष्कळांचा विश्वास असे. इतकेंच नव्हे, तर त्याजबद्दल अनेकवेळां, विशेषत: स्काटलंडामध्यें लोकांवर खटले करून त्यांची चौकशीही होई. स्काटलंडचा राजा सहावा जेम्स, हा मोठा विद्वान् होता; तरी त्या विद्वत्तेचा उपयोग तो नेहमीं चांगल्याच गोष्टीकडे करीत असे, असें नव्हतें. उदाहरणार्थ, त्यानें एकदां 'धूम्रपाननिषेध' ह्मणून एक ग्रंथ लिहिला होता! तेव्हां, राजेसाहेबांनीं 'चेटूकक्रिये' विरुद्धही एक पुस्तक लिहिण्यांत मेंदु खर्च केला यांत नवल नाहीं! स्काटलंडचे प्रेस्बिटेरीयन् पाद्री यांना वरील विषयासंबंधीं राजेसाहेबांचे विचार जरी थोडेच पसंत होते, तरी तीं राजाचीं मतें असल्यानें त्यांनीं त्यांचा पूर्ण स्वीकार केला, आणि त्यामुळें पुष्कळ लोक या काल्पनिक गुन्ह्याबद्दल दोषी ठरून व्यर्थ ठार मारले गेले.

तथापि जे लोक या गुन्ह्याबद्दल मारले गेले, त्यांपैकीं कांहीं लोक त्या शिक्षेस पात्र होते असें मला सांगितलें पाहिजे. कारण, पिशाच, देवदेवता इत्यादिकांशीं आपला व्यवहार आहे असें मिष करून, भोळ्या भाविक लोकांस ठकविणारे ठक त्यावेळीं स्त्रीपुरुष या दोन्ही

---

* ह्या गोष्टी प्रसिद्ध कादंबरीकार व कवि "सरवाल्टर स्कॉट्" याणें लिहिल्या आहेत. ह्या सर्व पौराणिक आहेत, ऐतिहासिक नव्हेत; ह्मणून त्या सर्वथैव खऱ्या असतीलच असें खात्रीनें ह्मणवत नाहीं; तथापि त्यावरून तत्कालीन लोकग्रहाविषयीं सामान्यत: अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं.

वर्गांत पुष्कळ असत, आणि हे लोक जे कोणी त्यांजकडे सल्ला घेण्यास जात, त्यांना ते शत्रूचा सूड घेण्याचें साधन, ह्मणून कांहीं गुटिका देत. ही गुटिका कांहीं विषारी पदार्थ एकत्र मिसळून तयार केलेली असे, व तिचें सेवन करणाऱ्यास ती हटकून अपाय करी.

अशाप्रकारचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. त्यांपैकीं मासल्याकरितां एक येथें सांगतों. उत्तर स्कातलंदांत एका 'अर्ल'ची एक बायको होती. ती चांगल्या कुलीन घराण्यांतील असून, द्वितीय संबंधाची होती. आपल्या सख्या पुत्राला आपल्या नवऱ्याची पदवी व सर्व इस्टेट मिळावी या हेतूनें, आपल्या वडील सावत्र पोराला ठार मारण्याची इच्छा तिनें धरली; आणि तो हेतु सिद्धीस नेण्यासाठीं, तिनें एका उत्तरेकडील डोंगराळ प्रांतांत राहणाऱ्या बाईकडून कांहीं औषधें पैदा केलीं. ही बाई चेटकीचा धंदा करीत असे. नंतर त्या कुलीन बाईनें तीं सर्व मारक द्रव्यें 'एल' दारूंत मिळवून, संधि पाहून त्या पोरास देण्यासाठीं एकीकडे ठेविलीं; परंतु ईश्वरानें तिची इच्छा तर निष्फळ केलीच; पण शिवाय तिला तिच्या कृत्याबद्दल भयंकर शासन केलें, तें असें.—तिचा जो पोटचा मुलगा होता, व ज्याच्या कल्याणासाठीं ती हें भयंकर पाप करण्यास प्रवृत्त झाली होती, तो एकदां शिकारीहून अगदीं थकून व अतिशय तान्हेजून आला, आणि कर्मधर्मसंयोगानें, तोच मादक पेला त्याचे हातीं चुकून लागला! त्यानें त्या तहानेच्या तडाख्यांत किंचित्सुद्धां विचार न करितां, तो पेला चटकन् पिऊन टाकिला, आणि तत्काळ मरण पावला!! हा विषाचा पेला तयार करणाऱ्या दुष्ट बाईची पुढें चौकशी होऊन, तिला देहांत प्रायश्चित्त मिळालें. आतां अशाप्रकारचें कृत्य करणाऱ्यास शिक्षा मिळाली असतां, कोणालाही वाईट वाटणार नाहीं; पण हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, ती जी शिक्षेस पात्र झाली, ती 'चेटकी' ह्मणून नव्हे, तर विषप्रयोगानें खून करण्याचे कामीं ती सामील झाली ह्मणून.

पण चेटूक करण्याबद्दल ज्यांना मरणाची शिक्षा भोगावी लागली, ते बहुश: ह्मातारे असत; आणि त्यांत फारकरून ज्यांना कोणी पालक

नाहीं व ज्या अगदीं निकृष्टदशेंत असून एकुलत्या, असल्या बायाच पुष्कळ असत. या बायांचा स्वभाव, त्यांच्या म्हातारपणामुळें व अशक्तपणामुळें, मोठा त्रासिक व चिडखोर झालेला असे. आणि जेव्हां जेव्हां शेजारी पाजारी यांच्याशीं भांडत आणि शिव्या देत, किंवा त्यांचा तिरस्कार करीत, तेव्हां त्या त्रासानें त्या त्यांना उलट ' तुमचें तळपट कां होईना! ' असें म्हणून शिव्या, श्राप देत. त्यांचा स्वभावच असा बनून गेलेला असे ; आणि या दुर्दैवी प्राण्यांच्या मुखांतून रागाचेवेळीं, जेव्हां अशा प्रकारचे शिव्या, श्राप सहजगत्या एखाद्या कुटुंबावर बाहेर पडत, तेव्हां काकतालीयन्यायानें जर एखादें मूल आजारी पडलें, किंवा एखादे शिंगराचा पाय मोडून तें लंगडें झालें, किंवा एखादा बैल मेला, अगर दुसरें एखादें अरिष्ट त्या कुटुंबावर आलें कीं, लगेच त्यावरून त्या बिचाऱ्या बायांवर चेटूक केल्याचा आरोप येई, व चमत्कार हा कीं, कोर्टांत न्यायाधीश व पंच ह्या गोष्टी, गुन्हा केल्याबद्दलचा मोठा सबळ पुरावा म्हणून मान्य करीत !! याशिवाय, तिचें वर्तन चमत्कारिक असून, स्वभाव तुसड असला व आपल्याशींच पुटपुटण्याची संवय अगर कष्टमय जरा व दारिद्र्य यांमुळें येणाऱ्या भ्रांतिष्टपणाचीं कोणतीहीं चिन्हें तिच्या अंगीं असलीं आणि त्यामुळें शेजाऱ्याच्या मनांत, त्या बिचाऱ्या बाईविषयीं चेटकी म्हणून जर संशय आधींच आलेला असला कीं, ' आज बरेच दिवस ही चेटकीचा धंदा करीत आहे ' अशी साक्ष भरण्यास ते तयार होत असत, आणि मग वधस्तंभाजवळ विस्तवांत जाळून मारण्याच्या शिक्षेपासून तिची क्वचित् सुटका होई.

कमी प्रतीच्या लोकांतील एकाद्या वृद्ध बाईनें आपल्याला एक विशेष कृति माहित आहे, असें सांगितलें, अगर ज्याचें रहस्य तिलाच ठाऊक आहे, अशा औषधोपचारानें, अगर मंत्रानें अगर एकाद्या ताईतानें कांहीं आजार बरे करण्याचें यत्न आपल्या जवळ आहे असें म्हटलें, तरी तेवढ्यानेंसुद्धां त्या बाईचा जीव धोक्यांत पडत असे ; आणि वैद्यांनीं जे आजार असाध्य म्हणून सोडले, ते आजार

बरे करण्याचें सामर्थ्य अशा प्रकारच्या मांत्रिक साधनांत आहे, अशी त्यावेळीं लोकांचीही समजूत होती.

अशाप्रकारची स्त्री, जी आपल्या कलेचा उपयोग परपीडेकडे न करितां परोपकारार्थ करी, तिला ' श्वेतडाकिनी ' असें ह्मणत; तथापि ती चेटकीच असल्यामुळें, तीसुद्धां वधस्तंभास पात्र असे. अशाप्रकारची वैद्यीणसुद्धां इतकीच या दोषास पात्र असे. मग तिचा रोगी मरो अगर बरा होवो. मग जशी परिस्थिति असेल, तसा तिजवर रोग्याला बरा करण्यासाठीं अगर ठार मारण्यासाठीं तिनें चेटूक केलें असा दोष ठेवून, तिला शिक्षा देत. मग तिनें आपल्या बचावाकरितां आपल्या तर्फे असा जरी पुरावा केला कीं, मला हें गुह्य कुटुंब परंपरागत प्राप्त झालें आहे, अगर दुसऱ्या कोणाकडून तरी मिळालें आहे, तरी तें तिचें ह्मणणें ऐकून न घेतां, तिनें गुप्त व बेकायदेशीर रीतीनें रोग्यास बरे करण्याचा प्रयत्न केला असा तिजवर गुन्हा ठेवून, तिला एकदम मरणाची शिक्षा देत. जगूं काय तिणें, वर सांगितल्याप्रमाणें, मनुष्यवध करण्यास मदत केली!!

पुढील गोष्ट अशाप्रकारचीच आहे, व ती चांगली लक्षांत ठेवण्याजोगी आहे. तिला आधार दंतकथाच आहे; पण ती खरी असण्याचा बराच संभव आहे. पूर्वी एक नामांकित इंग्लिश न्यायाधीश आपल्या प्रांतांत हिंडत असतां, त्याजपुढें एक ह्मातारी बाई आली. हिनें एका रोग्याची मंद दृष्टी कांहीं एक ताटगा करून बरी केली, असा तिजवर आरोप होता. तो ताटगा कोणता ह्मणाल तर, एक सुताची गुंडी तिनें त्या रोग्याला गळ्यांत बांधण्यास दिली होती. सामान्य औषधोपचारानें बरे न झालेले रोगी, ह्या ताटग्यानें बरे झाल्याबद्दलच्या पुष्कळ आश्चर्यकारक गोष्टी, साक्षीदारांनीं सांगितल्या. त्यानंतर ती बिचारी ह्मातारी ह्मणाली, महाराज, जर त्या सुताच्या गुंडींत कांहीं चेटूक असलें, तर तें मला माहीत नाहीं. आपल्या बचावासाठीं तिला यावाचून दुसरें कांहींच सांगण्यास नव्हतें. तिनें सांगितलें कीं, मला ही गुंडी सुमारें तीस वर्षांपूर्वी एका आक्सफोर्ड येथील विद्यार्थ्याकडून,

माझ्याच कुटुंबांतील एका मनुष्यास बरे करण्याकरितां मिळाली होती. त्यानें तिचा उपयोग केला व त्याच्यायोगानें त्याचा आजार बरा झाला; ह्मणून अशाच प्रकारच्या आजारापासून ज्यांना पीडा होत असेल, त्यांना त्या पीडेपासून मुक्त करण्यासाठीं, मी जर ती गुंडी त्यांना घटकाभर उपयोगास दिली, किंबहुना त्यापासून याबद्दल थोडीशी फीही घेतली, तर त्यांत मी कोणाचें नुकसान केलें असें मला वाटत नाहीं. पंचांनीं तिच्या या ह्मणण्याकडे थोडेंच लक्ष दिलें; पण न्यायाधीशास मात्र तें ऐकून गहिंवर आला! त्यानें तिला पुसलें, 'बाई, ज्यावेळेस ही मौल्यवान् वस्तु तुला मिळाली, त्यावेळेस तूं कोठें राहत होतीस?' तिनें एका खेड्याचें नांव घेऊन, तेथें आपण रहात होतें, असें उत्तर दिलें. त्या ठिकाणीं, तिनें पूर्वीं एक लहानसें दारू विकण्याचें दुकान घातलें होतें. नंतर न्यायाधीशानें तें गुंडाळें, मोठ्या जिज्ञासेनें हातांत घेऊन, नीट बारकाईनें तपासून पाहिलें; आणि पंचांकडे वळून त्यांना ह्मणाला, 'सभ्य गृहस्थहो, आह्मीं या गरीब ह्मातार्‍या बाईसंबंधानें मोठा अन्याय करण्याच्या बेतांत आहों, आणि तसें न व्हावें ह्मणून, मी लहान असतां जें मूर्खपणाचें वाईट कृत्य केलें, तें तुह्मांपुढें उघडपणें कबूल करतों. ज्यावेळची हकीकत ही बाई आपल्यास सांगत आहे, त्यावेळीं मी पाठशाळेंत होतों; पण माझें सर्व वर्तन त्यावेळीं आळशी व उनाडपणाचें होतें. ईश्वरदयेनें त्यांत जी माझी सुधारणा झाली, ती जर झाली नसती, तर आजची प्राप्त झालेली स्थिति मला प्राप्त होणें फार मुष्कील झालें असतें. मी एकदां त्यावेळीं या बाईच्या दुकानांत एक अहोरात्र राहिलों होतों. त्यावेळीं, तिचें बिल भागविण्यास मजजवळ कांहीं नव्हतें. मला पुढें काय करावें हें सुचेना. आणि मी असें पाहिलें कीं, ही बाई, आपल्या आजारी मुलीच्या खटपटींत अगदीं मग्न आहे. ह्या मुलीचे डोळे दुखरे होते. अशावेळीं मी तिच्याशीं नीचपणाचें वर्तन केलें. मी असें मिष केलें कीं, मला कांहीं मंत्रतंत्र येतें, आणि तिची खुषी असल्यास, तिच्या बिलाच्या ऐवजीं मी तिच्या मुलीचे डोळे या मंत्रानें बरे करीन. या गोष्टीला ती वेडीबाई तत्काळ कबूल झाली; आणि

तिच्या भोळेपणामुळें आपल्याला एक बिल फुकट पदरांत पडलें, याचा संतोष मानून गप न राहतां उलट, त्या बाईच्या भोळसरपणाची एका चावट पद्यांत चेष्टा करून, तें एका चर्मपटावर लिहिलें आणि तिला तें, ( जिच्या योगानें आज तिच्या जिवावर प्रसंग आला!! ) त्या गुंडींत गुंडाळण्यास सांगितलें. ह्या गोष्टीचा खरेपणा पहावयाचा असल्यास, ती गुंडी उलगडून पहावी, म्हणजे त्या तोटग्याच्या गुणाविषयीं आपची खात्री होईल. ' मग ती गुंडी त्यांनीं उलगडून पाहिली, तों तिच्या आंत गुंडाळलेल्या चर्मपटाच्या तुकड्यावर, एक दोन चरणाची कविता लिहिलेली आढळली, त्या चरणांचा अर्थ ' पिशाच तुझें दोन्ही डोळे फोडो आणि त्या दोन्ही भोकांत थुंको ' असा होता.

अशा मंत्रानें जे लोक बरे होत, ते बहुतकरून आपोआप नैसर्गिक नियमानेंच बरे होत असावेत, आणि कदाचित् कांहीं मदत त्यांच्या मनाकडून होत असल्यास होत असेल; परंतु अशा भारलेल्या वस्तूंचा जे लोक उपयोग करीत, त्यांना त्यांच्या दुर्दैवामुळें ते भारणारे लोक नेहमींच सांपडत असें होत नसे. ह्मणून पुष्कळ गरीब निरपराधी हतभागी प्राणी प्राणास मुकत यांत संशय नाहीं. फार कशाला, वरील गोष्टींतील ह्यातान्या दारूवालीकडेच पहाना; तिला असा आपला पूर्वीचा गिन्हाईक अकल्पितपणें खुद्द न्यायाधीशाचेच ठिकाणीं मिळाला, तसा जर न मिळता, तर ती खचित प्राणास मुकती असती.

आणखी एका बाईची अशी गोष्ट सांगतात कीं, तिनें मंत्र घालून गुरांना पटकीच्या आजारांतून वांचविलें. त्या बाईची फी ह्मटली ह्मणजे एक भाकरीचा पाव व एक रुप्याचें ' पेनी ' नांवाचें नाणें. तिनें ज्या जादूच्यायोगानें असे अपूर्व चमत्कार केले, तो मंत्र उघडपणें सांगण्यास जेव्हां तिला हुकूम झाला, तेव्हां असें आढळून आलें कीं, तो मंत्र तिच्या कुळांच्या भोळसरपणाची चेष्टा आहे. त्यांतील आशय हा होता, " एक भाकरी माझ्या हातांत आली आणि एक

पेनी माझ्या पिशवींत पडली, तुझा कांहीं फायदा नाहीं माझा कांहीं तोटा नाहीं !! "

हें चेटूक फक्त वैद्यकांतच तेवढें शिरलें आहे आणि इतरत्र नाहीं असा कांहीं समज नव्हता. कोणत्याही कलेमध्यें किंवा कोणत्याही धंद्यामध्यें कोणाचेठायीं यत्किंचित् नैपुण्य जरी दृष्टोपत्तीस आलें, —मग तें त्यानें आपल्या चातुर्यानें मिळविलेलें असो अगर उद्योगानें संपादन केलेलें असो,—कीं लगेच त्यांजवर चेटूक केल्याचा संशय लोक घेत. फार कशाला, आपल्या शेजाऱ्यापेक्षां आपल्या गाईसुद्धां चांगल्या स्थितींत असतां कामा नये !! मग ही स्थिति त्यांच्या खाण्यापिण्याकडे व स्वच्छतेकडे लक्ष दिल्यामुळें जरी प्राप्त झाली असली, तरी तिकडे कोणी लक्ष देत नसे. तसेंच एखाद्या बाईचे शेजारीं जरा कमी उद्योगी असले, आणि साधारणपणें उद्योग करून जेवढें चिवट निघेलसें वाटतें, त्यापेक्षां अधिक सूत जर त्या बाईनें काढलें, कीं तिजवर चेटूक केल्याचा संशय आलाच !! यापेक्षांही वेडेपणाची गोष्ट ह्मटली ह्मणजे, एकदां ' केंट ' तालुक्यांतील ' मार्लींग ' खेड्यांत राहणाऱ्या एका कुणब्यावर माजिस्ट्रेटापुढें चेटकेपणाचा आरोप आणिला होता. कारण, त्याच्या निशाणाचा नेम त्याच्या मित्रापेक्षां पुष्कळवेळां बरोबर येई !! हें त्याचें कौशल्य, व तो ' माशीला आपल्या सभोंवतीं उडूं व गुंगू देऊन, करमणूक करून घेत असे ' अशाबद्दल एक निराधार आख्यायिका, एवढ्या पुराव्यावरून न्यायाधीशाची खात्री झाली कीं, या मनुष्यानें ही कला, सैतानाच्याच कोणच्या तरी बच्याच्या साहाय्यानें संपादन केली !!!

ज्यांवर, मंत्रजाल, चेटूक वगैरे केल्याचा संशय असे, त्या लोकांवर याहून असंभवनीय व हास्यास्पद असे आरोप लोक ठेवीत. त्यावेळीं लोकांची अशी समजूत होती कीं, कांहींएक प्रकारचे, धर्माविरुद्ध, व अगदीं वेडगळ, असे विधिसंस्कार करून, हवें तेव्हां सैतानास आपल्यापुढें आणण्याचें सामर्थ्य ह्या लोकांचे अंगीं येतें, आणि अशा रीतीनें त्यांनीं त्याला आव्हान केलें, ह्मणजे सैतानाची स्वारी, कांहीं तरी

विलक्षण स्वरूप धारण करून, पुढें मूर्तिमंत येऊन उभी राहते. आणि ईश्वरकृपा संपादून, पापरूपी कारागृहांतून मुक्तता करून घेण्याची इच्छा त्यांनीं सोडून दिल्याबद्दल, सैतानानें त्यांना आपल्या शत्रूंचा सूड घेण्याची शक्ति दिली आहे. ही शक्ति व स्वजातीय प्राण्यांना पीडा करणें, अगर त्यांचें नुकसान करणें, एवढेंच काय तें त्यांनीं आपल्या नव्या धन्यापासून मिळविलें आहे असें लोक समजत. केव्हां, केव्हां लोक असें देखील ह्मणत कीं, ज्या ठिकाणीं सैतानाची मेजवानी असेल, तेथें त्यांना झाडणीच्या काठीवर बसून अंतरिक्षप्रयाण करण्याची शक्ति सैतानापासून मिळते. आणि अशाप्रसंगीं त्यांना जे विधि करावे लागतात, त्यांची हकीकतही फार कंटाळवाणी व अज्ञपणाची असून, आपल्या अध्यात्मिक विचाराहून अगदीं भिन्न आहे. ह्या गोष्टी, जे अगदीं अज्ञ व पशुतुल्य असतील, त्यांच्याच विश्वासास पात्र आहेत.

आतां वाचकांस हें वाचून फार चमत्कारिक आश्चर्य वाटेल कीं, ज्या लोकांवर असल्या काल्पनिक गुन्ह्याचा आरोप येई, ते लोकच आपल्यावर आणलेल्या वेडगळ व भयंकर आरोपांचा खरेपणा आपल्याच तोंडानें कबूल करून, आपणास दोषी ठरवीत; परंतु याची मीमांसा उघड आहे.

या हतभाग्यांपैकीं बिचारे बरेच लोक भ्रमिस्त झालेले असत. त्यांच्या मानसिक व शारीरिक शक्ति अगदीं नष्टप्राय झालेल्या असत, आणि ज्यांना ते शहाणे व विद्वान् असे समजत, ते लोक जेव्हां त्यांच्यावर राक्षसी व लोकोत्तर आरोप आणीत, तेव्हां आपण खरोखरच अपराधी आहों, असा त्यांचा निम्माशिम्मा ग्रह होई, आणि असें झालें ह्मणजे मग त्यांना जे प्रश्न करीत, ते जरी वेडगळ असले, तरी त्यांचीं उत्तरें ते देत; पण एवढ्यानेंच भागत नसे. केव्हां केव्हां त्यांचा जेव्हां कडक रीतीनें व क्रूरतेनें छल करावा, तेव्हांच ते आपले अपराध कबूल करीत.

स्काटलंडांतील सामान्य प्रतीच्या कोर्टांना, आरोपीचा छल करून त्यांच्या तोंडून हवी तशी जबानी घेण्याचा अधिकार नसून, तो फक्त

'प्रिव्हिकौन्सिला ' सत्र असे, ही गोष्ट खरी आहे; पण एवढ्यानें समाजांचा फार थोडा बचाव होई. कारण, चेटक्यांची चौकशी साधारण प्रतीच्या फौजदारी कोर्टासमोर क्वचितच होत असे. कारण, कायद्यानें ज्या अपराधास शिक्षा सांगितली आहे, अशाप्रकारच्या गुन्ह्याचें अस्तित्व, वकील व न्यायाधीश लोक जरी नाकबूल करीत नसत, तरी चेटकीक्रियेबद्दल ते कांहींसा अविश्वास दर्शवीत. तेणे-करून ज्या लोकांवर या अप्रिय दोषाचा आरोप आलेला असे, ते लोक, या धंदेवाल्याच्या स्वाधीन केले ह्मणजे, पुष्कळ वेळां सुटून जातात असा लोकांचा समज असे. आणि तसे ते सुटून न जावेत ह्मणून, चेटकीक्रियेची चौकशी बहुधा प्रिव्हिकौन्सिलनें नेमलेल्या कमि-शनरापुढेंच चालत असे. हे कमिशनर बहुधा खेड्यांतील सभ्य व पाद्री गृहस्थ असत. तेव्हां एकपक्षीं अज्ञान व दुसऱ्यापक्षीं भलत्या कामाकडे लाविलेली विद्वत्ता, व दोहोंपक्षीं हठवाद इतक्या गोष्टी एकत्र जमल्यामुळें, गांवढळ लोकांना, अशा लोकांवर खटला करण्याची जितकी मनापासून इच्छा असे, तितकी या कमिशनरांनाही असे. त्यांना त्यांच्या नेमणुकीमुळें, अपराध्याचे हाल करण्याचा अधिकार असे, आणि त्याचा ते निःशंकपणें हवातसा दुरुपयोग करीत. ते आपल्या मदतीस चेटकी हुडकून काढणारा असा एक कसबी घेत. हा गृहस्थ, आपल्याला हे गुन्हेगार उत्तम तऱ्हेनें अगदीं हातखंडा शो-धून काढण्याची विलक्षण कला साधली आहे असें मिष करून पैसे मिळ-वित असे. आणि कोल्हीं, रानमांजरें अगर अशाच प्रकारचे त्रास-दायक जिवाणू जसे हांकून लावितात, तसे या चेटक्यांना केव्हां केव्हां पॅरिशमधून किंवा शहरांमधून काढून लावण्याचें काम. माणशीं कांहीं ठराव करून हा पतकरत असे. हे दुष्ट ठक जसे सांगतील, तशा रीतीनें अपराध्यास पीडा होत असे. ह्मातारे, थकलेले अशांस झोंप घेऊं द्यावयाची नाहीं, आणि डोळे मिटूं लागल्यास, त्यांना तुरुंगांत इकडून तिकडे फिरायास लावावें, अंगांत सुया खुपसाव्या इत्यादि यातना ते त्यांना करीत. आपली प्रजा व आपला माल ह्मणून सैतान त्यांच्या त्वचेवर कांहीं खुणा करितो, अशी हे ठक थाप मारीत. मग

दु:खानें व जागरणानें वेडे होऊन गेल्यामुळें, हे दुर्दैवी प्राणी, जरी शेवटीं मरण हें त्यांच्या माथीं बसलेंच असे, तरी क्षणभरकां होईना, तेवढाच विसावा मिळावा ह्मणून, पाहिजे तें कबूल करीत यांत नवल नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें, या हतभाग्यांच्या मानासिक दौर्बल्यामुळें व त्यांच्या मांडलेल्या छळामुळें, ते कबूल होतच; पण पुष्कळवेळां लोक-लज्जेस्तव व जन्माचा कंटाळा आल्यामुळें, व वस्तुत: जे असंभवनीय व अयुक्तिक असे आरोपसुद्धां ते कबूल करीत. आपण ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, ज्या लोकांवर या चेटकी क्रियेचा आरोप असे, त्यांना बहुश: सर्व लोक व त्यांचे शेजारीपाजारी अपराधी असें समजत. आणि त्यांना दोषी ठरविण्यामध्यें कोर्टानें जर मागें घेतलें, तर त्यांना शिक्षा देण्याचें काम दंगेखोर लोक हातीं घेत. आणि मग ते त्या दुर्दैवी प्राण्यास बुडवून मारीत किंवा कोणत्या तरी दुसऱ्या उपायांनीं मारून टाकीत!! ह्मणून असें होई कीं, जरी यांचे हाल केले नाहींत, व जरी त्यांचें डोकें बिघडलें नसलें, तरी पुढें आपल्या नशीबीं असल्या प्रकारचा मृत्यु आहे एवढ्याच भीतीनें ते अपराध कबूल करीत! आणि ज्यांचीं मनें आपल्याविषयीं बिघडलीं आहेत अशा लोकांचा द्वेष सहन करण्यापेक्षां, कायद्यानें दिलेली शिक्षा कबूल करून मेलेलें त्यांना बरें वाटे! अशा प्रकारची झालेली एक चमत्कारिक गोष्ट सांगतात, ती अशी:—

मागें एकदां हॅडिंगटन येथें एक ह्मातारीबाई व तिची मुलगी ह्या दोघींची, त्या चेटकीचें काम करितात, ह्मणून चौकशी चालली होती. त्यांच्या गुन्ह्याबद्दल मुख्य पुरावा हा होता कीं, त्या अति दरिद्री असूनही त्यांचे चेहरे भयंकर दुष्काळामध्यें देखील नेहमीं "प्रफुल्लित व सुंदर" दिसत. त्या दुष्काळानें मोठमोठे श्रीमंत लोकसुद्धां दैन्यावस्थेस येऊन पोहोंचले होते, आणि दरिद्री लोक तर उपाशीं मरूं लागले होते; परंतु सर्व लोक असे विपत्तींत असतांना ह्या दोघी बाया नेहमीं-प्रमाणेंच खुशालीनें राहिल्या होत्या. त्यांनीं कोणाजवळ आपल्याला

मदत करा ह्मणून भिक्षा मागितली नाहीं किंवा ह्या सार्वजनिक अरिष्टापासून त्यांना दुःख झाल्याचें दिसून आलें नाहीं. पंचांची अशी पक्की खात्री झाली कीं, ही गोष्ट स्वाभाविक उपायानीं (साधनानीं) कधींही घडून यावयाची नाहीं, आणि एका किनसेन नांवाच्या डाकिनी शोधकानें, त्यांची विधियुक्त परीक्षा केल्यानंतर ज्या अर्थी आरोपीनीं सैतानाबरोबर असलेल्या व्यवहारासंबंधीं केलेल्या सर्व प्रश्नाची भडाभड कबुली दिली, त्याअर्थी पंचांनीं त्यांच्याच कबुलीवरून त्यांना बिनदिकत दोषी ठरविलें.

त्यावेळीं राजाच्या तर्फे जो वकील होता, (सर जॉर्ज मॅकिंझी) त्याचा या गोष्टीवर भरंवसा नव्हता. त्यानें ह्या बायांची खाजगी रीतीनें भेट घेतली, आणि त्यांना खरी हकीकत सांगण्याविषयीं आग्रह केला. त्यांनीं प्रथमतः आपल्या कबुली जबाबामध्यें जी गोष्ट सांगितली होती, तिचाच अनुवाद कांहीं वेळ चालविला; परंतु वकिलानें या बाया इतर बायांपेक्षां समजुतदार आहेत असें पाहून, त्यांजवर, तुह्मीं अशक्य गोष्टीचा आरोप आपल्यावर हट्टानें करून घेऊन, आत्महत्येस मदत करतां असा दोष ठेविला, आणि ज्याच्यायोगानें तुह्मीं आपली उपजीविका केली, त्यांतील खरें इंगित काय आहे तें जर उघड करून सांगाल, तर मी तुह्मांस जीवदान देऊन तुमचें रक्षण करीन असें अभिवचन दिलें. तेव्हां त्यांना मोठी पंचाईत पडून परस्परांकडे त्या मोठ्या उत्कंठेनें पाहूं लागल्या. सरतेशेवटीं आई ह्मणाली, ‘ महाराज, आपण फार चांगले आहा व आपला अधिकारही मोठा आहे असें मला वाटतें; पण त्याचा मला व माझ्या मुलीला कांहीं उपयोग नाहीं. आपण जरी आह्मांला या पिंजऱ्यांतून मुक्त केलें, तथापि आमच्यावरचा लोकांचा संशय नाहींसा होणार नाहीं. आह्मीं आमच्या झोंपडींत परत गेलों कीं, शेजारी बेसुमार ताडन आणि शिव्यांचा भडिमार यांनींच आमचें स्वागत करतील. आणि जरी त्यांनीं डोक्यांत धोंडा घालून आमचा मेंदु बाहेर काढिला नाहीं, किंवा तेथल्यातेथेंच बुडवून मारिलें नाहीं, तरी त्यांच्या मनांत आमच्याविषयीं वैर, मत्सर

हीं राहतीलच व प्रत्येक प्रसंगीं तीं बाहेर आल्यावांचून राहणार नाहींत, व त्यांच्यायोगानें आमचें जीवित इतकें कष्टमय होईल कीं, त्यापेक्षां एकदम मरून गेलेले बरें असें आह्मांला वाटतें.'

वकील साहेब ह्मणाले, 'तुह्मीं शेजाऱ्याबद्दल तिळमात्र भीति बाळगूं नका. तुह्मीं आपलें रहस्य जर मला सांगाल, तर मी तुमचें पुढें मरेपर्यंत संरक्षण करीन; आणि उत्तरेस माझी स्थावर इस्टेट आहे, तिकडे तुह्मांस पाठवून देईन. तेथें तुमची ही हकीकत कोणालाही माहीत असणेचा संभव नाहीं. आणि त्या ठिकाणीं लोकांची समजूत अशाप्रकारची आहे कीं, जरी त्यांना तुह्मीं चेटक्या आहां ह्मणून कळलें, तरी ते तुमचा द्वेष न करितां उलटे तुह्मांला भीतील व मान देतील.'

या अभिवचनांनीं त्यांच्या अंतःकरणांत मोह उत्पन्न होऊन, त्यांनीं त्याला सांगितलें कीं, आमच्या झोंपडींत एका कोंपऱ्यांत एक रिकामी जुनी पेटी आहे, ती जर आपण तेथून काढवाल आणि तिच्या खालची जमीन उकरून पहाल, तर सर्व दुष्काळ ज्यावर आह्मीं काढला, तें गुह्य आपल्याला उमजून येईल, व त्याचवेळीं त्यांनीं ईश्वराची शपथ वाहून असें सांगितलें कीं, ज्या बेकायदेशीर कृत्यांचा आह्मांवर आरोप आहे, व निराश होऊन ज्याला आह्मीं कबुली दिली, त्यांची आपल्याला यत्किंचित्‌सुद्धां माहिती नाहीं. सर जॉर्ज मॅकेंझीनें तत्काळ ती जागा तपासून पाहिली, त्यांत त्याला अर्धें पीप खारलेल्या गोगलगाईनीं भरलेलें आढळून आलें. पैकीं निर्मेसुमार संपून गेलें होतें! या विलक्षण अन्नावर त्या बिचाऱ्यांनीं, सर्व दुष्काळभर आपला निर्वाह केला!! वकीलानें, बोलल्याप्रमाणें वर्तन केलें. अशाप्रकारच्या खटऱ्यामध्यें लोकांनीं दिलेल्या कबुलीला किती महत्व द्यावें, हें ह्या गोष्टीपासून चांगलें व्यक्त होतें.

या कथेला ज्याअर्थीं केवळ दंतकथेचाच आधार आहे, त्याअर्थीं, ज्यांचा कालनिर्देश बरोबर करतां येईल, अशा आणखी दोन गोष्टी सांगतों.

यापैकीं पहिली जी आहे, ती एका चांगल्या कुलीन स्त्रीविषयीं आहे. सामान्यत: ज्यांवर या काल्पनिक गुन्ह्याचा आरोप येई, त्यांपेक्षां ही बाइ फारच श्रेष्ठ कुलांतील होती. 'फारडेल' येथील 'सरजान् हेंडरसन' यांची बहीण व 'फाईफ' येथील 'पिटारडो' नांवाच्या बड्या गृहस्थाची ती बायको होती. जरी या बाईचा जन्म व संबंध सन्मान्य घराण्याशीं होता, तरी या दुर्दैवी बायकोला इ० स० १६४९ त जुलै मध्यापासून ते दिसेंबर मध्यापावेतों एडिनबरो येथील साधारण प्रतीच्या तुरुंगामध्यें कैद भोगावी लागली. तेथें ती मेलेली सांपडली, व तिजवर विषप्रयोगाचीं पूर्ण चिन्हें दिसत होतीं. आपल्यावर आलेल्या आरोपानें होणारी अपकीर्ती, आपलें दूषित वर्तन व आपल्या कुळास लागलेला कलंक, इत्यादि गोष्टींचा विचार हेंच तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त होण्याविषयीं कारण झालें यांत संशय नाहीं.

ज्या प्रकारच्या विचारानें वरील गरीब बाई मरण्यास तयार झाली, तशाच प्रकारचा विचार एका सुंदर तरुण स्त्रीनें, ' पेले ' येथें इ० स० १६९७ त आपल्या चौकशीचे वेळीं केला. आपल्या तर्फे पुरावा जितक्या तत्परतेनें द्यावा तसा दिला नाहीं, ह्मणून तिचे कांहीं मित्र तिला दोष देऊं लागले. तेव्हां तिनें त्यांना थोडक्यांत असें उत्तर दिलें. ' त्यांनीं माझी अब्रु नाहींशी केली, आतां मला जगून काय करावयाचें ? '

परंतु अशाप्रकारची कबुली देऊन शेवटपर्यंत तेंच धरून बसल्याचें एका गरीबाचें उदाहरण एकानें लिहून ठेविलें आहे, तें फारच गहिंवर आणणारें आहे. हा गृहस्थ असल्या गोष्टींचा संग्रह करून ठेवीत असे व त्यांजवर त्याचा पूर्ण विश्वास असे. तो ह्मणतो कीं, ' लाडर ' खेड्यामध्यें एका बाईवर चेटूक केल्याचा आरोप आला, व ती आपला अपराध पुष्कळ वेळपर्यंत नाकबूल करीत होती; परंतु तुरुंगांतील आपले सर्व सोबती काढून नेले व त्यांचा वध करण्याचें नेमांत आलें, व आतां आपल्याला सर्व आयुष्य एकांतवासांत काढावें लागणार, हें पाहून ती बिचारी आपल्या जन्मास कंटाळली, आणि तत्कालीन मतान्वयें ज्या कृत्यास चेटूक समजत, तीं कृत्यें केल्याचें तिनें खोटेंच

कबूल केलें, आणि सर्वांबरोबर नेमलेल्या दिवशीं आपल्यालाही मारून टाकावें ह्मणून तिनें फिर्याद केली. तिचा हा विलक्षण प्रकार पाहून, तिच्या पाद्र्यास व इतर मंडळीस तिनें दिलेली अपराधाची कबूली अंतःकरणापासून नसावी, असा एकवार संशय येऊन, खोटी कबूली देऊन, आत्मघात करून घेणें हें मोठें दुष्टपणाचें कृत्य आहे, अशी त्यांनीं तिची पुष्कळ कानउघाडणी केली; परंतु ज्या अर्थीं तिनें आपलें ह्मणणें हट्टानें सोडलें नाहीं, त्याअर्थीं तिच्या इच्छेप्रमाणें तिला दोषी ठरवून सर्वांबरोबर तिलाही मारावें असें ठरविलें. वधस्थानीं नेल्यावर त्रिवार प्रार्थना करीतोंपर्यंत ती स्तब्ध राहिली. नंतर आतां फक्त उठून वधस्तंभाजवळ जावयाचें उरलें आहे असें पाहून, ती मोठ्यानें ओरडून ह्मणाली, 'अहो सर्व प्रेक्षकहो, मी चेटकी ह्मणून माझ्याच कबूलीनें आज मरत आहे; सर्वांना आणि मुख्यत्वें हे पाद्री व माजिस्त्रेट यांना मी या माझ्या रक्तपाताच्या दोषांतून मुक्त करतें. हा दोष सर्वोपरी मी माझ्या माथ्यावर घेतें—माझा रक्तपात माझ्याच डोक्यावर असो; आणि ज्याअर्थीं स्वर्गस्थ ईश्वरापुढें याचा जाब मला दिला पाहिजे, त्याअर्थीं मी प्रतिज्ञापूर्वक असें सांगतें कीं, लहान पोराप्रमाणें मी या पापापासून अलिप्त आहे; परंतु एका बाईनें द्रोहबुद्धीनें हा आरोप मजवर घातल्यानें, मला तुरुंगांत जावें लागलें. पुढें जेव्हां मला माझ्या नवऱ्यानें व मित्रांनीं सोडिलें, आणि तुरुंगांतून बाहेर पडण्याची अगर लोकांच्या विश्वासास पात्र होण्याची आतां आशा उरली नाहीं असें पाहिलें, तेव्हां मला जन्माचा कंटाळा येऊन, जगण्यापेक्षां मरण बरें असें वाटून, मी बुध्या आपला नाश करून घेण्यासाठीं सैतानाच्या मोहक प्रेरणेवरून, मी तें कबूल केलें' आणि अशा रीतीनें तिचा शेवट झाला!!

# बेंजामिन फ्रँक्लिनची पार्लमेंटपुढें झालेली जबानी ( १७६६ ).

गेल्या शतकाचे शेवटच्या पंचविशींत ब्रिटिश लोकांची हिंदुस्थानांत एकसारखी सरशी चालली होती. वॉरनहेस्टिंग्स साहेब यांच्या कारकीर्दीत बंगाल प्रांत इंग्रजांस मिळाला. पूर्वेकडील इंडियनांच्या सर्व मुलुखांचें स्वामित्व इंग्लंडाकडे येण्याचीं चिन्हें दिसत होतीं ; पण पश्चिमेकडील इंडियनांची राखरांगोळी करून, त्या ठिकाणीं वसाहत करून राहिलेल्या आपल्याच भाईबंदांशीं, जितांवर जेत्यांनीं जुलूम करावा, त्याप्रमाणें ब्रिटिश सरकारानें वर्तन ठेविल्यामुळें, वसाहतवाल्यांनीं साम, दान, भेद, दण्ड या चारीही उपायांचा यथाकालीं उपयोग करून आपणास स्वतंत्र करून घेतलें. ही हकीकत बहुधा सर्वांस माहीत आहेच. वसाहती व मातृभूमि यांमधील संग्रामकाल वॉरन्‌हेस्टिंग्स यांच्या कारकीर्दीशीं बहुतेक जुळतो. हे साहेब स्वपदारूढ झाल्यानंतर दोन वर्षांनींच वसाहतवाल्यांनीं आपल्या स्वातंत्र्यदुंदुभीच्या गंभीर नादानें सर्व पाश्चात्य जग दणाणून दिलें; आणि आपलें राजनिष्ठ प्रजात्व झुगारून देऊन इंग्लंडच्या लोकांस युद्धास आव्हान केलेंच ह्मटलें तरी चालेल. पराजय झाल्यावर ‘ झाली गोष्ट ठीक झाली ’ असें ह्मटलें तरी त्यावेळेस इंग्लंडास वसाहतींचें राज्य आपल्या हातून जावेंसें वाटलें नाहीं, ह्मणूनच त्यांणीं घनघोर संग्राम मांडला. त्यांत इंग्लंडास माघार खावी लागली. अमेरिकन वसाहतींचें स्वातंत्र्य कबूल करणें भाग पडलें. इतकें सगळें होण्यास फार वेळ लागला नाहीं. आमचे हेस्टिंग्ससाहेबांच्या कारकीर्दीचीं अजून दोन तीन वर्षें राहिलींच होतीं. पराभव झाल्यावर इंग्रज लोकांनीं करून घेतलेलें समाधान फार शांतवृत्तीचेंच दर्शक आहे. त्यांचें ह्मणणें इकडे हेस्टिंग्ससाहेब राज्य मिळवीत होतेच, तें नवीन आणि हें जुनें इतक्या राज्यावर अम्मल करण्यास फार जड गेलें असतें, ह्मणून हें पश्चिमेकडचें ओझें नाहींसें झालें हें

बरेंच झालें. उतूं गेलेलें दूध अग्नीचा भाग, लवंडलेलें दूध भूमीचा भाग असा समाधानप्रकार जगांत आहे ह्मणून बरें आहे; नाहींतर मानवी प्राणी निरंतर दुःखी राहता. असो; आह्मांस व आमच्या राज्यकर्त्यांस या इतिहासापासून पुष्कळ बोध घेतां येण्याजोगा आहे. वसाहतींनीं कायदेशीर चळवळी सर्व करून पाहिल्या व अखेरीस समशेर म्यानांतून बाहेर काढली. इंग्लंडांत बर्कसारखे महात्मे होते, त्यांणीं आपल्या लोकांस वेळींच सावध केलें; पण राजपक्षानें अधिकार-मदांत त्यांच्या सर्व वक्तृत्वाचा धिक्कारच केला. बर्कच्या पक्षाकडे कांहीं थोडे दिवस राज्यसूत्रें आलीं होतीं, तेवढ्या कालांत तंट्याचें मूळ जो स्टँम्पाचा कायदा, तो रद्द करावा अशाबद्दल त्यांनीं खटपट केली. त्या कामीं प्रसिद्ध अमेरिकन बेंजामिन फ्रँक्लिन यांची पार्लमेंटपुढें जबानी घेतली. तींत अमेरिकेच्या तत्कालीन स्थितीविषयीं फार सुरेखरीतीनें माहिती येऊन गेली आहे. ही जबानी अमेरिकेंतील संस्थानांच्या *स्वातंत्र्याच्या द्वाहीचे पूर्वी दहा वर्षें ह्मणजे १७६६ त झाली. त्या जबानीचें साद्यंत भाषांतर आह्मीं सादर करीत आहों, तें वाचकांनीं मननपूर्वक वाचावें.

१. प्र०—तुमचें नांव व राहण्याचें ठिकाण काय? उ०—फ्रँक्लिन; फिलाडेल्फिया.

२. प्र०—अमेरिकन लोक बरेच कर देतात काय? उ०—होय; पुष्कळ, व फार जबर कर देतात.

३. प्र०—पेनसिल्व्हानिआ येथें तेथील कायद्याप्रमाणें हल्लीं कोणते कर आहेत? उ०—स्थावर जंगम मालमत्तेवर कर आहे; एक माणशीं कर (डोईपट्टी) आहे; सर्व प्रकारच्या व्यापार धंद्यावर नफ्याच्या मानानें एक कर आहे; सर्व तऱ्हेच्या मद्यावर कर आहे; प्रत्येक आयात शिद्दीवर १० पौंड कर आहे; आणखी दुसरे कांहीं कर आहेत.

---

* Declaration of American Independence. 1776.

४. प्र०—हे कर कशाकरितां बसविले आहेत. उ०—देशांतील मुलकी व लष्करी खात्यांचा खर्च भागण्याकरितां व गेल्या लढाईंत अतोनात झालेलें कर्ज फेडण्याकरितां.

५. प्र०—किती कालपर्यंत हे कर चालावयाचे? उ०—कर्ज फेडण्याबद्दलचा कर १७७२ पर्यंत रहावयाचा व त्या मुदतीपर्यंत जर सर्व कर्ज फिटलें नाहीं, तर अधिक कालपर्यंत रहावयाचा; बाकीचे कर नेहमीं असावयाचेच.

६. प्र०—याहीपेक्षां आधीं कर्ज फिटलें असतें असें वाटलें नव्हतें काय? उ०—होय; जेव्हां फ्रान्स व स्पेन देशांशीं तह झाला, तेव्हां वाटलें होतें; परंतु इंडियन लोकांशीं नवीन युद्ध उद्भवल्यामुळें कर्जाचें नवीन ओझें बसलें, आणि मग एका नवीन कायद्याप्रमाणें ते कर अधिक दिवस राहिले.

७. प्र०—हे कर देण्यास सर्व लोक चांगले समर्थ नाहींत काय? उ०—नाहींत. शत्रूंनीं वारंवार हल्ले करून लुटालूट केल्यामुळें, अति दरिद्र स्थितींत असल्यानें, सर्व खंडभर सरहद्दीवरील प्रांतांतील लोकांच्या अंगीं कर देण्याचें अगदीं सामर्थ्य नाहीं. आणि ह्मणूनच त्यांची विपत्ति पाहून आमच्या करासंबंधीं कायद्यांची त्यांवर दयार्द्र दृष्टि आहे, ती अशी कीं, जे दारिद्र्यपीडित आहेत, त्यांना कर माफ आहेत; आणि मला वाटतें बाकीचे सरकारही असेंच करितात.

८. प्र०—अमेरिकेंतील टपाल खात्याची व्यवस्था तुमच्याकडे नाहीं काय? उ०—आहे. मी उत्तर अमेरिकेंतील डेप्युटी पोस्टमास्टरजनरल आहे.

९. प्र०—लोक विरुद्ध नसते तर, टपालाच्यायोगानें सर्वांस स्टांप मिळणार नाहींत काय? उ०—टपाल फक्त समुद्रकिनाऱ्यावरून जातें. थोड्या ठिकाणांखेरीजकरून तें परत आंत मध्यभागांत जात नाहीं; आणि जरी तें गेलें, तरी टपालानें स्टांप आणविणें ह्मणजे पुष्कळ ठिकाणीं स्टांपखर्चापेक्षां टपालखर्चच अधिक पडेल.

१०. प्र०--तुह्मीं न्यूफाउंडलंड पाहिलें आहे काय? उ०—मी तेथें कधींही गेलों नाहीं.

११. प्र०—त्या बेटांत टपाल जाण्याचे कांहीं रस्ते आहेत कीं नाहींत हें माहीत आहे काय? उ०—तेथें मुळीं रस्तेच नाहींत, असें मी ऐकिलें आहे. फक्त जलमार्गानें वसाहतींतील एकमेकांचें दळणवळण आहे.

१२. प्र०—**क्यान**डामध्यें टपालानें स्टांप वांटाल काय? उ०—**मां**टरीअल आणि **क्वेबे**कमध्येंच कायतें एक टपाल आहे. त्या अवाढव्य प्रदेशांत वस्ती इतकी पातळ व दूर दूर आहे कीं, टपालाचा खर्च त्यांना झेंपत नाहीं, ह्मणून त्यांना टपालानें स्टांप मिळणें शक्य नाहीं. सरहद्दीवरील इंग्लिश वसाहतींतसुद्धां वस्ती अगदीं पातळ आहे.

१३. प्र०—मध्यवसाहतींतील वस्ती पातळ असल्यामुळें, स्टांप-ॲक्ट अमलांत आणल्यास लोकांस अतिशय गैरसोय होणार नाहीं काय? उ०—अलबत, होईलच; कारण पुष्कळ लोकांना सरकारास सहा पेन्स देण्याकरितां, तीन चार पौंडदेखील खर्च केल्याशिवाय व दूरचा प्रवास केल्याशिवाय, जरूरी असते तेव्हां स्टांप मिळणें शक्य नाहीं.

१४. प्र०—एकंदर परिस्थितीवरून वसाहती स्टांपड्यूटी देण्यास चांगल्या समर्थ नाहींत काय? उ०—माझ्यामतें एक वर्षभर स्टांप-ड्यूटी देण्यास पुरे इतकें सोनें व रुपें वसाहतींत नाहीं.

१५. प्र०—स्टांपाचें सर्व उत्पन्न अमेरिकेंतच खर्च करावयाचें आहे हें तुह्मांस माहीत नाहीं काय? उ०—आक्टाप्रमाणें तें अमेरिकेच्या उपयोगाकरितां लावावयाचें ठरलें आहे, असें मला माहीत आहे; परंतु जिंकलेल्या वसाहतींत सैन्य आहे तेथें तें खर्च होईल, आणि ज्या वसाहती स्टांपड्यूटी देतात तेथें होणार नाहीं.

१६. प्र०—ज्या वसाहतींत सैन्य आहे, त्यांचेकडून जुन्या वसाहतींनीं कराच्यारूपानें दिलेल्या पैशाची फेड होऊन, दोहोंमध्यें व्यापार समतोल राहील असें तुह्मांस वाटत नाहीं काय? उ०—मला वाटतें नाहीं.

अगदींच थोडा पसा परत येईल. ज्याच्यायोगानें तो परत येण्याचा संभव आहे, असा एकही व्यापार मला माहीत नाहीं. मला वाटतें ज्या वसाहतींत तो खर्च होतो, तेथून तो थेट इंग्लंडास येईल. कारण, माझ्या पाहण्यांत नेहमीं असें आलें आहे कीं, प्रत्येक वसाहतींत इंग्लंडास पैसे पाठविण्याची ऐपत जसजशी अधिक, तसतसे त्या अधिकाधिक माल मागवितात व इंग्लंडाशीं अधिकच व्यापार होतो.

१७. प्र०—पेनसिल्व्हानिआ येथें **गोरे** लोक किती आहेत असें तुह्मांस वाटतें. उ०—सुमारें १,६०,००० असावेत असें वाटतें.

१८. प्र०—त्यांपैकीं **क्वेकर** किती? उ०—सुमारें $\frac{1}{3}$.

१९. प्र०—जर्मन किती? उ० सुमारें $\frac{1}{3}$; पण मला खात्रीनें सागतां येत नाहीं.

२०. प्र०—जर्मन लोकांपैकीं कांहीं तरी लोकांनीं युरोपमध्यें शिपायगिरीची नोकरी केली आहे काय? उ०—होय, पुष्कळांनीं, युरोपांत व अमेरिकेंत, दोहोंत केली आहे.

२१. प्र०—स्टांपड्यूटीमुळें इंग्लिशलोकांइतके तेही नाखुष झाले आहेत काय? उ०—होय, अधिकच व तेंही योग्य कारणावरून; कारण पुष्कळ प्रसंगीं त्यांना दुप्पट स्टांप द्यावे लागणार.

२२. प्र०—उत्तर अमेरिकेंत **गोरे** लोक किती आहेत असा आपला अदमास आहे? उ०—१६ पासून ६० वर्षांच्या वयाचे सुमारें ३,००,००० आहेत.

२३. प्र०—ब्रिटनमधून पेनसिल्व्हानियामध्यें एका वर्षांत आयात माल किती असतो असा तुमचा अदमास आहे? उ०—मला अशी माहिती लागली आहे कीं, आमच्या व्यापाऱ्यांच्या गणतीवरून पहातां ब्रिटनमधून आयात माल सुमारें ५ लक्ष पौंडांहून अधिक असतो.

२४. प्र०—तुमच्या प्रांतांतून निर्यात माल ब्रिटनला किती जातो? उ०—तो थोडाच असला पाहिजे. कारण, ब्रिटनला जरूरी आहे असा थोडाच माल आह्मीं तयार करितों. मला वाटतें तो ४० हजार पौंडांहून अधिक होणार नाहीं.

२५. प्र०—तर मग तुह्मीं बाकी कशी फेडता? उ०—वेस्ट

इंडीजमध्यें आमचा माल नेतों, आणि आमच्याच बेटांत अथवा फ्रेंच, स्पानिआर्ड, डेन्स आणि डच लोकांना विकून बाकी देतों. तसेंच उत्तर अमेरिकेंतील दुसऱ्या वसाहतींत, उदाहरणार्थ न्यूइंग्लंड, नोव्हा-स्कोशिका, न्यूफाउंडलंड, क्यारोलिना आणि जिआर्जिआ येथें व युरोपांतील निरनिराळ्या भागांत ह्मणजे स्पेन, पोर्टुगल, इटली येथें आमचा माल नेऊन विकतात आणि बाकी फेडतात. ह्या सर्व ठिकाणीं आह्माला पैसा, हुंड्या अथवा ब्रिटनला पाठविण्याजोगे जिन्नस मिळतात. हे व आमच्या व्यापाऱ्यांनीं व खलाशांनीं लांब फेऱ्याच्या सफरी करून उद्योगानें मिळविलेला सर्व नफा व त्यांच्या जहाजावरील बारदान, हीं सर्व एकत्र करून ती बाकी फेडण्याकरितां आणि जो ब्रिटिश माल आमच्या प्रांतांत सतत खपतो अथवा आमचे व्यापारी परस्थांना विकतात, त्या मालाचा पैसा देण्याकरितां, अखेरीस ब्रिटनमध्यें भर करावी लागते.

२६. प्र०—स्पानिश व्यापारास अलीकडे अडचणी आणलेल्या तुह्मीं ऐकिल्या आहेत कां? उ०—होय; मी असें ऐकिलें आहे कीं, कांहीं नवीन कायद्यामुळें व अमेरिकेच्या सर्व किनाऱ्याभर इंग्लिश लढाऊ जहाजें व लहान गलबतें ठेविल्यामुळें त्यांच्या व्यापारास फार अडथळा झाला आहे.

२७. प्र०—या देशानें अमेरिकेचें रक्षण करावें; पण अमेरिकेनें खर्चाचा कांहींही भाग न द्यावा, हें तुह्मांस रास्त वाटतें कां? उ०—तशी स्थिति नाहीं. गेल्या युद्धांत वसाहतींनीं सुमारें २५००० लोक दिले. त्यांचा कपडालत्ता पगारही दिला व लाखो पौंड खर्च केले.

२८. प्र०—पार्लमेंटनें तुमची रकम तुह्मांला दिली नाहीं काय? उ०—तुमच्या मतें जो आमचा हिस्सा अथवा रास्त रीतीनें आह्मीं जें द्यावयाचें, त्यापेक्षां जी रकम आह्मीं अधिक दिली, तेवढी मात्र परत केली. परंतु ती रकम आह्मीं खर्चलेल्या रकमेचा अगदीं लहान भाग होता. पेनासिल्व्हानियानेंच मुख्यतः सुमारें ५००,००० पौंड खर्च केले होते, आणि परत दिलेली रकम, सर्व मिळून ६०,००० पौंडांहून अधिक नव्हती.

२९. प्र०—पेनसिल्व्हानिआ येथें आपण फार जबर कर देतों असें तुह्मीं सांगितलें. एकंदरींत दर पौंडास किती देतां? उ०—सर्व मालमत्तेवरचा कर, पूर्ण असला ह्मणजे, दर पौंडास १८ पेन्स असतो. आणि सर्व व्यापार धंद्याच्या नफ्यावरचा कर व दुसरे कांहीं कर मिळून, मला वाटतें, दर पौंडांत एक पूर्ण अर्धा क्राउन (शेंकडा २५) असतो.

३०. प्र०—पेनसिल्व्हानिआ येथील हुंडीच्या दराविषयीं तुह्मांला कांहीं माहिती आहे काय? व तो अलीकडे कमी झाला आहे काय? उ०—तो बहुतकरून १७० पासून १७५ असतो. अलीकडे १७५ चा १६२॥ झाला आहे असें मी ऐकिलें आहे; याचें कारण मला वाटतें, ते आतां माल कमी मागवितात. आणि या देशाचें कर्ज त्यांनीं फेडलें ह्मणजे मला वाटतें हुंडीचा भाव बहुतकरून सारखा होईल.

३१. प्र०—स्टांपाचा कर जर कमी जबर केला, तर अमेरिकन लोक तो कबूल करतील असें तुह्मांस वाटतें काय? उ०—छे, कधीं नाहीं; तरवारीच्या बळानें भाग पाडल्याशिवाय कधींही कबूल करणार नाहींत.

३२. प्र०—इंग्लिश व्यापारास अडथळा आणण्याकरितां पेनसिल्व्हानिआ येथील कर, मुख्यत्वेंकरून व्यापारधंद्यावरचा कर कमजास्त बसविलेला नाहीं काय? उ०—जमिनीवरच्या करापेक्षां प्रमाणानें तो कर अधिक जबर नाहीं. या करानें नफ्याचा सारखा भाग घ्यावयाचा असा उद्देश व समज आहे.

३३. प्र०—सभेची घटना कशी आहे? सभासद कोणत्या प्रकारचे लोक आहेत? जमीनदार कीं व्यापारी? उ०—सभेंत जमीनदार, व्यापारी व कारागीर आहेत.

३४. प्र०—जमीनदाराची संख्या अधिक नाहीं काय? उ०—मला वाटतें आहे.

३५. प्र०—जमिनीवरील कर होईल तितका कमी करून व्यापारावर अधिक ओझें ते लादत नाहीं काय? उ०—माझ्या असें कधींही दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं. ह्यासंबंधीं कोणी ब्र काढल्याचें माझ्या

कधींही ऐकण्यांत आलें नाहीं. आणि खरोखर असला प्रयत्न अगदीं निष्फळ आहे. व्यापारी नेहमीं हिशोबांत तरबेज असतो. तो दौत लेखणी घेऊन तयार असतो. जर त्याच्या व्यापारावर कमजास्त ओझें लादलें, तर तो मालाची किंमत वाढवितो, आणि माल घेणारासच ह्मणजे मुख्यतः जमीनदारासच, सर्व जरी नाहीं तरी कराचा अतिशय मोठा भाग द्यावा लागतो.

३६. प्र०—१७६३ पूर्वीं ग्रेटब्रिटनविषयीं अमेरिकेचें काय मत होतें? उ०—जगांत उत्तम, असें होतें. ते खुषीनें राजाधिकार मान्य करीत होते; आणि न्याय कचेरींत पार्लमेंटचा कायदा त्यांना शिरसा वंद्य असे. जुन्या बहुतेक प्रांतांत जरी असंख्य लोक आहेत, तरी त्यांना ताब्यांत ठेवण्याला किल्ले, तट, शिबंदी, सैन्य वगैरेचा कांहींच खर्च तुह्मांला पडला नाहीं. या देशानें केवळ कागद, शाई, लेखणीचा खर्च करून त्यांच्यावर अम्मल चालविला. त्यांना ग्रेटब्रिटन-विषयीं नुसती पूज्यबुद्धि नव्हे, तर प्रीतिहि होती; तेथील कायदे, चाली-रीतीविषयीं प्रेम होतें, व ज्याच्यायोगानें व्यापार वाढला त्या छान-छूक तऱ्हेबद्दलही त्यांना हौस होती. खुद्द ब्रिटिश लोकांना नेहमीं विशेष आदरानें वागवीत असत; जुन्या इंग्लंडचा मनुष्य असणें ह्मण-जेच एक बहुमानास कारण होतें व आह्मांमध्यें त्यास मोठ्या दरजाचा मनुष्य मानीत.

३७. प्र०—आणि आतां त्यांचें काय मत आहे? उ०—छेः, फारच बदललें आहे.

३८. प्र०—अमेरिकेकरितां कायदे करण्याचा अधिकार पार्लमेंटला आहे कीं नाहीं, ही शंका ह्यापूर्वी कधीं तुह्मीं ऐकिली होती काय? उ०—**आंतर** कर बसविण्याच्या कायद्याखेरीज बाकी सर्व कायदे करण्याचा पार्लमेंटचा अधिकार संमत होता. व्यापार सुरळीत चाल-ण्याकरितां कर बसविण्याच्या अधिकाराविषयीं कोणी कधींही शंका घतली नाहीं.

३९. प्र०—अमेरिकेंत कोणत्या प्रमाणानें लोकसंख्या वाढली आहे? उ०—मला वाटतें सर्व प्रांतांत मिळून लोकसंख्या सुमारें २५ वर्षांत

मध्यम मानानें, दुप्पट होते. परंतु ब्रिटिशमालाचा खप याहून फारच जलद वाढतो. कारण, लोकसंख्येच्या मानानें खप होतो एवढेंच नव्हें, तर त्या लोकांचें माल विकत घेण्याचें सामर्थ्य जसजसें वाढतें, तसतसा खपही वाढतो. १७२३ या वर्षी ब्रिटनमधून पेन्सिल्व्हानिआ येथें एकंदर आयात माल १६००० पौंड होता, तो आतां जवळ जवळ पांच लाख पौंड आहे.

४०. प्र०—अमेरिकेंतील लोकांचा ग्रेटब्रिटनमधील पार्लमेंटविषयीं काय समज होता? उ०—पार्लमेंट हा आपल्या हक्काचा व स्वातंत्र्याचा दुर्ग व त्राता, असें ते मानीत, आणि नेहमीं तिजविषयींची पूज्यबुद्धि व सन्मान दर्शवीत. जुलमी मंत्री, कधीं कधीं आपल्यावर कदाचित् जुलूम करतील असें त्यांना वाटे; पण पार्लमेंटला अर्ज केल्यावर आपली दाद खास लागेल असा त्यांचा पूर्ण विश्वास असे. याचें एक सणसणीत उदाहरण तें कृतज्ञतापूर्वक स्मरत. एकदां पार्लमेंटमध्यें एक बिल ( खरडा ) आणलें होतें. त्यांत, संस्थानामध्यें राजानें केलेल्या सूचना, कायदे समजावयाचे असें होतें; परंतु हें कामन्ससभेस नापसंत झाल्यामुळें तें रद्द केलें.

४१. प्र०—आणि अजूनही पार्लमेंटविषयीं त्यांची ती पूज्यबुद्धि नाहीं काय? उ०—नाहीं; ती पुष्कळ कमी झाली आहे.

४२. प्र०—हें कोणत्या कारणामुळें? उ०—पुष्कळ कारणें एकवटल्यामुळें—ज्यांच्यायोगानें संस्थानांत परदेशी सोनें रुपें आणण्याचें बंद केलें; अशीं नुकतींच त्यांच्या व्यापारास घातलेलीं बंधनें—आपआपसांत कागदाचें नाणें सुरू करण्याची मनाई; **स्टांप**रूपीं नवीन जबरदस्त कर लादणें: जूरीपुढें चौकशी होण्याचा हक्क काढून घेणें; आणि त्यांचे नम्र अर्ज घेण्याचें व ऐकण्याचें नाकारणें.

४३. प्र०—स्टांपआक्टमध्यें थोडा फरक केला, त्यांतील त्रासदायक भाग काढून टाकिला, व कांहीं कमी महत्त्वाच्या बाबीवरचा कर

कमी केला, तर ते स्टांपआक्ट मान्य करतील असें तुम्हांस वाटत नाहीं काय? उ०—नाहीं, ते कधींही कबूल करणार नाहींत.

४४. प्र०—इंग्लंडांतील लोकसंख्येपेक्षां अमेरिकेंतील लोकसंख्या फार जलद वाढते, याचें कारण काय असावें असें तुम्हांस वाटतें? उ०—कारण, ते इंग्लिश लोकांपेक्षां लौकर लग्नें करितात व विवाहित लोकही बहुतकरून अधिक असतात.

४५. प्र०—याचें कारण काय? उ०—कारण, उद्योगी तरुण जोडप्याला सहज आपल्या मालकीची जमीन मिळते, त्यावर ते आपल्या कुटुंबाचा निर्वाह करितात.

४६. प्र०—इंग्लंडापेक्षां अमेरिकेंतील कनिष्ठ प्रतीचे लोक अधिक सुखी नाहींत काय? उ०—जे उद्योगी व मित मद्यपी आहेत ते असतील. कारण, त्यांना मजूरी अधिक मिळते.

४७. प्र०—स्टांपआक्टाच्याच तत्वावर बसविलेल्या भावी कराविषयीं तुमचें काय मत आहे? तो अमेरिकन लोकांस कितपत मान्य होईल? उ०—यासारखाच, तो ते देणार नाहींत.

४८. प्र०—अमेरिकेविषयीं पार्लमेंटला अधिकार आहे, व तेथील लोकांवर कर बसविण्याचाही अधिकार आहे, असे या सभेचे व लार्ड सभेचे ठराव तुम्हीं ऐकिले नाहींत काय? उ०—होय, असले ठराव मी ऐकिले आहेत.

४९. प्र०—त्या ठरावाबद्दल अमेरिकेंतील लोकांचें काय मत होईल? उ०—ते बेकायदेशीर व अन्यायाचे आहेत असें त्यांना वाटेल.

५०. प्र०—तेथें कर, जकात वगैरे बसविण्याचा अधिकार पार्लमेंटला नाहीं, असें १७६३ पूर्वी अमेरिकेंत मत होतें काय? उ०—व्यापार व्यवस्थित चालण्याकरितां जकात बसविण्याच्या अधिकाराबद्दल तक्रार मी कधीं ऐकिली नाहीं; परंतु आमचे मुखत्यार पार्लमेंटमध्यें नाहींत, म्हणून **आंतर** कर बसविण्याचा अधिकार त्या सभेला आहे, असें कधीं वाटलें नव्हतें.

९१. प्र०—अमेरिकेंतील लोक असा भेद करितात, असें तुमचें मत कशावरून झालें आहे? उ०—जेथें जेथें ह्मणून माझ्या समक्ष संभाषणांत हा विषय निघत असे, तेथें तेथें असें दिसून आलें आहे कीं, ज्या पार्लमेंटमध्यें आपले मुखत्यार नाहींत, तिला आपणावर कर बसवितां येणार नाहीं, असें प्रत्येकाचें मत होतें हें मला माहीत आहे; परंतु व्यापाराच्या व्यवस्थेकरितां पार्लमेंटच्या कायद्यानें बसविलेली जकात देण्याबद्दल कधींच तक्रार नव्हती.

९२. प्र०—परंतु हा भेद दाखविणारें एखादें सभेचें कृत्य अथवा तुमच्या एखाद्या सरकारचें सार्वजनिक कृत्य तुह्मीं सांगूं शकाल काय? उ०—एखादें असेल; मला माहीत नाहीं. तुह्मीं आतां आह्मांवर कर बसविण्याचा प्रयत्न करीपर्यंत असें कृत्य करण्याचा कधींही प्रसंग आला नव्हता असें मला वाटतें. ह्मणून हा भेद दाखविणारे असे सभेचे ठराव झाले आहेत, आणि मला वाटतें खंडांतील प्रत्येक सभेस आणि सभेंतील प्रत्येक सभासदास हें पसंत आहे.

९३. प्र०—तर मग ह्या वेळेपूर्वी ह्या विषयावर संभाषण होण्याचें कारण काय? उ०—१७५४ त असा एक ठराव मांडला होता कीं, (मला वाटतें, ह्या सभेमध्यें) जर लढाई झाली व ती होणार ह्मणून तेव्हां भीतिही होती, तर वसाहतींच्या सुभेदारांनीं एकत्र जमावें, आणि सैन्य गोळाकरणेकरितां, किल्ले बांधण्याकरितां आणि सार्वजनिक संरक्षणाकरितां, प्रत्येक जरूरीचा उपाय करण्याकरितां, हुकूम द्यावा, आणि जो खर्च होईल तो येथील खजिन्यांतून मागवावा आणि पार्लमेंटच्या कायद्या अन्वयें वसाहतींतील लोकांवर कर बसवून तो खर्च नंतर काढावा. यामुळें या विषयाची बरीच वाटाघाट झाली, आणि बहुतेकांचें असें मत होतें कीं, पार्लमेंटमध्यें आमचे योग्य मुखत्यार असेपर्यंत, पार्लमेंटला आह्मांवर कर बसवितां येणार नाहीं व पार्लमेंट बसविणारही नाहीं, कारण ते कर न्याय्य नव्हते व इंग्लिश राज्यनीतीला अनुसरून नव्हते.

९४. प्र०—एके वेळीं न्यूयार्क येथें कर बसविण्याबद्दल पार्लमेंटला अर्ज करण्याचा विचार चालला होता. कारण, संस्थानचा राज्यका-

रभार चालविण्याकरितां योग्य खर्च मिळविण्याचें सभेनें नाकारल्यावरून अथवा हयगय केल्यावरून तोटा आला होता, हें तुम्हांस माहित नाहीं काय? उ०—मी तें कधीं ऐकिलें नाहीं.

९९. प्र०—न्यूयार्क येथें अशा तऱ्हेचा अर्ज करण्याचा विचार होता; आणि पार्लमेंटला अमेरिकेंतील अमुक संस्थानावर कर बसविण्याचा अधिकार आणि तोही तेथील सभेनें योग्य खर्च उभारण्याचें नाकारल्यावरून तोटा आला अशा गोष्टीपुरतांच, असें त्यांना वाटलें असावें असें तुम्हांस वाटतें काय? उ०—आपल्या राज्यकारभाराचा योग्य खर्च सभा भागविणार नाहीं अशी गोष्ट त्यांना वाटावयाची नाहीं. जी सभा हें करण्याचें नाकारील, ती व्यवहारज्ञानशून्य असली पाहिजे; पण हें संभवत नाहीं. मला वाटतें, न्यूयार्क येथें अशी गोष्ट कधीं झाली नाहीं; आणि हा कोणी तरी गैर समज केला असावा किंवा खरी स्थिति समजली नसावी. येथील मंत्र्यांच्या सांगण्यावरून सुभेदारांना कायमचा पगार देण्याबद्दल सभांना भाग पाडण्याचे कांहीं प्रयत्न केलेले मला माहित आहेत. तें त्यांनीं नाकारिले ही शहाणपणाची गोष्ट केली; परंतु न्यूयार्क येथील अथवा दुसऱ्या एखाद्या संस्थानांतील सभेनें सार्वजनिक कामदारांस वेळोवेळीं योग्य पगार देऊन, राज्यकारभाराचा खर्च भागविण्याचें कधींही नाकारिलें नाहीं, असें मला वाटतें.

९६. प्र०—परंतु हुकुमावरून जर एखाद्या सुभेदारानें एखाद्या सभेस पैसा वसूल करण्यास सांगितलें व तें सभेनें नाकारिलें, तर संस्थानांतील लोकांच्या हितासाठीं व राज्यकारभार चालविण्याकरितां, पार्लमेंटनें त्यांवर कर बसवावा असें तुम्हांस वाटत नाहीं काय? उ०—हें जरूर आहे असें मला वाटत नाहीं. आपला राज्यकारभार चालविण्यास जरूर लागणारी रकम वसूल करण्याचें नाकारण्याइतकी अविचारी जर एखादी सभा कदाचित् असेल, तर अशा स्थितींत ती फार दिवस राहणार नाहीं; अव्यवस्था व गोंधळ होऊन ती लवकरच ताळ्यावर येईल.

९७. प्र०—जर ती आली नाहीं, तर उपाय योजण्याचा अधि-

कार ग्रेटब्रिटनला असूं नये काय ? उ०—अशाच प्रसंगीं केवळ संस्थानच्या लोकांच्या हिताकरितां अधिकार चालविण्यास माझी हरकत नाहीं.

५८. प्र०—परंतु याचा निर्णय कोण करणार ? ब्रिटन कीं संस्थान? उ०—ज्यांना नुकसान सोसावें लागणार त्यांनाच उत्तम निर्णय करितां येईल.

५९. प्र०—तुह्मीं ह्मणतां कीं संस्थानांना **बाह्य** कर नेहमीं मान्य आहेत आणि फक्त **आंतर** कर बसविण्याचा पार्लमेंटला अधिकार नाहीं, अशी तक्रार आहे. तर आतां ज्या संस्थानावर हे कर बसवावयाचे त्याला या दोहोंतला कांहीं तरी भेद जाणवतो असें तुह्मीं दाखवूं शकाल काय? उ०—मला वाटतें, भेद फार मोठा आहे. **बाह्य** कर ही आयात मालावरील जकात आहे. मालाच्या मूळ किंमतींत व अन्य खर्चांत ही जकात मिळविली जाते. आणि जेव्हां तो माल विकतात तेव्हां त्याची किंमत जकात धरून ठरविलेली असते. लोकांना त्या किंमतीला जर तो माल पसंत नसला तर ते घेत नाहींत. त्यांना ती जकात द्यावी लागत नाहीं. परंतु **आंतर** कर लोकांच्या प्रतिनिधींनीं बसविलेला नसला ह्मणजे त्यांच्या संमतीशिवाय बळजोरीनें वसूल केला जातो. **स्टँप** ॲक्टमध्यें असें ह्मटलें आहे कीं—अमुक रक्कम दिल्याशिवाय आह्मांस व्यापार, एकमेकांमध्यें मालमत्तेची अदलाबदल किंवा विक्री करितां येणार नाहीं, कर्ज देतां घेतां येणार नाहीं, लग्न व मृत्युपत्र करितां येणार नाहीं. आणि अशा रीतीनें आह्मांपासून पैसा बळजोरीनें घेण्याचा हेतु आहे अथवा तो न दिल्यास त्याचा परिणाम आमचा नाश करण्याचा आहे.

६०. प्र०—पण समजा, तुमच्या संस्थानांत आणलेल्या, जीवितास अत्यावश्यक अशा पदार्थांवर **बाह्य** कर किंवा जकात बसविली तर, त्याचा परिणाम **आंतर** कराप्रमाणेंच होणार नाहीं काय? उ०—उत्तर संस्थानांतील आयात वस्तूंपैकीं अशी एकही वस्तु मला माहित

नाहीं कीं, जिच्यावांचून त्यांचें चालावयाचें नाहीं, अथवा जी ते स्वतः करणार नाहींत.

६१. प्र०—इंग्लंडांतील कापड त्यांना अगदीं आवश्यक आहे असें तुह्मांस वाटत नाहीं काय? उ०—नाहीं; बिलकुल आवश्यक नाहीं. उद्योग करून सुव्यवस्थेनें त्यांना पाहिजे ती वस्तु स्वतःच पुरवितां येईल.

६२. प्र०—तो कारखाना काढण्याला त्यांना फार काल लागणार नाहीं काय? आणि तोंपर्यंत त्यांचे फार हाल होणार नाहींत काय? उ०—मला वाटतें नाहीं. आधींच त्यांनीं फार आश्चर्य वाटण्याजोगी प्रगति केलेली आहे. आणि मला वाटतें, त्यांचे जुने कपडे फाटण्यापूर्वींच त्यांनीं स्वतः केलेले नवे कपडे त्यांना मिळतील.

६३. प्र०—उत्तर अमेरिकेंत पुरी इतकी लोंकर मिळणें शक्य आहे काय? उ०—लोंकर अधिक उत्पन्न करण्याचे उपाय त्यांनीं योजिले आहेत. इतःपर कोंकरें खावयाचीं नाहींत असा त्यांनीं कट केलेला आहे. आणि गतवर्षीं फार थोडीं कोंकरें मारिलीं गेलीं. असा क्रम नेटानें चालविल्यास लोंकरीच्या प्रमाणांत लवकरच केवढी तरी विलक्षण तफावत पडेल! आणि येथल्यासारखे कापडाचे जंगी कारखाने व्यापाराकरितां ह्मणून जसे काढावे लागतात, तसे काढण्याची जरूरी नाहीं. लोक आपआपल्या घरींच आपणापुरते सूत काढतील व काम करितील.

६४. प्र०—एकदोन वर्षांत लोंकर व कारखाने पुरे इतके होतील? उ०—मला वाटतें, तीन वर्षांत होतील.

६५. प्र०—थंडीच्या कडाक्यामुळें, उत्तरेकडील संस्थानांतील लोंकर वाईट प्रकारची होत नाहीं काय? उ०—नाहीं. लोंकर फार बारीक व चांगली असते.

६६. प्र०—बऱ्याच दक्षिणेकडील संस्थानांत, उदाहरणार्थ, व्हर्जिनिया येथील लोंकर राठ आणि केवळ एक प्रकारच्या केसासारखी असते हें तुह्मांस माहित नाहीं काय? उ०—मला माहित नाहीं. मी तें कधीं ऐकिलें नाहीं; तथापि मी व्हर्जिनिया येथें केव्हां केव्हां गेलेलों आहें. तेथील लोंकर मुख्यत्वेंकरून मी पाहिली असें सांगतां

येत नाहीं. परंतु मला वाटतें ती चांगली आहे, खात्रीनें सांगतां येत नाहीं; पण व्हर्जिनिया आणि तिच्या दक्षिणेकडील संस्थानें यांना लोंकरीची जरूरीच कमी आहे. तेथील हिंवाळा कडक नसतो व थोडे दिवस असतो. आणि बाकीच्या ऋतूंत, स्वतः उत्पन्न केलेला कापूस व ताग यांचीं वस्त्रें ते खुशाल वापरतील.

६७. प्र०—बऱ्याच उत्तरेकडील संस्थानांतील लोकांना सर्व हिंवाळ्याभर मेंढरांना चारा घालावा लागत नाहीं काय? उ०—अगदीं उत्तरेकडील कांहीं संस्थानांत हिंवाळ्यांतील थोडे दिवसपर्यंत घालावा लागत असेल.

६८. प्र०—हक्काविषयीं पार्लमेंटचे जे ठराव झाले आहेत त्यासंबंधानें, जर स्टँप ॲक्ट रद्द केला तर, उत्तर अमेरिकन लोक संतुष्ट राहतील काय? उ०—मला वाटतें ते राहतील.

६९. प्र०—असें तुह्मांस कां वाटतें? उ०—मला वाटतें त्या हक्काविषयींच्या ठरावामुळें त्यांना थोडीच काळजी लागणार आहे. ते अमलांत आणण्याचा मात्र प्रयत्न न केला पाहिजे. त्या बाबतींत आपली व आयर्लंडची स्थिति सारखीच, असें बहुतकरून संस्थानांना वाटेल. त्यांना माहीत आहे कीं, आयर्लंडसंबंधानें तुह्मीं आपल्याला तसाच हक्क आहे असें ह्मणतां; पण तो कधीं अमलांत आणीत नाहीं; आणि एखाद्या फार विलक्षण प्रसंगाखेरीज जसें आयर्लंडमध्यें, तसेंच संस्थानांत तो अमलांत आणणार नाहीं असें त्यांना वाटेल.

७०. प्र०—पण तो विलक्षण प्रसंग कोण ठरविणार? पार्लमेंट नव्हे काय? उ०—जरी पार्लमेंट ठरविणार, तरी पार्लमेंटमध्यें संस्थानांतून प्रतिनिधि येईपर्यंत पार्लमेंट असला हक्क अमलांत आणणार नाहीं, आणि जेव्हां जेव्हां तसा प्रसंग येईल, तेव्हां प्रतिनिधि बोलावतील असें लोकांस वाटेल.

७१. प्र०—गेल्या युद्धांत मेरीलँडनें सार्वजनिक संरक्षणाकरितां आपली वांटणी देण्याचें नाकारिलें, हें तुह्मीं कधीं ऐकिलें नव्हतें काय?

उ०—त्या बाबींत मेरीलँडविषयीं फार गैरसमज उत्पन्न केला आहे. मला माहिती आहे, त्यावरून मेरीलँडनें राजास मदत करण्याचें कधींच नाकारिलें नाहीं. युद्ध चाललें असतां, दरवर्षी सभा बरीच रकम देण्याचा ठराव करीत असे, आणि ती वसूल करण्याकरितां कायद्याचे मसुदे करी. त्या प्रांताच्या राज्यव्यवस्थेप्रमाणें कायदा करण्याकरितां सुभेदाराकडे ते पाठवितां यावे ह्मणून, कौन्सिलकडे अथवा वरिष्ठ सभेकडे संमतिकरितां ते पाठवून देत. मुख्यत: राज्यव्यवस्थेंतील दोषामुळें दोन्हीं सभेंत खेदकारक भांडणें लागून, एक दोन मसुदे खेरीजकरून बाकी सर्व निरर्थक झाले. मेरीलँडनें आपली वांटणी दिली नाहीं; हें खरें आहे; परंतु माझ्यामतें हा राज्यव्यवस्थेचा दोष; लोकांचा नव्हे.

७२. प्र०—त्यांना भाग पाडण्याकरितां योग्य उपाय ह्मटला ह्मणजे पार्लमेंटला अर्ज करणें असें बाकीच्या प्रांतांत लोक बोलत नसत काय? उ०—मी असें बोलणें ऐकिलें आहे; पण लोकांचा दोष नाहीं असें पक्कें ठाऊक असल्यामुळें असा अर्ज कधीं केला नाहीं व करावा ह्मणून कांहीं खटपटही केली नाहीं.

७३. प्र०—एका जाहीर सभेंत अशी सूचना केली नव्हती काय? उ०—मला माहीत असलेल्या कोणत्याही सभेंत केली नाहीं.

७४. प्र०—सभेच्या कायद्यानें न्यूइंग्लंड येथील कागदी नाणें रद्द केलेलें तुह्मांस स्मरतें काय? उ०—मॅसॅच्युसेट्सचे येथील रद्द केलेलें मला स्मरतें.

७५. प्र०—या कामांत लेफ्टेनंट गव्हरनर हचिन्सन् याचें विशेष अंग नव्हतें काय? उ०—मी असें ऐकिलें आहे.

७६. प्र०—त्यावेळेस तो कायदा लोकांस फार अप्रिय नव्हता काय? उ०—असेल असें मला वाटतें; पण मला त्याविषयीं कांहीं सांगतां येत नाहीं. कारण त्या प्रांतापासून मी दूर होतों.

७७. प्र०—कागदाचें नाणें रद्द करण्याविरुद्ध सोन्यारुप्याची कमताई आहे अशी सबब आणली नव्हती काय? उ०—आणिली होती, असें मला वाटतें.

७८. प्र०—त्या कायद्याविषयीं आतां काय मत आहे? पूर्वी जसा अप्रिय होता तसा आतां आहे काय? उ०—मला वाटतें, नाहीं.

७९. प्र०—सुभेदारांना येथून पाठविलेले हुकूम कित्येक वेळां अतिशय जुलमी व राज्यनीतीविरुद्ध असे नव्हते काय? उ०—होय.

८०. प्र०—ह्मणून कांहीं सुभेदारांनीं ते अवमानिले नाहींत काय? उ०—होय, मी असें ऐकिलें आहे.

८१. प्र०—व्यापार सुयंत्र चालविण्याकरितां पार्लमेंटला नियामक अधिकार असल्याबद्दल अमेरिकन लोकांनीं कधीं तक्रार केली आहे काय? उ०—नाहीं.

८२. प्र०—स्टँपआक्ट अमलांत आणण्याला लष्करी सैन्याखेरीज दुसरें एखादें साधन आहे काय? उ०—त्याला लष्करी सैन्याचा उपयोग कसा करणार हें मला कळत नाहीं.

८३. प्र०—कां बरें नाहीं? उ०—समजा, लष्करी सैन्य अमेरिकेंत पाठविलें; पण त्यांना सशस्त्र असा कोणीच आढळावयाचा नाहीं. मग ते काय करणार? ज्यांना स्टांपाची जरूरी नाहीं, त्यांना ते घ्या, अशी बळजोरी करितां येणार नाहीं. त्यांना बंड दिसून येणार नाहीं; ते होऊन मात्र एखादें उपस्थित करतील.

८४. प्र०—आक्ट जर रद्द केला नाहीं, तर काय परिणाम होतील, असें तुह्मांस वाटतें? उ०—ह्या देशाविषयीं अमेरिकेंतील लोकांची पूज्यबुद्धि व प्रेम व त्यावर अवलंबून असणारा व्यापार हीं सर्व ठार नाहींशीं होतील.

८५. प्र०—व्यापारास कसा धोका येईल? उ०—जर आक्ट रद्द केला नाहीं, तर थोड्याच काळांत ते तुमची एकही वस्तु घेणार नाहींत, असें तुह्मांस दिसून येईल.

८६. प्र०—त्याशिवाय निभाव लागण्यास, त्यांच्या अंगीं सामर्थ्य आहे काय? उ०—मला वाटतें, त्यांवाचून त्यांचें उत्तम चालेल.

८७. प्र०—त्या न घेण्यांत त्यांचें हित आहे काय? उ०—

ब्रिटनमधून जो माल ते घेतात, तो आवश्यक, केवळ सोईचा अथवा चैनीचा असतो. पहिला, कापड वगैरे—हा थोड्या उद्योगानें आपल्या देशांत ते करूं शकतील. आपल्या आपणच पुरवठा करीपर्यंत दुसऱ्यावांचून त्यांचें चालेल. तिसराच काय तो मुख्यत्वेंकरून पुष्कळ खपतो. त्यास लगेच अजीबात ते फांटा देतील. ते केवळ छानछुकीचे पदार्थ असतात. प्रतिष्ठित देशांतील छानछुकीची तऱ्हा ह्मणून लोक ते पदार्थ विकत घेतात आणि त्यांचा खप होतो; पण आतां त्यांचा तिटकारा येईल आणि ते घेणार नाहींत. आशौचांत वापरण्याच्या सर्व पैकी मालास, सर्वांनीं मिळून आधींच फांटा दिला आहे, आणि हजारो पौंड किंमतीचा माल विकत नसल्यामुळें परत चालला आहे.

८८. प्र०—आपल्या देशांत कापड करण्यांत त्यांचें हित आहे काय? उ०—मला वाटतें, सध्यां ब्रिटनचें कापड त्यांना कमी किंमतीस पडेल; माझ्या ह्मणण्याचा अर्थ, तितक्याच बारीक सुताचें व विणकरीचें कापड सवंग मिळेल; पण दुसऱ्या गोष्टी लक्षांत आणल्या ह्मणजे,—उदाहरणार्थ, त्यांच्या व्यापारावरील बंधनें, पैसे पाठविण्याची अडचण वगैरे,—प्रत्येक गोष्ट स्वतः करणें त्यांना हितावह आहे.

८९. प्र०—समजा, करासंबंधीं अंतस्थ व्यवस्थेचा कायदा केला, तर तो कितपत मान्य होईल? उ०—मला वाटतें, ते त्यास हरकत घेतील.

९०. प्र०—तर मग कोणताही कराचा कायदा ते मान्य करणार नाहींत? उ०—ठाम ठरलेली जुनी वहिवाट अशी आहे:—जेव्हां राजाला मदत पाहिजे असते, तेव्हां निरनिराळ्या सभांकडे ती मागितली पाहिजे; नंतर नेहमीं देत आल्याप्रमाणें त्या सभा ती मदत देतील. आपली स्थिति व सामर्थ्य याविषयीं अगदीं अपरिचित अशा दूरस्थांनीं आपला विचार न घेतां आपला पैसा खर्चूं नये, असें त्यांचें ह्मणणें आहे. राजास मदत देणें, हाच काय तो राजानुग्रह होण्यास त्यांना मार्ग आहे, आणि ज्यांत आपले प्रतिनिधि नाहींत अशा मंडळीनें, आपलें जें नव्हे तें, दुसऱ्यानें, देण्याचें पुण्य बांधून घेणें आणि ज्याच्या

योगानें बाकी सर्व हक्कांचें रक्षण होतें, असा अत्यंत मौल्यवान् व महत्वाचा आपला हक्क काढून घेणें, हा मोठा जुलूम व अन्याय आहे, असें त्यांना वाटतें.

९१. प्र०—परंतु पुष्कळ दिवसपर्यंत त्यांना मान्य असलेलें टपालखातें हा एक कर व कायदा नव्हे काय? उ०—नाहीं, पत्राच्या टपालखर्चाचा पैसा कराप्रमाणें नसतो. तो फक्त काम केल्याबद्दल योग्य दाम आहे. जर कोणा मनुष्यास काम करून घेण्याची इच्छा नसेल, तर त्याला पैसा देणें भाग नाहीं. आक्ट होण्यापूर्वीच्या तऱ्हेप्रमाणेंच, एखाद्यास गड्याबरोबर, मुद्दाम जासूद करून, त्याबरोबर, अथवा मित्राबरोबर पत्र पाठविणें कमी खर्चाचें व अधिक सुरक्षित वाटल्यास, तो तें आतांही पाठविण्यास मुकत्यार आहे.

९२. प्र०—पण गतवर्षीच्या कायद्यावरून टपालखात्याचे केलेले नियम हा एक कर आहे, असें ते मानीत नाहींत काय? उ०—गतवर्षीच्या नियमानें सर्व अमेरिकेभर टपालाचा दर, शेंकडा जवळ जवळ तीस कमी झाला आहे. हें कमी होणें ह्मणजे एक कर आहे असें ते खास मानणार नाहींत.

९३. प्र०—समजा, पार्लमेंटनें स्थळकर बसविला; व कर बसविलेले जिन्नस न वापरतां तो कर देण्याचें त्यांना टाळतां येईल असें आहे, तर या कराला ते हरकत घेतील काय? उ०—हो, खचित हरकत घेतील. कारण, ह्या स्थळकराचा तुह्मीं बजावलेल्या एखाद्या कामगिरीशीं बिलकुल संबंध नाहीं, तर हा कर केवळ सरकारास एक मदत आहे, व आपण जर ही देणार, तर त्यांना वाटतें, ती आपल्याजवळ मागितली पाहिजे, आणि मग आपण दिली पाहिजे, व ज्यांना आपण अधिकार दिला नाहीं, अशा कोणासही आपल्यातर्फे ती देतां येणार नाहीं.

९४. प्र०—आयात मालावर जकात बसविण्याला पार्लमेंटला अधिकार आहे, त्याबद्दल त्यांची तक्रार नाहीं असें तुह्मीं ह्मणतां, आतां, आयात मालावरची जकात आणि देशांत खपणाऱ्या मालावरची जकात यांत भेद आहे काय? उ०—होय, फार महत्वाचा आहे.

नुकत्याच सांगितलेल्या कारणाबद्दल त्यांच्या देशांतील मालावर जकात बसविण्याला तुह्मांला अधिकार नाहीं असें त्यांना वाटतें; पण समुद्र तुमचा आहे. तुमच्या आरमाराच्यायोगानें त्यांतील नौकागमन निर्भय झालेलें आहे, आणि चांचेलोक नाहींसे केले आहेत. ह्मणून तुमच्या राज्यांतील ज्या भागांतून माल जातो, त्याच्या सुरक्षितपणाबद्दल तुह्मांस जें आरमार ठेवावें लागतें, त्याचा खर्च भागण्याकरितां मालावर कांहीं जकात बसविण्याला तुह्मांला साहजिकच योग्य अधिकार आहे.

९५. प्र०—त्यांच्या निर्यात मालावर जकात बसविली असतां हेंच ह्मणणें लागू पडेलना? मग ते ह्या जकातीबद्दल तक्रार करणार नाहींत काय? उ०—त्याच्यायोगानें बाहेरगांवीं माल अधिक महाग होऊन, जर खप कमी होऊं लागला, तर ते खास अशा कराबद्दल तक्रार करतील. कर बसविण्याच्या तुमच्या हक्काबद्दल नव्हे. हें आपणावर जबर ओझें आहे अशी कुरकुर करतील, आणि तें हलकें करण्याकरितां तुह्मांस अर्ज करतील.

९६. प्र०—निर्यात तंबाकूवरील कर या प्रकारचा नाहीं काय? उ०—तो, मला वाटतें, किनाऱ्यावरील एका संस्थानांतून दुसऱ्याकडे जो तंबाकू जातो, त्यावर आहे, आणि व्हर्जिनिआंतील विल्यम्सबर्ग येथें जी पाठशाळा आहे, तिच्या खर्चाच्या फंडाकडे त्याचा उपयोग केला आहे.

९७. प्र०—उत्तर अमेरिकेंतील सभांप्रमाणेंच वेस्ट इंडिज येथील सभांना स्वाभाविक हक्क नाहींत काय? उ०—निःसंशय आहेत.

९८. प्र०—आणि त्यांच्या निर्यात साखरेवर कर बसविला नाहीं काय? उ०—वेस्ट इंडिजविषयीं मला विशेष माहिती नाहीं; पण निर्यात साखरेवर शेंकडा साडेचार कर, त्यांच्याच सभांनीं कबूल केला आहे.

९९. प्र०—तुमच्या प्रांतांत अविवाहित पुरुषाला डोईपट्टी किती आहे? उ०—२१ वर्षांवरील प्रत्येक अविवाहित पुरुषाला १५ शिलिंग द्यावे लागतात असें मला वाटतें.

१००. प्र०—पेनसिल्व्हानिआ येथील सर्व कराची मिळून दरसाल किती रकम होते? उ०—मला वाटतें, सुमारें २०००० पौंड.

१०१. प्र०—समजा, स्टांपआक्ट सुरू करून अमलांत आणला, तर नाखुषीमुळें अमेरिकन लोक आपल्या स्वतःच्या वाईट मालाला तितके पैसे देतील, आणि आमचा चांगला माल टाकून आपला माल वापरतील असें तुह्मांला वाटतें काय? उ०—होय, तसें मला वाटतें. आपला राग शांत करण्याकरितां तुमचा चांगला माल न घेतां, स्वाभिमानाच्यापायीं लोक खुषीनें आपल्या वाईट मालाला अधिक पैसे देतील.

१०२. प्र०—बॉस्टन येथील लोक आपला व्यापार बंद करतील काय? उ०—लोकसंख्येच्यामानानें, व्यापाऱ्यांची संख्या फार थोडी आहे. आणि कोणीही मालच जर विकत घेणार नाहीं, तर त्यांनीं व्यापार बंद केलाच पाहिजे.

१०३. प्र०—संस्थानांतील लोक कोणकोणत्या धंद्याचे आहेत? उ०—ते शेतकरी, खोत व मळेकरी आहेत.

१०४. प्र०—ते आपल्या जमिनींचें उत्पन्न नामूं देतील काय? उ०—नाहीं. ते इतकें पुष्कळ उत्पन्न करणार नाहींत. ते कारखाने अधिक काढतील आणि जमिनीची लागवड कमी करतील.

१०५. प्र०—प्रत्येक मनुष्याला स्टांप घेतां यावे, ह्मणून स्टांपाच्या रक्षणाकरितां पुरेसें सैन्य ठेविलें आहे असें समजा. तरी स्टांप घेण्याचें सोडून व्यवहाराच्या बाबींत न्याय न मिळतां ते राहतील काय? आणि बराच कालपर्यंत अशा स्थितींतील सर्व गैरसोयी सोसतील काय? उ०—प्रत्येकाला स्टांप घेतां येतील अशा रीतीनें स्टांपाचें संरक्षण करण्याची कल्पनाच अशक्य आहे. आक्टाप्रमाणें प्रत्येक तालुक्याच्या गांवांत, प्रांतांत व खेडोखेडीं वांटणारे नेमावयाचे, व त्यांची जरूरीही लागेल. परंतु ज्यांना एकंदरींत पुष्कळ फायदा मिळावयाचा होता, अशा मुख्य वांटणाऱ्यांनादेखील ह्या कामावर राहणें योग्य वाटलें नाहीं; अशा स्थितींत आपल्या वांट्यास येणाऱ्या थोड्याशा नफ्याकरितां लोकांच्या तिरस्कारास पात्र होणारे व त्यामुळें होणाऱ्या नुकसानीस

तयार असणारे, असे पोटवांटणेकरी मिळणें अशक्य आहे असें मला वाटतें; आणि ते जरी मिळाले, तरी दूरदूरच्या ठिकाणीं स्टांपाचें रक्षण करणें कठीण आहे असें मला वाटतें.

१०६. प्र०—पण जेथें स्टांपाचें रक्षण करितां येईल, त्याठिकाणीं-मुद्धां, कोणताही हक्क मिळत नाहीं, व कायद्यानें ऋण वसूल करितां येत नाहीं, अशा स्थितींत राहण्यापेक्षां, लोक त्या स्टांपांचा उपयोग करणार नाहींत काय? उ०—लोक काय करतील हें सांगणें कठीण आहे. मला स्वतःला जें वाटत आहे, त्यावरूनच दुसऱ्यांना काय वाटत असेल व ते कसे वागतील ह्याची मला कल्पना करितां येते. अमेरिकेंत पुष्कळांकडे माझें कर्ज येणें आहे; पण स्टांपॲक्ट कबूल करण्यापेक्षां, तें माझें कर्ज, कायद्यानें न मिळतां तसेंच राहिलें तरी मला चालेल. तें पतीवरचें कर्ज होईल. मला वाटतें, लोक त्याच स्थितींत राहतील किंवा आपली सुटका करण्याकरितां एखादा मार्ग पाहतील; बहुतकरून स्टांपाशिवायच न्यायकचेरींत जावयाचें असें सर्वानुमतें ठरवितील.

१०७. प्र०—अमेरिकेंतील प्रत्येक भागांत स्टांपवांटणीचें रक्षण करण्याकरितां किती लष्करी सैन्य पुरें आहे असें तुह्मांस वाटतें? उ०—फार मोठें सैन्य लागेल; सगळ्या अमेरिकेभर जिकडे तिकडे आड येण्याचीच जर प्रवृत्ति आहे, तर अमुक सैन्य बस होईल, असें मला सांगतां येणार नाहीं.

१०८. प्र०—अमेरिकेंत लढाऊ लोक अथवा कवाईत शिकलेलें सैन्य किती आहे? उ०—मला वाटतें निदान—

(या प्रश्नास हरकत घेतली).

१०९. प्र०—अमेरिकन स्टांपॲक्ट हा देशावर सारखा कर आहे काय? उ०—मला वाटतें नाहीं.

११०. प्र०—असें कां? उ०—कर्ज वसूल करण्याकरितां केलेल्या फिर्यादीपासूनच बराच पैसा गोळा व्हावयाचा, आणि जे कनिष्ठ प्रतीचे लोक अत्यंत गरिबीमुळें कर्ज फेडण्यास असमर्थ असतात, त्यांनाच तो

द्यावा लागणार. ह्मणून हा गरिबांवर जबर कर आहे, आणि तोही ते गरीब आहेत ह्मणून.

१११. प्र०—पण हा खर्च वाढल्यामुळें, फिर्यादी कमी होण्याला हें एक साधन होणार नाहीं काय? उ०—मला वाटतें नाहीं. कारण सर्व खर्च ऋणकोवर पडतो आणि त्यानें तो द्यावयाचा असतो; ह्मणून धनकोला फिर्याद करण्याला कांहींच प्रतिबंध नाहीं.

११२. प्र०—जबर व्याजबट्ट्याप्रमाणें याचा परिणाम होणार नाहीं काय? उ०—होय, गरिबांवर जुलुम होणार.

११३. प्र०—प्रतिवर्षी उत्तर अमेरिकेंतून जवसांनीं भरलेलीं किती जहाजें आयर्लंडास जातात? उ०—जहाजांची संख्या मला सांगतां येणार नाहीं; पण १७९२ त फिलाडेल्फिआ येथून आयर्लंडला १०,००० हागूशेड (पिपें) जवस पाठविला. तेव्हांपासून प्रमाण फार वाढलें आहे, असें मला वाटतें, आणि फिलाडेल्फिआ येथून जितका माल जातो, तितकाच न्यूयार्कमधून जातो असें समजतें.

११४. प्र०—जवसाबरोबर झालेल्या जवसाच्या दोरांचें काय होतें? उ०—कांहींचें जाड व कांहींचें मध्यम प्रकारचें तागासारखें जाड कापड करितात.

११५. प्र०— अमेरिकेंत स्लिटिंगमिल्स (लोखंड कापण्याच्या गिरण्या) आहेत काय? उ०—तीन आहेत; पण सध्यां एक चालू आहे, असें मला वाटतें. व्यापाराला हरकत जर अशीच होऊं लागली, तर त्या सर्व सुरू होतील.

११६. प्र०—कापडास कांजी पाजण्याच्या गिरण्या (फुलिंग-मिल्स) आहेत काय? उ०—पुष्कळ आहेत.

११७. प्र०—लढाई चालली असतां, सैन्याकरितां पुष्कळ पायमोजांचा मक्ता घेतला होता व ते फिलाडेल्फिआ येथें केले, हें तुह्मीं कधीं ऐकिलें नाहीं काय? उ०—मी ऐकिलें आहे.

११८. प्र०—स्टांपॲक्ट रद्द केला ह्मणजे, हल्लीं चालू असलेला,

बाह्य कराविषयीं प्रत्येक कायदा रद्द करण्याला पार्लमेंटला लावूं, असें अमेरिकन लोकांना वाटणार नाहीं काय? उ०—इतक्या दूर असलेल्या लोकांना काय वाटेल, ह्या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण आहे.

११९. प्र०—पण आक्ट रद्द होण्याचे हेतु त्यांना कोणते वाटतील, अशी तुमची कल्पना आहे? उ०—त्यांना वाटेल कीं, त्याच्या अयुक्ततेबद्दल खात्री झाल्यामुळें तो रद्द केला आणि जेव्हां ह्मणून अशी अयुक्तता दिसेल, तेव्हां अशा प्रकारचा दुसरा एखादा ऑक्ट तुह्मीं कधींही करणार नाहीं, याविषयीं त्यांचा पूर्ण भरंवसा आहे, असें मला वाटतें.

१२०. प्र०—त्याची अयुक्तता तुह्मीं कशावरून ह्मणतां? उ०—पुष्कळ कारणांवरून तो अयुक्त आहे असें ह्मणतों. ज्यांनीं तो कर द्यावयाचा, त्यांचें दारिद्य व असमर्थता, त्यामुळें झालेला सार्वजनिक असंतोष, व तो अमलांत आणण्याची अशक्यता.

१२१. प्र०—आक्ट जर रद्द झाला, आणि मग त्याला विरुद्ध होते त्या लोकांवर कायदे करणाऱ्या सभेनें आपला राग काढला, तर त्या सभेचा अधिकार वसाहतींस मान्य होईल काय? ते काय करतील असें तुह्मांस वाटतें? उ०—जर स्टांपऑक्ट रद्द केला, तर वसाहती तो अधिकार मान्य करतील, याविषयीं मला बिलकुल संशय नाहीं.

१२२. प्र०—त्यांच्या मनाविरुद्ध लहानशा कराचा कायदा करून, कर बसविण्याचा आपला अधिकार निश्चित करणें जर पार्लमेंट सभेस योग्य वाटलें, तर तो कर ते कबूल करतील काय? उ०—अमेरिकेंतील लोकांच्या कृत्यांचा विचार करण्यांत अगदीं गप्पाघोळ केलेला दृष्टीस पडतो. बाजारबुणगे लोकांचीं कृत्यें व सभांचीं कृत्यें अगदीं निरनिराळीं आहेत. त्यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध नाहीं, ह्मणून त्यांतील भेद लक्षांत आणिला पाहिजे. सभांना जे आपले हक्क आहेत असें वाटतें, त्याविषयीं त्यांनीं केवळ शांतपणानें ठराव केले आहेत. हरकत करण्याकरितांच ह्मणून त्यांनीं कोणतेही उपाय केले नाहींत. त्यांनीं किल्ला बांधिला नाहीं, सैन्य जमविलें नाहीं, किंवा दारूगोळ्याच्या एका कणाचीही तरतूद केली नाहीं. दंग्याच्या पुढाऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे असें

त्यांना वाटतें. त्यांना करितां येईल तर, तेच स्वतः करतील. दंगेखोर लोकांना शिक्षा झालेली पाहून प्रत्येक विचारी, समंजस मनुष्याला आनंद होईल. कारण, तसें न झालें तर, शांतताप्रिय लोकांना आपल्या जीविताचा व मालमत्तेचा सुरक्षितपणा वाटणार नाहीं; परंतु येथील कायदे करणाऱ्या सभेंत आपले प्रतिनिधि नसतां, येथील सभेनें तेथील लोकांवर जर **आंतर** कर बसविला,—मग तो कितीही लहान असो—तर तो कधींही मान्य करणार नाहींत असें मला वाटतें. शेवटपर्यंत ते हरकत करतील. त्यांच्यावर कर बसवून पैसा वसूल करणें तुह्मांला अवश्य आहे, असें त्यांना बिलकुल वाटत नाहीं. कारण, राजाकडून मागणी आली ह्मणजे स्वतः कर बसवून, पैसा वसूल करून आपल्या सामर्थ्यानुसार मोठमोठ्या रकमा देण्यास नेहमीं ते तयार झाले आहेत व आतांही आहेत.

त्यांनीं आपल्या सामर्थ्यानुरूप दिलें आहे इतकेंच नव्हे; पण गेल्या सर्व लढाईभर आपल्या अगदीं कुवतीबाहेर आणि ह्या देशाशीं ताडून पाहतां, आपल्या हिश्शापेक्षां (आणि हिस्सा ठरविणारे तुह्मींच आहां) कित्येक लक्ष पौंड त्यांनीं अधिक दिले आहेत. आणि त्यांचें नुकसान भरून देण्याबद्दल पार्लमेंटला शिफारस करण्याचें स्टेट सेक्रेटरीनें नुसतें वचन दिल्यावरून, हे त्यांनीं खुषीनें लगेच दिले, व त्याप्रमाणें फार थोर मनानें पार्लमेंटला शिफारस केली. असें असूनही 'अमेरिका फार कृतघ्न, अविचारी आणि अन्यायी आहे. कारण, आपल्या रक्षणाकरितां या देशावर अतोनात खर्च लादून आपण यत्किंचितही देण्याचें तिनें नाकारिलें.' असा येथील वर्तमानपत्रांतून, लहान लहान पुस्तकांतून व भाषणांतून अमेरिकेविषयीं गैरसमज व निंदा केली आहे. संस्थानांनीं गेल्या युद्धांत सुमारें २५००० सैन्य जमविलें व त्यांच्या अन्नवस्त्राचा खर्च दिला. ब्रिटनमधून पाठविलेल्या सैन्याइतकेंच हें होतें, व त्यांच्या वांट्यापेक्षां फार अधिक होतें. यामुळें ते फार कर्जबाजारी झाले आहेत. आणि तें फेडण्याकरितां त्यांचे सर्व कर व उत्पन्न बरींच वर्षेंपर्यंत गहाण ठेविलें आहे.

त्यावेळीं येथील राज्याधिकाऱ्यांना हें सर्व चांगलें माहीत होतें,

त्यांनीं संस्थानांची पार्लमेंटला शिफारस केली. प्रत्येक वर्षी राजा या पार्लमेंटाला पुढील लेखी निरोप पाठवीत असे. "आमचे योग्य हक्क व मुलुख यांच्या संरक्षणार्थ, उत्तर अमेरिकेंतील आमची इमानी प्रजा फार मनापासून हिम्मतीनें झटली, हें आह्मांस पूर्ण माहीत आहे, ह्मणून सभेनें, हें लक्षांत घेऊन, आमच्याकडून त्यांना योग्य मोबदला पोंहोचावा, अशी तजवीज करावी अशी आह्मीं शिफारस करितों." लढाईच्या प्रारंभापासून अखेरपर्यंत प्रत्येक वर्षी तुमच्या रोजनाम्यावर हे निरोप तुह्मांला सांपडतील; आणि त्याप्रमाणें संस्थानांची नुकसानी भरून देण्याकरितां दरवर्षी तुह्मीं राजाला २ लक्ष पौंड दिले आहेत.

खर्चाचा वांटा देण्यास वसाहती नाकबूल नव्हत्या, इतकेंच नव्हे; तर आपल्या वांटणीपेक्षां अधिक दिलें, याबद्दल हाच भक्कम पुरावा आहे. कारण, जर त्यांनीं कमी दिलें असतें, किंवा केवळ वांट्याइतकेंच दिलें असतें, तर नुकसान भरून देण्याचें कांहीं कारण नसतें. वास्तविकपणें आपल्या वांट्यापेक्षां त्यांनीं जो अधिक खर्च सोसला, त्याच्या पासंगासही, त्या नुकसान भरून देण्यासाठीं ह्मणून दिलेल्या रकमा नव्हत्या; पण त्याविषयीं वसाहतींनीं कधींही कुरकुर केली नाहीं. दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या भरपाईपेक्षां या सभेची पसंती व आपल्या स्वामिभक्तीबद्दल व कळकळीबद्दल राजाची पसंती त्यांना अधिक किंमतीची वाटली; ह्मणून पैसा देण्यास तयार असलेल्या लोकांपासून बलात्कारानें पैसा काढण्यासाठीं, हा कायदा करण्याचें कांहीं प्रयोजन नव्हतें. ज्यासाठीं आक्ट केला त्या कार्यास पैसा देण्यास त्यांनीं ना ह्मटलें नव्हतें; मुळीं मागणीच नव्हती; यथान्याय जें त्यांनीं करावयाचें तें करण्यास ते नेहमीं खुषी व तयार असत, आणि असेंच आपल्याविषयीं मत असावें अशी त्यांची इच्छा आहे.

१२३. प्र०—पण समजा, ग्रेटब्रिटनला युरोपमध्यें युद्धप्रसंग आला तर, त्याचा खर्च उत्तर अमेरिका देईल काय? उ०—यथाशक्ति ते मदत करतील असें वाटतें. ब्रिटिश राष्ट्राचा आपण एक भाग आहों, व दोहोंचें हित एकच आहे, असें ते समजतात. येथील लोक त्यांना परकाय असें मानोत; पण ते आपल्यास तसें मानीत नाहींत. या

राष्ट्राची भरभराट व नांवलौकिक व्हावा अशी त्यांची उत्कट इच्छा आहे, आणि त्यांना चांगल्या रीतीनें वागविलें ह्मणजे ते यथाशक्ति मदत करण्यास नेहमीं तयार होतील. १७३९त कार्थेजिनावरील मोहिमेंत त्यांची मदत मागितली होती, आणि तुमच्या सैन्यास येऊन मिळण्यास तीन हजार लोक त्यांनीं पाठविले. कार्थेजिना अमेरिकेंत आहे हें खरें आहे; पण उत्तरेकडील संस्थानापासून तें इतकें दूर आहे कीं, तें युरोपांत असल्यासारखेंच आहे. युद्धांत मदत करण्याच्या कर्तव्या-संबंधानें अमकें युद्ध आणि तमकें युद्ध असा भेदाभेद ते मुळींच करीत नाहींत.

अमेरिकेंतील लोकांच्या संरक्षणार्थ अथवा हितार्थ मागील युद्ध केलें, असें येथील सर्व लोक बोलतात, हें मला माहीत आहे. हा अगदीं गैरसमज झाला आहे, असें मला वाटतें. कॅनडा व नोव्हास्कोशिआ यामधील हद्दीसंबंधानें हें युद्ध सुरू झालें. ज्या प्रांतासंबंधानें सुरू झालें, त्यावर खरोखर राजानें आपला हक्क स्थापिला; पण कोणत्याही ब्रिटिश वसाहतीनें आपला हक्क सांगितला नाहीं. त्यापैकीं जमीन कोणत्याही वसाहतवाल्यास दिली नाहीं. त्या युद्धांत आमचें हिताहित ह्मणून बिलकुल नव्हतें. ओहिओवर जें युद्ध झालें, तें इंडियन देशांत व्यापार करण्याच्या तुमच्या हक्काबद्दल. हा हक्क युट्रेक्ट येथील तहावरून तुह्मांला मिळाला होता; पण तो फ्रेंचांनीं मोडला. त्यांनीं व्यापारी व त्यांचा माल पकडला. तो माल तुह्मीं तयार केलेला होता. त्यांनीं एक किल्ला घेतला, तो तुमच्या व्यापारी मंडळीनें, तिच्या मुनीमांनीं व कारकुनांनीं व्यापारसंरक्षणार्थ बांधिलेला होता. तुमच्या व्यापाराच्या संरक्षणार्थ व तो किल्ला परत घेण्याकरितां ब्रॅडाक याला सैन्य देऊन पाठविलें होतें (राजाच्या प्रांतावर, ही आणखी एक जबर-दस्ती असें येथें वाटत होतें). त्याचा पराभव झाल्यानंतर मग वसाहतीवर हल्ला झाला. त्यापूर्वीं फ्रेंच व इंडियन या दोन्ही लोकांशीं वसाहतींचें उत्तम सख्य होतें. ह्मणून त्यांच्या रक्षणाकरितां सैन्य पाठविलें हें खरें नव्हे.

इंडियन लोकांशीं व्यापार जरी अमेरिकेंत होतो, तरी अमेरिकेचा

त्यांत हिताहितसंबंध नाहीं. अमेरिकेंतील लोक मुख्यत्वेंकरून शेतकरी व मळेकरी आहेत. त्यांनीं उत्पन्न केलेला कोणताही जिन्नस इंडियन लोकांशीं व्यापार करण्यासारखा नसतो. इंडियन व्यापार ब्रिटिश लोकांना फायदेशीर आहे. ब्रिटिश व्यापारी व कारागीर यांच्या फायद्याकरितां ब्रिटिश माल त्या व्यापारांत असतो. ह्मणून ज्या अर्थी राजाच्या प्रांताच्या ( अमेरिकन लोकांच्या नव्हे ) रक्षणार्थ व केवळ ब्रिटिश व्यापाराच्या संगोपनार्थ जें युद्ध सुरू झालें, तें खरोखर ब्रिटिश लोकांकरितां युद्ध होतें. तथापि तें चालविण्याकरितां व त्याचा शेवट गोड व्हावा ह्मणून, अमेरिकेंतील लोकांनीं आपल्या हातून होईल तितकी मदत देण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं.

१२४. प्र०—तर मग राजाचे प्रांतिक हक्क मिळविण्यांत व सरहद्दीस बळकटी आणण्यांत अमेरिकेचें हित नाहीं असें तुह्मांस वाटतें काय? उ०—विशेषेंकरून नाहीं, ब्रिटन व अमेरिका या दोहोंचें मिळून हित आहे.

१२५. प्र०—मागें स्पेन देशाशीं झालेली लढाई अमेरिकेकरितांच करावी लागली, हें तुह्मीं नाकबूल करणार नाहीं; अमेरिकन समुद्रामध्यें जहाजें धरल्यामुळें ती उद्भवली नव्हती काय? उ०—होय, ब्रिटिश व्यापाराकरितां, ब्रिटिश मालानें भरलेलीं जहाजें धरल्यामुळें.

१२६. प्र०—फ्रान्सशीं तह झाल्यानंतर इंडियन लोकांबरोबर नुकतेंच झालेलें युद्ध केवळ अमेरिकेकरितांच नव्हे काय? उ०—होय, पूर्वींच्यापेक्षां हें विशेषेंकरून अमेरिकेकरितांच झालें; पण इंडियन लोक पूर्णपणें शांत न झाल्यामुळें, पूर्वींच्या लढाईचा हा परिणाम किंवा शेष होता; आणि खर्चाचा बराच मोठा भाग अमेरिकेंतील लोकांनीं सोसला. सेनापति बोके याच्या हाताखालील सैन्यानें हें युद्ध संपविलें. त्या सैन्यांत तीनशेंपेक्षां अधिक कायमचे शिपाई नव्हते; पण १००० हून अधिक पेन्सिल्व्हेनियन् होते.

१२७. प्र०—इंडियन लोकांपासून अमेरिकन लोकांचें रक्षण करण्याकरितां, अमेरिकेंत सैन्य पाठावण जरूरीचें नाहीं काय? उ०—नाहीं, मुळीच नाहीं. कधीही जरूर नव्हतें. अमेरिकन अगदीं थोडे होते,

आणि इंडियन लोक किती तरी पटीनें अधिक होते, तेव्हां देखील त्यांनीं स्वतःच आपलें रक्षण केलें. त्यांनीं एकसारखें आपलें पाऊल पुढें टाकिलें, आणि इकडील सैन्याच्या मदतीशिवाय इंडियन लोकांना डोंगरावर घालवून दिलें. आणि आतां वसाहती इतक्या बलाढ्य आहेत व लोकवसति वाढली आहे व इंडियन लोक कमी झाले आहेत, अशावेळीं त्यांच्या संरक्षणाकरितां सैन्य पाठविणें जरूर वाटेल काय? त्याची मुळींच जरूरी नाहीं. आपलें रक्षण करण्याला ते स्वतः खंबीर आहेत.

१२८. प्र०—इंडियन लोकांशीं नुकत्याच झालेल्या युद्धांत २०० पेक्षां स्थायिक शिपाई नव्हते, असें तुह्मी ह्मणतां काय? उ०—**ओ**हिओ येथें अथवा **पे**न्सिल्व्हानिया येथें नव्हते, व वसाहतींशीं संबंध आहे, असा हाच लढाईचा मुख्य भाग होता. **ना**यगारा, **फो**र्ट **डि**ट्राइट व दूरदूरचीं ठाणीं होतीं, तेथें तुमच्या व्यापाराकरितां ठेविलेले शिबंदी होते, ते मी धरले नाहींत; परंतु एकंदरींत अमेरिकेंतील लोकांचें सैन्य स्थायिक शिपायांपेक्षां अधिक होतें असें मला वाटतें. खात्रीनें सांगत नाहीं; पण मला असें वाटतें.

१२९. प्र०—राजास देण्याकरितां लोकांपासून पैसा वसूल करण्याचा हक्क सभांना आहे असें तुह्मांला वाटतें काय? उ०— होय, खास आहे, असें मला वाटतें. त्यांनीं नेहमीं असें केलें आहे.

१३०. प्र०—* **हक्काचा जाहिरनामा** त्यांना माहीत आहे काय? आणि त्या सनदेप्रमाणें पार्लमेंटच्या संमतीशिवाय लोकांपासून पैसा वसूल करावयाचा नाहीं, हें त्यांना ठाऊक आहे काय? उ०—त्यांना तें पूर्ण अवगत आहे.

१३१. प्र०—तर मग राजाकरितां किंवा स्थानिक कामाखेरीज इतर कामाकरितां पैसा वसूल करण्याचा हक्क आहे, असें त्यांना कसें वाटतें? उ०—पार्लमेंटच्या संमतीशिवाय राजाकरितां लोकांपासून पैसा घेतां येत

---

* Declaration of Rights.

नाहीं, हें कलम फक्त राज्यांतील प्रजेसंबंधानेंच आहे असें ते समजतात. वसाहती राज्यांत नाहींत अशी कल्पना आहे. त्यांच्या स्वतःच्या सभा आहेत. त्या त्यांच्या पार्लमेंट होत. त्या बाबतींत आयर्लंडची व त्यांची स्थिति एकच आहे. आयर्लंडामध्यें किंवा वसाहतींमध्यें राजाकरितां लोकांपासून पैसा वसूल करावयाचा असला ह्मणजे, आयर्लंडच्या पार्लमेंटमध्यें किंवा वसाहतीच्या सभांमध्यें संमति दिली असते. ग्रेटब्रिटन येथील पार्लमेंटमध्यें अमेरिकेंतून प्रतिनिधि येईपर्यंत तिला ती संमति वास्तविकपणें देतां येत नाहीं. कारण पार्लमेंटमध्यें सर्वानुमतें तें झालें पाहिजे, असें **पिटिशन आफ् राइट्**समध्यें स्पष्ट सांगितलें आहे; आणि त्या सर्वानुमतांत अमेरिकनांचा समावेश होण्यास, त्यांचे प्रतिनिधि असले पाहिजेत, ते पार्लमेंटमध्यें नाहींत.

१३२. प्र०—स्टांपआक्ट रद्द केला आणि दंग्यामुळें ज्यांचें नुकसान झालें, त्यांचे वसाहतींतील सभांनीं तें भरून द्यावें असा कायदा केला, तर ते मान्य करतील काय? उ०— ह्या प्रश्नाचें उत्तर मला देतां येत नाहीं.

१३३. प्र०—समजा, वसाहतींनीं वसूल द्यावा अशी राजाची आज्ञा झाली, आणि पार्लमेंट त्याविरुद्ध आहे, तर ग्रेटब्रिटनच्या पार्लमेंटच्या संमतीशिवाय राजास वसूल देतां येईल, असें त्यांना वाटतें काय? उ०—हा गहन प्रश्न आहे. माझें स्वतःचें मत विचाराल तर, योग्य प्रसंग वाटल्यास तो देण्यास पूर्ण मोकळीक आहे असें मला वाटतें.

१३४. प्र०—मागणीमुळें वसाहतींत पैसा वसूल झाल्यानंतर तो राजास दिला नाहीं काय? उ०—नेहमीं दिला आहे; पण अमुक कामाकरितां ह्मणून बहुशः मागण्या केलेल्या आहेत.—उदाहरणार्थ, सैन्य जमा करणें, त्याचा कपडालत्ता, पगार देणें वगैरे कामाकरितां. केवळ पैशाकरितां ह्मणून नव्हे.

१३५. प्र०—ज्यांचें जें नुकसान झालें आहे, त्यांचें तें अमेरिकनसभांनीं भरून द्यावें असा कायदा केला, आणि तो त्यांनीं अमान्य केला, आणि मग दुसरा एक कायदा करून पार्लमेंटनें **आंतर** कर बसविला, तर तो ते मान्य करतील काय?

उ०—लोक **आंतर** कर देणार नाहींत; आणि सभांनीं नुकसान भरून द्यावें, असा कायदा करण्याची जरूरी नाहीं, असें मला वाटतें. कारण, सध्यां चाललेली धांदल कमी होतांच ते याचा विचार करतील, आणि हें करणें रास्त असल्यास, ते स्वतःच करतील.

१३६. प्र०—ज्या ठिकाणीं टपाल जात नाहीं, अशा मध्यदेशांतील एखाद्या शहरास पाठविलेलीं पत्रें, अमेरिकेंतील टपाल आफिसांत येत नाहींत काय? उ०—होय, येतात.

१३७. प्र०—एखादा खासगी मनुष्य तीं पत्रें त्या पत्त्यावर घेऊन जाऊं शकेल काय? उ०—होय, झालेलें टपालहांशील देऊन, त्या मनुष्यांच्या कोणाही मित्रास पत्र घेऊन जातां येईल.

१३८. प्र०—पण अशा मध्यदेशांतील शहराच्या अंतराच्या मानानें त्याला अधिक हांशील द्यावें लागत नाहीं काय? उ०—नाहीं.

१३९. प्र०—अधिक हांशील न घेतां पत्र पोंचण्याची जबाबदारी पोस्टमास्तर घेतो काय? उ०—जें काम तो करीत नाहीं, त्याबद्दल त्याला कांहीं मागतां येणार नाहीं, हें खास.

१४०. प्र०—समजा, एखादा मनुष्य आपल्या गांवापासून फार दूर आहे, त्याला आपल्या नांवावर पाठविलेलें पत्र एका पोस्ट आफीसमध्यें आढळलें, आणि त्याच्या राहण्याच्या गांवीं टपाल जात असतें, आणि तें पत्र त्या गांवच्या पत्त्यावर जावयाचें आहे, तर ज्या गांवास पत्र जावयाचें आहे, तेथपर्यंतचें हांशील न घेतां तें पत्र पोस्टमास्तर त्याला देईल काय? उ०—होय, जें पत्र पोस्टआफीस नेत नाहीं, त्याचें हांशील किंवा नेतें त्याच्या पुढील अंतराबद्दल हांशील पोस्टआफीसास मागतां येणार नाहीं.

१४१. प्र०—पार्लमेंटच्या कायद्यावरून अमेरिकेंतील नावाड्यांना कांहीं न घेतां, टपाल नदीपार करून द्यावें लागत नाहीं काय? उ०—होय, लागतें.

१४२. प्र०—हा नावाड्यांवर जुलूम नव्हे काय? उ०—त्यांना

तो जुलूम असें वाटत नाहीं. कारण, टपाल घेऊन जाणाऱ्यापासून त्यांचा फायदा आहे.

१४३. प्र०—स्टांपआक्ट रद्द करून राजानें वसाहतीस पैशाची मागणी केली, तर ते मान्य करतील काय? उ०—करतील, असें मला वाटतें.

१४४. प्र०—असें तुह्मांस कां वाटतें? उ०—मी जेथें राहतों, त्या वसाहतीबद्दल मला सांगतां येईल. नेहमींच्या कायदेशीर रीतीनें जेव्हां जेव्हां मागणी होईल, तेव्हां आपल्या स्थितीस व सामर्थ्यास अनुरूप अशी मदत राजास देणें आपलें कर्तव्य आहे, असें ज्याप्रमाणें ते नेहमीं मानीत आले होते, त्याप्रमाणें ते नेहमीं मानतील अशी प्रधान मंडळाची खातरी करण्याबद्दल मला सभेचा सांगावा होता; आणि त्यावेळच्या प्रधानास हें मी कळविलें होतें.

१४५. प्र०—ब्रिटिश कामाकरितां असें ते करतील काय? उदाहरणार्थ—समजा, त्यांचा संबंध नाहीं असें युद्ध युरोपांतील एखाद्या भागांत झालें तर? उ०—होय, सार्वजनिक हिताच्या कोणत्याही गोष्टींत ते असें करतील. आपण सगळ्या राज्याचा एक अवयव आहों, असें तें मानितात.

१४६. प्र०—वसाहतीकडे मदतीकरितां मागणी करण्याची नेहमींची कायदेशीर रीत कोणती? उ०—स्टेट सेक्रेटरीकडून एक पत्र आलें पाहिजे.

१४७. प्र०—तुमच्या ह्मणण्याचा सर्व अर्थ एवढाच काय? स्टेट सेक्रेटरीकडून एक पत्र? उ०—राजाज्ञेनें स्टेट सेक्रेटरीकडून एक वटहुकूम यावा, त्यांत कारण नमूद असावें, आणि वसाहतींनीं स्वामिभक्तीस उचित व सामर्थ्यानुरूप मदत द्यावी, अशी शिफारस असावी. याप्रमाणें नेहमींची मागणी असावी असा माझा अर्थ.

१४८. प्र०—स्टेट सेक्रेटरीनें राजाकरितां पैशाबद्दल कधीं लिहिलें आहे काय? उ०—सैन्य जमविणें, त्यांना कपडालत्ता देणें, त्यांना पगार देणें अशाबद्दल मागण्या असत; आणि हें पैशाशिवाय व्हावयाचें नाहीं.

१४९. प्र०—फक्त पैसा मागितला तर ते देतील काय? उ०—माझ्या मतें जेव्हां त्यांच्याजवळ पैसा असेल किंवा त्यांना तो वसूल करितां येईल, तेव्हां ते पैसा व सैन्यही देतील.

१५०. प्र०—पार्लमेंटनें स्टांपआक्ट रद्द केला, तर पेन्सिल्व्हानिआ येथील सभा आपले ठराव रद्द करील काय? उ०—मला वाटतें, नाहीं.

१५१. प्र०—स्टांपआक्टच्या कल्पनेपूर्वी पार्लमेंटमध्यें आपले प्रतिनिधि असावे असें त्यांना वाटलें होतें काय? उ०—नाहीं.

१५२. प्र०—पेन्सिल्व्हानिआच्या सनदेमध्यें तेथें कर बसविण्याचा अधिकार पार्लमेंटला आहे असा स्पष्ट उल्लेख आहे, हें तुह्मांस माहीत नाहीं काय? उ०—सनदेंत असलेल्या एका कलमाअन्वयें, सभेच्या संमतीशिवाय किंवा पार्लमेंटच्या कायद्याशिवाय, प्रजेवर आपण कर बसविणार नाहीं, असें राजाचें आश्वासन आहे हें मला माहीत आहे.

१५३. प्र०—तर मग स्टांपआक्टनें आपल्यावर कर बसविणें ह्मणजे आपल्या हक्काची पायमल्ली होते, असें पेन्सिल्व्हानिआ येथील सभेनें कसें ह्मटलें? उ०—त्यांचा समज असा आहे:—त्या व इतर सनदेवरून इंग्लिश लोकांचें स्वातंत्र्य व सर्व हक्क आपणांस आहेत. सर्वानुमताशिवाय कर बसवावयाचा नाहीं, हा इंग्लिशप्रजेचा एक हक्क पिटिशन व डेक्लरेशन आफ् राइट्स यांत व महासनदांत आहे हें त्यांना माहीत आहे. ह्मणून, ज्यांवर कर बसवावयाचा, त्यांचे प्रतिनिधि पार्लमेंटमध्यें असून, त्यांच्या अभिप्रायाचा त्या **सर्वानुमतांत** समावेश होणें आवश्य आहे. अशा रीतीनें त्यांवर कर बसविण्याच्या हक्कास पात्र होईपर्यंत, पार्लमेंट सनदेंतील त्या कलमाच्या मिषानें कधींही तो हक्क घेणार नाहीं, व तो घेतां येणार नाहीं, असा त्या प्रांतांत वसाहत झाल्यापासून त्यांचा पूर्ण भरंवसा आहे.

१५४. प्र०—असा अर्थ करण्यास सनदेंत तसे कांहीं शब्द आहेत काय? उ०—पिटिशन आफ् राइटस व माग्नाचार्टा यांत 'इंग्लिश लोकांचे सामान्य हक्क' असे शब्द नमूद केलेले आहेत, त्यावरून तो अर्थ होतो.

---

१५५. प्र०—सनदेंतील शब्दांत **आंतर** व **बाह्य** कर असा भेद आहे काय? उ०—नाहीं; मला वाटतें नाहीं.

१५६. प्र०—तर मग तसाच अर्थ करून बाह्य करही बसविण्यास पार्लमेंटला अधिकार नाहीं, अशी हरकत ते घेणार नाहींत काय? उ०—आजपर्यंत त्यांनीं कधींही घेतली नाहीं. या दोहोंत भेद नाहीं, आणि **आंतर** कर बसविण्यास जर तुह्मांला अधिकार नाहीं, तर त्यांवर **बाह्य** कर बसविण्यासही नाहीं, किंवा त्यांना बंधन करण्याकरितां दुसरा एखादा कायदा करण्यासही अधिकार नाहीं, असें त्यांना दाखविण्याकरितां येथें अलीकडे पुष्कळ कारणें काढलीं आहेत. सध्या तरी त्यांना असें वाटत नाहीं; पण कांहीं कालानें या कारणावरून कदाचित् त्यांची खात्री होईल.

१५७. प्र०—पेन्सिल्व्हानिआ येथील सभेच्या ठरावांत ' सर्व कर ' असें ह्मटलें नाहीं काय? उ०—जर असें ह्मटलें असेल, तर त्यांचा ह्मणण्याचा अर्थ **आंतर** कर एवढाच आहे. येथें व वसाहतींत त्याच शब्दांचे तेच अर्थ नेहमीं असत नाहींत. कर ह्मणजे ते **आंतर** कर असें समजतात; जकात ह्मणजे आयात व निर्यात मालावरील कर असें समजतात. हे त्यांच्या भाषेचे अर्थ आहेत.

१५८. प्र०—**मॅसाच्युसेट्स**चे येथील सभेचे ठराव तुह्मीं पाहिले नाहींत काय? उ०— पाहिले आहेत.

१५९. प्र०—**आंतर** किंवा **बाह्य** कर कोणताही पार्लमेंटला आपल्यावर कर बसवितां येणार नाहीं असें ते ह्मणत नाहींत काय? उ०—ते असें ह्मणतात, हें मला माहीत नाहीं; मला वाटतें, असें ह्मणत नाहींत.

१६०. प्र०—जर त्याच वसाहतीनें कर व भार बसवितां येत नाहीं असें ह्मटलें, तर दोनीही बसविण्याचा अधिकार पार्लमेंटला नाहीं, असें त्या वसाहतीचें ह्मणणें आहे असें होत नाहीं काय? उ०—मला वाटतें ' भार ' या शब्दाचा अर्थ व्यापाराच्या व्यवस्थेकरितां आयात मालावरील कर असें ह्मणण्याचा त्यांचा उद्देश नाहीं.

१६१. प्र०—तर मग भार याचा करापासून भिन्न असा

काणतो अर्थ वसाहती ह्मणतात? उ०—पुष्कळ गोष्टी ते ह्मणत असतील, जसें मनुष्यें अथवा गाड्या वेठीस धरणें, खासगी घरांत शिपायांना ठेवणें आणि अशाच दुसऱ्या गोष्टी. वास्तविक कर नव्हेत असे मोठे भार असूं शकतील.

१६२. प्र०—टपालखर्च हा पार्लमेंटच्या कायद्यानें बसविलेला **आंतर** कर नव्हे काय? उ०—याचें उत्तर मी दिलेलें आहे.

१६३. प्र०—वसाहतींचे सर्व भाग कर देण्यास सारखे समर्थ आहेत काय? उ०—छे:, खास नाहींत. शत्रूनें नासधूस केल्या-मुळें सरहद्दीवरचे भाग अगदीं असमर्थ आहेत, ह्मणून आमच्या कराच्या कायद्याची अशांवर बहुतकरून मेहेरनजर असते.

१६४. प्र०—कृपादृष्टीस कोण पात्र आहेत, याची परीक्षा इतक्या दुरून करण्यास आह्मीं लायक आहों कां? उ०—पार्लमेंटला तसें वाटलें आहे. कारण, अमेरिकेंत कराचे कायदे करण्याचा अधिकार पार्लमेंटनें आपल्याकडे घेतला आहे. मला तें अशक्य वाटतें.

१६५. प्र०—स्टांपआक्ट रद्द केला ह्मणजे तुमचे कारखाने मंदावतील काय? ज्यांनीं कारखाने सुरू केले आहेत, ते बंद करतील काय? उ०—होय, मला वाटतें ते करतील; पण, व्यापारही लगेच पूर्ववत् सुरू झाला पाहिजे; ह्मणजे पैसा इकडून तिकडे सहज पाठवितां येईल. पुष्कळ उदाहरणें मला माहीत आहेत, त्यावरून हें संभवनीय दिसतें. गेल्याच्या मागील लढाईत तंबाकूला मंदी आली, आणि हुंड्या आल्या नाहींत, ह्मणून व्हर्जिनिआ येथील लोक बहुतकरून घरोघर माल काढूं लागले. नंतर जेव्हां तंबाकूचा भाव चढला, तेव्हां ते ब्रिटिश माल वापरूं लागले. तसेंच, पेन्सिल्व्हानिया येथें गेल्या लढाईत फूलिंगमिल्स बंद होत्या. याचें कारण, हुंड्या पुष्कळ होत्या, आणि इंग्लिश कापड व दुसरा माल आणण्याकरितां ब्रिटनला सहज पैसा पाठवितां येत असे.

१६६. प्र०—स्टांपआक्ट रद्द केला ह्मणजे, अमेरिकेंतील सभा, पार्लमेंटचा कर बसविण्याचा अधिकार कबूल करतील काय? आणि

आपले ठराव रद्द करतील काय? उ०—नाहीं, कधीं नाहीं.

१६७. प्र०—ते ठराव रद्द करण्यास त्यांना भाग पाडण्याला उपाय नाहींत काय? उ०—मला तर माहीत नाहींत. शस्त्रबळानें भाग पाडल्याशिवाय ते कधींही करणार नाहींत.

१६८. प्र०—ते रद्द करण्यास भाग पाडण्याला या भूतलावर एखादी शक्ति आहे काय? उ०—कोणत्याही शक्तीला, मग ती कितीही मोठी असो, मनुष्यांस आपलीं मतें बदलण्यास भाग पाडतां येणार नाहीं.

१६९. प्र०—टपालखातें, ह्मणजे हा एक कराचा बोजा, असें ते समजतात कीं ती एक सोईची व्यवस्था आहे असें ते मानितात? उ०—कर नव्हे; पण व्यवस्था व सोय असें मानितात. प्रत्येक सभेनें त्यास उत्तेजन दिलें आहे; आणि पैसा देऊन त्यास बालपणांत मदत केली. नाहीं तर त्यांनीं ती केली नसती. आणि लोकही टपालहांशील नेहमीं देत आले आहेत.

१७०. प्र०—तुह्मीं सांगितलेली माहिती तुह्मांला केव्हां मिळाली? उ०—सुमारें १९ महिन्यांमागें जेव्हां मी इंग्लंडास आलों, तेव्हां मीं ती घेऊन आलों.

१७१. प्र०—तुह्मीं प्रधानास ती कधीं कळविली? उ०—मी येथें आल्यानंतर लौकरच अमेरिकेवर स्टांप लादण्याचा विचार चालला असतां व मसुदा सभेंत आणण्यापूर्वी कळविली.

१७२. प्र०—व्हर्जिनिआ येथील लोक तंबाकूंत गुंतलेले असणें, ग्रेटब्रिटनला अत्यंत हितावह आहे कीं कारखान्यांत गुंतलेले असण्यांत त्यांचें कल्याण आहे? उ०—खास तंबाकूंत.

१७३. प्र०—अमेरिकेंतील लोकांना यापूर्वी कोणत्या गोष्टीचा अभिमान वाटत होता? उ०—ग्रेटब्रिटनच्या चालीरीतींचें अनुकरण करणें व तेथील माल हौसेनें वापरणें याचा.

१७४. प्र०—हल्लीं त्यांची अभिमानाची गोष्ट कोणती? उ०—नवीन वस्त्रें स्वतः तयार करीपर्यंत, जुनींच पुनः वापरणें.

# व्यवहारचातुर्य.

रूपलावण्य अभ्यासितां नये ॥ सहज गुणासी न चले उपाये ॥
कांहीं तरी धरावी सोये ॥ आगंतुक गुणांची ॥ १ ॥
मूर्खपण सांडितां जातें ॥ शहाणपण शिकतां येतें ॥
तें कारभार करितां उमजतें ॥ सकल कांहीं ॥ २ ॥

या जगांत आपली संसारयात्रा सुगम व सुखद होण्यास शक्तिपेक्षां युक्तीची आवश्यकता जास्त आहे. याविषयीं एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे कीं, "उपायेन हि यत्कुर्यात्तन्न शक्यं पराक्रमैः" ह्मणजे "युक्तीनें कार्य घडे, नोहे तैसें कदापि शक्तीनें." परंतु ही युक्ति ज्यांना निसर्गतःच साध्य झालेली नसते, त्यांना ती अनायासें लाभत नाहीं. तथापि खटपटीनें ती थोडीबहुत तरी मिळवितां येईल. अशा हेतूनें या विषयावर दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

कोणालाही संतोषविण्याची संधि आली असतां ती व्यर्थ दवडूं नये. सर्वांशीं सुजनतेनें वागण्याचा क्रम ठेवावा. "ऐश्वर्यस्य विभूषणं सुजनता" अशी भर्तृहरीची उक्ति आहे. लेडी मान्टेग इनें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, 'सुजनता ही कांहीं मोल देऊन विकत घ्यावी लागत नाहीं; पण ती एक अंगीं असली ह्मणजे कशाचीही उणीव पडत नाहीं.' 'मुखाचें मुखें बोलतां काय वेचें' अशी श्रीसमर्थांची उक्ति आहे; तिचा तरी अर्थ हाच. 'द्रव्येण सर्वे वशाः' असें एक वचन आहे; परंतु द्रव्य खर्चूनही जें मिळण्याजोगें नसेल, तें सुजनतेनें प्राप्त होण्यासारखें आहे असें आह्मांस वाटतें. ज्याच्याशीं समागम ह्मणून घडेल, त्यास आपलासा करून घ्यावें. प्रसिद्ध मुत्सद्दी बर्ले यानें इलिझाबेथ राणीस एके प्रसंगीं असें कळविलें कीं, 'बाईसाहेब

प्रजाजनांचीं चित्तें आपलींशीं करून घ्या; ह्मणजे आपण त्यांच्या चित्तांच्या व वित्तांच्याही स्वामिनी झालाच.

जेथें बळ विफळ होतें, तेथें युक्तीनें कार्य साधतें. या संबंधांत इसाब-नीतींतील सूर्य आणि वारा यांची एक जुनी गोष्ट वाचण्यालायक आहे. ती अशी :—एके प्रसंगीं आपणांत प्रबळ कोण ह्मणून सूर्य आणि वारा यांच्यांत कलह लागला. त्या समयीं रस्त्यानें एक पांथ चालला होता, त्याचे अंगावरील कपडे उडवून आपला पराक्रम कसोटीस लावावा असें त्यांनीं ठरविलें. तेव्हां त्याचे कपडे उडवून देण्याकरितां वारा मोठ्या सोसाट्यानें निघाला व त्यावर जोरानें झडप घालूं लागला; परंतु वारा जसजसें आपलें उग्र स्वरूप प्रगट करून स्वत:चा प्रभाव दाखवूं लागला, तसतसें तो पांथ आपले कपडे अंगास अधिक अधिक चिकटून घेऊं लागला. नंतर सूर्य आपल्या प्रखर किरणांचें तेज पाडूं लागला, तेव्हां त्या गृहस्थाचे शरीरांत उष्णता येऊं लागली. अखेरीस हवा फारच गरम झाल्यामुळें त्यानें अंगांतील झगा काढून टाकिला; इतकेंच नाहीं तर आंतील बारबंदीही काढून टाकिली. हें पाहतांच वाऱ्यानें आपला पराभव कबूल केला."

कोणालाही काय, अरेपेक्षां अहो ह्मटलें असतां संतोष होतो, हें नेहमीं लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

अहो कांहो अरे कांरे ॥ जनीं ऐकिजे ते कीं रे ॥ १ ॥

असे सद्गुरु समर्थांचे उद्गार आहेत. गोडीगुलाबीनें जसें इतरांचें मन स्वाधीन करून घेतां येतें, तसें तें बळजोरीनें होत नाहीं. जुलमाचा रामराम करावयाला लावण्यापेक्षां, आनंदानें व सुखसंतोषानें वाट दाखविता आली ह्मणजे पुरें. एका कवीनें ह्मटलें आहे :—

मंदस्मित वचनाहीं वश होती जन न लागतां उशिर ॥
तैसें न परुषवचें ते असि घेउनि तोडितांहि तें शीर ॥

ही उक्ति सदैव स्मरणांत ठेवण्यासारखी आहे.

साध्वी द्रौपदीला पांच पति असतांही तिनें त्या सर्वांस आपल्या मुठींत ठेविलें होतें; परंतु सत्यभामेला एकाचेंही मन आपलेसें करून

घेतां आलें नाहीं. याविषयीं पंतांनीं फार सुरस वर्णन केलें आहे तें असें—

सत्या कृष्णेसी ह्मणे, 'वदत्यें तें तूं खरेंच मान सये ॥
लोक ह्मणोत, परिपळहि माझ्या हातीं न कांतमानस ये ॥ १ ॥
त्वां हे पांच पति कसे वश केले? भजति सर्व एकीतें ॥
थोडे याहुनि पाहुनि नटती कादंबिनीस केकीतें ॥ २ ॥
सांग वशीकरण कसें केलें त्वां देवि कोणत्या मंत्रें ॥
कीं दिव्यौषधिमूळें किंवा वात्स्यायनोदितें यंत्रें '॥ ३ ॥
कृष्णा हांसोनि ह्मणे ' भामे मोहावयासि पतिला जे ॥
मंत्राद्युपाय करणें या श्रवणें बहुमदीय मति लाजे ॥ ४ ॥
प्रेमें पतिचरणाशीं न देउनि दे हात तायिताला जे ॥
ते स्त्री न रुचे पतिला कीं तीतें आततायिताला जे ॥ ५ ॥
जाणें वशीकरण हें कारित्यें जेणें कधीं न कोपति ते ॥
सखि तूंही असेंचि करीं मदमत्सर दाखवूं नको पतितें ॥ ६ ॥
पतिपरमेश्वरचरणा जी तत्सेवार्थ न नवशी करणें ॥
ती मुग्धा कैशी गे, वळवील स्वामिमन वशीकरणें ॥ ७ ॥

संसारांत ज्यांच्याशीं ह्मणून समागम घडतो, त्यांचा विश्वास सर केलाच पाहिजे. त्यांच्या विश्वासस्थानास पात्र होण्याची योग्यता अंगीं आणणें अवश्य आहे. बुद्धीपेक्षां केवळ सद्वर्तनाच्याच जोरावर लहान लहान माणसें वंदनीय झालीं आहेत, अशीं उदाहरणें इतिहासांत व पुराणांतरीं जागोजागीं आढळतात. एका आधुनिक कवीनें ह्मटलें आहे:—

' असतां तुका बिचारा वाणी त्या द्विजहि वंदितात जनीं॥
याचें बीज असावें काय असें शोधितां कळेल मनीं ॥ १ ॥
वंदन वस्तु न पावे, गुण पावे वंदना अनायासें ॥
हें तत्व अनुभवावें, पाहावें साधुसंतसहवासें ॥ २ ॥
यास्तव संपादावें यत्न करुनि सद्गुणांस मनुजांहीं ॥
त्यावांचुनि वंद्यत्वप्राप्तीचा मार्ग दूसरा नाहीं ' ॥ ३ ॥

दुसऱ्याच्या मनाजोगतें येईल तितकें करण्याची खटपट करावी; तथापि प्रसंगीं 'नाहीं' म्हणण्यास डगमगूं नये. हवें त्याला होय म्हणतां येईल; पण सुखानें व आनंदानें 'होय' म्हणणें थोड्यांनाच साधतें. तथापि 'नाहीं' म्हणून सांगतां येणें हें मात्र फार कठीण आहे. 'भीड भिकेची बहीण' अशी आपणांत एक म्हण आहे, व ही भीड न तुटल्यामुळें आणि 'नाहीं' म्हणतां न आल्यानें, किती तरी लोकांची दुर्दशा उडाली आहे. **श्री**समर्थ **रा**मदास स्वामींनीं एकेजागीं म्हटलें आहे 'भिडेनें कार्यभाग नासतो,' हें वचन ध्यानांत धरण्याजोगें आहे. 'नाहीं' हा द्व्यक्षरी शब्द उच्चारितां न आल्यानें, एशियामायनर देशांतील लोकांना पराधीनत्व सेवावें लागलें, असें **प्लयु**टार्क नामक एका ग्रंथकारानें लिहिलें आहे. आतां या संसारांत 'नाहीं' म्हणण्याचे प्रसंग पदोपदीं येतात. तेव्हां कोणाचेंही मन न दुखवितां 'नाहीं' म्हणतां आलें पाहिजे. ज्यांच्यांशीं आपणांस व्यवहार ठेवावा लागतो, त्यांच्याबरोबर अशा धोरणानें वागावें कीं, आपणाशीं व्यवहार ठेवण्यांत त्यांना उल्हास वाटावा, व आपणाशीं वारंवार प्रसंग घडावा अशी त्यांना मनापासून इच्छा व्हावी. व्यवहारांत इतरानें आपल्याशीं ममतेनें, मर्यादेनें, प्रांजलपणानें व गोडीगुलाबीनें वागावें असें प्रत्येकास वाटतें, तेव्हां इतरांशींही प्रत्येकानें तसेंच वागलें पाहिजे. वागण्याचें धोरण कसें असावें याविषयीं इंग्रजींत एक म्हण आहे, ती अशी:—

इतरें तुजशीं जैसें वागावें वाटतें तसें वाग ।
ऐशानें स्नेह जडे येईना मानसीं कधीं राग ॥

यासंबंधीं सद्‌गुरु **श्री**समर्थांची उक्ति आहे ती येणेंप्रमाणें:—

'आपण दुसरियास करावें ॥ तेणें सवेंचि उसणें घ्यावें ॥
जना कष्टवितां कष्टावें ॥ लागेल बहु ॥ १ ॥
म्हणोन दुसऱ्यास सुखी करावें ॥ तेणें आपण सुखी व्हावें ॥
दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें ॥ लागेल स्वयें ॥ २ ॥

मैत्रीकरितां होतें कृत्य ॥ वैर करितां येतो मृत्य ॥
बोलिलें हें सत्य कीं असत्य ॥ ओळखावें ' ॥ ३ ॥

दुसरे एकेठिकाणीं श्रीसमर्थांनीं असें ह्मटलें आहे :—

' हें आपणाकडेच येतें ॥ राजी राखिजे समस्तातें ' ॥

कविराज मोरोपंत यांचीही यासंबंधाची उक्ति संस्मरणीय आहे :—

ज्याचें आचरण जैसें त्या तैसा फळद काळजी वाहो ॥

आपली चित्तवृत्ति नेहमीं सुप्रसन्न ठेवावी; व ही गोष्ट बहुतेक प्रत्येकाच्या स्वाधीनची आहे. जो स्वतः सुप्रसन्न असेल, त्यासच इतरांना सुप्रसन्न करितां येईल. ' आडांत असेल तर पोहोऱ्यांत येईल ' ही ह्मण येथें चांगली लागू पडते. दुर्मुखलेल्या पुरुषांचा सहवास कोणासही सुखप्रद वाटणारा नसतो. ही सुखी राहण्याची कला बालपणींच संपादणें अवश्य आहे. कारण, ' बालपणीं बाळांची कोमल तरुतुल्य बुद्धि वांकेल ' या आर्यार्धाप्रमाणें ज्यांना ही कला बाळपणीं साधत नाहीं, त्यांना ती तरुणपणीं प्राप्त करून घेण्यास आयास पडतात. या जगांत किती तरी लोकांनीं, अंगीं बुद्धिमत्ता व कार्यक्षमता नसतांही केवळ गोड किंवा चांगल्या वागणुकीनें अथवा शिष्टाचारानें कार्यसिद्धि व कृतार्थता संपादिली आहे. एका कवीनें ह्मटलें आहे :—

सुकृति हे वश सर्व जनां करी ॥ भय समूळ खरोखर संहरी ॥

तसेंच साधु समर्थ ह्मणतात :—

जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देश काल प्रसंग जाणे ॥
तया पुरुषा काय उणे । भूमंडळीं ॥

तसेंच उलट पक्षीं साफ दिलाच्या व प्रेमळ आणि शुद्ध अंतःकरणाच्या पुरुषांनादेखील, शिष्टजनसंप्रदायानुरूप वर्तन न ठेवितां आल्यामुळें, निष्कारण वैरी उत्पन्न होतात असें वारंवार नजरेस येतें.

संसारांत शांतता आणि दक्षता यांची पदोपदीं जरूर लागते. मन शांत व स्थिर केल्याशिवाय कोणतेंही काम होत नाहीं व तें दक्षतेनें

न केल्यास श्रम विफळ होतात; परंतु हे दोन गुण अंगीं असले ह्मणजे, बिकट प्रसंगीं देखील अनेक अडचणींतून पार पडतां येतें. इंग्रजींत एक ह्मण आहे कीं, डोकें थंड असावें; पण अंतःकरणांत प्रेमोष्मा मात्र असावा.

आपल्यापेक्षां कमी बुद्धीच्या व कमी अकलेच्या पुरुषाशीं गांठ पडली असतां त्यांना अवमानूं नये. श्रीसमर्थांनीं ह्मटल्याप्रमाणें :—

॥ वेड्यास वेडें ह्मणों नये ॥ वर्म कदापि बोलों नये ॥

कारण सुदैवानें श्रीमान् कुलांत जन्म झाला ह्मणून, केवळ यदृच्छया लाधलेल्या संपत्तीचा गर्व वाहणें जितकें निरर्थक व पोकळ आहे, तितकेंच सहजगत्या प्राप्त झालेल्या विशाल बुद्धिमत्तेचा तोरा मिरविणें हें आहे. वडिलोपार्जित दौलतीचा सद्व्यय करणें जसें भूषणावह, तसेंच ईश्वरदत्त बुद्धिमत्तेचा सदुपयोग करणें हेंही भूषणावह होय. मनुष्यें दिसतात त्यापेक्षां तीं विशेष बुद्धिमान् व चाणाक्ष असतात. ग्रंथ-परीक्षा करणें फार सोपें; पण मनुष्यपरीक्षा करणें फार अवघड. ही परीक्षा करण्याचें मुख्य साधन ह्मटलें ह्मणजे अवलोकन. ‘ माणसाच्या बोलण्यांत व करण्यांत मेळ नसला ह्मणजे, शहाणा पुरुष त्याच्या कर-णीवरून त्याला ओळखतो व त्याचें बोलणें जमेस धरीत नाहीं. ’ असें इमर्सन नामक प्रख्यात ग्रंथकाराचें मत आहे.

फाजील औपचारिक भाषणांनीं भुलून जाऊं नये. त्यावर बेता-बातानेंच इतबार ठेविला पाहिजे. एखाद्या अपरिचित पुरुषानें पहि-ल्याच भेटीला विशेष स्नेहभाव व अपरिमित अगत्य दाखविलें असतां, तें सर्वथैव खरें मानणें रास्त नाहीं. कारण, पुरुषांना पुरुषांविषयीं व स्त्रियांना स्त्रियांविषयीं दर्शन होतांच प्रेमातिशय उत्पन्न होत नाहीं. असें भाषण ह्मणजे नेहमीं मायावीच असतें असें जरी नाही, तरी इतकें खास कीं, एक तर त्यांत फाजीलपणाचा अंश अधिक, किंवा स्वार्थबुद्धि अधिक. ‘ मी आपला स्नेही आहें ’ असें ह्मणणारा प्रत्येक मनुष्य खरोखरच स्नेही आहे असें समजूं नये. ‘ तन्मित्रमा-

पाद सुखे च समक्रियं यत्' या उक्तीप्रमाणें जीवास जीव देणारा एखादा मित्र भाग्यवानालाच मिळतो. खरा मित्र दुनियेंत विरळ; यास्तव असा स्नेही भेटला असतां त्यास प्रेमपाशांनीं जखडून टाकिलें पाहिजे. खरा मित्र दुर्लभ, ह्मणून बाकीचे सर्व शत्रु, असा एकदम समज अगदीं चुकीचा. शत्रु व मित्र यांच्या दरम्यान महदंतर आहे. त्यांत समाविष्ट असलेल्या लोकांना ओळखून, त्यांच्या दरजाप्रमाणें त्यांच्याशीं वागणूक ठेवणें याचेंच नांव चातुर्य अथवा युक्ति.

परमेश्वरानें मनुष्यास बुद्धि दिली आहे, अशी आपण मोठी घमेंड मिरवितों; परंतु तदनुरूप वर्तन फारच थोड्या जनांचें दृष्टीस पडतें. बहुतेक लोक विकारवश झालेले असून, त्यांवर दुराग्रहाचाही पगडा बसलेला असतो. तेव्हां त्यांच्या मनोदयानुरूप वर्तनक्रम ठेविल्याशिवाय त्यांची सहानुभूति व त्यांचें पाठबळ मिळणारें नाहीं. 'मनः-पूतं समाचरेत्' या उक्तीच्या शब्दशः अर्थाप्रमाणें वर्तन ठेविलें असतां, पदोपदीं त्रास होण्याचा व अडचणी येण्याचा संभव आहे; कारण लोक 'गतानुगतिक' आहेत, यास्तव 'महाजनो येन गतः सपंथाः' या मार्गाचेंच अवलंबन श्रेयस्कर समजावें.

व्यवहारांत 'वादे वादे जायते **तत्वबोधः**' याची प्रतीति क्वचित् येते; परंतु 'वादे वादे जायते **स्नेहभंगः**' याचा मात्र ठिकठिकाणीं अनुभव आलेला आहे. स्वजनाशीं, स्नेह्यांशीं व इष्टजनांशीं, वादविवाद करणें बहुतकरून अनिष्ट असतें. त्यायोगानें गैरसमज होऊन स्नेहांत व प्रेमांत अंतर पडण्याची भीति फार. इंग्लंडांतील प्रसिद्ध वक्ता व मुत्सद्दी **एडमंडबर्क** व **फॉक्स** यांच्यांत कित्येक वर्षें अकृत्रिम व अप्रतिम स्नेहभाव वसत होता; परंतु १८ व्या शतकाच्या अखेरीस फ्रान्स देशांत जी राज्यक्रांति झाली, तिच्या बरेवाईटपणाविषयीं या मित्रद्वयांत मतभेद पडून वादविवादाचा झंझावात सुरू होतांच, इतके दिवस प्रेमानें वाढविलेला स्नेहवृक्ष धाडकन एकदम उपटून खालीं पडला. अगदीं अलीकडचेंच उदाहरण पाहिजे असल्यास, कैलासवासी प्रिन्सिपाल **आगरकर** व नामदार **बाळ गंगाधर**

टिळक यांचें होय. वादविवादानें स्वपक्षाचें मंडन व स्थापन होतें; परंतु त्यास स्नेहाची आहुति द्यावी लागते. कोणासही काय, आपल्या मताचें खंडन असह्यच वाटतें. दुसरें, आपण आपला पक्ष स्थापित केला ह्मणजे प्रतिपक्षाची खातरजमा झाली असें तरी कोठें आहे ? यास्तव वादविवादाचा प्रसंग आलाच तर प्रतिपक्षाचे मान्य असतील तितके मुद्दे मान्य करून, अमुक एका मुद्याकडे आपली नजर पोहोंचली नसावी असें त्यास सुचवावें. आपला पक्ष थोडक्यांत पण स्पष्ट व विशद अशा रीतीनें मांडावा, व त्यायोगानें प्रतिपक्ष्याचें मत डगमगूं लागलें ह्मणजे पुरे. याहून जास्त अपेक्षा करणें व्यर्थ.

संभाषण ही एक कला आहे व अवांतर कलांप्रमाणें ती कष्टसाध्य आहे. 'सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् ॥ न ब्रूयात् सत्यमप्रियं' ही उक्ति सदैव चिंतनीय आहे. तसेंच 'अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः' हें वचन देखील संस्मरणीय आहे. मुखांतून एकदां शब्द निघाले ह्मणजे त्यांना परतवितां येत नाहीं, व ऐकणारांनाही त्यांची विस्मृति पडत नाहीं. याकरितां विचारपूर्वक बोलण्याची संवय ठेविली पाहिजे. कारण, एका कवीनें ह्मटलें आहे.—'सुचिंत्य चोक्तं सुविचार्य यत्कृतं सुदीर्घकालेऽपि न याति विक्रियां ॥' चार मंडळी बसली असतां विनोदाच्या भाषणानें आनंद होतो; परंतु आपला विनोद कोणाच्या मर्मी लागणार नाहीं, याविषयीं खबरदारी ठेवणें इष्ट आहे.

कित्येकांना बोलण्याची हांव फार असते. त्यांचें चऱ्हाट एकदां सुरूं झालें, ह्मणजे दुसऱ्यांना तोंड उघडण्यास अवसर मिळत नाहीं. वक्तृत्व हें जसें भूषणास्पद आहे, तसेंच श्रोतृत्व अंगीं असणें हाही एक गुण आहे हें त्यांना अवगत नसतें. 'मौनं सर्वार्थसाधनं' किंवा

वाटे मौन बरें तें वटवटतां देतसे बहू त्रास ॥
हासा पिकवी भारी देई स्वजनास फार आयास ॥

या उक्ति त्यांच्या मनींमानसींही नसतात. दुसरें समयानुरूप भाषण करणें हें फार महत्वाचें आहे. एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे, 'वचस्तत्रैव वक्तव्यं, यत्रोक्तं सफलं भवेत्. ॥'

आपणाजवळ ज्या ज्या गोष्टींचा अनुवाद होतो, त्या सर्व टीकाविषयक होत असें समजूं नये. त्या त्या गोष्टीसंबंधीं आपलें मत घटकाभर एका बाजूस ठेवून, बोलणाराच्या चित्तवृत्तीशीं तल्लीन व्हावें व त्याच्या सुखदु:खाचा वांटा घेण्यास तयार असावें. मनुष्याच्या अंगीं अनुकंपा व सहानुभूति यांचें वास्तव्य असलें ह्मणजे, त्याचा विचार व सल्लामसलत घेण्याकरितां दुसरे लोक त्याजकडे जाणारच. संकटसमयीं व काळजीच्या प्रसंगीं आपण लोकांच्या उपयोगीं पडलों, त्यांस सुखी केलें व त्यांची काळजी दूर केली, तर आपणांस केवढें बरें समाधान वाटण्याजोगें आहे!

कोणाशीं वैर ह्मणून संपादूं नये. त्यासारखें दुसरें अनहित नाहीं. 'एक वैरी दहा मित्रांस भारी' हें कांहीं खोटें नाहीं. सद्गुरु श्रीसमर्थांनीं ह्मटलें आहे:—

॥ वैर करितां वैराचि वाढे ॥ आपणा दु:ख भोगणें घडे ॥

मृदु व नम्रोक्तीनें राग घालवितां येतो, हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे खरें; परंतु हेंही लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, कोपवचनापेक्षां उपहासोक्तीनें क्रोधानळ जास्त व लवकर पेटतो. शेंकडा नव्वद लोक नुकसान पतकरतील, शिव्या सोसतील; पण उपहास ह्मणून त्यांना खपणार नाहीं. कौरव पांडवांत जो वैराग्नि भडकला, व ज्याच्या ज्वालांनीं त्यांना भस्म करून टाकिलें, त्याच्या मूळाशीं तरी हा परिहासच होता. राजसूययज्ञांत मयसभा अवलोकन करीत हिंडत असतां, दुर्योधनास भूमीच्या ठिकाणीं जलाचा व जलाच्या ठिकाणीं भूमीचा भास झाल्यामुळें तो पाय घसरून पडला; व त्यामुळें पुढें झालेल्या परिभवाचें गाऱ्हाणें त्यानें आपल्या बापास कळविलें तें असें:—

मयकृत सभेंत पडलों मी वापींत स्थळभ्रमें सहसा ॥
हंसले सपत्नदाराहि, न ह्मणे कोणीहि कीं 'उगे न हंसा' ॥ १ ॥
खदखद हांसे भीमहि जिष्णुहि मजला तसेंचि वा यम ही ॥
तद्दुर्दशा न करितां निस्तेजा मज वटेल कायम ही ॥ २ ॥

विवृतद्वाराकार प्रेक्षुनि भित्तिप्रदेश जों शिरतों ॥
फुटलें तें थोडेंबहु, जें धरिलें शतुनें स्वयें शिरतों ॥ ३ ॥
धृतराष्ट्रसूता ये मी दाखवितों द्वार, हें न बापाहे ॥
वदला असें वृकोदर जें, तद्वाक्यार्थ तूंचि बा पाहे ॥ ४ ॥

हृदयाला घरे पाडणारी ही परिहासमर्मोक्ति ऐकून दुर्योधनानें संतप्त व्हावें व "चित्तीं ह्मणे मरो परि अपमानीं सर्वथा सुयोधन हो" अशी प्रतिज्ञा करावी यांत काय बरें नवल आहे? शस्त्रांचा घाव औषधादि उपचारांनीं नाहींसा होतो; परंतु शब्दांचा घाव नाहींसा करण्यास कोणतेही उपाय चालत नाहींत. लॉर्ड चेस्टरफिल्ड यानें एकेप्रसंगीं असें ह्मटलें आहे कीं, 'क्षणिक विनोदाकरितां स्नेहांत अंतर आणणें हा केवळ मूर्खपणा होय.' घटकेच्या विनोदानें जन्माच्या स्नेहास मुकावें हा वेडेपणा नव्हे कां? परंतु 'नाशत्रु नामित्र' अशा मध्यस्थ किंवा निस्पृही जनांची संख्या बरीच असते. त्यांचा परिहास करून क्रोधाग्नि प्रज्वलित करावा व त्यांशीं निष्कारण वैर संपादावें, हा कमी मूर्खपणा आहे असें नाहीं. कविराज मोरोपंतानें ह्मटल्याप्रमाणें

'हें तुज कोणी कथिलें चक्षुर्विष नागपुच्छ तुडवाया.'

अलीकडे मतवैचित्र्य दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर आहे असें आपण पहातों. तेव्हां प्रत्येकानें आपआपल्या विचारांचा व मतांचा निर्भयपणें अभिमान बाळगावा. त्याबद्दल प्रसंगोपात्त लोकनिंदा व उपहास हीं सोसण्यास आपण तयार असलें पाहिजे. यायोगानें कांहीं हानि होईल ही भीति निरर्थक आहे. वास्तविक विचार केला असतां आपलें खरें स्वरूप प्रगट करण्यांत काय उपहासास्पद आहे बरें? खरें ह्मटलें तर ढोंग व दांभिकपणा हेच उपहासास्पद होत. कोणालाही काय, कावळ्याचा ह्मणून राग येत नाहीं; पण तोच मोराचीं पिसें लावून फिरूं लागला ह्मणजे स्वकीयांतून व परकीयांतून भ्रष्ट होतो. आतां हें खरें कीं, लोक केव्हां केव्हां केवळ काल्पनिक दुःखानें दुर्मुखतात, चडफडतात, जवळच्या लोकांवर रागावतात व त्यांच्यावरील प्रेम कमी करितात. याला कोणाचा उपाय आहे?

व्यवहारांत मनाचा मोकळेपणा जसा लागतो, तशीच संकोचवृत्तिही पण लागते. होतां होईल तोंपर्यंत स्वत:संबंधीं किंवा स्वत:करितां किंवा स्वत:विरुद्ध बोलूं नये; परंतु इतरांना मात्र आपल्याविषयीं वाटेल तितकें बोलूं द्यावें. ज्याला जें आवडतें, तें तो बोलतो व आपण तें शांतपणें ऐकून घेतलें ह्मणजे त्यांच्या मनांत आपल्याविषयीं प्रेम व आदर उत्पन्न झालाच पाहिजे.

कोणच्याही उद्योगांत किंवा धंद्यांत उतावीळपणा कामाचा नाहीं. 'धीरसो गंभीर' ही ह्मण व श्रीसमर्थांची पुढील उक्ति ध्यानांत धरण्याजोगी आहे.

पसेवरी वैरण घातलें ॥ तांतडीनें जातें ओढीलें ॥
तेणें पीठ बारीक आलें ॥ हें तों घडेना ॥ १ ॥
घांसामागें घांस घेतला ॥ अवकाश नाहीं चावायाला ॥
अवघा बोकणा भरीला ॥ पुढें कैसें ॥ २ ॥

धिमेपणा हा एक मोठा गुण आहे व तो अभ्यासानें अंगीं जरूर आणिला पाहिजे. विपत्कालीं व संकटाच्यासमयीं धिमेपणासारखा गुण नाहीं; ह्मणून एका कवीनें ह्मटलें आहे कीं, 'दरिद्रता धीरतया विराजते' यासंबंधीं भारवी कवीची अशी उक्ति आहे:—
'सुकरस्तरुवत्सहिष्णुना रिपुरुन्मूलयितुं महानपि'

होतांहोईल तोंवर क्रोधवश होऊं नये. यदाकदाचित् क्रोधानलानें पेट घेतलाच तर जीभ स्वाधीन ठेऊन, त्याची ज्वाला करवेल तितकी मंद करावी. 'क्रोध हें एक वेड आहे' अशी इंग्रजींत ह्मण आहे. बायबलांत साम ह्मणजे गीति ह्मणून एक भाग आहे, त्यांत क्रोधाविषयीं लिहिलें आहे तें असें:—

## अभंग.

नको वाहूं क्रोध ॥ सोडी हा समंध ॥
ठसो मनीं बोध ॥ हितकारी ॥ १ ॥
क्रोधें खुरखूर ॥ वाटे हुरहूर ॥

करवी निरंतर ॥ पापकर्में ॥ २ ॥
नम्र वाचे भाळे ॥ दुष्ट क्रोध पळे ॥
कंठीं मुक्ताफळें ॥ हीं वागवी ॥ ३ ॥
कटूक्तीच्या बळें ॥ क्रोध खळबळे ॥
चित्त तळमळे ॥ टाकी त्यातें ॥ ४ ॥

सत्पुरुष आपणास क्रोधवश कधींच होऊं देत नाहीं. कारण, कविराजपंतानें ह्मटल्याप्रमाणें 'सन्मनदरींत न शिरे कोपमतंगज, विवेक हरि जागे.'

जेथें आपल्याविषयीं अगत्य नाहीं किंवा आदर नाहीं, अशा ठिकाणीं जाऊं नये. 'विपुलच पृथ्वी' ही भवभूतीची उक्ति अनुसरावी.
'यदेव परिहर्तव्यं तदेवोदाहरति मूर्खः' या शूद्रक राजाच्या वचनाप्रमाणें भलतेंच कांहीं तरी बोलण्यानें उद्विग्नता उत्पन्न होईल, ह्मणून ज्याचा उल्लेख करूं नये तो करण्याची, व ज्यायोगानें विरोध व मतभेद वाढेल असा विषय चार चौघांत काढण्याची कित्येकांना फारच नामी लकब साधलेली असते.

व्यवहारांत लोकज्ञान अत्यंत उपयोगाचें आहे. कारण, आत्मपरीक्षणाचें व परपरीक्षणाचें ज्ञान त्यायोगानें होणारें आहे. 'मनुष्याचें ऐहिक आणि पारलौकिक कल्याण होण्यास जीं अनेक साधनें साधुपुरुषांनीं सांगितलीं आहेत, त्यांत आत्मपरीक्षण हा इतर सगळ्या साधनांचा पाया आहे. आत्मपरीक्षण या शब्दाच्या अर्थाचा चमत्कार असा होतो कीं, याहून अगदीं वेगळें जें परपरीक्षण किंवा अन्यपरीक्षण त्याचाही समावेश आत्मपरीक्षणांत होतो, तो असा.—ऐहिक व्यवहारामध्यें आपणांस काय करितां येतें, आणि ज्यांशीं वागायाचें आहे, त्यांच्या योग्यतेच्या मानानें आपलें हित साधण्यास आपणास काय करितां आलें पाहिजे हें कळलें पाहिजे.*' हजारों लोकांशीं आपणास नित्यशः प्रसंग पडतो. त्यांपैकीं कोणावर किती व कोणच्या

* बालबोध पुस्तक १५, पान २७४.

बाबतींत भरंवसा ठेवावा, याचा शहाणपणानें उलगडा लावणें हें काम लहानसान नाहीं. तसेंच ज्यांच्या समागमें आपणांस काम करावयाचें असतें किंवा ज्यांना आपल्या हाताखालीं काम करण्याचें आहे, अशा लोकांची योग्य निवड करणें अति महत्वाचें आहे. ज्या महिरापींतला देव त्या महिरापींत बसविणें फार अवघड आहे.

जर एखाद्या मनुष्याच्या इमानदारीविषयीं शंका असेल, तर त्याला आपल्या कामीं लाऊं नये; परंतु त्याकडे काम सोंपविल्यावर निरर्थक शंका घेत बसणें व्यर्थ आहे. विश्वास पूर्ण असावा; पण तो अंधळा मात्र नसावा.

आपण समंजस व समजूतदार असलें पाहिजे. 'द्विकर्णस्य तु मंत्रस्य ब्रह्माप्यंतं न गच्छति' हें वचन ध्यानांत ठेऊन आपली मसलत कोणास कळूं देतां कामा नये. आपली मसलत जर आपणासच संभाळितां आली नाहीं, तर इतर लोकांनीं ती न संभाळिल्याबद्दल दोष देतां येणार नाहीं. शहाण्याची जीभ त्याच्या हृदयांत असते; पण मूर्खाचें हृदय त्याचे जिभेवर असतें; कारण त्याला जें कांहीं येतें, तें सर्व तो भडभड बोलून टाकितो. हरएक कामांत अकलेचा व बुद्धीचा विनियोग केला पाहिजे. अशानें सर्वच कामें ह्मणजे बिनचूक होतात असें जरी नाहीं, तरी कोणत्याही कामांत डोकें खर्चिलें असतां चुकी होण्याचा संभव तितका कमी होतो.

पुष्कळ लोक जें बोलतात, तें त्यांना कांहीं सांगावयाचें असतें ह्मणून नाहीं, तर त्यांची जीभ वळवळ करिते ह्मणून. एरव्हीं त्या बोलण्यांत कांहीं अर्थ असतो असें नाहीं. वाचाळपणा ह्मणजे वटवट करण्याची आवड. त्यामुळें कार्यभाग बिघडतो. 'बोलेल तो करील काय' अशी आपणांत एक ह्मण आहे, व त्याच अर्थाचें 'नीचो वदति न कुरुते' हें संस्कृतांतील सुभाषित आहे. एकदां जिभेची टकळी सुरूं झाली, ह्मणजे बोलणारा आपलें देहभान विसरतो व मागाहून पश्चात्तापही पावतो. जिभेला स्वैरपणें फिरूं दिल्यानें कितीतरी अनर्थ

ओढवतात. जगज्जननी जानकी इजवर जी अपरिमित दुःखपरंपरा ओढली, तिचें कारण तिनें आपल्याच मुखानें सांगितलें आहे तें असें :— 'अशि सकळ अनर्था मूळ माझीच वाणी.' अरे लक्ष्मणा धांव, ही राक्षसाची कपटवाणी आहे. रामचंद्राची हांक नव्हे, असा सौमित्रानें केलेला बुद्धिवाद सीतादेवीनें मान्य करून, नुसतेंच तोंडसुख घेतलें नसतें, तर रावणानें हरण करण्याचा प्रसंगच आला नसता.

प्ल्युटार्क नांवाच्या ग्रीक ग्रंथकारानें डिमेरॅटसविषयीं एक आख्यायिका सांगितली आहे ती अशी :—एकदां डिमेरॅटस हा एका सभेंत बसला असतां, दुसऱ्या एका गृहस्थानें त्यास विचारलें, " कांहो, तुह्मीं स्तंभासारखे स्तब्ध बसला आहां तें कां ? तुह्मीं मूर्ख आहां अथवा काय बोलावें हेंच तुह्मांला सुचत नाही. " यावर त्या विद्वान् पुरुषानें असें उत्तर दिलें कीं, " मूर्खाला आपली जीभच संभाळितां येत नाहीं. " सालोमन नामक एक प्रख्यात परम चतुर पुरुष प्राचीन काळांत होऊन गेला. त्यानें असें ह्मटलें आहे कीं, —

मूर्खापरीस गमतो मज मूर्ख लोकीं ॥
जो आवरू नच शके रसना विलोकीं ॥

श्रीसमर्थांनींही असेंच सांगितलें आहे.—

' बहुत बोलणें ऐकावें ॥ तेथें मौन्यचि धरावें ॥
अल्प चिन्हेंचि समजावें ॥ जगदांतर ॥ १ ॥
हेतु समजोन उत्तर देणें ॥ दुसऱ्याचे जिवींचें समजणें ॥
मुख्य चातुर्याचीं लक्षणें ॥ तींही ऐशीं ॥ २ ॥'

कोणालाही काय, आपलें वर्चस्व दाखवूं नये. 'तूं कोण आहेस?' 'तुझ्यानें काय होणार आहे!' 'तुला कोण विचारतो!' इत्यादि तोऱ्याच्या गोष्टी ऐकणाराला जसा खेद वाटतो व जसा तो विमनस्क होतो, तसा दुसऱ्या थोड्याच गोष्टींनीं होणार आहे.

कोणत्याही गोष्टीचें विधान करितांना त्यांत दुराग्रह नसावा. 'हो हो, तें असेंच आहे किंवा तसेंच आहे' अशी फाजील खात्री अंगीं

असणें अनिष्ट आहे. कारण, एखाद्या गोष्टीविषयीं आपली पक्की खात्री असतांही आपण चुकतों, असें व्यवहारांत अनेक प्रसंगीं दिसून येतें. केव्हां केव्हां आपली स्मृति चकते, व "॥ जें सारें दिसतें चकाकित असें तें सर्व सोनें नसे ॥" याचाही प्रत्यय पदोपदीं येतो. शिवाय आपलें विधान खरेंही असलें, तथापि त्याची मांडणी करितांना थोडासा कमी निःशंकपणा दाखविल्यास त्यांत कांहीं वावगें आहे असें नाहीं.

ज्याला दम धरून थांबतां येतें व चांगली संधि आली असतां तिचा उपयोग करून घेतां येतो, त्याला सर्व कांहीं लाधतें; परंतु एका आंग्लकवीनें ह्मटल्याप्रमाणें :—

॥ अवसर येतां न जया वाटे उत्साह साधण्यालागीं ॥
॥ येतां उत्साह तया लाधे अवसर असें घडे न जगीं ॥

याचा अनुभव पुष्कळांना असेलच. गेली वेळ पुन्हां येत नाहीं, ही ह्मण कांहीं खोटी नाहीं. पाश्चात्यकविकुलगुरु शेक्स्पिअर याची यासंबंधानें जी अलौकिक उक्ति आहे, ती आह्मीं वाचकांस आपल्याच भाषेंत सादर करण्याचा यत्न करितों.

साक्या.

॥ मुहूर्तवेला आयुष्यामधिं येतां मनोरथातें ॥
॥ साध्य कराया यत्न करीना अवसर मिळे न त्यातें ॥ १ ॥
॥ दुःखद होई जीवित यात्रा खेद पदोपदिं वाटे ॥
॥ शांति मनाला अल्प नुरे ती हृदयीं हुरहुर दाटे ॥ २ ॥
॥ येतां वेळा साधी संधी युक्त उद्यमा करिती ॥
॥ ऋद्धी सिद्धी जोडुनि पाणी जवळी त्यांच्या वसती ॥ ३ ॥
॥ येतां भरतें उदधीलागीं नौका इष्ट प्रदेशा ॥
॥ सत्वर जाते दूर असे जरि वाटे मनीं न आशा ॥ ४ ॥
॥ संसारार्णविं येतां वेला उद्यम नौका हांकी ॥
॥ इष्टकार्य तें सिद्धिस न्याया दुजा उपाय न लोकीं ॥ ५ ॥

॥ गेली वेळा पुनरपि येई न घडे कदापि ऐसें ॥
॥ तत्वमानसीं जागृत ठेवी वागावें तूं तैसें ॥ ६ ॥

संसारांत नेहमीं सावध व दक्ष असलें पाहिजे.

सुप्रसिद्ध कवि भारवी यानें ह्मटलें आहे:—

सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदं ॥
वृणते हि विमृश्यकारिणं गुणलुब्धाः स्वयमेव संपदः ॥
सहसा न करी क्रिया कदा अविवेकें जडतीच आपदा ॥
वरि त्यास बळेंचि संपदा करिती जे सुविचार सर्वदा ॥

तथापि फाजील सावधपणा व भीति हीं कामाचीं नाहींत. 'मी चुकणार नाहींना' अशा नुसत्याच फाजील भीतीनें घाबरून जाऊं नये. कारण, 'जो पोहणार तो बुडणार व चढणार तो पडणार' ही ह्मण विसरतां कामा नये. ज्याचे हातून चूक होत नाहीं, त्याचेकडून मोठेंसें काम होईल ही आशाच नको.

आपला पेहराव नीटनेटका व ठाकठिकीचा असावा. आपल्या देशांत पेहरावाकडे प्राचीनकाळीं फारसें लक्ष्य असे असें दिसत-नाहीं; परंतु ते दिवस गेले. सांप्रत पेहरावाचें माहात्म्य दिवसें दिवस वाढत चाललें आहे. साहेब लोकांत त्यांची चहा फार. वस्त्र परिधान करणें अवश्यमेव आहेच. तरी तीं चापून चोपून घालावींत हेंच ठीक; परंतु त्यांत छानछोकीचा व नटण्यामुरडण्याचा प्रकार मात्र नसावा. पोषाकांत काळाची व द्रव्याची उधळपट्टी माजवूं नये. पोषाकावरून माणसाची परीक्षा किती होते, याचा विचार केला असतां आश्चर्यच वाटेल. व्यवहारांत हजारों लोकांशीं प्रसंग पडतो. त्यांपैकीं बहुतेक बहिरंगावरून परीक्षा करितात. अंतरंग जाणणारे फारच थोडे असतात, व ते ओळखण्याची संधिही फारच थोड्यांना येते. कर्णद्वारा व नेत्रद्वारा हृदयांत प्रकाश पडतो. शंभरांत एखादा अंतरंग ओळखणार मिळाल्यास भाग्याचें! शिवाय जो स्वतःविषयीं निष्काळजी व गबाळ्या असतो, तो इतरांविषयीं निष्काळजी होईल हें अनुमान पुष्कळअंशीं खरें ठरेल.

चार चौघांच्या समागमांत असतां चतुर व मर्यादशील आचरण पाहून तदनुरूप वागण्याचा क्रम ठेवणें फार इष्ट आहे. कविराज मोरोपंतानें ह्मटलें आहे 'चतुरपण परम दुर्मिळ तुज परिचय न घड-लाची सभ्यासी.' सुशील चित्ताकर्षि आचरण ह्मणजे ताम्रपटावरची एक शिफारसच होय. शिष्टाचारामुळेंच मनुष्यास मनुष्यपण येतें, अशी इंग्रजींत एक ह्मण आहे. यांत कदाचित् अतिशयोक्ति असली, तरी सत्यांशही पण बराच आहे. अदबशीर वर्तनानें कित्येकांस तर मोहनीच पडते व त्यानें ज्याला गुदगुल्या होणार नाहींत, तो योगीच समजला पाहिजे. लॉर्ड चेस्टरफिल्ड याचें असें ह्मणणें आहे कीं, 'कोणाचेंही अंत:करण आपलेंसें करून घेण्यास पांडित्य किंवा गुणो-त्कर्ष फारसा कामीं पडत नाहीं; पण तें एकदां स्वाधीन झाल्यावर या गुणद्वयांनीं त्यास बद्ध मात्र करितां येतें. प्रसन्न मुद्रा, अनुरूप अंगविक्षेप व दाक्षिण्य, यांनीं चक्षुरिंद्रियांस दंग करून टाकिलें व मधुरोक्तीनें आणि पदलालित्यानें श्रोत्रेंद्रियांस गारेगार करून सोडिलें, ह्मणजे अंत:करण स्वाधीन झालेंच ह्मणून समजावें. त्याच्याकरितां निराळें वशीकरण नको. सदसद्विचार जरी थोड्यांनाच असतो, तरी डोळे व कान हे सर्वत्रांस असतात. संसार ही एक रंगभूमी आहे, व आपणा सर्वांस कोणत्या तरी भूमिकेनें त्यावर यावेंच लागतें.

तेव्हां आपली जीवितयात्रा सुखकर व श्रेयस्कर होण्यास चित्ता-कर्षी अभिनय ह्मणजे वर्तन अवश्यमेव पाहिजे. कारण नाटक कितीही चांगलें उतरलें असलें, तरी प्रयोगाचे वेळीं अभिनयावरूनच त्याच्या गुणावगुणाची परीक्षा ठरते.

संसारयात्रा सुगम होण्यास जसा वाग्देवीचा प्रसाद अवश्य आहे, तसाच ललितभाव-लालित्यस्वामिनी लक्ष्मीचाही-अनुग्रह पाहिजे. व्यव-हारांत अनेक वेळां असें नजरेस आलें आहे कीं, एकाचे महान् महान् अपराधांची देखील डोळेझांक होते; परंतु दुसऱ्याची क्षुल्लक चुकीबद्दल-सुद्धां फटफजीती होते, हें असें कां बरें व्हावें? याचें कारण एवढेंच कीं, पहिल्या प्रतीचे लोक मोठ्या बेताबातानें, युक्तीनें व चातुर्यानें

वागतात; आणि दुसऱ्या प्रकारच्या मंडळींचें वर्तन धसमुसळ्यासारखें असतें. होरेस नामक एका रोमन ग्रंथकाराचें असें ह्मणणें आहे कीं, यौवन, वक्तृत्व, कलाकौशल्य इत्यादि गुण अंगीं असून एक ललितभाव नसला ह्मणजे ते सर्व निरर्थक होतात.*

---

* हा निबंध प्रसिद्ध सर जॉन लबक यांच्या Use of Life (जीवित साफल्य) ह्या ग्रंथाचा तिसरा भाग Tact ह्मणून आहे, त्याच्या आधारानें लिहिला आहे.

# प्रस्तुत चर्चेंतले विषय.

( धनुर्धारीकडून. )

हातून कृत्य घडण्यापूर्वी चर्चा होणें साहजिक आहे. त्या चर्चेंत मग काय निर्णय ठरावयाचा तो ठरेल. चर्चेचीं ठिकाणें आजमितीस आमच्या महा-राष्ट्रांत कायतीं वृत्तपत्रें, सार्वजनिकसभा आणि सुशिक्षितांच्या फुरसतींतल्या भेटी हीं होत; पण तेथेंही चर्चेच्या विषयांतली निवडणूक आणि पद्धतींतला अचरटपणा पाहिला ह्मणजे व्यर्थ नाउमेद होते. वृत्तपत्रें आठवड्याच्या आठवड्यास एकसारखी चर्चा करीत सुटतात. मजकूर भक्कम खरडला असतो; पण 'मनुष्याच्या आवश्यकतेंतील बारा आणे विषयांकडे पूर्ण दुर्लक्ष्य हे पत्रकार करितात' असा एका आंग्लाचा आरोप आहे. तो खोटा ह्मणून खोडण्याचा प्रसंग आमचा एकही वृत्तपत्रकार अद्याप आणून देत नाहीं. पूर्वी विद्याविषयक लेख वृत्तपत्रांतून येत असत; पण तोही मनु आतां बदलला आहे. निव्वळ अखबारपत्रें बनण्याकडेच साऱ्यांचा कटाक्ष आहे. सारस्वत किंवा वाङ्मय—Literary—लेख ह्मणजे एकाद दुसऱ्या पुस्तकांची 'पोंच' अगर 'आभारपूर्वक स्वीकार' आणि तोही चुकारतट्टुपणांतला होय.

*

* *

सर्व वृत्तपत्रकारांचा भार काय तो राजकीय विषयांवर; आणि तो राजकीय विषय ह्मणजे काय? तर शब्दब्रह्मांतली पोकळ आरडाओरड. सारा लेख पाण्यांत कोळला तर तळाला चार दोन अक्षरें राहणेंही मुष्किल! आमचा देश आणि तेथले दरिद्र व इंग्रज-सरकार या तिनींवर सगळा रोख ठेवून, विशेषणात्मक शब्दवृष्टीचा भडिमार उठवीत पोंकळ अवडंबर माजवावें, आणि कविकल्पनेप्रमाणें थातुरमातुर करीत आपणांस भरावयाची ती जागा अडवावी, या पलीकडे कांहींएक नाहीं असें स्पष्ट ह्मटलें तर, कोणाचीही छाती हें तुझें ह्मणणें खोटें असें सांगणेची नाहीं.

आणि असा प्रकार आमच्या पत्रकारांत कां असावा, याचीं कारणें-हीं उघड आणि स्पष्ट आहेत. भरपूर वेळेचा लेखक मिळणें कठीण, ही अडचण पहिली. दुसरा पोटाचा धंदा संभाळून हायसें बसण्याची वेळ ह्मणजे, लेखनसेवेचें काम किंवा वकीलीच्या परीक्षेचा नाद अथवा नौकरी मिळण्याची अवधी संपेतोंपर्यंतच्या द्विधा मनांतला व्यासंग ' एडीटरी ' काम. अशी स्थिति असतांना हातून काम कसें रेटावयाचें हें उघड दिसतेंच आहे. वेठवजा कामांत निष्णातपणा मिळण्याचा योगायोग येतो न येतो तों, मोर्चा दुसरीकडे वळावयाचा हटकून संभव. कलेक्टर, कमिशनर, गव्हरनर, कायदेकार ' मनू ', उंच्या प्रतीचे प्रोफेसर, कायदेबाज लढवय्ये, बालिष्टर, धन्वंतरीतुल्य डाक्टर, विश्वकर्मे इंजिनीयर अशीं माणसें हिंदुस्थानच्या खर्चानें तयार करावयाचीं, आणि तीं पक्क दशेला येऊं लागतात न लागतात तोंच आणि आपल्या अनुभवाचा आतां कोठें उपयोग होण्याचा संभव, अशावेळीं त्यांनीं हिंदुस्थानाला, कीं ज्याच्या द्रव्यावर ते तयार झाले, त्या भूमीला रामराम ठोकून विलायतेस जाऊन बसतात, त्याचप्रमाणें— अत्यंत अल्प प्रमाणांवर— या ' एडीटरी ' लेखकांचीही गोष्ट आहे.

*

* *

हिंदुपंचांगकार खोलींत बसून काय मोडणी शिलशिल्यानें चालत आलेली टाऊक आहे, तिच्या अवसानावर आकाशाकडे न पहातां पंचांगें वर्तवितात. त्याचप्रमाणें स्वतः प्रत्यक्ष अनुभव न घेतां पुस्तकी ज्ञानाच्या जोरावर आणि इंग्रजी पत्राच्या आधारानें ठरीव तर्हे एक दोन उराशीं बाळगून लेख खरडत सुटतात, हा एक वर्ग; दुसरा प्रो० गोळे ह्मणतात त्याप्रमाणें ' परोचा ' ह्मणणारा. अलीकडे हा पत्रकर्त्यांचा धंदा भारी सवंग झालेला आहे. तालुक्याच्या गांवांतूनमद्धां एखादुसरें वृत्तपत्र आहेच. धर्मसंबंध ब्राह्मण ' भूदेवानीं ' कवडीमोल केला, आणि त्या धर्माची थट्टा मांडून त्या-धर्माची किंमत आपल्या आचरणानें कमी करून, अशा विश्वास उडविण्याचें तत्त्वं साधण्यापलीकडे धर्मगुरु ब्राह्मणांच्या हातून कांहीं

एक होतनासें झालें आहे. तोच प्रकार या वृत्तपत्रकारांचा होतो हें मोठें दुर्भाग्य होय!

*
* *

तेव्हां सांगण्याचें तात्पर्य काय कीं, चर्चेचें एक ठिकाण जें वृत्तपत्रें तेथें भरपूर निराशा आहे. मनुष्याच्या आवश्यकतेपैकीं तीनचतुर्थांश गोष्टींची चर्चा हे पत्रकार सध्यां करीत नाहींत. करण्याची त्यांच्या अंगीं योग्यता नसते. तशी अनुकूलता लेखकांकडून नाहीं. वाचकांचें उत्साहन कमी अगर मुळींच नाहीं ह्मटलें तर चालेल. ह्मणून कंगालपणामुळें मनांतले मांडे मनांतच जिरतात. सरकारांत वजन पडत नाहीं, लोकांवर वचक नाहींसा होतो, आणि मग असल्यापेक्षां नसलेलें बरें वाटतें.

*
* *

आमचे सुशिक्षित ह्मणविणारे, इंग्रजांचे सद्गुण सोडून दुर्गुणाचें तेवढें चटकन् आणि भरपूर असें मर्कटी अनुकरण करण्यांत तरबेज आढळतात, त्याप्रमाणें नाहीं ह्मणण्यास आमच्या वृत्तपत्रकारांची स्थिति आहे खरी. एखाद्यांची खोटी निंदा, आपल्याहून भिन्नपक्षाच्या माणसाची टर, आपल्याला नको त्या किंवा आपणाहून निराळ्या मताच्या मनुष्याच्या कृतीचा उल्लेख करण्यांत औदासिन्य, आणि वस्तुविपर्यासांतला हातखंडेपणा, फुकट जाहिरातींतला सावधगिरी पुरावा करण्यांतले कसब, एक पक्ष अजी दडपून ठेवण्याची शिताफी, आणि खोटा कलकलाट माजविण्यांतला कावळेपणा इत्यादि गोष्टींत मात्र आमच्या पत्रकारांनीं खूप प्राविण्य संपादिलेलें अगदीं स्पष्ट दिसतें. आपली आपण एकसारखी 'किंमत कमी कमी करून घेत' सवंग सवदा मांडण्यांतही कमतरता नाहीं. दहा रुपये दरसालीचा ज्ञानाचा प्रकाश मराठी वाचकांस अवघा रुपयांत मिळूं लागला.

*
* *

सर्व पत्रकर्त्यांचा रोख एका विवक्षित वर्गांतल्या लोकांसाठीं—पांढरपेशा--आणि एकाच राजकीय विषयाकडे, व्यापारी नाहीं, कला-

कौशल्याचा नाहीं, शेतकऱ्यांचा नाहीं, उदीमधंद्याचा नाहीं किंवा केवळ नीतिखातर व शुद्ध धर्मासाठीं वाहवलेला वृत्तपत्रकार कां नसावा? या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण नव्हे. चर्चा हल्लीं जी वृत्तपत्रांत चालते, ती एकांग व एकवर्गी असते हें कांहीं चांगलें नाहीं.

*

* *

दुसरें चर्चेचें स्थळ खासगी मित्रांच्या भेटी व फुरसतींतल्या गप्पागोष्टी; पण तेथला खरा प्रकार पाहिला म्हणजे अंगावर शहारेच उठतात, आणि मानवी अधमतेची कमाल कशी हें कळतें. ती अधमता लोकांस दाखविण्यांत जणों चढाओढच लागली आहे कीं काय, असा भास होतो. खासगी मित्रांच्या भेटींतल्या विषयचर्चेचें खरें आणि ढोबळ नांव म्हणजे गैरहजर असणारांची निंदा आणि ती ऐकून खदखद हांसत जन्मसार्थकासारख्या आनंदवृत्तीचें स्थान हेंच होय! कौतुक मानणें आणि अभिनंदन करणें हें अशा भेटींतल्या चर्चेत महत्पाप गणिलें जातें. आपला दुष्टाचारीपणा मिरविण्याचा एकच सुलभ, सवंग मार्ग काय तो आपल्यापेक्षां वास्तविकपणें श्रेष्ठ असणाऱ्यांची एकसहा खरीखोटी नालस्ती, ही बिचाऱ्यांची दृढ समजूत पडलेली. आपण करण्यास असमर्थ किंवा नालायख तें काम दुसऱ्याच्या हातून घडलें, यांत आपला सर्वस्वी घात झाला असें समजून, त्या गृहस्थाची आणि त्याच्या कृतीची कशी तरी टर उडवावी म्हणजे पुत्रजन्मोत्सवाइतपत आनंद वाटावा, यापेक्षां मानवी अधमतेची सीमा ती आणखी कोणती राहिली? दोष काढून त्याची चर्चा माजविण्यापुरतींच काय ती यांची आपलेपणाची कळकळ, मत्सर, हेवा व तज्जन्य निंदा, चुगली यांतच या मंडळीचा आपलेपणा भरपूर मुरलेला; व्यंगाचें किंवा दोषाचें आविष्करण हीच यांची कुशाग्रबुद्धीची ग्राहकता आणि त्या दोषाचें व व्यंगाचें विस्तृत रूप दाखविण्याचें कौशल्य, हाच त्यांच्या कवित्वशक्तीचा परिपाक, आणि तो ऐकून आनंदानें टिऱ्या पिटवीत खदखद हांसणें हीच गुणग्राहकता; अशा समाजाचा धिःकार

करण्याच्या कामीं मराठी भाषेंतला शब्दकोश असमर्थ आहे, ही नाइलाजाची गोष्ट होय!

* * *

आणि असा प्रकार आमच्या समाजांत त्यांतून सुशिक्षितपणाची घमेंड मारणारांत नाहीं, असें छाती पुढें करून सांगणारा माईचा पूत कोणी असल तर तें भाग्य समजलें पाहिजे. शेरिडन नामक आंग्ल विद्वानानें The School for scandals "चुगलखोरांचा आखाडा" म्हणून एक नाटक लिहिलेलें आहे. त्याचा प्रयोग नित्यशः आमच्या मंडळींत चाललेला आहे असें म्हटलें तरी चालेल! अस्तु. अशी स्थिति आहे, आणि ती असणें केवळ अधमता मानवी स्वभावाची, आणि दुर्दैव समाजाचें, त्याला इलाज नाहीं. म्हणून चर्चेचें हें ठिकाण ही निराशेचीच जोड. तेव्हां उरतां उरलीं सभाठिकाणें. खाजगी भेटींत प्राणापेक्षां प्यार अब्रू, तिजवर हल्ले करीत खुनापेक्षां भयंकर अपराध करण्यास मंडळी शरमत नाहीं, तसा प्रकार या ठिकाणीं नसतो ही गोष्ट आनंदाची आहे; पण तेथेंही नाहीं दुसरी निराशा ठेविलेली, यांत कांहीं कमतरता नसते.

* * *

सभेंतला मुख्य विषय राजकीय म्हणून तिकडे मंडळी गुंतते ती सरकार सेवेव्यतिरिक्त असावयाची. राजकीय बाबींशिवाय एखादं दुसरी कधींमधीं कोठें सभा झाली तर, त्यांत वक्ते रावसाहेब आणि त्यांचें मग भाषण सुरस, सुश्राव्य अशा विशेषणांनीं युक्त म्हणून बातमी पत्रांतून प्रसिद्ध व्हावयाचें. राष्ट्रीयसभेचा दरमहा भव्य वक्तृत्वसमारंभ ठिकठिकाणीं होतो, त्या नगाऱ्याच्या घाईंत टिमक्यांची डाळ शिजत नाहीं. कैलासवासी नामजोशी माधवरावजींची औद्योगिक परिषद् शरपंजरीं पडली, तिला थोडें उदकप्राशन करूं देणाऱ्या प्रयत्नापूर्वी, दुही माजवीत, आपलें राजकीय घोडें पुढें दामटीत सुटण्याचें मोठें महत्वाचें कार्य अडून राहिलें होतें, तें पार पाडण्याखातर अर्ज खोलींत बसून लिहिण्याची डेक्कनसभा अवतीर्ण झाली आहे, ती ही अर्ज खरडणें संपवून सभा भरऊं लागेल. केनसाहेबांचें मद्य-

पाननिषेधक कामही थोडेंबहुत चालतें. याशिवाय प्रोफेसर गोळ्यांच्या ह्मणण्याप्रमाणें "विधवाविवाह आणि विधवाकेशवपन या दोन खुंटांतला खो खोचा डाव" हाही एक सभेचा विषय असतो. देश, आह्मीं, आमचे लोक इत्यादि शब्द भाषणांत वापरल्यानेंच, देशकैवारधारीपणाच्या मुद्रा कपाळावर धारण करणारी कैक मंडळी धाडसाच्या होडग्यांत पोंकळ शब्दब्रह्माचें वल्हें हांकीत, केव्हां शिवाजी स्मारकवर, केव्हां देशी कपडा असल्या विषयांची चर्चा करण्याला अधून मधून सभा भरवितात. याशिवाय सभा ह्मणण्यासारख्या दुसऱ्या कोणत्या नसावयाच्याच, अशी आज मितीला स्थिति आहे. हें इंग्रजांचें राज्य. यांला वास्तविक पाहतां असत्ययुग ह्मणावयास हरकत नाहीं. कारण, सर्वत्र देखावा आणि पुरावा आढळतो. खरें बोलणें आणि लिहिणें या युगांत साध्यच नव्हे. जिकडे तिकडे पुरावा चाललेला. कोणी शहाणपणाचा पुरावा करितो, कोठें लोकमताचा पुरावा, कोठें कळकळीचा पुरावा, कोठें औदार्याचा कोठें कशाचाना कशाचा, हा आपला पुरावा चाललेला असावयाचाच. सरकार पुरावा करण्यांत तत्पर आणि तरबेज, आणि प्रजाही तिकडेच सारी मदार ठेवून पुरावा प्रत्येक बाबीचा करण्यांत तरबेज हें कां असें कांहीं कळत नाहीं. मुंबईस "बद्या तापाची" सांथ उद्भवली तर, तेथली मृत्युची संख्यादेखील लोकांस सादर करण्यांत आपला पुरावा चाललेला. दुष्काळ नाहीं ह्मणून पुरावा; आगगाडीच्या अपघातानें मरण पावलेल्या लोकसंख्येचा पुरावा; मुंबईच्या दंग्यांत मेलेल्या लोकसंख्येचा पुरावा—ह्मणजे असावा प्रकार एक, दाखवावयाचा प्रकार एक हें असें कां? सभेंत लोक जमावेत शंभर नाहींत तर दीडशें दोनशें, आणि त्या सभेच्या हकीकतींत दहा आणि पंधरा हजार! सभेंतलें भाषण असावयाचें काथ्याचें चऱ्हाट नाहींतर एरंडाचें गुऱ्हाळ; पण आपलें वृत्तपत्रांत सुश्राव्य, अस्खलित, चटकदार, आवेशयुक्त असें लिहिलेलें. समाजाच्या सुधारणेसाठीं अवतरलेलेमुद्धां अशा तऱ्हेच्या पुराव्यांत बेशरमपणानें दंग झालेले पुण्याच्या सामाजिक रणकंदनाच्यावेळीं व संमतिवयप्रसंगीं आढळत! या भोगाला काय ह्मणावयाचें?

# पैशाविषयीं.

अर्थचि या कलिमाजिं जना परमार्थ असा दुसरा न दिसे ।
अर्थ मिळेल कसा मज राहिल तो जवळी मनिं हेंचि वसे ॥
अर्थ सुयोग वियोगहि केवळ दुःख अजस्रहि देत असे ।
अर्थ परासि कळेचि न हा वरि अर्थ असोनि अनर्थ असे ॥

*यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः ।
स पंडितः स श्रुतिमान् गुणज्ञः ॥
स एव वक्ता स च दर्शनीयः ।
सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते ॥

इंग्लंदांतील लोकांना मितव्ययाची योग्यता कळावी तितकी कळत नाहीं, असें सर जॉन लबाक् यांचें मत आहे. ते असें ह्मणतात कीं, आमचे लोक जीव तोडून कामधंदा करितात व पुष्कळ कमाई करितात; परंतु मितव्ययाच्या बाबतींत इतर राष्ट्रें आह्मांला मागें टाकतात. श्रीमंती किंवा गरीबी ही खर्चावर अवलंबून असते, मिळकतीवर नाहीं असें एका सुज्ञ वयोवृद्ध पुरुषाचें ह्मणणें आहे.

घटकाभर श्रीमंतीचा विचार एके बाजूस ठेविला तरी, पुढच्या तरतुदीकरितां ह्मणून दोन पैसे मागें टाकणें हें शहाणपणाचें व वाजवी आहे. गरीबी आली कीं, ममतेला पंख फुटलेच, ही कल्पना क्षुद्र असेल; परंतु व्यवहारांत तिची प्रचीति पदोपदीं येते. गरीबी आली ह्मणजे मनुष्याची अवस्था कशी दीनवाणी होते, याचें शूद्रककवीनें फार हृदयद्रावक वर्णन केलेलें आहे, तें असें :—

---

* असे जयाला धन तोचि पंडित ॥ कुलीन तो तोचि गुणी बहुश्रुत ॥
सु-पूज्य तो सुंदर तो विचक्षण ॥ धनाश्रयें राहति सर्वही गुण ॥

दारिद्र्याध्द्रियमेति, ऱ्हीपरिगत: सत्वात्परी भ्रश्यते ।
नि:सत्व: परिभूयते, परिभवान्निर्वेदमापद्यते ॥
निर्विण्ण: शुचमेति, शोकपिहितो बुद्ध्यापरित्यज्यते ।
निर्बुद्धि: क्षयमेत्यहो निधनता सर्वापदामास्पदं ॥ १ ॥
निवासश्चिन्तायाः परपरिभवो वैरमपरं ।
जुगुप्सा मित्राणां स्वजनजनविद्वेषकरणम् ॥
वनं गन्तुं बुद्धिर्भवति च कलत्रात् परिभवो ।
ह्यदिस्थ: शोकाग्निर्न च दहति सन्तापयति च ॥ २ ॥

आणखी

दारिद्र्यात् पुरुषस्य बान्धवजनो वाक्ये न सन्तिष्ठते ।
सुस्निग्धा विमुखीभवन्ति सुहृद:स्फारीभवन्त्यापद: ॥
सत्वं ऱ्हासमुपैति शीलशशिनः कान्ति: परिम्लायते ।
पापं कर्म च यत् परैरपि कृतं तत् तस्य संभाव्यते ॥ ३ ॥
संगं नैव हि कश्चिदस्य कुरुते संभाष्यते नादरात् ।
संप्राप्तो गृहमुत्सवेषु धनिनां सावज्ञमालोक्यते ॥
दूरादेव महाजनस्य विहरत्यल्पच्छदो लज्जया ।
मन्ये निर्धनता प्रकाममपरं षष्ठं महापातकम् ॥ ४ ॥

आपण उद्योगधंदा करून दोन पैसे मागें न टाकल्यानें अथवा अमुक एक छंदांत—मग तो छंद कितीही निर्विकारी किंवा सात्विक असो – पैसा खर्चून संग्रहीं न ठेविल्यानें, बायकामुलांना खाण्यापिण्याची व वस्त्रप्रावरणाची ददात आहे; किंवा त्यांच्या दुखण्याबाण्यांत त्यांना औषधोपचारांची व पथ्यापाण्याची तजवीज करितां येत नाहीं, अथवा त्यांना विश्रांति घेतां येत नाहीं किंवा त्यांना हवा पालटण्याकरितां कोठें पाठवितां येत नाहीं, या गोष्टी मनाला अत्यंत क्लेशप्रद वाटणाऱ्या आहेत. केवळ धनलोभास्तव मितव्यय करणें हें खरोखरच क्षुद्रबुद्धीचें लक्षण होय; परंतु पराधीनतेचें जूं झुगारून देण्यास व स्वातंत्र्यसुखाची चव घेतां यावी म्हणून, मितव्यय करणें यांत खरोखरच पुरुषार्थ आहे व तसें करणें यथार्थही आहे.

आपल्या जमाखर्चाचें टिप्पण नेहमीं ठेवावें व तें काळजीनें सांभाळावें. प्रत्येक पैन्‌पैचा खर्च लिहून ठेवण्यांत कांहीं मतलब आहे असें आमचें ह्मणणें नाहीं. आपल्या पैशाचा विनियोग कसा होतो व आपणास काय खर्च येतो हें ज्याचें त्यास कळलें पाहिजे, हाच कायतो आमच्या ह्मणण्याचा भाव आहे. आपली आदा किती व खर्च काय हें ज्याला माहित असतें, त्याच्या हातून सहसा उधळपट्टी ह्मणून व्हावयाची नाहीं. आपला खर्च किती आहे, याकडे डोळे-झांक झाली कीं, उधळपट्टीस सुरुवात होते. कारण, उघड्या डोळ्यांनीं विध्वंसाच्या कड्यावर सहसा कोणीही जाऊन बसत नाहीं.

कोणताही उद्योगधंदा केला तरी, आदाईपेक्षां खर्च जास्ती करितां कामा नये. एका आधुनिक कवीनें ह्मटलें आहे :—" स्वप्राप्तीहुनि खर्च तो अधिक ना व्हावा स्वसौख्यार्थ ही ". ' आंथरूण पाहून पाय पसरावे ' अशी जी आपल्यांत एक ह्मण आहे, तिचा तरी अर्थ हाच. " थेंबें थेंबें तळें, कणें कण जसें कोठार सारें भरे ॥ कौडि कौडिस जोडितां गृह धना ठेवावया ना पुरे " ॥ हें लक्षांत ठेऊन दरवर्षी कांहीं ना कांहीं तरी—मग तें कितीही अल्प असो—मागें टाकण्याचा क्रम ठेवावा; व कांहींही झालें तरी लोकांचें देणें ह्मणून करूं नये. ' ऋण काढून सण करण्याचा ' प्रचात आपल्या लोकांत फार आहे; परंतु तो सर्वथैव त्याज्य होय हें नव्यानें सांगणें नको. या संबंधांत सुप्रसिद्ध इंग्लिश कादंबरीकार डिकिन्स यांचें असें ह्मणणें आहे कीं— हें ह्मणणें त्यानें मिकॉबर नांवाच्या एका उधळखोर गृहस्थाकडून वदविलें आहे, तरी देखील त्यांतील समर्पकपणा व शहाणपणा अणुरेणु मात्र कमी होत नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे.—" जर एखाद्या मनुष्याची सालीना वीस पौंड मिळकत असून, एकोणीस पौंड, एकोणीस शिलिंग सहा पेन्स खर्च आहे तर त्याचा परिणाम सुखावहच होणार. परंतु सालिना वीस पौंडांची प्राप्ति असून खर्च मात्र वीस पौंड शून्य शिलिंग, सहा पेन्स झाला, तर अखेरीस विपत्ति दत्त ह्मणून उभी हें खास." आणि असेंही करितां यांत फरक काय तो एक शिलिंगाचा आहे.

‘ कर्जबाजारीपणा ही एका प्रकारची गुलामगिरी आहे ’ असें ह्मटलें असतां, कडक शब्दांचा उपयोग केला अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. एका कवीनें ह्मटलें आहे :—

ओवी.

॥ काढूं जातां ऋण । निव्वे दुःखाची खाण ॥
॥ अनुभवी यांची खूण । अनुभवी ते जाणती ॥ १ ॥

अथवा

जातां ऋण मागाया जात असें दुःख सागरा वाटे ॥
ठेउनि चित्तीं ऐसें सुज्ञ न जाती ऋणाचिया वाटे ॥

‘ ऋणकर्ता पिता शत्रुः ’ असें संस्कृतांत एक सुभाषित आहे. संसारांत अप्रिय अशा अनेक गोष्टी घडतात. होरेस–ग्रीले या नांवाचा एक महानुभवी गृहस्थ होऊन गेला. त्याची पुढील उक्ति फारच मार्मिक व यथातथ्य आहे :—‘ उपासमार, थंडीची हुडहुड, वस्त्रप्रावरणाच्या चिंधड्या, ढोरमेहनत, अपमान, वहीम, निष्कारण अपवाद या सर्व गोष्टी अप्रिय व खेदजनक आहेत खऱ्या ; पण कर्जबाम हें या सर्वांहून अत्यंत अप्रिय व खेदकारक होय. कोणाचा कर्जदार ह्मणून कदापि होऊं नये. जर एखाद्यापाशीं दोनच आणे आहेत, व दिवसभर मेहनत करूनही जास्त मिळण्याचा संभव नाहीं, तर एकभुक्त रहावें, रात्रीं नुसतें पाणी पिऊन निजावें ; पण कोणाची दुगाणी कर्ज ह्मणून वागवूं नये. ’

कॉबडेन याचें असें ह्मणणें आहे कीं, ‘ दुनियेंत नेहमीं दोन प्रकारचे लोक असतात. बेताबातानें खर्च करून दोन पैसे शिल्लक ठेवणारे व असलेल्या ठेवीचा फडशा उडविणारे—मितव्ययी व उधळे. मोठमोठ्या हवेल्या व मंदिरें, गिरण्या व कारखाने, पूल व तळीं आणि इतर कामधंदे व कळाकुसरीचीं कामें, कीं ज्यायोगानें मनुष्यास माणुसकी आलेली आहे, तीं सर्व शिल्लक ठेवणाऱ्या माणसांनीं ह्मणजे मितव्ययी लोकांनीं केलेलीं आहेत, व आपल्या पदरीं असलेल्याचें वाटोळें

करून टाकणारे उधळे लोक त्यांचे दास बनलेले आहेत. जगांत अशीच रहाटी चालावी असें परमेश्वराचें व सृष्टीचें सूत्र दिसतें, व एखाद्या निरुद्योगी, अविचारी आणि अविवेकी जातींतील लोकांना, तुमची अभिवृद्धि व उन्नति होईल असें आश्वासन देणें, ह्मणजे आपणाकडे वंचकपणाचा दोष लावून घेण्यासारखें आहे.'

प्राचीनकाळीं ग्रीस देशांत, एफीसस येथें आरटेमिस नांवाच्या देवाचें एक देवालय होतें. त्यासंबंधीं अशी आख्यायिका आहे कीं, एखादा कर्जदार त्या देवालयांत शिरून देवाच्या मागें लपला ह्मणजे तो ऋणमुक्त होई. या गोष्टीस अनुलक्षून प्ल्युटार्क नांवाच्या ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, 'ऋणकरी आरटेमिसच्या मंदिरांत घुसला ह्मणजे त्याला थारा मिळून सावकाराच्या तडाक्यांतून तो मोकळा होतो हें खरें; परंतु विचारशील लोकांना मितव्ययाचें मंदिर जगांत चहूंकडे सदासर्वकाळ खुलें असतें व त्यांत त्यांना प्रतिष्ठेनें व सुखानें आराम घेण्याकरितां मुबलक जागा मिळते.' यास्तव व्यापारधंदा चालविण्याकरितां जें देणेंघेणें करावें लागतें, तें शिवायकरून, बाकी कोणाचें ऋण काढूं नये व कोणास ऋण देऊंही नये. कारण, कर्ज दिल्यानें पैशापरी पैसा जातो व घेणाराला तर त्याबद्दल उपकार वाटत नाहीं. शिवाय कर्ज देणारानें जणों काय आपलें अहितच केलें आहे, असें जें कर्जदारांना वाटतें तें निराळेंच. यास्तव आपली अवकात पाहून, कोणास जें कांहीं देणें असेल तें सढळ हातानें द्यावें; पण तें आपणांस परत मिळेल याची मात्र आशा ठेऊं नये.

प्रथमारंभीं मिळकतीचें मान स्वल्प असलें तरी नाउमेद होतां कामा नये; कारण गल्ली लांबच लांब असली ह्मणजे तिला मध्यें वळण नसतें. उलटपक्षीं पैसा मुबलक मिळूं लागला असतां, तो सर्व एकदम खर्च करून टाकूं नये. परंतु एका कवीनें ह्मटल्याप्रमाणें:—

"प्राप्तीचा चवथा निदान अथवा तो अंश पै साहवा।
राखावा बहु कामकाज पडल्या हातांत पैसा हवा॥"

कोणाचाही काय, दिवस सारखा रहात नाहीं व वाईट गल्ल्यांप्रमाणें

चांगल्या गल्लयांनाही वळण असतेंच; शिवाय दिवसानुदिवस खर्चाच्या बाबी वाढत जातात व नवे नवे खर्च उभे राहतात, या गोष्टी मनांत बाळगून संग्रहीं शिलकेची भर असावी. व्यापारधंद्यांत प्रथमारंभींच दैव विलक्षण प्रकारें अनुकूल होऊन पुष्कळसा पैसा मिळाल्यानें, पुढें किती तरी लोकांची दुर्दशा उडालेली आहे.

पैसा मिळविण्याविषयीं चिंतातुर होण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण श्रीमंती जरी थोड्यांच्याच नशीबीं असते, तरी उद्योगानें व बेताबाताच्या खर्चानें प्रत्येकाला आपली उपजीविका मिळवितां येते. फलाण्याची धनदौलत नेकीची नाहीं असें आपण पुष्कळवेळां ऐकतों; परंतु वास्तविकपणें पाहूं गेलें असतां खरी गोष्ट ही आहे कीं, दरिद्रपणादेखील नेकीनें येत नाहीं. 'स तु भवति दरिद्रोः यस्य तृष्णा विशाला' या उक्तीप्रमाणें ज्याची संपत्ति थोडी तो दरिद्री नव्हे, तर ज्याला हांव फार तो दरिद्री असें समजलें पाहिजे.

कोण दरिद्री? ज्याच्या हृदयीं तृष्णा सदा विशाल वसे ।
श्रीमान् कोण ह्मणावा? जो नर संतुष्ट चित्त नित्य असे ॥

या आर्येचा तरी हाच मतलब आहे.

सर जेम्स पॅगेट यांनीं आपल्या विद्यार्थीजनांच्या आयुष्यांतील वर्तनक्रम काळजीपूर्वक अवलोकन करून, एका मनोहर भाषणांत त्यांच्याविषयीं आंकडे घेऊन माहिती दिलेली आहे, ती अशी :—

एकंदर हजार विद्यार्थ्यांपैकीं दोनशांनीं, अकालीं मृत्यूमुळें किंवा धनदौलत विपुल मिळाल्यानें, आपला रोजगार धंदा सोडून दिला. बाकी राहिलेल्या आठशांपैकीं सहाशें बऱ्याचशा नांवारूपास चढले व यांतूनही कित्येकांनीं तर चांगलाच लौकिक संपादिला. एकंदर समुदायांपैकीं ५६ जण मात्र अगदींच घसरले, त्यांत देखील १५ जणांची कोणतीच परीक्षा उतरली नाहीं व दहाजण दुराचारानें आणि व्यसनाधीनतेनें मोडावले; आणि एकंदर हजारांपैकीं फक्त २५ जण मात्र स्वतःचा कांहींएक दोष नसतां केवळ दुर्दैवाच्या फेऱ्यामुळें

बुडाले. वैद्यकीच्या धंद्याप्रमाणें, इतर व्यवसायांत देखील जर आपण कोणाच्या उपयोगीं पडलों, तर लोक आपला उपयोग करून घेणार हें पक्कें समजावें.

खरोखर पाहूं गेलें असतां अन्नवस्त्राबद्दल कोणासही चिंता वाहण्याचें प्रयोजन नाहीं. कारण धरित्रीची थोडीशी आराधना केली कीं, ती आपणास पुरून उरेल इतकी सामुग्री देते; परंतु ऐषआरामापुढें मात्र कांहीं पुरें पडत नाहीं. ' एक व्यसन पोसण्याला जो खर्च लागतो, त्यांत दोन मुलांचें पालनपोषण करण्याला पुरे इतकें मोल निघतें. ' हें फ्रँक्लिनचें ह्मणणें अगदीं यथार्थ आहे.

' व्याज जबर ह्मणजे जोखीम फार ' असें जें ड्यूक ऑफ वेलिंगटननें ह्मटलें आहे, तें फार शहाणपणाचें असून सदैव लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

जसें एकाच टोपल्यांत पुष्कळशीं अंजिरें ठेविलीं असतां खराब होण्याची भीति असते, त्याचप्रमाणें आपली सर्व धनदौलत एकेच ठिकाणीं ठेविली असतां दगा होण्याचा संभव आहे. कारण आपणाला कितीही शहाणपणाची सल्लामसलत मिळालेली असली, किंवा एखाद्या विविक्षित गोष्टीचा कितीही खोल व दूरवर विचार केलेला असला, तरी देखील कधीं कधीं आपला आटंका उरफाटा होतो. अति शहाण्या व्यापाऱ्यांच्या व पेढीवाल्यांच्यासुद्धां चुका होतात. साधारणतः चूक होऊं नये, एवढीच कायती उद्योगधंद्यांतील बहुतेक समंजस लोकांची अटकळ असते. दोननीदोन चार, असें आपण लहानपणीं शिकतों; परंतु दुसऱ्या एका दृष्टीनें ते बावीसही होऊं शकतात. दोहोंत दोन मिळविले कीं बेरीज चार आलीच पाहिजे, हें गणितशास्त्राच्या दृष्टीनें सर्वशः खरें आहे; पण व्यवहारांत तें भ्रांतिमूलक असून या दृष्टांताची योजना भलत्याच जागीं केल्यानें, पुष्कळ होतकरू लोकांचा नांवारूपास चढण्याचा मनसुबा फसलेला आहे.

'तुका ह्मणे उगा राहे ॥ जें जें होईल तें तें पाहे' या उक्तीप्रमाणें संसारांत भलें बुरें झालें असतां, घाबरून गोंधळून जातां कामा नये. कांहींही झालें तरी मनाची शांतता कायम ठेवावी.

एका अर्थी मनुष्यमात्रास कामधंदा लागलाच आहे. मग तो करण्याची त्याची इच्छा असो वा नसो. घरदाराची व्यवस्था लावणें, संसार चालविणें, खर्चवेंचाबद्दल बंदोबस्त ठेवणें इत्यादि प्रकारचीं आवश्यक कामें आपल्याला करावीं लागतात; व केव्हां केव्हां मोठमोठ्या गोष्टी इतकेंच लहानसान बाबतींतही त्रास व आयास पडतात.

उद्योगधंद्यांत सिद्धि मिळणें हें बुद्धिमत्तेपेक्षां अक्कलहुषारी, काळजी व अवधान यांवर जास्त अवलंबून असतें. 'तूं आपलें दुकान संभाळ ह्मणजे दुकान तुला संभाळील' अशी एक जुनी ह्मण आहे, व याच भावार्थाची झेनॉफन नामक ग्रीक इतिहासकारानें एक आख्यायिका सांगितलेली आहे; ती अशी:—"इराणच्या बादशहाला एकदां अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, आपला उमदा घोडा दोन दिवसांत अंगानें भरून पुष्ट झाला पाहिजे. तेव्हां त्यानें आपल्या पदरीं असलेल्या अश्वहृदयवत्त्यांना असें विचारिलें कीं, याला कोणता मसाला चारला असतां, हा तावडतोब पुष्ट व जोमदार होईल. तेवेळीं एका चतुर पुरुषानें चटकन् उत्तर दिलें कीं, 'हुजूरची नजर.'

कामधंद्याच्या रीतीभाति व शिस्त अभ्यासानें अंगीं आणणें फार महत्वाचें आहे; कारण त्यावांचून व्यवहारांत कार्यसिद्धि ह्मणून मिळत नाहीं. एका विद्वान् सुप्रसिद्ध पुरुषाचें निश्चयात्मक असें मत आहे कीं, कित्येक कार्यक्षम व सुलक्षण पुरुषांची संसारयात्रा निष्फळ कां झाली, या गोष्टीचा विचार करितां असें कळून आलें कीं, ही धूळधाण होण्याचें मुख्य कारण ह्मणजे ते लोक दीर्घसूत्री, वेळेवर कामकाज न करणारे, इतरांबरोबर मनोभावानें न खपणारे, लहानसान गोष्टींत दुराग्रह घेऊन बसणारे व वास्तविक ज्यांना कामाकाजाची रीतभात व शिस्त नाहीं अशा प्रकारचे होते.

मोठमोठ्या गोष्टीप्रमाणें लहानसान बाबतींत देखील बातेवेत व व्यवस्था ठेवणें फार महत्वाचें आहे. योग्यस्थळीं योग्य वस्तूचा विनियोग करणें हें एक कनकसूत्र आहे, व आपलें काम आटोपल्या-बरोबर जेथली वस्तु तेथें ठेविली ह्मणजे, पुनः तिची गरज पडली असतां ती हुडकून काढण्याचे किती तरी प्रयास वांचतात.

भुसाऱ्यानें गहूं, ज्वारी, तांदूळ व हरभरा वगैरे विक्रीकरितां लागणारे जिन्नस आपल्या कोठारघरांत वेगळे वेगळे थैल्यांत न ठेवितां, एकवटून टाकावे व गिऱ्हाइक येऊन उभें राहिलें ह्मणजे तें मागेल तो जिन्नस निवडून काढून द्यावा, यासारखी अव्यवस्था दिसते असें झेनॉफन नामक इतिहासकाराचें ह्मणणें आहे.

जहाजाचा दृष्टांत देऊन, अव्यवस्थितपणानें वागलें असतां हानि कसकशी उद्भवते, हें त्यानें स्पष्ट करून दाखविलें आहे. तो ह्मणतो, देवतांचा क्षोभ होऊन समुद्रावर एकदां कां वादळ सुरू झालें, ह्मणजे बचावाकरितां काय लागेल तें धुंडाळण्यास अवकाश ह्मणून नसतो, व जें कांहीं उपयोग करण्याला अवघड असेल, तें सुघड करण्यालाही वेळ ह्मणून नसतो. कारण, देवता गफलती लोकांना भीति दाखवितात व शासन करितात, अनपराधी लोकांचा, ज्यांनीं चूक केली नाहीं अशांचा, त्यांनीं संहार केला नाहीं, तर त्यांनीं गय केली असें समजून संतोष मानिला पाहिजे, व जे कोणी प्रत्येक गोष्टीला डोळ्यांत तेल घालून जपतात, अशा लोकांचा योगक्षेम केल्याबद्दल देवांनीं त्यांचा उपकार मानिला पाहिजे. येवढ्याकरितां हरएक वस्तु यथायोग्य स्थळीं ठेवीत गेलें पाहिजे.

पाश्चिमात्य तत्ववेत्त्यांनीं, सर्वांनीं नाहीं तरी पुष्कळांनीं, व्यापार उदीम करणाऱ्या लोकांना नांवें ठेविलीं आहेत; किंबहुना व्यापार व देणें घेणें ह्मणजे नीच व हलकट असें ठरवून त्यांनीं ते दोषार्ह मानिले आहेत. उदाहरणार्थ प्लेटोनें आपले रिपब्लिक नांवाचे ग्रंथांत व्यापारी लोकांना आपल्या जान-पद राज्यांत निवासस्थान ह्मणून दिलें नाहीं. त्याच्या मतें असला नीच धंदा, वाटल्यास परकीय देशांतील

लोकांनीं करावा. ‘ उत्तम शेती, मध्यम व्यापार, व कनिष्ठ नोकरी ’ अशी आपणांत एक जुनी म्हण आहे. आतां स्वतःच्या व मुलाबाळांच्या उदरनिर्वाहाकरितां व जोपासनेसाठीं व्यापार व देण्याघेण्याचा रोजगार किती तरी लोकांना अपरिहार्य व अवश्यमेव झालेला आहे, आणि या धंद्यांत पडणाऱ्या लोकांच्या स्वभावावर व वर्तनावर त्यांचे परिणाम विघातक होऊं लागले व त्यांच्यामुळें मानसिक उन्नतीलाही बाधा येऊं लागली, तर ती गोष्ट फार उद्वेगकारक समजली पाहिजे; परंतु सुदैवेंकरून वस्तुस्थिति अशी नाहीं, अर्थात् अशा लोकांना फुरसतीचाच काय तो वेळ इतर व्यवसायांना देतां येतो व असें असूनही शास्त्र आणि वाङ्मय या विषयांत किती तरी व्यापार उदीम करणारे लोक इंग्लंडांत नांवालौकिकास चढलेले आहेत. त्यांपैकीं थोड्यांचा येथें उल्लेख करूं. प्रसिद्ध ज्योतिषी स्मिथ हा शिल्पकार होता. इतिहासकार ग्रोट हा व्याजबट्ट्याचा धंदा करीत असे. लंडन येथील प्राचीनकाळचे वस्तूंचा शोध करणाऱ्या परिषदेचा अध्यक्ष व रॉयल सोसायटीचा खजीनदार सर जेम्स इव्हान्स हा कागदकुट्ट्याचा धंदा करी. प्रेस्टविच् हा प्रथमतः लहानसा दुकानदार होता; पण पुढें तोच आक्सफर्ड येथें भूस्तरणशास्त्राचा अध्यापक बनला. रॉजर्स व ग्रेड हे देखील व्याजबट्टा करूनच पोट भरीत; तथापि ते कविवर्गांत येऊन बसले आहेत. सर जॉन् लबाक यांचा बाप उत्तम गणिति व कित्येक वर्षें रॉयल सोसायटीचा खजीनदार व उपाध्यक्ष होता; तरी पण तो व्याजबट्ट्याचाच धंदा करीत असे. आपल्या देशांत देखील तराजू घेऊन गूळखोबरें विकणारा तुका नांवाचा वाणी तुकाराम महाराज झालेले आहेत. मडकें व बोळकें करणारा कुंभार व गळ्यांत धोकटी घालून फिरणारा हजाम यांची गोरा कुंभार व सेना न्हावी या नांवांनीं साधुसंतांत गणना केलेली आहे. चोखामेळा व नरसी मेहता हे अंत्यज असतांही द्विजवरांच्या वंदनास पात्र झाले. कबीर, विणकऱ्याचा धंदा करीत असतां हिंदू व मुसलमान त्याच्या पदरजीं लोळूं लागले; आणि यजमानाच्या घरीं खतावणीवर घातलेला मोरोबा कारकून कविराज मोरोपंत बनले.

'स्वस्त बाजारांत खरेदी करून महाग बाजारांत विक्री करावी' या अर्थशास्त्रांतील तत्वास कार्लाइल यानें मोठाच विरोध केलेला आहे. त्याचा बुद्धिवाद असा आहे कीं – (असें कसें करितां येईल हें मात्र सांगतां येत नाहीं.)—'कापसाच्या कपड्यांची व इतर जिनसांची एक अगदीं कमींत कमी किंमत ठरवून टाकावी.' मग आपणास ह्मणतां येईल कीं, "तूर्त कपड्यांची किंमत जास्त कमी करण्याची गरज नाहीं."—आणि ह्मणून आपण ते परराज्यांतील लोकांपेक्षां कमी भावानें विकूं नये. 'बंधुजनहो, इतर राष्ट्रांपेक्षां कमी भावानें विकण्याची वहिवाट आपण बंद करूं; आपण त्यांच्याच भावानें विकून संतोष मानूं' ही गोष्ट व्यवहारदृष्ट्या अघटनीय आहे; इतकेंच नाहीं, तर तत्वदृष्टीनें देखील दोषमय आहे. कारण जर आपण कपडा कमी विकला, तर आपणास धान्यही कमींच घ्यावें लागेल. भाव कमी असला ह्मणजे विक्री जास्त होते, हें कार्लाइल कबूल करितो; यावरून असें होईल कीं, किती तरी लोकांना कपड्यांची जरूरी लागेल; परंतु ते त्यांना कार्लाइलच्या तत्वानुरूप ठरलेल्या भावानें विकत घेण्याची अवकात राहणार नाहीं, आणि आपणाला कमी भावानें विकतां येत असूनहीं त्यानें प्रतिपादिलेल्या तत्वाप्रमाणें तसें करण्याची मुभा नाहीं. असें झालें ह्मणजे आपण तितक्या मानानें स्वदेशबंधूंना अन्नास मुकवितों, व परराष्ट्रांतील लोकांचें वस्त्रहरण करितों असें होणार नाहीं काय? स्वतःस उत्पन्न करितां येणारा जिन्नस स्वस्त भावानें विकून त्याचे मोबदल्यांत आपणांस येत नसलेला जिन्नस विकत घेतां यावा, हाच कायतो व्यापाराचा मुख्य पाया. स्वस्त बाजारांत खरेदी करून, महाग बाजारांत विक्री करणें हें व्यापाराचें अपरिहार्य व अवश्यमेव असें सूत्र आहे; इतकेंच नाहीं, तर तें सर्वांस हितावहही आहे. कारण (असें केल्यानें) ज्यांना आपण उत्पन्न केलेला जिन्नस विक्री करण्याची अत्यंत जरूरी असते, अशांपासून आपण विकत घेतों, व ज्यांना आपलेजवळ असलेल्या जिनसांची अतिशय गरज लागते, त्यांनाच आपण ते विकतों. याहून भिन्न परिपाठ घालणें ह्मणजे

आपल्यांत ह्मण आहे त्याप्रमाणें 'काशीस भागीरथी नेण्याइतकेंच निरर्थक आहे.'

इतिहासाकडे पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, किती तरी संतोषी व सात्विक वृत्तीच्या पुरुषांनीं आपले दिवस अकिंचनावस्थेंतच काढिलेले आहेत. प्रसिद्ध आंग्लकवि वर्ड्स्वर्थ व त्याची बहीण हीं बरींच वर्षें दरमहा ९० रुपयांवर गुजराण करून राहत होतीं, व त्यांनीं जें कांहीं सुखाचे ह्मणून दिवस पाहिले, त्यांतच या काळाची गणना करितां येईल असें मला वाटतें. आपल्या देशांत रामदास, तुकाराम, मुक्तेश्वर इत्यादि जे महापुरुष होऊन गेले, ते अकिंचन होते; इतकेंच नाहीं, तर निरिच्छही पण होते.

श्रीमंत होणें एखाद्याच्या कपाळीं नसल्यास सहवासानें व स्नेहभावानें एखादें साधारण स्थळ, एखादी लहानशी.झोंपडी, किंवा एखादा गोडसा चेहरा यांतच त्याला त्रैलोक्यांतील राज्यसुख वाटतें.

मुसलमानी धर्माचा संस्थापक महमद पैगंबर याची अशी उक्ति आहे कीं, 'मेंढऱ्याशिवाय इतर कोणीही परमेश्वराच्या अनुग्रहास पात्र होऊन पैगंबराची दीक्षा मिळविण्यास लायख ठरला नाहीं.' यांत कांहीं अतिशयोक्ति असेल असें जरी मानिलें, तरी आजवर होऊन गेलेल्या महापुरुषांत अकिंचनांचा भरणा फार मोठा आहे, याचें एकेपरी आश्चर्यच वाटतें.

'दाम करी काम' या ह्मणीस नसतीच थोरवी देऊन पैशानें सर्व कांहीं लाभतें, असा कित्येकांचा भ्रांतिमूलक समज झालेला आहे.

धनदौलत जवळ असली ह्मणजे खाण्यापिण्याचें सुख तरी अंगीं लागतें काय?

याविषयीं सर रिचर्ड टेंपल यानें असें ह्मटलें आहे कीं, 'लक्षापतींना निरोगी रहावें असें वाटत असल्यास, त्यांनीं साधारण मनुष्याप्रमाणेंच वागलें पाहिजे.' सकाळचे जेवणाला वरण, भात, भाजी, लोणचें, कढी किंवा आमटी, चपाति आणि थोडेंसें तूप यांहून चांगलें असें दुसरें तें काय बरें असणार? दुपारचे वेळेस दशमी, भाजी, चटणी व

थोडासा गुळंबा असला ह्मणजे मधल्या वेळचा फराळ मजेदार झाला असें ह्मणण्यास काय बरें हरकत आहे? साधेंच पण स्वच्छ आणि चांगलें तयार केलेलें जेवण असून भूक कडकडीत लागली असली ह्मणजे जो संतोष होतो, तो श्रीमंताच्या घरच्या मेजवानीनेंही होणार नाहीं. त्या त्या मोसमांत उत्पन्न होणाऱ्या पौष्टिक व खाण्यास उत्तम अशा जिनसांना साधारणपणें पाहिलें असतां फार खर्च लागत नाहीं, व मोसम नसला ह्मणजे त्यांना चवही पण नसते.

सधनांना पुस्तक वाचनाचें तरी सुख मिळतें काय? या गोष्टीचा विचार करितां असें कळतें कीं, सांप्रतकाळीं पुस्तकें इतकीं स्वस्त झालीं आहेत कीं, स्वतःला वाचण्यास लागतील तितकीं तीं विकत घेण्यास फारसा खर्च लागत नाहीं. वाचनास उत्तम पुस्तकें ह्मटलीं ह्मणजे इंग्रजींत बायबल, व मिल्टन्, शेक्सपिअर इत्यादिकांचे ग्रंथ होत. मराठींत दासबोध, मनोबोध, तुकाराम, वामन, मोरोपंत, मुक्तेश्वर व रघुनाथपंडित इत्यादिकांचीं काव्यें आणि संस्कृतांत भगवद्गीता, उपनिषदें, व कालिदास आणि भवभूति इत्यादिकांचीं काव्यें व नाटकें हीं होत. आणि आजकाल हीं पुस्तकें सर्वांस घेतां येतील इतकीं सुलभ झालेलीं आहेत.

धनाढ्यांना आरोग्य, बुद्धि, वैभव, मित्रलाभ, सौंदर्य किंवा गृहसुख हें, मोल देऊन तरी विकत मिळण्याजोगें आहे काय? विशेषेंकरून असें पहाः—

## साक्या.

वाटे वित्तापासूनि लाधे सौख्य असें जरि तूंते ।
पहा सभोंती वित्तेशांची काय दुर्दशा होते ॥ १ ॥
पाटावरूनी ताटावरते बसती अनेक दाते ।
घांस बळानें मुखीं घालिती चव नच पारि त्या वाटे ॥ २ ॥
पर्यंकावरी मऊ रुझामे टाकुनि शय्या केली ।
निशा लोटली पारि नच त्यांना झोंप कशी ती आली ॥ ३ ॥
काय तमाशा कोण मौजही नकळे मजला कांहीं ।
अकिंचनाची स्थिति याहुनी किती तरी बरवी पाही ॥ ४ ॥

नाच रंग ते करिती त्यांचा हेवा मजला नाहीं ।
दु:ख लपविण्या विलासपाणी दाविती अन्य न कांहीं ॥ ९ ॥

प्रख्यात तत्ववेत्ता लॉर्ड बेकन यानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, ' मनुष्याला वैभव आलें ह्मणजे तो स्वत:लासुद्धां विसरतो व कारभाराच्या विवंचनेंत इतका गढून जातो कीं, त्याला आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्यतेकडेदेखील लक्ष देण्यास फुरसत सांपडत नाहीं. '

शृंखला ह्मटल्या ह्मणजे त्या दु:खप्रद वाटल्याच पाहिजेत, मग त्या सोन्याच्या कां असेनात. मातबराचें घर ह्मणजे चिंतेचें माहेर असें जे ह्मणतात, त्यांत तिलमात्र शंका नाहीं. निर्धनतेच्या वेदनेसारख्याच दामाजीबोवाच्याही पण वेदना असतात. आणि आजूबाजूनें पाहिलें असतां असें दिसून येतें कीं, धनवान ह्मणून ह्मणविणारीं माणसें धनाचे धनी नसून खरोखर दासच बनलेले आहेत. ' पुत्रादपि धनभाजां भीतिः ' अशी श्री शंकराचार्यांची उक्ति आहे. बिशपवुइलसन यांचेंही ह्मणणें असेंच आहे कीं, ' संपत्तीपासून अनेक प्रसंगीं चिंता उद्भवते; इतकेंच नाहीं, तर तिच्या जबरदस्त यातनाही सहन कराव्या लागतात. '

पैशाच्या पायीं, या जगांत किती तरी लोकांची राखरांगोळी होऊन गेलेली आहे. एकंदरींत पाहिलें असतां असें दिसून येतें कीं, गरीबांपेक्षां श्रीमंतांनाच पैशाची हांव फार. पैसा हा विवेकी पुरुषांना मात्र सुखदायक होतो हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. ज्याला पैशाची हांव फार, तो जन्माचाच दरिद्री ह्मणून समजावें. ताजमहालांत राहून वाखाणण्याजोगें दुसरें स्थळ दृष्टिपथीं न येण्यापेक्षां भिकार घरांत रहावें, व ताजमहालासारखी भव्य व मनोरम इमारत डोळ्यांना चकित करून थक्क करण्यास राखून ठेवावी, हें जास्त सुखप्रद आहे असें कोण बरें ह्मणणार नाहीं!

संपत्तीचा उपभोग घ्यावा असें वाटत असल्यास केवळ पैशालाच तनुमन अर्पण करितां कामा नये. याविषयीं सादी नांवाच्या एका मुसलमान कवीनें असें ह्मटलें आहे:—

आर्या.

राशी आह्मांजवळी वित्त धनांच्या अनेक जरि नाहीं ।
परि मुक्तता असे ती; व्याप तशी काळजी नुर कांहीं ॥ १ ॥
न ह्मणे कोणी आह्मां प्रभु ऐसें; परि ह्मणे न दास असें ।
गत काळाचा नाहीं शोक, उद्याचीहि काळजी न असे ॥ २ ॥
यातायातीपासुनि मुक्त असें वर्तंतो जगीं धन्य ।
शांत असो शांतिप्रियां, आह्मांऐसा सुखी नसे अन्य ॥ ३ ॥

"धनदौलत विपुल असल्यामुळें ज्याला इच्छा ह्मणून उरली नाहीं पण भीति मात्र फार आहे, अशा पुरुषाचें जिणें दुःखापन्न असलें पाहिजे." असें लॉर्ड बेकन याचें ह्मणणें आहे. आंग्लकवि–कुल–गुरु शेक्सपिअर यानें एके जागीं असें ह्मटलें आहे:—

अभंग.

संपत्तीचा वाहे । जयापाशीं पूर ॥
आहे खरोखर । दरिद्री तो ॥
भार वाही आहे । जैसा तो खेचर ॥
तैसा हा पामर । वाटे मातें ॥
संपत्तीचें ओझें । घेउनिया डोई ॥
तांतडीनें जाई । थोडे फार ॥
कृतांताचे दूत । येती झडकरी ॥
मुक्तभार करी । तया लागीं ॥

असें आहे, तर ग्रेनामक इंग्लिश कवीनें ह्मटल्याप्रमाणें:—

साक्या.

भविष्यकाळीं कामा यावें ह्मणवुनि वित्त धनातें ।
संचय करण्या चिंता करिशी नाशी जीव धनातें ॥ १ ॥
व्यर्थ गमे तें, कारण व्याधि जर्जर करितां तनुतें ।
दुःखित चित्ता प्रसन्न केलें न घडे कदा असें तें ॥ २ ॥
किंवा त्यानें स्वास्थ्य सुखातें क्षणभरीं आणुनि दिधलें ।
विधिनें वित्ताच्या हें भाळीं गमतें नच कीं लिहिलें ॥ ३ ॥
किंवा येतां निधन काल तो घडिभर दूर तयाला ।

सारायातें समर्थ आहे किंवा सुखवायाला ॥ ४ ॥

'निर्धन मनुष्याला किती तरी जिनसा हव्या असतात; परंतु लोभ्याला सर्वच कांहीं हवें असतें' असें सेनेका नामक एका ग्रीक तत्ववेत्त्याचें ह्मणणें किती तरी यथार्थ आहे.

ग्रीस देशांत झेनॉफन नांवाचा प्रसिद्ध इतिहासकार व तत्ववेत्ता होऊन गेला. त्यानें आपल्या एका ग्रंथांत चारमायडीस नांवाच्या पुरुषाकडून असें प्रतिपादन करविलें आहे कीं, श्रीमंतीपेक्षां गरीबी किती तरी बरी आहे. त्यानें लढविलेलें तर्कशास्त्र असें आहे कीं,— 'धोक्यांत असण्यापेक्षां बिनधोक असणें किती तरी बरें आहे. दास्यत्वापेक्षां स्वातंत्र्य किती तरी चांगलें आहे; आपल्याविषयीं देशबांधवांना आशंका येण्यापेक्षां भरंवसा वाटणें किती तरी जास्त श्रेयस्कर आहे. या गोष्टी सर्वतोपरी मान्य आहेत; परंतु याच नगरींत जेव्हां मी धनाढ्य होऊन बसलों होतों, तेव्हां मला किती तरी भीति वाटत होती! नजाणो, कदाचित् चोरटे लोक येऊन, माझे घरावर दरोडा घालतील, माझी धनदौलत लुटून नेतील, व मला मारहाण करून दुखापत करतील! पण ते दिवस गेले, हल्लींचा काळ कांहीं निराळाच आला आहे. आतां मी कोठेंही निजलों तरी छान गाढ झोंप लागते, गांवांतील पंचाइती करायाला मला कोणी बोलावीत नाहीं. लक्ष्मीबाईची फारशी कृपादृष्टि नसल्यानें सरकारास माझा वहीम येत नाहीं, व स्वेच्छाचारानें वाटेल तेव्हां मला आतां शहरांतून जातां येतें व परत येतांही येतें. श्रीमंत असतां साक्रेटीस व इतर हलकट तत्ववेत्त्यांची मी संगत धरी, ह्मणून लोक माझी निंदा करीत; परंतु आतां लोकापवादास न भितां मला आपले संगतीसोबती निवडतां येतात. कारण, गरीबी आल्यापासून मजकडे कोणी फारसें लक्ष देत नाहीं. मजजवळ धनधान्याची समृद्धि होती, तेव्हां मी सदांसर्वकाळ दुर्मुखलेला असे. कारण, नेहमीं पदरास खार लागत होता. आतां आकाबाईची दया झाल्यामुळें खार लागायाला पदरच राहिला नाहीं व कांहीं तरी नवीन प्राप्ति होईल अशी आशा व उमेद आल्यानें आतां किती तरी सुख व समाधान वाटतें.'

चारमायडीसच्या या संभाषणांत सत्यांश पुष्कळ आहे, तरी तें सर्वांशीं सत्य आहे असें ह्मणतां येणार नाहीं. शिवाय हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, हें संभाषण करतेवेळीं पोटांत सुग्रास गेल्यामुळें चारमायडीसचा अंतरात्मा गार झालेला होता, व रागरागिण्याचें गायन ऐकून तो रंगांत आलेला होता.

शहाणपणानें उपयोग केला असतां, दामाजीपंत पाहिजेल तें करील. त्याची कर्तबगारी कांहीं विलक्षण असून, त्याचें तेज व गुण फारच अप्रतिम. तो असा तसा नाहीं. सर्व पंतांचा तो पंत आहे. दुर्गा देवीकृत दुष्काळाचेवेळीं खुद्द यमाजीशीं टक्कर मारून त्यानें किती तरी गोरगरीबांचे प्राण वांचविले. त्याची कृपादृष्टि झाली ह्मणजे आपणास कल्पद्रुमच लाभला असें ह्मटलें पाहिजे. गोड व उत्तम हवा, हवाशीर व प्रशस्त घर, ज्ञानदायक व मनोरंजक पुस्तकें, सुरस गायन इत्यादि गोष्टी जर उपभोगायोग्य असतील, तर दामाजी त्या तेव्हांच आणून देईल. फुरसतीचा कांहीं उपयोग करून घेणें असल्यास, दामाजीला सांगा, कीं ती त्यानें आणून दिलीच. तीर्थयात्रा व देशाटन करून सृष्टींतील अद्भुत चमत्कार व स्थळें पाहण्याची इच्छा असल्यास, दामाजी आपल्याला वाटखर्चाची तजवीज तेव्हांच करून देऊन मार्गस्थ करितो. दामाजीच्या आश्रयानें इष्टमित्रांना व आप्तजनांना संकटांतून मुक्त करून, त्यांचें कल्याण करून दिल्याचेंही श्रेय मिळवितां येतें. त्यास योजक मात्र चांगला मिळाला पाहिजे. कसेंही काम असो, तो तें करण्यास निरंतर एका पायावर राजी असतो.

पैशाचा उपयोग ह्मटला ह्मणजे दान आणि भोग; परंतु या दोन्हीं मार्गांनीं त्याचा उपयोग न करितां केवळ हांव ह्मणून जो त्याचा संचय करितो, व ज्याचा मितव्ययीपणा अत्याचाराच्या शिखरास जाऊन पोंहचलेला असतो, त्यास कृपण असें ह्मणतात. त्याच्या लोभाला पारावार नसतो. रात्रंदिवस पैसा मिळविण्यांत तो इतका गर्क होऊन गेलेला असतो कीं, जणो काय पैसा मिळविण्याचें तो एक यंत्रच बनलेला आहे. एका संस्कृत कवीनें त्याची मजेदार व्याजस्तुति केलेली आहे ती अशी:—

कृपणेन समो दाता भुवि कोऽपि न विद्यते ।
अनश्नन्नेव वित्तानि यः परेभ्यः प्रयच्छति ॥

दुसऱ्या एकानें ह्मटलें आहे :—

कृपणस्य कृपाणस्य च केवलमकारतो भेदः ॥

व्यवहारांत सदैव लक्ष्यांत ठेवण्याजोगे जे कांहीं उपदेश आहेत, त्यांतलाच हाही एक आहे, कीं आपल्या मागें क्षुल्लक व भिकार उपाधि नसाव्यात, आणि पैशाचा अतिलोभ व तत्संबंधीं विवंचना ह्या फारच हलकट व भिकार होत असें समजलें पाहिजे.

पैशाचा विनियोग शहाणपणानें करितां येणें ही गोष्ट ल्हानसहान नाहीं.

डेव्हनशायरचा अर्ल एडूवर्ड कोर्टने याच्या थडग्यावर लिहिलेला लेख सुप्रसिद्ध आहे. तो आह्मीं महाराष्ट्रजनांना आपल्याच भाषेंत सादर करितों :—

आहे मदीय दिधलें स्वजनांस जें कीं ।
होतें मदीय धन, वेंचियलें विलोकीं ॥
जें दीधलें नच जयासहि वेंचियेलें ।
कष्टूनि तें मिळविलें परि व्यर्थ गेलें ॥ १ ॥

संस्कृतांतील पुढील सुभाषितांचा तरी हाच अर्थ आहे :—

यद्ददासि विशिष्टेभ्यो यच्चाश्नासि दिने दिने ।
तत्ते वित्तमहं मन्ये शेषं कस्यापि रक्षसि ॥
दानं भोगो नाशस्तिस्रो गतयो भवंति वित्तस्य ।
यो न ददाति न भुंक्ते तस्य तृतीया गतिर्भवति ॥

या दोन संस्कृत उक्तींत आणि त्यांवरील आंग्ल कवीच्या वचनांत अर्थसादृश्य फार आहे. यावरून सर्व देशांत व सर्व काळांत सत्पुरुषांचे विचार सारखेच प्रगल्भ व उदात्त असतात, या वचनाची प्रतीति येते.

मनुष्याच्या अंगीं उधळेपणा नसावा हें खरें; पण त्याचा हात सढळ असावा.

“ तनिम्ना शोभंते गलितविभवाश्चार्थिषु नृपाः ” अशी भर्तृहरीची उक्ति आहे, व याच अर्थसादृश्याचे विचार बायबलांतील ‘ प्राव्हर्ब ’

म्हणजे म्हणी या भागांत आढळतात. त्यांची यथामति केलेली प्रतिकृति वाचकांना सादर करितों :—

## साक्या.

॥ परार्थ वेंची धन जो सारें निर्धन धनिक असे तो ॥
॥ नेदी कोणा किमपि जगतीं धनिक दरिद्री गमतो ॥ १ ॥
॥ दीन दुबळा साह्य करितो प्रभु त्यांचा सहकारी ॥
॥ एकपरीनें देती त्यांना द्विगुणित दे कंसारी ॥ २ ॥

स्वत: मिळविलेल्या धनदौलतीवर मनुष्यमात्राची सत्ता निरंकुश असते; परंतु वडिलोपार्जित आलेल्या मालमत्तेची गोष्ट तशी नाहीं. त्यांत दायादांचा विभाग असल्यानें, त्यावर आपली मालकी सर्वतोपरी नसते. या गोष्टीस अनुलक्षून येशूख्रिस्तानें एका धनिकास केलेला बोध व्यक्तिमात्रानें घेण्याजोगा आहे. तो हा कीं, आपण आपल्या मुलाबाळांचा समाचार घेतों, त्याप्रमाणेंच गोरगरीबांचाही घेतला पाहिजे.

दुसरें, या जगांत धनिकांनीं हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, संग्रहीं असलेल्या वित्ताचे आपण केवळ जिम्मेदार आहोंत, मालक नाहीं. त्याचा सद्विनियोग करणें श्रेयस्कर असून भूषणावह आहे. आपल्याला संग्रहीं असलेल्या वित्ताची झडती द्यावी लागणारच. तेव्हां त्यावेळीं खालीं पाहण्याचा प्रसंग न येऊं देण्याची खबरदारी ठेविली पाहिजे. संपत्तीचा गर्व वाहणें अगदीं निरर्थक आहे.

‘ तनका नहीं भरोसा बे । देखे काल तमासा बे ॥
ये तो दो दिनकी जिनगानी । मत करना मगरोरी ॥
माया दौलत कुच नही तेरी । ये तो धूप छावकी फेरी ॥
तुटेगी अगबतकी जब दोरी । पलख नहि सबुरी ’ ॥

हा साधुराज कबीर यानें हडसून खडसून केलेला बोध, या जगांत सर्वांनीं विशेषत: धनिकांनीं सदैव लक्षांत ठेविला पाहिजे.

बायबलांतही अशा अर्थाचीं वचनें आढळतात. टिमोथी नांवाच्या एका साधूनें बोध केलेला आहे, तो असा :—

‘ धनिकांनों, तुम्हीं पैशाचा वृथाभिमान बाळगूं नका. लक्ष्मी फारच चंचळ आहे, दोन प्रहरच्या सावलीप्रमाणें ती केव्हां निघून जाते हें

कळतसुद्धां नाहीं. तिजवर विश्वास ठेवूं नका; भरंवशाचें ठिकाण परमेश्वर. त्याच्याच कृपेनें संसारांत लागणाऱ्या वस्तु आपल्याला लागतील तितक्या प्राप्त होतात."

"धनिकांनों, तुह्मीं सदाचरणांत आपला वेळ घालवा; आपलें वित्त व जीवित परोपकारांत खर्च करा; सदाचरणांत श्रीमंती मिळवा. ईश्वरानें दिलेल्या संपत्तीचा व ज्ञानाचा गोरगरिबांत प्रसन्न अंतःकरणानें प्रसार करा."

"धनिकांनों, तुमचें जीवित अत्यल्प आहे हें खूप लक्षांत ठेवा; यमाजीचा घाला केव्हां येईल याचा नेम नाहीं. यास्तव आपली कीर्ति अजरामर करण्याकरितां सदां सर्वदा सुकृतांचा संचय करा."

"बायबलांत दुःखांचें मूळ ह्मणून जें सांगितलें आहे, तें धन नाहीं; तर धनाची हांव हें होय. लक्ष्मी कृपावती होऊन धनधान्याची समृद्धि झाली असतां, आपलें सर्व तनुमन केवळ तिच्याच पायीं अर्पण करूं नका."

"इहलोकीं पृथ्वीतलावर नश्वर अशा धनराशीचा संग्रह करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, त्यांना कसर लागून किंवा जंग चढून मलीन होण्याची भीति असते. शिवाय चोरटे व दरोडेखोर यांचें भय निराळेंच."

"वित्तापाशीं चित्त लागतें," यास्तव परलोकीं—वैकुंठांत किंवा कैलासांत—सुकृतधनांच्या राशींचा संचय करून ठेवावा. त्यांना कशाचीही भीति ह्मणून नाहीं. कसर लागून किंवा जंग चढून त्या मलीन होत नाहींत, अथवा चोरांनाही त्या हरण करितां येत नाहींत.

यास्तव जगद्गुरू श्रीशंकराचार्य यांनीं केलेला बोध—"॥ मूढ जहीहि धनागमतृष्णां कुरु तनुबुद्धे मनसि वितृष्णां ॥ यल्लभसे निज कर्मोपात्तं वित्तं तेन विनोदय चित्तं ॥"—याचें नेहमीं मनन करावें व तदनुरूप वागण्याचा क्रम ठेवावा, ह्मणजे आपली दुःखमय संसारयात्रा किती तरी सुखप्रद होईल.

———

# षष्टिवार्षिकमहोत्सव

## अथवा

# डायमण्ड ज्युबिली.

चालू साल व त्यांत चालू महिना, इंग्लंडच्या किंबहुना ग्रेटब्रिटनच्या लोकांस ऐहिक परमानंदाचा वाटत आहे, हें अगदीं स्वाभाविक आहे. एकाच तक्ताधिपतींचें आमच्या दयाळू महाराणी सरकाराइतकें दीर्घकाळ राज्य झालें नाहीं, तेव्हां या अपूर्व प्रसंगीं त्यास अभूतपूर्व असाच आनंद होऊन, तो प्रदर्शित करण्यासाठीं त्यांणीं तसाच अनन्यसदृश महोत्सव केला, तर त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहीं नाहीं. कर्मधर्मसंयोगानें भारतीयांचाही त्या दैववान्, प्रतापशाली व संपन्न राष्ट्राशीं परमेश्वरेच्छेनुरूप निकट संबंध जडला आहे, ह्मणून त्याच आनंदाचे भागीदार आह्मींही झालों आहों. राणीसरकारच्या कारकीर्दींत इंग्लंडच्या लोकांची सर्व दिशांनीं पुरोगति झाली, व या पृथ्वीवर निरनिराळ्या राष्ट्रांच्या मनांत त्यांच्याविषयीं कोठें आदर, कोठें भीति, कोठें हेवा अशा नानाप्रकारच्या मनोवृत्ति प्रकट झाल्या, व या सर्वांवरून त्यांची सुस्थितीच स्थापित होते. त्याच मानानें त्यांच्या ताब्यांतील वसाहतींस कमी अधिक मानानें सुखप्राप्ति झाली, व त्यांचेंही शास्त्र, ज्ञान, कलाकौशल्य व नीति या सर्व गोष्टींत पाऊल पुढें पडलें. त्यांतच हिंदुस्थानासही गणलें पाहिजे. इतर वसाहतींमध्यें जसा महाराणी सरकारचा जयजयकार होईल, तसा हिंदुस्थानांतही होणें स्वाभाविक आहे, आणि तसा होण्याची जिकडे तिकडे जय्यत तयारी सुरू आहे, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. अशा प्रसंगीं या महोत्सवाप्रीत्यर्थ आह्मींही दोन शब्द लिहून प्रस्तुत प्रसंग साजरा करण्याचा विचार केला आहे.

आह्मांपैकीं कांहीं वरवर पहाणाऱ्या लोकांस या महोत्सवाची फार चीड आहेसें दिसतें. त्यांचें ह्मणणें इंग्लंडचे लोक यासंबंधानें नंगानाच घालोत, आपल्या सगळ्या घराला हिरे माणकें लावोत, घरांत असेल नसेल तें विकून नेमलेल्या दिवशीं झकपक दिमाखाची हात धरोत, त्यांच्या तिकडे १००० पौंड देऊन राणीसरकारची मिरवणूक पहाण्यासाठीं एक घर भाड्यानें घेवोत. त्याच पांच मिनिटांच्या नेत्रसुखासाठीं १०० पौंड देऊन एक खिडकी आखून ठेवोत, अगदीं गोरगरीब लोकसुद्धां दोन महिने उपास काढून या चैनीसाठीं एक जागा राखून ठेवण्यास ४ पौंड उधळून टाकोत; पण आह्मीं हिंदुलोकांनीं दारूकाम सोडण्यांत, मेजवान्या करण्यांत, पुतळे बसविण्यांत अथवा या समारंभानिमित्त एखादी संस्था उभी करण्यांत कां होईना, याप्रसंगीं पैशाची उधळपट्टी कां करावी? आमचें कल्याण असें काय झालें आहे, ह्मणून बादशाहीण ह्मणविणाऱ्या महाराणी सरकारांचा आह्मीं जयघोष करून त्यांस दीर्घायुष्य व अक्षय्य सुख चिंतावें? त्यांत यंदाचें साल भयंकर दुष्काळाचें; पुढलेंही तसेंच जातें कीं काय याची भीति आहेच. अशा प्रसंगीं आह्मीं आनंदोत्सव करणें बिलकुल वाजवी होणार नाहीं. बरें, इंग्रज लोकांस आनंद ह्मणून आह्मांस आनंद, तसें ह्मणावें तर, त्यांची आजवर झालेली व हल्लीं होत असलेली आमच्याशीं वर्तणूक तरी तशी ह्मणण्यासारखी दयाळूपणाची व न्यायीपणाची असावी! राणीसरकारच्या राज्यापूर्वीच आमची पेशवाई बुडाली होती, व त्यांच्या राज्यांत आमचीं दुसरीं पुष्कळ राज्यें खालसा झालीं. सत्तावन सालचें बंड होऊन सर्व हिंदुलोक दगलबाज व बेइमानी अशा समजुतीवर अम्मलबजावणी चालली आहे. बुद्धीचा, नीतीचा व शक्तीचा ऱ्हास एकसारखा चालला आहे. अशा स्थितींत, मोर नाचतो ह्मणून लांडोरीनेंही नाचूं लागावें, हें नीट नाहीं. इंग्लंडचें वैभव इंग्लंडाला; त्यांनीं सरी घातली ह्मणून आपण दोरी घालावी, हें अविचाराचें व अत्यंत वेडेपणाचें काम आहे. अहो, ज्यांनीं आमचे घर धुवून नेलें व नेत आहेत, त्यांच्या राज्याचा जयजयकार करण्या इतका नामर्दपणा

? निलाजरेपणा आम्हीं दाखवावा काय? असो. अशा धोरणावर विचार करणारे कांहीं लोक आहेत, परंतु त्यांच्यामध्यें खरोखर सत्यज्ञान व दूरदृष्टी यांचा पूर्ण अभाव आहे यांत कांहीं शंका नाहीं.

स्वराज्याची इच्छा असणें हें कांहीं वावगें नाहीं; परंतु आपल्या देशकालस्थितीचा विचार न करतां आपणास आहे तें दुःख वाढविण्यांत अर्थ काय? आपला ज्यांचा संबंध जडला आहे. ते लोक अमानुष आहेत कीं काय, आपली आलेली स्थिति ही त्यांनीं आणली आहे काय, हल्लीं असलेल्या स्थितींत आपणास समाधानाच्या गोष्टी किती आहेत, हल्लीं आहेत यापेक्षां चांगले दिवस येणार असतील तर ते कोणत्या प्रकारानें येतील, सांप्रत आपणांत कोणकोणते दोष आहेत, ते जातील कसे, या सर्वांचा विचार न करतां उगीच दुर्मुखलेल्याप्रमाणें वागून आपलें अहित करून घेणें, हें शुद्ध वेडेपणाचें नव्हे काय? आपण कांहीं दिवस स्वराज्यसुखाचा अनुभव घेऊन, हिंदुस्थानांतील बहुतक सर्व लोकांस आपल्या तरवारीचें पाणी दाखविलें आहे, व हरएक प्रकारचे मुत्सद्दीपणाचे चार डावही आपण खेळलों आहों, तर परक्या लोकांवर अम्मल करतांना राज्य कर्त्यांच्या मनोवृती व वर्तनक्रम कसा असतो, ह्याची कल्पना करणें आपणास कठीण जाऊं नये. राज्यनीतीचे नानारूप ढंग आपण ओळखून, मानव जातींतील लोकांकडून, देवलोकींच्या वर्तनाची अपेक्षा करीत बसणें हें वेडेपण आहे; आणि तशी अपेक्षा करून त्यांत निराशा झाल्यास त्याचा दोष आपण दुसऱ्यास कां लावावा? परकीय अम्मल ही कांहीं सुखाची गोष्ट नाहीं. त्यांत अभिमान व आनंद मानण्याजोगें कांहीं नाहीं; पण परकीय अमलांतच जर रहावयाचें, तर हल्लींच्या आमच्या प्रभूंचा अम्मल फार चांगला व आपली सुधारणा होण्यास फार अनुकूल, अशाबद्दल महाराणी सरकारच्या राज्याच्या या साठव्या वर्षीं आपण आपल्यापरी आनंदमहोत्सव करणें वाजवी आहे. त्यांच्या उदाहरणानें व शिक्षणानें आपल्यांत त्यांच्या सुखाचा प्रादुर्भाव व्हावा, अशा तंत्रावर आपण वर्तन ठेवावें, व योग्य मार्गांनीं

आपला स्वराज्याचा काल येईपर्यंत गुण्यागोविंदानें राहून, आपल्या र
कर्त्यांच्या आनंदाबरोबर आनंद, व दुःखाबरोबर दुःख करीत
यांतच आमची उत्कृष्ट राजनिष्ठा व स्वहितसाधकता आहे
समजलें पाहिजे. आह्मांपैकीं थोर व दूरदर्शी लोक सांप्रतच्या
स्थानच्या स्थितीस शिक्षणकाल असें ह्मणतात. हल्लीं आ
भावी उन्नतावस्थेस अनुरूप असें शिक्षण मिळत आहे, त्याचा
श्वराच्या दयेनें, आमच्या हल्लींच्या प्रभूंच्या उत्तेजनानें, पुढील क
चांगला उपयोग होणार आहे. दुसऱ्या अशास्त्र लोकांच्या
सांप्रत काल हा प्रायःश्चित्तकाल आहे, ह्मणजे सुखोपभोग
कालीं केलेल्या अत्याचाराबद्दल हल्लीं आपणांस परमेश्वरानें शाप
आहे. दोहोंचा अर्थ एकच. आमच्या केवळ कल्याणासाठींच
श्वरानें इंग्रज लोकांशीं आमची सांगड घातली आहे, त्याअर्थीं
जगन्नियंत्यावर भार घालून हल्लींचा षष्टिवार्षिकसमारंभ मोठ्या
करणें आपलें कर्तव्य आहे.

आह्मांवर तिचें राज्य असो सदा ॥ तिच्या राज्यपदा ढळ नसो ॥
पृथ्वीवरी तिचें राज्य चिरकाळ ॥ राहिल्या सकळ सुख आह्मां ॥
लोकसुखासाठीं जे केले कायदे ॥ रक्षितां फायदे होती आह्मां ॥ १
तिनें ते आमचे कायदे रक्षावे ॥ जना सुख द्यावें हेंच मागों ॥ १
आह्मीं सर्व लोक तिचीं गाऊं गाणीं ॥ ऐशी आमुची राणी कीर्ति करो ॥

मराठी पांचवें पुस्तक

---

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा.क्र. 14079
891.464
वाई जि. सातारा